कृष्णाजी अनंत सभासद विरचित

छत्रपती श्रीशिवाजीराजे यांची बखर

संपादक
शंकर नारायण जोशी



" पुण्यश्लोकनृपावळींत पहिला होवोनि जो राहिला।
जो राजा असतां समस्त महिला विश्रांति शेषाहिला।
'कृष्णोक्तें'[1] अवगाहिला हि 'परमानंदें[2] हि जो गायिला।
जो नामें शिवराज भूपति सदा तो पाहिजे पाहिला " ॥१

— रघुनाथपंडित कृती—
थोडी बदलून

१. कृष्णाजी अनंत सभासद—प्रस्तुत बखर.
२. कवींद्र परमानंदकृत 'शिवभारत.'

कृष्णाजी अनंत सभासद विरचित

छत्रपति श्रीशिवाजीराजे

यांची बखर

[व्यक्ति-स्थल सूचि, शब्दसूचि, कालपट, सविवरण विस्तृत टिपणी, 'सभासद' व 'बखर'-ग्रंथ यांविषयीं नवी माहिती, बखर-छायाचित्र, शिवाजीमहाराजांचें पत्र व मुद्रा व नाणीं यांसह]

संपादक :

श्री. शंकर नारायण जोशी

संशोधक सभासद भा. इ. सं. मं. पुणें.

किंमत : रु. ४

चित्रशाळा प्रकाशन पुणें-२

प्रकाशक :—
दामोदर पांडुरंग रानडे
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रकाशन,
५६२, सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति
आश्विन व॥ १३ शक १८८२
१८ ऑक्टोबर १९६०
किंमत रु. ४

मुद्रक :
के. ग. शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

अर्पण--

ज्यांच्यामुळें माझ्या आयुष्याला, तारुण्याच्या तोंडींच द्रव्यार्जना-बरोबर विद्यार्जन व त्यागमय जीवनाचें वळण लागलें व मी थोडा उन्नत अशा प्रकाशांत आलों त्या **श्रौतस्मार्तमार्तंड, आयुर्वेदमार्तंड, वेदशास्त्रसंपन्न, सोमयाजी,** ' मोदवृत्त ' (साप्ताहिक) व ' धर्म ' (मासिक) ह्या नियतकालिकांचे संपादक, अनेक वेदस्मृतिपुराणग्रंथांचे मान्यवर **भाषांतरकार काशिनाथ वामन** तथा **भाऊशास्त्री लेले वांईकर** ह्यांच्या तेजस्वी स्मृतीस ही माझी अल्पकृति सादर समर्पण.

शंकर नारायण वत्सजोशी, वांईकर.

प्रकाशकाचे दोन शब्द

प्रस्तुत '**शिवाजी चरित्राची बखर**' प्रसिद्ध करण्यास फार समाधान वाटत आहे. 'चित्रशाळे' ची निर्मितीच त्यासाठीं आहे हें साक्षेपी वाचकांस व तज्ज्ञांस सांगणें नको. तेव्हांपासून म्हणजे (इ. १८७८ काव्येतिहाससंग्रह) संशोधनासहि प्रारंभ झाला त्यापासून, आज जवळजवळ शंभर वर्षें होत आलीं हें इतिहास-संशोधन, वैयक्तिकरीत्या व संस्थांद्वारां चालू आहे.

त्या संशोधनाच्या अभ्यासांतील पुढली पुढली पायरी ह्या दृष्टीनें 'बखर' तीच पण अन्य प्रकाशित अव्वल साधनांची जोड देऊन व इतर सूची इत्यादि आवश्यक भागांसहित हा ग्रंथ प्रकाशित होत आहे हा ह्या ग्रंथाचा विशेष आहे.

ह्यापूर्वीची साने प्रकाशित आवृत्ति आर्यभूषणमध्येंच मुद्रित झाली होती व हीहि आवृत्ति तेथेंच मुद्रित झाली आहे हाहि एक योग आम्हांस उल्लेखनीय वाटतो. **इतिहासाचार्य राजवाडे** यांचे स्वतंत्र पुनर्मुद्रित ग्रंथ चित्रशाळेनेंच प्रकाशित केले व त्या ग्रंथांप्रमाणें 'इतिहासमंजिरी' (द. वि.आपटे) व आतां हें सभासद-रचित शिवचरित्र त्यांचे शिष्य श्री. शं. ना. जोशी सुप्रसिद्ध इतिहास संशोधक ह्यांचेकरवीं संपादित होऊन प्रकाशित करीत आहों. ह्यापूर्वीं श्री. शं. ना. जोशी ह्यांनीं भा. इ. सं. मं. त अनेकानेक ऐ. कागद व लेख व ग्रंथ व शकावली प्रसिद्ध केल्या आहेत. वरील 'काव्ये० सं. पत्रें यादी' ह्या ग्रंथाच्या प्रकाशनांतहि प्रस्तुत संपादकांचा कार्यभाग नमूद आहे. त्यांच्या "भाऊसाहेब बखर' ह्या संपादनकार्यास म. म. प्रा. द. वा. पोतदार '**ही पहिलीच संस्करण आवृत्ति**' म्हणून गौरवीत आहेत. तसाच हाहि ग्रंथ आहे ह्यांत संशय नाहीं. हा ग्रंथ **महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, इतिहासाभ्यासी** आणि नागरिक ह्या सर्वांनाच वाचनीय व अभ्यसनीय आहे हें सांगण्याची येथें संधि घेतों. महाराष्ट्रेतिहासाचें अध्ययन व अध्यापन ह्यांची पातळीच थोडी उंचावेल असा हा नम्र प्रयत्न पुढें ठेवीत आहों. पुढील आवृत्तींत अधिक भर व सुधारणा करण्याचें मनांत आहे हेंहि येथें व्यक्त करीत आहों.

ता. १८ ऑक्टोबर १९६०

—**प्रकाशक**

निवेदन

कृष्णाजी अनंत सभासद लिखित श्रीशिवाजीराजांचें चरित्र, रूढ नांव **'सभासद बखर'** ह्या ग्रंथाची ही नवीन संस्करण आवृत्ति किंवा नवीन सटीप आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. कैं. गु. रा. ब. का. ना. साने ह्यांनीं इ. १८८१ मध्यें पहिली आवृत्ति 'काव्येतिहाससंग्रहांत' 'मासिक' रूपानें प्रकाशित केल्यानंतर इ. १८८९, १९१२ व १९२३ मध्यें ह्याच ग्रंथाच्या, प्रत्येक पुढल्या आवृत्तींत थोडथोडी सुधारणा करीत चार आवृत्ति प्रसिद्ध केल्या. प्रस्तुतची पांचवी म्हणजे **पहिली नवी संस्करण आवृत्ति** साने ह्यांच्या चवथ्या आवृत्तीचेंच मूळ गृहीत धरून पण सुधारून, कांहीं चुका दुरुस्त करून प्रसिद्ध होत आहे. ह्या आवृत्तींत कोणकोणत्या गोष्टी नवीन आहेत व त्यामुळें पहिल्या आवृत्तीचें स्वरूप कसें बदलून गेलें तें प्रास्ताविकांत निर्दिष्ट केलेल्या गोष्टींवरून कळून येईल. त्या गोष्टी आणि प्रकरणवार जोडलेली शेवटची टिपणी, कालपट, सूची, शब्दकोश, ह्याहि गोष्टी नवीनच आहेत. ह्यावरून ह्या आवृत्तीचें नांव नवी 'सटीप आवृत्ति' हें सार्थ वाटेल हा भरंवसा आहे. पूर्वप्रसिद्ध आवृत्तींत नवीन दोन आवृत्तींचा उपयोग केल्यामुळें सभासदांची मूळ संहिता आतां कमी संशयाची व्हावी असा यत्न केला आहे.

प्रकृतिमान लक्षांत घेतां आणि इतर मानसिक उपाधींची व्यग्रता बाजूस सारून आर्यभूषण छापखाना, इतर कांहीं प्राध्यापक व प्रकाशक मंडळी ह्यांच्या त्वरेमुळें हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. येथेंच हेंहि सांगणें कर्तव्य आहे कीं, ह्या ग्रंथसंपादनासाठीं व प्रकाशनासाठीं पुणें विद्यापीठ, महाराष्ट्रग्रंथोत्तेजक संस्था, श्रीमंत राजे तात्यासाहेब मिरजकर पटवर्धन ह्यांचें अनुक्रमें ५००, २००, १०० हें आश्वासनपूर्वक साहाय्य न मिळतें तर वाढत्या महागाईत हा ग्रंथ प्रसिद्ध न होता. म्हणून ह्या सर्वांचें हें ऋण मजला सदैव प्रोत्साहकच होईल ह्यांत शंका नाहीं. सर्वांचा फार आभारी आहें. तसेंच भा. इ. सं. मंडळ व तत्संलग्न संस्था ह्यांचेहि मी आभार मानतों. अधिक लिहिणें नलगे.

शं. ना. जोशी

प्रास्ताविक

सभासद संज्ञा व अधिकार :—ह्या बखरग्रंथाचा लेखक **कृष्णाजी अनंत** हा असून तो '**सभासद**' ह्या पदाचा अधिकारी आहे. इतिहासकालीं 'सभासद' ह्या शब्दाचे दोन अर्थ: 'सभेमध्यें बसलेले जाणते लोक ते सभासद,' हा एक अर्थ. स. प. पृ. ११७ वर 'निर्वाह पत्र' म्हणून एक वाटणीचा निवाडा दिला आहे (इ. १६६३). त्यांत म्हटलें आहे— 'मजालसीस लोक ज्यास वृत्ति आहेत, वृत्तीचे व्यवहार जिहीं निवडिले आहेत, देखिलें, ऐकिलें, ऐसे लोक मजालसी सभेस बैसविले होते.' (मजालसी सभा ज्ञेया' राज्यको. पण ह्यांत पाठभेद आहे व तो लक्षांत घेतला पाहिजे. 'मजलस' म्हणजे सभा आणि 'मजालसी' म्हणजे सभासद. 'सभासत्स्यान्मजालसी।' ७) 'सभासदीं विज्ञानेश्वरीचा शास्त्रार्थ पाहिला. ऐसे पंडित विद्वांस यांच्या मुखांतरें विज्ञानेश्वरामध्यें वृत्तीच्या विशेष विवंचना ज्या होत्या त्या मनास आणणारे' ते सभासद. 'सभायां सीदति' सभेमध्यें बसतात पण जे वरील योग्यतेचे आहेत ते सभासद, हा एक अर्थ आणि दुसरा अर्थ 'सभासद' ह्याच नांवाचा 'राज्यकारभारांतील अधिकारी.' तोहि गुणी, जाणता आणि लढवय्या असावयाचा. ह्या 'सभासद' हुद्याचा अंमलदार शिवकालापासून तर आहेच; पण पुढेंहि पेशवेकालीनहि ह्या पदाधिकाऱ्यांचे निर्देश आढळतात. शिवकालीन 'सभासद' हें किल्ल्यावरील अधिकारीहि असून त्यांचा उल्लेख 'नामजाद' ह्या शब्दासह आलेला आहे. म्हणजे 'स्वतंत्र अधिकार देऊन मुद्दाम नियोजित करून पाठविलेला.' अशांची कांहीं यादीच येथें विषयनावीन्यास्तव दर्शित करतों—

[१]पदो नारायण	सभासद	नाभजाद	किले कोंढाणा	इ. १६५८
[२]विठ्ठल [३]गोपाळ	,,	,,	कारकून सुभा दाभोळ	इ. १६९६
महादाजी बलाळ	,,	,,	,,	इ. १६९८
[४]त्र्यंबक कृष्ण	,,	,,	सुभा प्रांत व्याघ्रगड	इ. १७००
[५]बालाजी विश्वनाथ	,,	,,	व कारकून प्रांत पुणें	,,
[३]दादाजी कान्हो	,,	,,	तर्फ लांजे	इ. १७०७

---

१ शिचसा २ ले. ९८. २, ३ सघइ पृ. ३६ ले. ५२ पूर्वार्ध भाग पृ. ४० ले. ५६. ४ शिचसा ५ ले. ७७. ५ पे. द ३० ले. १.

(ह्याचेंच वाचन बाबाजी असें झालें असावें. मोडीमध्यें दा, बा, चीं वळणें सारखींच आहेत.)

[६]कृष्णाजी बाजी हा चिमणाजी दामोदर ह्यांच्या पदरचा सभासद आहे. इ. १७०८-२८.

[७]विष्णु रुद्र हा स्वारी राजश्री पंतसचिव इ. १७०९

[८]गंगाजी काशी सभासद सेवक राजमंडळ इ. १७११

[९]राघो रुक्मांगद, [१०]राघो अनाजी हा प्रतिनिधींच्या दिमतींतील आहे. [११]बाळाजी भिकाजी बहुश्रुत हा पेशव्यांकडील आहे. असो. ह्यांमध्यें जसें गडकिल्यावरील व स्वतंत्र नेमलेले 'सभासद' अधिकारी आहेत त्याप्रमाणें निरनिराळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाताखालचेहि सभासद-पदाधिकारी आहेत. 'बाळाजी विश्वनाथ' हे जे पुढील प्रधान पेशवे, त्यांचाहि उल्लेख 'पुणें प्रांताचा सभासद' म्हणून राजारामकालीन आहे. गंगाजी काशी ह्याचाहि उल्लेख वर आला असून तो जसा राजमंडळाकडील आहे तसांच प्रस्तुत बखरलेखक 'कृष्णाजी अनंत' हा 'सभासद राजमंडळ' आहे. पाठांतर व चित्रगुप्तबखरमध्यें तसें स्पष्ट दिलें आहे. कांहीं सभासदांना मुद्राधिकारहि आहे. सबनीस वगैरे अधिकाऱ्यापेक्षां सभासद हा वरचा अधिकारी आहे. 'दादाजी[१२] कान्हो यास रत्नागिरीची सबनिसी होती. हुजूर सभासदांत आसामी घालून तनखा पादशाही होन ७०० सांगितला' आहे. जे सभासद एखाद्याच्या पदरचे असतात त्यांचा तनखा शें, दोनशें. पण हुजूर राजमंडळांतील सभासद यांचा तनखा वेगळा व तो वर दिला आहे. बाळाजी विश्वनाथ व कृष्णाजी अनंत इ. हे अशांतील होत. कांहीं 'गोतसभां'तुन 'राजमुद्रा' ह्या शीर्षकानें जे निर्दिष्ट आहेत त्यांत 'सभासद' आहेत.

कृष्णाजी अनंत सभासद

छत्रपती राजाराम कर्नाटकांत जिंजीस जातांना जी कार्यकर्ती मंडळी त्यांनीं बरोबर घेतली (इ० १६८९ आक्टो. ते डिसें.) त्यांत ही मंडळी आहेत—

---

६ इ. सं. पेदसमा पृ. ३३६. ७ खं. १५ ले. २९०. ८ पेद ३० पृ. २२९. ९ पेद ७ ले. २६. १०, ११ इ. सं. पेदसमा पृ. ३२४. १२ पे. द. ३० पृ. २३०.

अग्रे सेनापतिः पश्चात् **मानसिंहो**ऽरिमर्दनः ।
सत्यप्रतिज्ञः **प्रल्हादः** श्रीप्रल्हाद इवापरः ।
हरिभक्तः सुमतिमान् नृपसेवाविशारदः ।
तद्धस्तकोऽ**नंतसुतः कृष्णशर्मा** [1]महामतिः ॥ १८

म्हणजे मानसिंह–मानाजी मोरे, प्रल्हाद निराजी, आणि महामति कृष्णाजी अनंत. त्यांतील प्रल्हाद निराजीच्या पदरीं हा कृष्णाजी अनंत सांगितला आहे. प्रल्हाद निराजी हा प्रथम लष्करच्या सबनीसीकडे असे. पण पुढें हा भागानगर येथें कुत्बशहाकडे छत्रपती शिवाजी राजांचा परराष्ट्रमंत्री म्हणजे वकील म्हणून होता. नंतर न्यायाधीशहि [2]झाला. अशा त्या कर्तबगार अधिकाऱ्याबरोबर जात्या हुषार असलेला हा कृष्णाजी अनंत कर्नाटकचाहि चांगला माहितगार होता व म्हणून राजारामानें त्यास आपल्या बरोबर आपत्प्रसंगीं घेतलें चित्रगुप्तबखरीमध्यें शिवाजीच्या सुभेदारांची यादी देतांना ब्राह्मण सुभेदारांत कृष्णाजी अनंताचा उल्लेख आहे. तेथें कोणच्या परगण्याचा हा सुभेदार हें दिलेलें नाहीं.

सारांश '**सभासद**' ह्या हुद्याचे अंमलदार राज्यकारभारांत आहेत. पण ते सर्व, राजमंडलांतील होत असें नाहीं. 'हुजूर राजमंडलांतील' सभासदत्व तें वेगळें. आणि त्यांतील हा कृष्णाजी अनंत दिसतो. पुढें कदाचित् सभासद हेंच त्याच्या घराण्याचें आडनांव रूढ होणेंहि शक्य आहे. प्रल्हाद निराजीकडील कृष्णाजीचा संबंध लक्ष्यांत घेतां इ. स. १६६८ पासून हा बखरलेखक शिवाजीच्या राज्यकारभारांत प्रविष्ट असावा असें सामान्यतः समजण्यास हरकत नाहीं. 'प्रधानमंडळ' असा उल्लेख कागदोपत्रीं सामान्यतः कोठें आढळत नाहीं. पण 'राजमंडळ' हा शब्द येतो. आणि ह्या राजमंडळांतील हा सभासद आहे. ('राजमंडळ' हा एक परगणा, प्रांत, सुभा ह्यासारखा स्थलविशिष्ट भाग असावा असा एक उल्लेख इ. १६७७ मधील श्रीसंप्र. पत्रें ले. २४ मध्यें आहे त्यावरून वाटतें. म्हणजे 'सरकार' हें जसें प्रांतविशिष्ट देशविभागाचें नांव त्याप्रमाणें 'राजमंडळ' हेंहि असावें. 'प्रांत राजमंडळ' असें तेथें आलें आहे. ह्याशिवाय विशिष्ट खात्याला अनुलक्षूनहि हें नांव असणें शक्य. असो.) प्रल्हाद

१ छत्र. राजा. जिंजीप्रवास–वा. सि. बेंद्रे.

२ सभा. ब. परि, ६५, ७० व ९६ पहा.

निराजीच्या पश्चात् (इ. १६९४) हा कृष्णाजी, पेशव्यांचा मुतालीकहि झाला असल्याचें संकलन ग्रंथांत दिलें आहे. तेथें आधार दर्शित केलेला नाहीं. इ. १७०२ मधीलहि कृष्णाजी अनंताचा, पण नुसते 'नामजाद' म्हटलेला उल्लेख आहे (शिचसा ८ ले. ४८)–हा कोंढ्यावरील स्वारीप्रसंग आहे.

'सभासद' ह्या अधिकाराविषयीं आणि त्यांतील कृष्णाजी अनंत सभासद ह्या अधिकाऱ्याविषयीं याप्रमाणें थोडेसें नवीन आढळलें तें सांगितलें. आतां 'बखर' ह्याविषयींहि नवीन आढळलें. तें पुढीलप्रमाणें—

बखर:—हें 'सहीशिक्का असलेलें प्रमाण माहितीपत्र.'

बखर हें वाङ्मय महाराष्ट्रेतिहासाच्या साधनांतील प्रमुख भाग आहे. तो आकारांनीं जसा मोठा तसा गुणांनींहि मोठाच आहे. त्यांतील वाङ्मयीन गुणवत्ता इतर सर्व ऐतिहासिक गद्य साधनांपेक्षां श्रेष्ठच आहे; आणि ह्याचें कारण उघडच आहे कीं, तें वाङ्मय तयार होत असतांना पत्रादिकांपेक्षां लेखकाचें मन व बुद्धि जितकी वाङ्मयप्रधान असते तितकी पत्रादि लेखनसमयीं नसते. कारणहि नाहीं. ह्यामुळें सहजच महाराष्ट्रसारस्वताच्या प्रासादांतील बखरवाङ्मय हा साहित्यगुणी बहुमोल 'कल्याणमंडप' आहे, आकर्षक बहारदार दालन आहे; किंवा मनोज्ञ नृपांगण अथवा राजसदन आहे. वाङ्मयीन गुणांसाठीं मग तें व्याकरण असो; रस, अलंकार इत्यादि साहित्य असो; वा प्रसंग-कथन-गुण असो–ह्या बखरवाङ्मयाकडेच आपणांस वळावें लागेल. अशी त्याची विशिष्ट गुणश्रेष्ठता असली तरी त्या वाङ्मयांत कांहीं दोषहि आहेत. प्रस्तुत ह्या गुण-दोषाचा उल्लेख करण्यापलीकडे येथें आधिक कांहीं दर्शित करावयाचें नाहीं. येथें 'बखर' हें एक राजकीय–वा लोक-व्यावहारिक पूर्ण प्रमाण असें सहीशिक्यानिशीं सिद्ध होत असलेलें एक 'माहितीपत्र' होतें व हा ह्या बखरसंज्ञेचा नवा भाग थोडक्यांत सांगावयाचा आहे. 'बखर' हा एक 'पत्रप्रकार' होता. तो त्यावरील शिक्कामोर्तबामुळें सर्वांशीं प्रमाण असा होता. बखर म्हटल्याबरोबर आपल्या मनांत, एक ऐकीव कथात्मक, आठवणीवजा केलेलें गद्यलेखन येतें. आणि तें वास्तवगुणापेक्षां काल्पनिक गुणांनीं मिश्रित असें असल्यामुळें त्याचें स्थान दुय्यमातिय्यम असें मानण्याकडे प्रवृत्ति होते. तसा हा बखर शब्द नाहीं. 'बखर' ह्याच नांवाचा व इतर कचेरीपत्रें, सनदा वगैरे बनत, त्याप्रमाणें

कचेरीपत्रप्रकार होता, सभापत्रप्रकार होता, व तेथेंच तो बनेहि. क्रयपत्र, दुमालपत्र, अभयपत्र, देणगीपत्र इत्यादि जसे व्यवहारात्मक कागद रीतीप्रमाणें सिद्ध होत; त्याप्रमाणें हें 'बखरपत्र' तयार होई. न्यायनिवाड्याचे कामीं साक्षपत्र, चौकशीपत्र अथवा माहितीपत्र म्हणून हा बखरकागद बनत असे. त्यावर वर म्हटल्याप्रमाणें शिक्कामोर्तब होई; उपस्थितांच्या साक्षी घेतल्या जात व अधिकृतपणें तें 'पत्र' व्यवहार्य मानिलें जाई.

इ. १६८५ मधील एक तंटा व त्याचा झालेला निवाडा छापला आहे. हा तंटा तीनचार गांवच्या पाटलांमध्यें झालेला असून सिवडें, वराडें, सिरवडें व कोणेगांव ह्या गांवच्या भोसले पाटलांनीं जगदळे व घाटगे पाटलांचीं उभ्या पिकांचीं शेतें चारलीं, शेतांतील राहते माळे मोडले, आणीकहि कितेक आवाडाव करून मारामारी व धामधूम केली; जगदळे पाटलांच्या अंगावरील वस्ता-कानांतील मोत्यांसह कुडकीं, सेला, पासोडी-नेली; कडबा भूस-तुरीचे व बाजे हरजिनसी कूट-हि नेलें; तरवार व कोचकीहि नेली. ही नासधूस चांगली पन्नास बिघ्यांइतक्या मोठ्या शेतजमिनीची झाली. अर्थात् ह्याबाबत पुढें तक्रार-फिर्याद होऊन [1]निवाडा झाला. ह्याप्रसंगीं कविकलश छंदोगामात्य व इतर सरकारकून ह्या सरकारी अधिकाऱ्यांनीं देशाधिकारी (सुभेदार) व पारपत्यगार ह्यांना 'कलमाचे कलम' म्हणजे प्रत्येक बारीकसारीक प्रश्नाची तपशीलवार माहिती मागितली. शेतें पिकलीं किती, चारिलें काय काय, कुडक्यामधील मोतीं किती व सोनें कोठें खरीदी केलें, किंमती काय, इत्यादि सर्व सातहि कलमांची माहिती तेथील देशमूख, देशकुलकर्णी, भले लोक ह्यांचेकडून घेऊन 'शिकिया-साक्षीनसी बखैर' लिहून पाठविणें अशी आज्ञा केली आहे. सातहि कलमें पृथक् लिहून प्रत्येक कलमांत 'बखैर सिकियानसी' हे दोन्ही शब्द आले आहेत.

असाच दुसरा निवाडा पाटिलकीसंबंधाचा आला आहे. त्यांत 'कोनेर रंगनाथ देशाधिकारी प्रांत कऱ्हाड यांची 'बखेर' छ २७ जवल सुा समस समानैन (इ. १६८५ एप्रील २२) ची छत्रपती स्वामीस आणिली' असें स्पष्ट आलें आहे. म्हणजे सुभेदार हुजुर-दप्तरकडे म्हणजे छत्रपतींना दोघां पाटलांच्या

---

[1] रा. सं. १५ ले. १०, ११, १२

संबंधानें 'सरकारी पत्र' म्हणून जें कळवितो त्या पत्रास 'बखेर' म्हटलें आहे. ह्याच ग्रंथांत ले. ३७ मध्यें 'सेरीकराची बखैर' सलाबत असे' असें क्षेमकुशल सांगून शेवटीं मसूरच्या कारकून व हवालदार यांना यादव व जगदळे ह्यांत खरे कोण ती 'बखेर' लिहून देणें म्हणून पाडळीच्या पाटीलकुलकर्ण्यांनीं पत्र मागितलें आहे. व त्या पत्रासाठीं 'बखेर' असाच शब्द वापरला आहे. तर्फ उंबरजचे कारकून मोरो जनार्दन ह्यांनीं भांडणाबाबतचा गोतसभेचा निर्णय ज्या पत्रानें[1] कळविला त्यास बखैर म्हटलें व ह्याच नांवानें त्या पत्राचा प्रारंभहि केला आहे. शिवाजीराजांच्या पत्रांत बखर शब्द, गत नव्हे चालू वृत्त ह्याअर्थीं आला आहे. सरदेशमुखीचा ऐवज छत्रपतींच्या भांडारगृहांत यावयाचा. तसा आलेला ज्या आयपत्रानें जमा झाला म्हणून म्हटलें तेथें 'बखर बरहुकूम ऐवज जमा' असें लिहिलें [2]आहे. सारांश, बखर ह्या शब्दानें केवळ ऐकीव, अतिशयोक्त, कल्पित किंवा आठवणींचें रचनात्मक गद्यलेखन आणि म्हणून तें दुय्यम–तिय्यम प्रकारचें असें समजण्याचें कारण नाहीं; तर, दैनंदिन सत्य वृत्त, सहीशिक्का होत असलेलें सरकारी कचेरींत बनत असलेलें पूर्ण प्रमाण असें माहिती देणारें पत्र, ती बखर असाहि अर्थ मानावयाचा.

बखर–शब्दासंबंधांत आणखी असें दिसून येतें कीं, हा शब्द शुद्ध अरबी आहे. बक्–पासून ह्या शब्दाची व्युत्पत्ति सांगतात. पण बक् = बोलणें हा धातु पाणिनीय धातुपाठांत नाहीं (भक्, बख् हि नाहीं). तेव्हां खबर शब्दांतील पहिले दोन वर्णांचा व्यत्यास होऊन खब-चें बख झालें व बखर शब्द बनला. पटवर्धनांच्या फार्सि-मराठी कोशांत दोन्ही शब्दांचा अक्षरविन्यास चुकीनें एकच दाखविला गेला आहे. (खे-बे-रे म्हणजे खबर आणि खे-बे-रे म्हणजेहि बखरच. हें बरोबर नाहीं. बखर-चें स्पेलिंग बे-खे-रे असें पाहिजे.) दुसरी गोष्ट कीं, बखर शब्द जरी ह्याप्रमाणें मुसलमानी भाषेंतील ठरला तरी त्या नांवानें मुसलमानी इतिहासग्रंथ आढळत नाहींत. 'पेशवा' हा शब्द मुसलमानी; पण त्याची प्रतिष्ठा जितकी तो मराठींत आल्यानंतर झाली तितकी त्याच्या मूळ घरीं म्हणजे फार्सी वगैरेमध्यें झालेली दिसत नाहीं. त्याप्रमाणें ह्या बखर शब्दाचें

---

१ खं. १५ पृ. २८२ ले. २७४ इ. १६६२

२ खं. ६ ले. ११ पृ. १३७ रु. इ. १७१३

दिसतें. फार्सीतील इतिहास-वा चरित्र-ग्रंथांना 'नामा', 'तवारीख' 'तारीख,' 'गुलिस्तान' 'ह्यात, मजमू, मिहरा, वाकियत, अहवाल, तसवीर' इत्यादि शब्द येतात. अलमगीर,-औरंगजेब,-नामा, शहा-नामा, जहांगीर-नामा; तारीख-ए-दख्खन, तारीख-सुलतानी,-फिरिश्ताह; मजमू-ए-कागजात्, कारवाई, अदालत इत्यादि इ. सारांश, खबर-अनेकवचन अखबार हा शब्द आणि बखर शब्द मराठींत फार रूढ झाला. बखर शब्दाची महती एवढी झाली कीं बखर शब्द रूढ होण्या आधींचे जे ग्रंथ, त्यांच्या अनुवाद, भाषांतर, वा संक्षेप केलेल्या मराठी ग्रंथांनाहि बखर संज्ञा लाविली गेली. महाभारताची बखर, शालिवाहनाची बखर, कार्तिक महात्म्याची बखर इ. इ. ग्रंट डफ यांच्या हिस्ट्रीचें भाषांतरासहि बखर शब्दच लावून त्याची ओळख होऊं लागली. इतका बखर शब्द मान्यता पावला. सभासदाला छत्र० राजारामांनीं शिवाजीचें चरित्र लिहून देण्यास सांगितलें व तें लिहून समाप्त करतांना 'चरित्र-आख्यान राजियाचें जालें' असेंच सांगितलें. तरीपण 'ही बखर संपूर्ण जाहाली' हें शेवटीं लिहिलेंच आहे.

येथेंच बखर ह्या वाङ्मयात्मक प्रकाराची गुणलक्षणात्मक व्याख्या सांगून ठेवणें इष्ट होईल. **बखर हा पत्रप्रकार वेगळा** आणि **वाङ्मयप्रकार वेगळा.** ज्यांत विषयप्रतिपादन व्यावहारिक जीवनांगाचें आहे,—तात्विक वा साहित्य इत्यादिपर नाहीं,—लिपी मोडी, भाषा मराठी, काल यादवोत्तर व आंग्लपूर्व असून, लेखन गद्य आहे; त्यास बखर म्हणावयाचें. **बखर वाङ्मयाची** अशी ही **पंच लक्षणात्मक व्याख्या** आहे.

इंडिया ऑफिसमधील सभासद बखर—लंडन येथें भारताच्या इतिहासोपयोगी जो वस्तुसंग्रह आणि हस्तलिखित संग्रह येथून तिकडे नेलेला इंडिया ऑफिसमध्यें ठेवलेला आहे त्यांत कृष्णाजी अनंताच्या ह्या सभासद बखरीच्या तीन प्रती असल्याचें क्र. १३९, १४० व २१९ पृ. ६७, ६८ व १०२-१०३ वर नमूद आहे. पैकीं क्र. २१९ ची बखर ही रघुनाथयादवांनीं जी बाईसाहेब (म्ह. गोपिकाबाई) यांजसाठीं पानिपतची बखर लिहिली त्या बखरीच्या पाठीवर पहिल्या सात बंदापुरती ही कृ. अ. ची स. ब. लिहिलेली आहे अर्थात् ही फारच अपुरी आहे हें लिहिणें नको. (पानपतबखरींसंबंधांत जो काल तेथें दिला आहे त्यांत शकांक व शकनाम ह्यांत एक वर्षाची भिन्नता

आहे. श. १६८२ ऋषभ (फा. शु. २) आहे. ८२ धरलें तर विक्रम पाहिजे. ऋषभ म्हणजे वृष धरलें तर शकांक १६८३ पाहिजे.) सदर बखरीचा प्रारंभ 'श्री गजान, श्रीमन्माराजराजश्री छत्रपती स्वामींचे शेवसी. बखर विनंती सेवक रु. अ. स.' असा असून 'हजार पागा व तीन ह. शिलेदार अशी पांच ह. फौज जाहली' असा शेवट आठव्या बंदावर दोन ओळी लिहून झाला आहे. हा मजकूर चित्रगुप्तबखरीशीं जमतो. क्र. १३९ हीहि बखर वरील बखरीपेक्षां जरा अधिक मजकुराची आहे. पण अपुरीच. वरील बखरींचे बंद सात तर हिचे तेरा आहेत. ह्या बखरीचा प्रारंभ म्हणून 'राजियांचे वडील थोर थोर राजे श्री शाहाजीराजे ह्यांचे बाप' हा मजकूर दिला आहे आणि 'राजगडाचे पाईं उभे राहिले होते तेव्हां हलुहळू खाली' असा शेवट सांगितला आहे. दोनहि अपुऱ्या प्रतींचा नकलकार किंवा नकलकाल नाहीं. हें लिहिणें नको. राहिली क्र. १४० ची प्रत ही पूर्ण आहे. बंद १२७. प्रती लेखनकाल व स्थल शक १७३९ ईश्वर पौष शु. १० मंदवार सिंधुदुर्ग असें दिलें आहे. (म्ह. १७-१-१८१८) व नकलकार 'कृष्णाजी धोंडो' हा आहे. पण हिचा प्रारंभ जर लक्षांत घेतला-विशेषतः दुसरा परिच्छेद तर ही चित्रगुप्त बखर आहे, असें म्हणणें प्राप्त वाटतें. मात्र रु. अ. स. वर्णित जी चंदी मुकामीं लिहिलेली ती ही नव्हे. 'चित्रगुप्त दुसरा परि.' हा येथें एवढ्यासाठीं सांगितला कीं, रघुनाथ यादवाच्या ह्या बखरीचा प्रारंभ म्ह. पहिला परिच्छेद व 'राघोबादादासाठीं' जी पानिपतची बखर ह्याच रघुनाथ यादवांनीं लिहिलेली म्हणून प्रसिद्ध आहे तिचा प्रारंभ एकच आहे. हाच कॅटलाग क्र. १२९ पृ. ६१ पहा.

ह्या इंडिया ऑ. मधील मराठी हस्तलेखसंग्रहांत क्र. १३३ ही जी 'शिवाजी-महाराजांची बखर' म्हणून दिली आहे तिचा शेवट, जे० श० त सांगितल्याप्रमाणें 'श. १६०२ रौद्र सं. वैशाख वद्य ३ दिवशीं-शुद्ध पाहिजे-राजारामसाहेब यांस मंचकारोहण करविलें याप्रमाणें शिवाजीमहाराज यांचें चरित्र समाप्त जाहालें.' अशा प्रकारें केला आहे. सभासदकथित असें कोणचेंहि शिवाजी-चरित्र नाहीं कीं ज्यांत राजारामास मंचकी बैसविलें हें सांगून शिवाजीचरित्र, समाप्त केलें आहे. ह्यावरून एक दृष्टोत्पत्तीस येतें कीं, राजारामाचा पक्ष त्यावेळीं जरा वर्चस्वांत होता आणि त्याच्या बाजूचे ग्रंथ तयार झाले. मात्र संभाजीची बाजू सांगणारे ग्रंथ मराठींत जवळ जवळ नाहींत; संस्कृतांत आहेत. प्रस्तुत इंडिया

ऑ. मधील मराठी हस्तलिखितापुरतें पाहतां कृष्णाजी अनंत सभासदांची बखर, जी ईश्वर संवत्सरीं इ. १६९७ मध्यें समाप्त केली ती, ह्या संग्रहांत पूर्णतया नाहीं. आहे ती चित्रगुप्ताची व वेगळी आहे असें कॅटलॉगवरून दिसून येतें.

सभासद बखरींचे मराठी व इंग्रजी अवतार असे दोन भेद आहेत व ते ह्या पाठभेद निश्चितप्रकरणीं विचारांत घेतले पाहिजेत. सभासदबखरींतील पाठभेदांचा विचार करतांना आपणांस तीन प्रकारच्या प्रती लक्ष्यांत घेतल्या पाहिजेत.

(१) स्वयं सभासदबखर, नकला प्रती.

(२) सभासदबखर–आधारेंच ज्यांनीं आपापल्या स्वतंत्र बखरप्रतींचें लेखन केलें त्या प्रती—चित्रगुप्त, शेडगांवकर इ.

(३) सभासदीच्या इंग्रजी भाषांतरप्रती.

पैकीं सभासदांच्या इंग्रजी अवताराविषयीं आधीं लिहितों.

रा. ब. का. ना. साने ह्यांनीं इ. स. १८८१ मध्यें आपली १ ली आवृत्ति छापली त्याच सुमारास; रायगडच्या पायथ्यास जें पाचाड गांव आहे त्या गांवच्या पाटलाजवळ त्या वेळचे कलेक्टर बोसन्क्रेट यांना सभासदांच्याच बखरीचें हस्तलिखित बाड मिळालें. पुढें जे. एल्फिस्टन हेहि कुलाब्याचे कलेक्टर होते ते बदलून अहमदनगरला गेले पण (बोसन्क्रेट हे हंगामी कलेक्टर होते.) जे. एल्फिस्टन ह्यांच्या सांगण्यावरून पाचाडपाटलाकडून मिळालेल्या कृष्णाजी अनंत सभासदाच्याच बखरीचें इंग्रजींत भाषांतर करविलें व तें इ. स. १८८४ मध्यें प्रसिद्ध केलें. ही इंग्रजी भाषांतरप्रत सत्वरच सर्व खपलेली दिसते. कारण ह्या भाषांतराची दुसरी आवृत्ति इ. स. १८८६ मध्यें प्रकाशित झाली आहे. पण सभासदांच्या ह्या इंग्रजी अवताराची कल्पना साने ह्यांस नसावी. हें मी फार भीतभीत म्हणतों आहें. कारण साने ह्यांचा अधिकार, ह्या विषयाचा अभ्यास, ऐ. साधनें गोळा करण्याची त्यांची तळमळ व त्याप्रमाणें अत्यंत साक्षेपीपणानें ऐ. ग्रंथप्रसिद्धीचें प्रचंड कार्य (२४ ग्रंथ), अनेक ऐ. ग्रंथपरीक्षणात्मक लेख, ऐ. माहिती देणारे लेख, त्यांच्या डायरींतील उतारे इ. इ. जें प्रकाशित वाङ्मय आहे; आणि त्यांच्या अधिकारानुसार त्यांना करावी लागणारी फिरती–ह्या फिरतीचा साने ह्यांनीं फार फार चांगला उपयोग

केला. सारांश, असे हें इतिहाससाधन–प्रसिद्धीचे आद्य सरकारी विद्वान् अधिकारी ह्यांच्या दृष्टीस हा सभासदांचा इंग्रजी अवतार आला नसेल असें म्हणणें कठीण आहे. पण जर आला असतां तर त्यासंबंधीं निर्देश, त्यांच्या ज्या चार आवृत्ती ह्या सभासदबखरीच्या निघाल्या त्यांत कोठेंतरी अवश्य यावयास हवा होता. इतकेंच नव्हें तर, आणखी एक प्रसंग, ह्या इंग्रजी आवृत्तीचा उल्लेख अवश्य अवश्य यावयास हवा असा आला होता. पण तेथेंहि जर तो लेख साने ह्यांचा असेल तर–हा निर्देश नाहीं. तो सभासदांच्या बखरीचा इंग्रजी दुसरा अवतार होय. इ. स. १९२० मध्यें कलकत्ता विद्यापीठानें महाराष्ट्रेतिहासाच्या अभ्यासाचें स्वतंत्र अध्यापन सुरू करून त्यासाठीं डॉ. सुरेंद्रनाथ सेन ह्यांजकरवीं ज्या मराठींतील इतिहासग्रंथांचीं इंग्रजी भाषांतरें किंवा स्वतंत्र इतिहासग्रंथ प्रसिद्ध केले त्या उपक्रमांत ह्या कृष्णाजी अनंत सभासदांच्या बखरीचें इंग्रजींत भाषांतर प्रसिद्ध केलें आणि त्या इंग्रजी आवृत्तीचें परीक्षण विविध–ज्ञा. वि. च्या इ. स. १९२१ च्या अंक १ व २ मध्यें जें प्रसिद्ध झालें तें गु. साने ह्यांनींच केलें आहे. परीक्षणलेखावर साने ह्यांचें प्रत्यक्ष नांव नाहीं. साने ह्यांचे असे इतिहासपर लेख बरेच आहेत कीं त्यांवर त्यांचें स्पष्ट नांव नाहीं किंवा अन्य एखादें टोपण नांव आहे. उदा० ‘ टोमदेव शर्मा ’ ह्या नांवानें साने ह्यांनीं आपली फिरतींतील डायरी प्रसिद्ध केली आहे. एका अधिकाऱ्याच्या रोजनिशींतील उतारे ’ असें ह्या डायरीलेखाचें शीर्षक असे. ह्या उताऱ्यावरून कळून येतें कीं हे टोमदेव अधिकारी म्हणजे साने होत. साने ह्यांचें हें संध्येंतील नांव आहे. असो. प्रस्तुत सांगावयाचें असें कीं ह्या १९२० मध्यें प्रसिद्ध झालेल्या सभासद बखरीच्या इंग्रजी भाषांतराच्या परीक्षणाचे वेळीं सुमारें ४० वर्षांपूर्वी झालेल्या ह्या बोसन्केटच्या इंग्रजी रूपांतराचा अवश्य उल्लेख यावयास पाहिजे. ह्याहि वेळीं ज्याअर्थी साने यांच्या परीक्षण-लेखांत हा निर्देश नाहीं व त्यांच्या ज्या मराठी तीनचार आवृत्ती प्रसिद्ध झाल्या त्यांतहि हा सुगावा नाहीं त्याअर्थी हें भाषांतर त्यांस माहीत तरी नसावें; किंवा उल्लेखहि न करण्याइतपतच तें आहे असें त्यांस वाटलें असावें. पण साने ह्यांचें सेनकृत इंग्रजी भाषांतर-परीक्षण लेख पाहतां, हें इ. १८८४–८६ मधील इंग्रजी रूपांतर टाकाऊ आहे असें एका वाक्यांत सांगून टाकण्यास ते मुळींच कचरले नसते. असो.

आपणांस सध्यां ह्यावरून एवढेंच लक्षांत घ्यावयाचें कीं, इ. स. १८८४–८६ मधील सभासदांचें इंग्रजी रूपांतर हें ज्या मूळ मराठी प्रतीचें आहे त्या प्रतीच्या प्रस्तुत मराठी ज्या प्रती दर्शित होत आहेत त्यांशीं कोठें मेळ आहे काय ?

तर थोडक्यांत सांगतों कीं ती 'पाचाडप्रत' वेगळी नाहीं. साने ह्यांस जी माहाड आणि सातारा प्रत म्हणून मिळाली तिच्याशीं ती जमती आहे. तसेंच पाठभेद पाहण्याच्या दृष्टीनें ह्या इंग्रजी अवताराचा तादृश उपयोग नाहीं. कारण भाषांतरकारानें बखरींतील वृत्त सुबोध करण्याकडे लक्ष दिलें आहे.

आतां भाग उरला तो ज्या मराठी प्रती आहेत त्यापुरता. ह्यांत दोन प्रकार आहेत हें वर सांगितलें. एक सभासदाच्या नकला प्रती आणि दुसरा सभासदी प्रत घेऊन मराठींतच अन्य स्वतंत्र बखर ग्रंथ इतिहासकालांतच रचले त्यांत वापरलेल्या सभासद्प्रती. ह्या प्रती लक्षांत घेऊन प्रस्तुत प्रतींत जो फेरबदल केला तो 'प्रतशुद्धि' ह्या प्रकरणांत पुढें दिला आहे.

प्रतशुद्धि :—प्रतशुद्धि वेगळी व पाठभेद वेगळे. एकाच ग्रंथाच्या निर-निराळ्या हस्तलिखित प्रती आढळतात व त्यांतून एकाच्या जागीं दुसरा उल्लेख सांपडतो तो पाठभेद. पण प्रत एकच आणि तींत मागचें पुढें किंवा उलट, अथवा अन्य कांहीं कारणांनीं बदल, दुबार, अपुरेपणा, असंदर्भितता असले कांहीं दोष दिसून येतात, ते दार्शित करून योग्य वाटतें तें सयुक्तिक कसें हें सप्रमाण सुचविणें ही प्रतशुद्धि होय. अशी प्रतशुद्धि येथें प्रथमच देत आहें. व ती कशी हें उदाहरणानेंच सांगतों—

उदाहरण १ लें :—अफजलप्रसंगीं खानाचे भेटीस शिवाजीराजे चालले त्या वर्णनांत लिहिलें—"खासा राजियांनी जरीची कुडती घातली, डोईस मंदील बांधिला, त्यांत तोडा बांधिला, पायांत चोळणा घालून कास कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें;" आणि 'बराबर जिऊ महाला, संभाजी कावजी व इतर धारकरी लोक घेतले' ते लिहून मग लिहिलें कीं "आणि राजियांनीं स्नान करून भोजन केलें." पोषाख सर्व घातला, शस्त्रें हत्यारें घेतलीं, पोशाख पुरा केला. आणि मग स्नान (व भोजन) हें कसें सुसंगत व शक्य ?

खरा प्रकार हा कीं, 'आणि राजियांनीं स्नान करून भोजन केलें' हें वाक्य 'जरीची कुडती घातली' इत्यादि ह्या वाक्याआधीं पाहिजे. वर्णनाचा ओघ पाहतां

तसाच आहे. आधीं स्नानभोजन, नंतर युद्धवस्त्रपरिधान, नंतर बरोबरचे लोक घेऊन ' सिद्ध होऊन गडाखालीं भेटीस जावयास ' उतरणें. म्हणजे प्रस्तुत स्नान-भोजनाची आवश्यकता जेथें नको तेथून ती काढली व जेथें पाहिजे तेथें ती ठेविली कीं दोन्ही स्थलें सुसंगत व कारणींहि लागतात. (पृ. १४ परि. १८ पहा)

उदाहरण २ रें:—षाहिस्तेखान प्रसंगांतील असून पहिल्या उदाहरणाप्रमाणें सहासात वाक्यांनंतरचे मुख्य चार शब्द आधीं घ्यावयाचे अशा प्रकारचें नसून एकाच वाक्यांतील शब्द मागला पुढें घ्यावयाचा हें सांगणारें साधें आहे. " राजियानें आंगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन बाड कटारिनें चिरून आंत शिरलें. " येथील ' आंगेंच 'चा संबंध सांगोनच्या पुढची मुख्य क्रिया ' आंत शिरणें ' ही असल्यामुळें ' राजियानें...सांगोन ' " [ते] आंगेंच आंत शिरलें " असें वाक्य पाहिजे. (परि. ३६)

एकाच प्रतींतील वाचनाच्या चुका व त्यांच्यामुळें होणारी दुरुस्ती ती प्रतशुद्धि पुढें दाखवितों. पण वाचन बरोबर, मात्र ठिकाण कांहीं कारणानें चुकलें तीं स्थलें येथें दाखवीत आहे; त्यांतील

उदाहरण ३ रें :—' तें स्थळ जेर करावें म्हणोन ' एवढेंच एका परिच्छेदाचे प्रारंभीं मुळाप्रमाणें छापलें व टीपेंत लिहिलें कीं, ' मुळांत हें वाक्य अपुरेंच राहिलें आहे. ' (साने आवृत्ती ४ पृ. ६८ परि. ८५). वस्तुतः मागील परिच्छेदांत दंडाराजपुरीचे शिद्दीस जिंकून त्याचें स्थल जंजिरा तें हस्तगत करण्याच्या प्रयत्नांत झालेल्या दोन लढाया सांगितल्या आणि पहिल्या लढाईप्रमाणें दुसऱ्याहि यशस्वी लढाईत शिद्दीनें ' सल्ल्याचें नातें लाविलें. ' परंतु ' राजियांनीं सला केलाच नाहीं.' कां ? तर ' तें स्थल जेर करावें म्हणोन ' त्याचे देशांत जागां जागां गडकोट नवेच बळावून राहिले...' इत्यादि. तात्पर्य, हे पांच शब्द, नकोत तेथून घेऊन बरोबर मागील परिच्छेदांत हवेत तेथें ठेऊन दिले कीं, ' अपुरेपणा ' राहात नाहीं आणि कथानकांतील विधानास पुष्टिबल मिळतें. ह्याच शिद्दी प्रकरणांत बाजी पासलकर व हबशी यांचें युद्ध सांगत असतां जो तुटकपणा आला आहे तो किंवा चार-पांच वाक्यें दुबार आलीं आहेत तींहि दिसून येतात. बाजी पासलकरावर राजपुरीहून काय सावंत येतो व मोठें रणखंदल युद्ध होतें; हा प्रसंग सांगत असतां मध्येंच ' अगणित गड जंजिरे

जमिनीवर व पाणियांत वसविले. असें कर्म केलें ' हें सांगितलें. आणि " तैसेंच जाहाजें पाणियांतील जाली...हा एक हात सजला...अद्यापि निजामशाहाचें नांव चालतें " हीं पांच वाक्यें दुबार आलीं आहेत; तीं तेथें अजिबात नकोत, कारण हींच वाक्यें अशींच परिच्छेदाचे शेवटीं आलीं आहेत व तेथें तीं योग्य होत. आणि ' तें स्थल हस्तगत करावें. ' इत्यादि सहा ओळी मजकूरहि परिच्छेदप्रारंभीं घेणें इष्ट. (पृ. ६३–६५ पहा).

वाचनदुरुस्ती—ही दुरुस्तीहि अर्थात् एकाच प्रतीला अनुलक्षून आहे व हा प्रतशुद्धींतीलच भाग होय. कारण मोडी लिपींत सारख्या वळणाचीं-थोडा फरक असतो-अक्षरें आणि लेखनांतील लपेट इत्यादि कारणांनीं वाचन वेगळें झालें. योग्य कोणतें तें येथें देत आहे. वाचनभेदामुळें जे पाठभेद होतात तेहि त्यांत समाविष्ट केले आहेत. वाचनदुरुस्ती हे खरे पाठभेद नव्हतच. परि. १७ निर्वाद करून = निर्वाह करून; ' राजियानें गंडकी नदीस द्रव्य गाडियावरि घालून, गं.की पाषाण आणून श्रीभवानी सिद्ध करून...स्थापना केली ' असें आहे. येथें ' राजियानें द्रव्य [पाठवून] गंडकी नदीहून ' गाडियावरि घालून गंडकी पाषाण आणून श्रीभवानी ... ' इत्यादि असें पाहिजे (परि. २५ पहा).

' खंडणी केल्या जागां ओळखियास ब्राह्मण न घ्यावा. ' = ' खंडणी केल्या जागां बोलीप्रो पैका घ्यावा.' ह्या बखरीमध्यें इतर अनेक प्रसंगीं ब्राह्मणाची जामिनकी, विश्वास्यता, मधस्थी, मान्य म्हणून सांगितलेली आहे. चंद्रराव मोरे प्रकरण, अफझल प्रकरण, आग्रा प्रसंग—संभाजीस संभाळणें इ. इत्यादि. मुलुखप्रकरणांत तर सबनीस ओळखीचे ब्राह्मणच ठेवावे, साहेबी कारकुनाखेरीज नाहीं, लष्करास, गडास, हशमास देणें ते कारकुनानी द्यावे. मुलूखाचे तीन भाग करून तिघा ब्राह्मणांचेच हवाला केले आहेत. आणि प्रस्तुत व्यवस्था सांगतांना ' खंडणीची बोली एकदां झाली म्हणजे त्यांत तफावत नको, त्या बोलीप्रमाणेंच पैका घ्यावा हेंच मुख्यतः सांगावयाचें आहे. 'बोलीप्रमाणें पैका ध्यावा' ह्याचे चुकीचें वाचन ' ओळखियास ब्राह्मण ' इत्यादि झालें (परि. ३२). मोकासबा = नकल करणारा शिवकालीन म्हणजे फारसी भाषेशी बराच अपरिचित दिसतो म्हणून मोहसबा मोसबाचे जागीं ' मोकासबा ' लिहिणें घडलें. मोहसबा किंवा मोसबा म्ह. हिशेबी पत्र, तक्ता. नव्या मुलखांतील चौकशी वगैरे होऊन ' घडणी ' कागद बनले म्हणजे ' हिशेब ' सिद्ध झाले म्हणजे खातेबांधणी झाली कीं त्या

महालची मजमू द्यावी वगैरे (परि. ३५). सतीलीवाले=सैतीवाले. सैती- नांवाचें हत्यार आहे. मागें (पृ. ३६ पहा)

'डेरियांत डेरे, सात वाडांचे फेरे' हें एकदां वर्णन झालें. नंतर राजा खासा नबाबाचे डेरियासि पावले. तेथें पुनः 'डेरियांत डेरे सात' ह्याची आवश्यकता नाहीं. 'डेरियांत खान व दाया असा समुदाय बायका होत्या.' येथील 'खान-'चें चुकीचें वाचन 'सात' झालें परि. ३६ मार्ग = माग. परि. ३९. स्वार पठाण उन्माद रजपूत = स्वार पठाण 'उजबेग' ही एक मुसलमानांतील जात आहे. उजबेगचें उन्माद झालें. परि. ४४ खलाशी = खलक. परि. ४६ दिलेलखानानें गड घेतला मग भेट जाहल्यानें 'हलवारी' आहे. 'हलाखी' 'हलकेपणा' आहे, (पृ. ४२ परि. कित्ता.) 'दिलेरखान बादशहाचे मेहेरबानीचा आहे' 'त्यास मुजरा हातीं करून लागतो.' 'तुम्हीच दिलेरखानाचे भेटीस जावें लागतें.' ह्या ठिकाणीं जयसिंग शिवाजीस असें सांगतो कीं, जरी मी ह्या स्वारीचा मुख्य आहे व हें दिलेरखानासहि कबूल आहे तरी, दिलेल हा गर्विष्ठ व बादशाही भिडेचा असल्यामुळें तुम्ही जसे माझ्याकडे आला तसे त्याच्याकडेहि जा; त्यालाहि ह्याप्रकारें हाताशीं घेतलेलें बरें. म्हणजे त्यालाहि मान देऊन आपलासा केल्यासारखें होईल. थोडक्यानें साधत आहे. खान म्हणतोच आहे 'तुम्हीं साहेबलोक आहां, तुमच्या हुकमानें येऊं' म्हणजे जयसिंग वरिष्ठ व मुख्य; तरी दिलेरखानासहि 'तुम्ही हातीं घ्यावा लागतो.' ह्याचें वाचन झालें 'मुजरा हातीं करून लागतो.' मोडींतील 'तुम्ही'-चे 'मुजरा' झाले. मग 'हातीं' आले. पण एक काय किंवा दोन काय हातींच मुजरा करावयाचा; पण येथें मुजऱ्याचा प्रश्नच नाहीं. पुढें विजापुराकडे जातांना सुद्धां जयसिंगाच्या शेजारीं शिवाजी असल्यामुळें दिलेलखान जोहार करीत नाहीं हें आलेंच आहे. तात्पर्य, असा तो गर्विष्ठ व मानी आहे. म्हणून तुम्हींच त्याच्याकडे जाण्यानें तो तितका हातीं लागेल; आपलासा होईल परि. ६१ पृ. ५२. 'अपाय होता दगाच व्हावा असें जालें होतें.' म्हणजे अपाय झाला असतां तर दगाच झाला असतां, ह म्हणण्यांत कांहींच स्वारस्य नाहीं. कारण अपाय म्हणजे दगाच; आपत्ति, संकट, बंधन, इजा. तर मोडींतील 'उद्गम'-चें चुकीनें अपाय हें वाचन झालें. शिवाजी असल्याचा थोडा जरी 'उद्गम' झाला असतां तरी दगाच झाला असतां, हें लेखकास म्हणावयाचें आहे. पृ. ५१ 'न्यायाधिशी सरकारांतून

सांगितली ' ' सरकारकुनी ' सांगितली. पुढें पृ. ५९, ८० पहा. परि. ७३ पृ. ६०–६१.

" दुसरे दिवशीं तयारी करून रात्रीस फौजेनिशीं निघोन गेलें ' मग ' राजियाची फौज औरंगाबादेस–(हून) निघोन गेली ' हें वाक्यच नको; दुबार. कारण फौज निघून गेल्याचें व राजियास ती भेटल्याचें चार वाक्यांपूर्वीच आलें आहे. आणि ' खावयास वाव जाहला असें बोलिलें ' ह्या वाक्यापुढें ' मग औरंगाबादेस राजियाची फौज निघोन गेली ' हें पुनः सांगण्याचें कांहींच कारण नाहीं; आणि ' औरंगाबादेस ' तर चूकच आहे. ' औरंगाबादेहून तर नव्हे ' अशी टीपहि श्री. साने यांनीं दिली आहे. पृ. ६३ वर सुरतेवरील हल्याचें वर्णन आलें आहे. त्यांत सुरतशहर मारून चालले ' ही खबर ' मोगलाचे सुभेदार, वीस उमराव, व मोहबतखान व दाऊदखान असे ...चालून आले ' ह्यांत ' ही खबर ' हे शब्द मोघमच राहिले आहेत. दाऊदखान ' यास कळून ते ' सात गांवची दवड करून चालून आले, असें पाहिजे. म्हणजे येथें ' असें– ' याचें वाचन ' यास ' हें पाहिजे व ' कळून ते ' हे दोन शब्द अध्याहृत घेतले पाहिजेत.

नंतर पृ. ६४ परि. ७९ मध्यें ' रायबागीण कोंडली ' हा उंबरखिंडीच्या युद्धाचा भाग आला आहे. व त्यांत ' रायबागीण कोंडली ' हें सांगून पुढेंच ' तिनें राजियाचा कौल घेतला व लेक म्हणवूं लागली म्हणून तीस ' अनात करून सोडली असें आलें आहे. ' अनात ' हें मोडींतील ' मुक्त ' ह्या शब्दाचें चुकीचें वाचन घडलें आहे. जी ' कोंडली ' होती ती ' मुक्त ' करून सोडिली हें बरोबर. ' अनात करून ' असाच शब्द मागेंहि परि. २१ मध्यें अफजल— प्रकरणांत ' शरण आले त्या भटब्राह्मण, बायकामुलें, गोरगरीब यांस ' अनात ' करून सोडिले. ' परि. २३ मध्येंहि ' खानाकडील वजीर पाडाव केलें त्यास ' अनात ' करून सोडिलें ' असें आहे. टीपेंत कै. साने लिहितात ' जेथें तेथें हा शब्द ' अनात ' असाच आहे. पण अनात, अजात ह्यानें कांहीं अर्थ लागेना. म्हणून ' अनाथ ' छापिलें, पण मुळांत ' त ' आहे. ह्या सर्व ' अनात 'चें जागीं मुळांत ' मुक्त ' असें आहे व त्यांचें चुकीचें वाचन ' अनात ' असें झालें.

परि. ८४ मध्यें ' पांच हजार मावले खकम पाईचे घेऊन ' असें आलें आहे. खलक ' (म्ह. लोक) असें पाहिजे. परि. ८५ आलम नव्हे आम; मोडींतील

आ व म मधील लपेटचें ल हें वाचन झालें. असो; ह्याप्रमाणें इतर जीं वाचन-दुरुस्तीचीं ठिकाणें (नाणीं, गड–नामें इ.) तीं तेथेंच दुरुस्त करून दर्शित केलीं आहेत.

येथेंच हेंहि सांगणें प्राप्त वाटतें कीं, ह्या ' प्रतशुद्धी 'मुळें जी काय मूळ संहिता उपलब्ध व प्रसिद्ध आहे म्हणजे होती, तींत, कांहीं चाळवाचाळव केली, आणि ' संहिता ' ' संहिता ' म्हणून जो मूळग्रंथ, तो तसाच ठेवला नाहीं, ह्यांत फिरवा-फिरव केली, असें कदाचित् कांहीं अभ्यासकांच्या मनांत येईल. परंतु, वर जीं शुद्धिस्थळें, म्हणजे शब्द वा वाक्य ह्यांची योग्य स्थळयोजना, वाचनांतील शुद्धता, साधार सुचविली, ती लक्षांत घेतां असें कांहीं म्हणतां येणार नाहीं व हें विचाराअंतीं सहज पटेल. नाहींतर ' पोशाख केल्यानंतर स्नान केलें ' हें कसें मानावयाचें ? शुद्ध संहिता तशीच ठेवावी, भाषेसाठीं तर ती अवश्यमेव तशीच ठेवावी आणि इतिहासासाठींहि. पण तीं मूळ खास लेखकाच्या हातची असेल तर. नकल किंवा नकलेचीहि नकल असेल तर संहिता ह्या उच्च संज्ञेपासून आपण दूर जातों असा अर्थ उघड आहे. तरीहि तशाहि संहितांना संभाळलें पाहिजे हें मान्य. साने ह्यांनीं ' दुसऱ्या प्रतीवरून बरें वाटल्यास फेरफार केला जाईल ' हें सांगितलेंच आहे. वरील प्रतशुद्धींत अन्य प्रतींतील एकहि पाठ घेतला नाहीं; सूचना लक्षांत घेऊन वाचनशुद्धि, वाक्यस्थलनिश्चिती मात्र केली.

पाठभेद :—सभासदांच्या बखरींतील पाठभेदाविषयीं विशेष लिहिणें नको. प्रतशुद्धि ह्या प्रकरणांत तो भाग येऊन गेला आहे. श्रीमान् साने यांनीं ' पाठांतर ' व ' पाठभेद ' असा भेद करून टीपांमधून उल्लेख दिले आहेत. पैकीं पाठभेदाची स्पष्टता त्यापुढें म. प्रत, सा. प्रत म्ह. महाड, सातारा, प्रतापगड ह्या प्रतीचा निर्देश केल्यामुळें होते. पण ' पाठांतर ' असें जेथें मोघम लिहिलें तें काय ? ह्यांपैकीं एखाद्या प्रतींतील तो उल्लेख असतां तर प्रतीविशेष सांगितला असतां. मग पाठांतर म्हणजे कोणच्या प्रतीला अनुलक्षून ? अशी कल्पना संभवते कीं, एकाच प्रतींतील अस्पष्टता, दुर्बोधता, किंवा लेखकानें जागा सोडली इत्यादि कारणांमुळें जें वाचन कल्पिलें तें पाठांतर. पण पाठांतराचे उल्लेख पाहिले म्हणजे हें म्हणणें टिकत नाहीं. उदाहरणार्थ, सभासद–चें पाठांतर ' सभासद राजमंडळ ' (परि. १) हें कसें होईल. ' राजमंडळ ' लिहिलेली प्रतच

वेगळी असली पाहिजे. एकाच प्रतींतील ह्या उल्लेख मानतां येणार नाहीं. 'मोकासबा'-चें पाठांतर 'हिशेब' (परि. ३२); 'पांच तक्षिमा पिकाच्या केल्यानंतर०'–चीं पाठांतरें दोनः 'पांचवी तक्षीम दिवाणांत यावी' किंवा 'पांच रयतेस द्याव्या व दोन दिवाणांत.' (परि. ३३) हें एकाच प्रतींतील निश्चित नाहीं. शिवाय दुसरें हें कीं येथील दुसऱ्या पाठांतरांत, सात तक्षिमा होतात व त्यांपैकीं पांच रयतेस व दोन दिवाणांत; पण असें बहुधा अशक्य. पांचापैकीं तीन रयतेस व दोन दिवाणांत असें असलें पाहिजे. असो. अशीं पाठांतराचीं स्थलें कांहीं आहेत. तीं तशींच प्रस्तुत आवृत्तींत घेतलीं आहेत. पण त्यांचा खुलासा होत नाहीं. वाटतें कीं, पृ. ४८ वर टीपेंत 'खटाव' प्रत मिळाल्याचें लिहिलें आहे. ती अपुरीच आहे व अशींच कांहीं त्रुटिक पानें ह्याच बखरीचीं मिळालीं असावीं व त्यांवरून पाठांतरसंज्ञक उल्लेख घेतले असावे. ह्या पाठांतर–पाठभेदाशिवाय कै. गु. साने यांनीं ग्रांट डफ, जदुनाथ सरकार ह्यांचेंहि म्हणणें पाठभेद वाटतील असें दिलें आहे तें प्रस्तुत टीपांत दिलें नाहीं.

पाठभेदाच्या संबंधांत आणखी असें येथेंच सांगणें इष्ट आहे कीं, सभासद–बखर वापरून ज्यांनीं आपली वेगळी बखर म्हणून लिहिली तींतीलहि उल्लेख पाहण्याजोगे; कारण तीहि बखर सभासदांचीच. पण त्यांतील पाठभेद येथें दर्शित केले नाहींत. कारण, सभासदांच्या लिहिण्याला ह्या लेखकांनीं आपलें म्हणून बरेंच लेखन ठिकठिकाणीं जोडलें आहे. त्यांतुन विविक्तपणें सभासदांचा उल्लेख नेमका काढतां येतो. पण असें इतकें येथें करून ते पाठभेद घेतले नाहींत व बखरीची वाढ–भर कशी होते हें सांगावें लागेल व तो विषय स्वतंत्र होईल. उदाहरण म्हणून एकच सांगतों कीं, सभासदांच्या बखरींत व्यक्तिस्थलांचे उल्लेख २१६ व १३२ आले आहेत. तर हीच सभासद बखर वापरल्याचें स्पष्टपणें सांगून चित्रगुप्तानें आपली बखर लिहिली आणि तींत हे उल्लेख ३५६ व २३३ असे आहेत. म्हणजे सभासदांपेक्षां अनुक्रमें १४० व १०१ इतके उल्लेख चित्रगुप्तांनीं अधिक दिले आहेत. ह्याच्या उलट गोष्ट सभासदांच्या इंग्रजी अवताराची आहे. त्यांत क्रमानें ४३ व २३ उल्लेख कमीच आहेत. ह्या उल्लेखांत शिवराज्याच्या मोजदादींतील उल्लेख धरलेले नाहींत. चरित्रकथनांत जे व्यक्तिस्थलोल्लेख आले तेवढेच येथें घेतले आहेत. सारांश, अशी वाढ चित्रगुप्तांनीं केली आहे व हाच प्रकार चरित्रवर्णनांतहि झाला आहे. पण

तारतम्यानें, चित्रगुप्ताच्या लेखनपद्धतींतील वैशिष्ट्य ध्यानीं घेऊन सदर प्रकार ओळखतां येतो. तथापि वर लिहिल्याप्रमाणें तो विषय स्वतंत्र होणारा असल्यामुळें तो भाग येथें घेतला नाहीं.

बखर लेखनकाल :—सभासदांनीं आपल्या बखरलेखनाच्या समाप्तीचे निदर्शक तीन परिच्छेद केले आहेत. पहिला ' ऐसें राजियाचें चरित्र–आख्यान उत्पन्न काळापासून देहावसानापर्यंत जाहालें ' हें सांगितलें तो (परि. ११५) दुसरा ' प्रतिइच्छा मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहाला नाहीं, पुढें होणार नाहीं. असें वर्तमान माहाराजांचें जाहालें. कळलें पाहिजे ' (परि. ११६) हा आणि तिसरा ' बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहाली. चैत्रशुद्ध प्रतिपदा ते दिवशीं वर्णन समाप्त जाहालें. ईश्वर संवत्सर—मुक्काम चंदी शालिवाहन शके १६१६ [त] जाहाली. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? हें विनंती.' (परि. ११६ अ). ह्याप्रमाणें तीनदां वेगवेगळ्या प्रकारें लेखनाचा शेवट केला आहे. प्रत्यक्ष शिवाजीचा निर्याणदिन सांगून ' प्राण प्रयाण केलें, विमानीं बैसून कैलासास गेले,' हें प्रथम सांगितलें. पण दुश्चिन्हें सांगावयाचा परिपाठ आहे. अवतारी पुरुषाच्या जन्मकालीं सुचिन्हें व दृष्टान्त व देहावसानीं दुश्चिन्हें सांगावयाचीं; त्यासाठीं दुसरा परिच्छेद आणि चरित्रश्रवणाची फलश्रुति व लेखनसमाप्ति हा तिसरा परिच्छेद.

पण लेखनसमाप्तीकाल नेहमींप्रमाणें पद्धतीबद्ध सांगितलेला दिसत नाहीं. म्हणजे ' बखर संपूर्ण जाहाली ' हें लिहिलें व लगेच ' चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दिवशीं वर्णन समाप्त जाहालें ' ही मिती महिना–पक्षासह सांगितली. पण वर्ष जर न सांगितलें तर ह्या बारकाव्याला कांहीं अर्थ नव्हता म्हणून ' ईश्वर संवत्सर ' असें नुसतें 'वर्षनाम' लिहिलें. म्हणजे क्रमानें पाहतां 'ईश्वरसंवत्सराच्या चैत्रशुद्ध प्रतिपदेला' हें लेखन संपलें हें एवढें कळलें. पण लेखकानें आणखी तपशील दिला. तपशील दिल्यानें अधिक माहिती मिळते हें खरें; पण तो तपशील गणितानें सुसंगत असेल तर. नाहींतर तोच तपशील घोटाळ्याला कारण होतो आणि पहिलें थोडें होतें तेवढेंच ठीक होतें असें म्हणण्याचा प्रसंग येतो. तसें येथें झालें आहे. ईश्वरसंवत्सर सांगितल्यानंतर लेखनस्थल सांगितलें ' मुकाम चंदी ' आणि पुढें लिहिलें ' शके १६१६ [त] जाहाली '. मुळांत हें कालोल्लेखन रा उलटें झालें. आधीं महिनापक्षमिति, नंतर संवत्सरनाम आणि

नंतर शा. शकाचा आंकडा. ह्या १६१६ आंकड्यामुळें सगळा घोटाळा झाला. म्हणजे 'ईश्वर' आहे म्हणून १६१६ गृहीत धरतां येत नाहीं; १६१६ गृहीत धरलें तर 'ईश्वर' राहात नाहीं ईश्वर म्हणजे १६१९ आणि १६१६म्हणजे युवा संवत्सर. बरें, ह्यांवरहि लेखकानें वार दिला असतां म्हणजे उलगडा होण्यास साहाय मिळालें असतें. चित्रगुप्तांनीं तर 'सोळाशें सोळा' हें अक्षरींच लिहून सांगितलें आहे. मात्र 'गत' शब्द तेथें घातल्यानें, लिहिण्याला प्रारंभ केला १६१६ शकांत आणि लेखन संपविलें ईश्वरसंवत्सरीं म्हणजे १६१९ मध्यें; असा गु. राजवाड्यांनीं अर्थ बसविला. म्ह. १६९७ मार्च १३ शनिवार हा लेखनसमाप्तीचा काल येतो.

सभासदांचा एक लेखनविशेष:—सभासदांनीं शिवाजी चरित्र सांगितलें ही तर गोष्ट अतीच मोठी व अनेक पुढल्या पिढ्यांनाहि कौतुकाची व मार्गदर्शक वाटत राहील ह्यांत शंका नाहीं. पण त्यांतहि त्यांनीं चरित्राचा उपान्त्य भाग म्हणून शिवाजीच्या राज्याची गणितीपद्धतीनें मोजदाद दिली ही गोष्ट फार फार चांगली केली. शिवाजीच्या राज्याच्या सीमा, राज्यांतील प्रमुख विभाग, वांटणीच करणें झाल्यास दोन वांटण्या कशा हें चरित्रां प्रसंगानें सांगितलें. परंतु सीमा जरी कळल्या तरी त्यांतहि एकूण गडदुर्ग किती, नवेजुने किती, सैन्य किती, खजिना केवढा, त्यांत किती प्रकारचीं किती रकमेपर्यंतचीं नाणीं; कापड व जवाहीर किती, सरदारशिलेदार, सुभेदार कोण, पागा केवढी, हत्ती छावे आणि आरमार केवढें इत्यादि हें सर्व कळणें आवश्यक होतें. 'हेंच राज्य' व त्यासाठीं ही जी यादी दिली ही गोष्ट अत्यंत समुचित आणि उच्च धोरणाची निदर्शक झाली. औरंगजेब इकडे आपल्या सैन्यसमुदायानिशीं व सर्वशक्ति खर्च करून महाराष्ट्रराज्य बुडविण्यासाठीं आलेला; कर्नाटकांत राजाराम गेला तरी तिकडेहि औरंगजेबाचा छळवाद चालूंच; उद्यां औरंगजेबाला आम्हीं पराभूत केलें किंवा तोच यशस्वी झाला तरी आमचें राज्य त्यानें घेतलें म्हणजे किती व काय काय घेतलें, अथवा आम्ही त्यासी झगडून आमचें स्वत्त्व रक्षण केलें व राज्य टिकविलें म्हणजे तरी कोणचा कोणचा प्रांत आमचा; घाटावर, सरहद्दीवर, दर्याकाठीं किती व कोणचे किल्ले आमचे; मावळांत, पश्चिमेकडे उत्तरदक्षिण कोकणांत किती मुलूक आमचा इत्यादि हें सर्व, नंतर कळण्याची फार आवश्यकता उत्पन्न होते. विशेषतः विजापूर व भागानगर येथील दोन्ही

शाह्या नष्ट झाल्यामुळें व सर्वभर औरंगजेबी संचार चालू असल्यामुळें विविक्तपणें शिवाजीचें राज्य म्हणजे अमुक अमुक; बंधुबंधूंत किंवा चुलत्यापुतण्यांत अथवा चुलतभावांत उद्यां वांटण्या होण्याचा प्रसंग आला तरीहि मूळ वडिलार्जित मिळकत किती हें कळण्याची सोय असणें आवश्यक आहे. शिवाजीराजांच्याकडून सभासदानें आपण मूळ किती होनांचा मुलूख असतां शेवटीं किती होनांचा वाढविला हें सांगविलें आहे. आणि शेवटीं 'पितापुत्र बैसून कुलराज्य आपलें देखिलें' असें म्हणून अखेरीस 'एणेंप्रमाणें आपलें राज्य' असा राज्याचा आढावा व एकुणात दिली. एऱ्हवीं शिवाजीराजांच्या लढाया व राज्याभिषेक ह्यांचें वर्णन देऊन चरित्र संपवितां आलें असतें. व त्यांत तसा अपुरेपणाहि न राहता; परंतु ही राज्याची मोजदाद दिली व येथें सभासदांच्या शिवचरित्राचें पुरेंपण झालें. अलीकडील भाषेंत सांगावयाचें तर जसा एखाद्या सर्ववरिष्ठ अधिकाऱ्यानें आपल्या कार्यकलापाचा 'चार्जशीट द्यावा' तशासारखी ही सभासदांची शिवचरित्राची सांगता व पूर्तता आहे. शेंकडों किल्यांचीं नांवें, अनेक नाण्यांचीं नांवें, पागा, सरदार व शिलेदार व सुभेदार ह्यांचीं नांवें इत्यादि पाहून वाटेल कीं ही नामावळींची लांबड कशाला? पण शिवाजीचें राज्य नवनवीन आहे; भोंवतालीं मुसलमानी पातशाही मुलूख आहे; राज्या-राज्यांचा झगडा चालू आहे अशा स्थितींत शिवाजीराजांचें राज्य म्हणजे काय काय व किती हें सांगणें अवश्यच होतें.

सभासदांच्या शिवचरित्रलेखनांतील **आणखी एक विशेष** थोडक्यांत पण सांगावयास पाहिजे. ज्याप्रमाणें शिवाजीच्या राज्यांतील गड, नाणीं इत्यादि मोजणी व बेरीज सांगितली त्याप्रमाणें शिवाजीच्या राज्यांतील राज्यकारभार पद्धतीहि, तें राज्य नवें म्हणून, ठिकठिकाणीं सांगितली. राज्यकारभारपद्धति सांगतांना, जसजसे नवे देश जोडून 'बांधीत चालले' म्हणजेच नवा प्रांत—गड घेत व वसवीत चालले तसतसे नवे अधिकारी नेमले आणि कारभारपद्धतींतहि बारकावा येऊं लागला. मुतालीक आपल्याजवळ किंवा मुलाच्या नांवें हप्त-सप्त-हजारी मान्य केली तेव्हां त्याच्याजवळ नेमले, सैन्याचे पोषाक ठरविलें, घोडीं नवीं घेतलीं तरी त्यांच्या पाठीवर शेपटीकडे चौकटी डाग मारण्याचें ठरविलें; राज्यामध्यें सरकारकून वेगळे व अष्टप्रधान वेगळे; सरकारकुनांत अष्टप्रधान अंतर्भूत आहेत. पण अष्टप्रधान तेवढेच सरकारकून असें नाहीं. राज्याच्या दोन

विभागांच्या सीमा कोणत्या तें सांगून त्यांत कर्नाटकांत मुख्य दोन अधिकारी तेंहि सांगितलें. राज्यकारभार सांगतांना 'नवी पद्धत घातली', 'पातशाही कायदा मोडला,' 'मुलकाचा बंद या प्रकारें केला,' असें स्पष्ट सांगितलें. त्यांतहि मुख्य हें कीं, 'वराता देत होते. हक्कांत धरीत होते' अशींच वाक्यें ह्या पद्धतिकथनांत लिहिलीं गेलीं. ह्याचा अर्थ प्रत्यक्ष चालू वहिवाट पाहिलेला हा लेखक आहे म्हणून तो 'वराता देत होते' असें रीतीभूतकाळी प्रयोग लिहितो. नाहींतर 'वराता याव्या, नेमावे, ठेवावे, इ असें विध्यर्थी प्रयोगांत लिहिलें असतें. पण तसें नाहीं. हें अवश्य लक्षांत घेण्याजोगें आहे. असो सारांश सभासदांच्या चरित्रांत कोणता भाग पत्रांतहि भर घालण्याजोगा व पूर्ण विश्वास्य आहे हें अभ्यासानें ओळखतां येईल. प्रस्तुत कीं राज्य म्हणजे देश, गड किती सांगितलें तसें तेथील कारभाररीतीहि सभासदानें सांगितली आहे.

ह्या याद्यांवरून हें एक लक्ष्यांत येतें कीं, अशा यादी ज्या बखरग्रंथांतुन आल्या वा अजिबात आल्या नाहींत किंवा वेगवेगळे निमित्त देऊन आल्या त्या बखरग्रंथाची ओळख सहजच वेगळी होते. सभासदानुकरणी चित्रगुप्त व शेडगांवकर ह्यांच्या बखरग्रंथांत सभासदाप्रमाणें ही यादी योग्य ठिकाणीं व योग्य प्रकारें आली मल्हाररामराव यांनीं यादी दिल्या पण 'ज्याअर्थी इतके गड मुलूख आहे त्याअर्थी 'सार्वभौमपद करण्यास व सिंहासन करण्यास अधिकार जाला' असें पुढें सांगून आधीं गडादींच्या याद्या दिल्या. म्हणजे मल्हार-रामरावांचें हें लेखन शुद्ध पौराणिक पद्धतीचें झालें. 'दक्षिणदिग्विजय' वगैरे आधीं नंतर 'राज्याभिषेक' ही रचना ऐतिहासिक नाहीं. शिवदिग्विजयकारांनीं षाहिस्तेखान प्रसंगाच्याहि आधीं ह्यांतील यादी दिल्या. पण एक्याण्णव कलमी, किंवा शिवाजीप्रताप ह्या बखरींतुन हा भाग मुळींच नाहीं. आतां हें खरें कीं, ह्या यादींतील नांवांत परस्पर तफावत आहे, कमीअधिकताहि आहे, वाचनांतहि कांहीं चुका झालेल्या दिसतील.

पण ह्यावरून हें स्पष्ट मान्य करणें भाग आहे कीं, 'बारनिशा' आहेत, 'एकुणातीच्या' याद्या आहेत, खातेवारी म्हणजे 'घडणी' दप्तर आहे, 'हुजूर पोतदारी' याद्या आहेत; खं. ८ मध्यें आल्याप्रमाणें 'सरंजामी खातें' स्वतंत्र आहे; 'एकबेरजी दप्तर' आहे व म्हणून 'राजमंडळाकडील' ह्या 'सभासद' अधिकाऱ्याला त्या दप्तरांतुन ही मोजणी एकत्रित देतां आली. उघडच झालें कीं

शिवाजीराजांच्या ह्या राज्यकारभाराला अवमानून कोणी कांहीं भलतेंच लिहिलें तर तें केवळ गैर होय. 'राज्यदप्तर' म्हणून जी सर्व कालसापेक्ष कचेरी किंवा फड असावयाचा तसा सर्व शाळाशुद्ध आहे. शिवाजीच्याच पत्रांत फड शब्द आला आहे. इत्यर्थ कीं, शिवाजीराजांचें राज्य बाराव्या वर्षापासून यथा-पद्धत तरवारीबरोबर लेखणीनेंहि उत्क्रान्त होत चाललेलें आहे व तेंच त्या पुण्यश्लोक शिवाजीराजाचें व राज्याचें हें **सभासद कथित** 'चरित्र-आख्यान' म्हणजे रूढ किंवा प्रवर्तक नाम '**बखर**' हें आहे. व तीच पुढें दिली आहे.

शिवाजी महाराजांच्या एकंदर बखरी ८, सभासद (इ. १६९७), चित्रगुप्त-सभासद (इ. १७५९), ९१ कलमी (इ. १७८०) मल्हाररामराव (इ. १८१०), महाराष्ट्र साम्राज्याची छोटी बखर (इ. १८१७), शिवदिग्विजय (इ. १८१८), शिवप्रताप (इ. १८२९) व शेडगांवकर (इ. १८५४). पैकीं जों जों आपण मूळ कथानकापासून दूर दूर जातों तों तों काल दर्शित करण्याची आपली इच्छा वाढत जाते. नेहमीं हेंच घडतें. सध्यांच्याच म्हटल्या जाणाऱ्या एखाद्या गत प्रसंगासंबंधानें 'परवां' 'नुकतेंच' इत्यादि आपण बोलून श्रोत्यांना ती आठवण ताजी करून देतों. कारण श्रोतावक्ता दोघेंहि ह्या सामान्य कालनिदर्शनानें जें समजावयाचें तेंच समजतात. दोघांनाहि तो प्रसंग व काल माहीत असतो. पण जों जों मागील आठवणीपलीकडील वृत्त कथन करूं पाहावें तों तों नेमकें वर्ष, वय, नेमका वार, तिथि, महिना सांगण्याची व ऐकण्याची अपेक्षा अधिक उत्पन्न होते आणि त्याचेंहि कारण हें कीं, सांगण्यांत गणितशुद्ध कालज्ञान असल्यामुळें वास्तवता येते आणि कालसंबद्ध जें वातावरण व त्यांतील कथानक ह्या दोहोंचा बोध होतो. बखरींच्या बाबतींत हेंच घडलेलें आहे. जों जों पुढल्या पुढल्या काळांत बखरी बनत गेल्या तों तों त्यांत काल सांगण्याचें अधिक घडलें आहे. तो काल बिनचूक किंवा सचूक किती हा प्रश्न वेगळा पण बखर पुढल्या काळांतील हें अंदाजण्याची एक खूण सामान्यतः ही आहे. त्याचप्रमाणें वर्णनांत अतिशयोक्ति इ. इ. इ. सभासदाचें लेखन ह्या दृष्टीनें जरूर अभ्यासण्याजोगें वाटतें. व इतर बखर ग्रंथांत ते जर शिवकालापासून बऱ्याच दूरच्या कालांत लिहिलेले आहेत तर जवळच्या लिखित ग्रंथांतल्यापेक्षा ह्या ग्रंथांत कालदर्शित प्रसंग अधिक कसे ? प्रत्यक्ष प्रसंगाची चर्चा व वर्णनहि पाहण्याजोगें असो. सभासदाचें लेखन आणि इतर बखरींतील त्याच

प्रसंगाचें लेखन तुलनेनें पाहण्यासारखें आहे. असो. सांगण्याचा भाग हा कीं, सभासदांत प्रसंगाचा क्रम मागेंपुढें झाला आहे; कांहीं प्रसंग नाहींतच. पण जें आहे त्यांत किती साधेपणा आहे हें पाहण्याजोगें आहे. एकंदरींत '**नस्ता कवींचा व्यापार। तरी कैंचा जगदोद्धार।** ह्याप्रमाणें कृष्णाजींनी एवढेंहि लिहिलें व मिळालें नसतें तर शिवाजीराज–चरिताला आपण अंतरलोंच असतों. ही बखर सापेक्षतया कृष्णाजी अनंतांचें हें चरित्रलेखन ध्यानीं घेतलेंच पाहिजे. बखरीस कालाची जोड पाहिजे व ती दिली आहे.

सभासद बखरींतीलच कांहीं भाग म्हणून शिचसा १ पृ. १०८–०९ मध्यें दिला आहे. पण तो प्रमाण नाहीं. पुढल्या कालांतील नकलकार आपल्याला हवी असलेली गोष्ट, ती तेव्हां रूढहि असेल, नकलेंत कशी समाविष्ट करीत ह्याचें तें उदाहरण आहे इतकेंच. अशीं उदाहरणें चित्रगुप्त, शे. ब, व चिटणीस ह्यांच्याहि बखरग्रंथांत आढळून येतात. सभासदांच्याच कांही प्रतींत मंत्री पदावरील दोन प्रधानांचीं नांवें दिलेलीं आहेत हें जसें चूक तसाच हा प्रकार. अमात्यांचीं दोन नांवें कां हें सभासद सकारण सांगतो. तसें वाकनीस किंवा मंत्री पदाचें नाहीं.

शिवाजीराजांनीं षाहिस्तेखानाला वेगळाच हुन्नर करून पराभूत केल्यानंतर औरंगजेब पातशहानें खानाला दरबार तर बंद केलाच पण गौहत्तीसारख्या दूर ठिकाणीं सुभेदारी सांगून पाठविलें. ह्या नवीन व थोट्या खानाचें हें आगमन तिकडील लोकांना साहजीकच विस्मयकारक वाटलें व हा शास्ताखान कोण, बोटें कां तुटलेलीं इत्यादि माहिती तिकडील भाषेंत लिहिली गेली. त्या बखरग्रंथाला तिकडे 'बुरूंजी' हें नांव आहे. ह्या 'आसामी बुरूंजी' ग्रंथांतुन ह्या निमित्तानें शिवाजीराजांची माहिती आली आहे. अर्थात ती समकालीन असली तरी कांहीं विशिष्ट हेतुनें लिहिलेली व विकृत असल्यामुळें विश्वास्य नाहीं.


राष्ट्रजीवनांत इतिहासाचें कार्य काय आणि त्यासाठीं त्याच्या साधनाची आवश्यकता किती व केवढी आहे हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. इतिहासाबरोबर किंबहुना इतिहासाच्या साधनाला महत्त्व फार आहे. ह्या ठिकाणीं इतिहास शब्दानें आतांचे सिद्ध इतिहासग्रंथ तो इतिहास आणि इतिहाससाधन ह्या शब्दानें आजचा सिद्ध इतिहास ज्या इतिहासकालीन साधनाधारें बनतो तीं

इतिहास–साधनें हें समजावयाचें आहे. इतिहासापेक्षां त्याच्या साधनांची महती मोठी हें वाचून कित्येकांना जरा आश्चर्य वाटेल. कारण साधन तें साधनच, त्याला सिद्धवस्तुपेक्षां अधिक महत्त्व कसें देतां येईल असें ते म्हणतील. पण हें म्हणणें महाराष्ट्रीय इतिहासप्रांतांत तूर्त लटकें होय. प्रथम बखरग्रंथांच्या बाबतींत गु. राजवाडे ह्यांनीं सांगितलें तेंच लक्ष्यांत आणावयाचें. म्हणजे बखरग्रंथ सर्वांशीं ग्राह्य तर नाहींतच पण त्याज्यहि नाहींतच नाहींत. कोणचा बखरग्रंथ कोणच्या उल्लेखापुरता प्रमाण हें सांगण्यास प्रत्यंतर विश्वसनीय पुरावा आणि बखरग्रंथांचेंच तारतम्यानें निरीक्षण हीं दोन प्रमाणें आहेत. उदाहरणार्थ ९१ कलमी शिवाजीची बखर ही अत्यंत विसंगत बोलते; पुढलाच मजकूर तींत आलेला आहे. घटनांचा कालानुक्रम तींत बराच ढिसूळ आहे. तथापि इतर बखरग्रंथांत नाहीं आणि ९१ कलमींतच आहे व प्रत्यंतर विश्वास्य पुराव्यानें ते समर्थित आहे असे उल्लेख ह्या बखरग्रंथांत कांहीं आहेत. पैकीं आऊजी गोविंद हणमंते (मालोजीचा दिव ण होता) हा उल्लेख वेरूळ घृणेश्वरच्या शिलालेखांत आहे व तो ह्या ९१ कलमी बखरींत आहे. तात्पर्य असें कांहीं कांहीं उल्लेख बखरग्रंथांतून आले असल्यामुळें सदर ग्रंथ अभ्यसनीय निश्चितच आहेत. नुसत्या मराठी पत्रांवरून शिवाजीचरित्र लिहितां येणार नाहीं. शकावली, शिवभारत, बखरग्रंथ इत्यादि ग्रंथ आणि इंग्रजी पत्रें हीं त्या चरित्रासाठीं ध्यानीं घेतलीं पाहिजेत. शिवकालीन म्हणजे, इ. स. १७०७ पर्यंतच्या इतिहासाची गोष्ट पुढील कालच्या इतिहासास लागू नाहीं. पुढें पुढें बखरग्रंथहि कमी आणि पत्रें पुष्कळच व उपलब्ध आणि प्रसिद्ध. सारांश, शिवाजीराजांच्या चरित्रापूर्वीं त्या चरित्रसाधनांची चर्चा व निष्कर्ष सांगणारें पुस्तक आधीं सिद्ध होणें आवश्यक वाटतें आणि सर्वांपेक्षां अद्याप संशोधन होणेंच अत्यावश्यक आहे. आहे ह्या साधनाधारें कोणीं शिवाजीचरित्र लिहूं नये असें कसें म्हणतां येईल व म्हणून कोण थांबणार ? जो तो आपल्यापरीनें शिवाजीचरित्र किंवा शिवाजी चरित्रांतील एखादा प्रसंग कथन करणार हें उघड आहे. पण स्थिर, चिर आणि खरें चरित्र सांगावयाचें तर साधनाधारेंच सांगावयास पाहिजे व संशोधनच अद्याप व्हावयास पाहिजे. ' साधनाधारें ' ह्याचा माझा अर्थ हा कीं, इतिहास शिकवितांनाच साधनांच्याच द्वारें तो सांगितला जावा. म्हणजे त्यांतल्या त्यांत तें चरित्रकथन वास्तववादी राहील; त्याला अन्य लेप

लावलें तरी मूळ काय तें लोकांपुढें येईल. आणि ग्रामण्यें, भेद, मत्सर, पंथ, मतें ह्यांना वाव फार कमी मिळेल. ज्ञानेश्वरी, तुकाराम–गाथा सांगतांना ओवी, अभंग मुख्य, प्रतिपादन दुय्यम तसें इतिहासाचें आहे. साधन मुख्य व सिद्ध इतिहास दुय्यम; म्हणजे ज्यांचा इतिहास त्यांच्याचकडून व त्यांच्या इष्ट-मित्रांकडून ऐकून व समजून घेणें हें घडावें. त्यांतीलच ही **सभासदांची बखर** आहे.

हस्तलिखित बखरीचें पान

पृ० २६–२९ पाहा.



१. जातिवंत ठेवावे त्यासी जमान हुजरातीचे वो
२. लखीचे ठेवावे कारखानावीस परभू म्हणोन
३. (जाति) वत होतां तो ठेविला यैसे यकासयेक
४. प्रतीमल ठेवावे यक हवालदाराचे हाती फि
५. तवा फतडा यासी लोक कोणाच्यानें देव व जा
६. तीने बदोबस्ती किल कोटाच मामले कले न
७. वीन पधत घातली [1]तैसेच लस्करात पागा
८. केली पागेच बले तोळदांर पागेचे तोलदारीखाली
९. सिलेदार ठेविले स्वतंत्र बत्ल कोणाचे केल नाही
१०. पागेमधे दर घोडियास बारगीर येक आश्व
११. डी आश्व पंचवीसं त्यास येक मराठा
१२. धारकरी हवलदार लोक पाच हवालेसी
१३. येक जुमला केला नाव ठेविले जुमलेदार
१४. यासी पाच होन तैनात पंचवीस घोडि
१५. यास येक पाखाली येक नालबद दाहा जुमले
१६. मणजे यक हजारी यासि हजार होन तैनात

नवीन (दुबार) ओळींत मध्येंच वर लिहिलें आहे.

२ 'नवीनवीच' असेंहि होईल. परंतु थोडें खोडल्यासारखें केलें आहे. 'नवीच' एवढेंच म्हणणें युक्त. ३ ही मात्रा येथें वृथा. च–वर धरल्यास ठीक. पागेचें बल असें होईल. ४ दा–वर अनुस्वार उगाच लपेटींत पडला. ५ ल-ला त्–कार जोडण्याची पद्धत तेव्हां होती. व ह्याचें वाचन ळ करावयाचें. ६ हें दु–चें वळण फारच वेगळें. हें बखर पान वाचून म. म. द. वा. पोतदार ह्यांनीं पाहून दिलें आहे. 'येक अश्व (श्प) दु अश्व (स) अशी मोगल मनसबदारी पद्धत म्हणून प्रसिद्ध आहे हेंहि त्यांनींच सुचविलें.

बखर पान नमुना

हस्तलिखित मूळ बखर नकलेचें मोडी लेखन कसें असतें त्याची कल्पना येण्यासाठीं वर हस्तलिखित बखरग्रंथाचा कांहीं भाग फोटोरूपानें दिला आहे. ह्या भागापुरतें मोडीचें बालबोधींत वाचनहि सोबत आहे. श्रीमान् साने यांस मिळालेल्या एका बखरीचाच हा भाग असावा. आणखी थोडी अधिक कल्पना येण्यासाठीं म्हणजे बखरींतील पानें एकास एक जोडून कशीं असतात, त्यांवर पानाचा क्रमांक कसा असतो, बरींचशीं पानें जोडून झालीं म्हणजे पानांच्या पाठीमागें उलटून कसें लिहिलें जातें व लेखन पुरें कसें करीत इत्यादि दाखविण्यासाठीं अशींच आणखीं कांहीं पानें द्यावयाचीं तर तें इतर दृष्टीनें जमण्याजोगें नाहीं. सोबत जोडलेलें पान मूळ बखरींतील २४ वें आहे आणि छापील प्रस्तुत बखरींत हा भाग पृ. २२ वर आला आहे. फोटोवरून ध्यानीं येईल कीं, मोडी लेखनांत शब्द तोडून लिहिलें जात नाहींत, ऱ्हस्वदीर्घहि संभाळलें जात नाहीं, मात्रा, वेलांट्या व लेखनाची लपेट कशी असते, विरामचिन्हें नाहींत, तसेंच परिच्छेद वेगळा दाखवून लिहिणें नाहीं. सोबतच्या पानांत ९ व्या ओळींत 'तैसेच लस्करांत पागा' हा वेगळा परिच्छेद आहे; पण तो मार्डीत सलगच लिहिण्यांत आला आहे. एखादें अक्षर ओळींत मध्येंच वर लिहीत, *कांहीं जागीं अक्षर नकलकारास लागलें नाहीं म्हणून असो पण लिहिलें जात नाहीं व ती जागा तेवढी मोकळी सोडली जाते. ओळ ३ पहा. ह्या ओळींत पहिलें अक्षर लिहिण्याचें राहिलेलें दिसतें. तें का असावें. (म्हणजे कायत ?) पाठांतरें किंवा पाठभेद कसे उत्पन्न होतात, संशय कसा वाटतो, एक कोणची तरी प्रत घेतां कां येत नाहीं, अनेक प्रती पाहून उचित पाठ कोणता तें ठरविण्याचा प्रसंग कां व कसा येतो हें ह्या एका पानाच्या अभ्यासावरून लक्षांत येईल. खालून चवथ्या व तिसऱ्या ओळींत 'जुमलेदार यासी पांच होन तैनात' आणि शेवटच्या व उपान्त्य ओळींत 'दाहा जुमले म्हणजे येक हजारी यासि हजार होन तैनात' असें सांगितलें. दहा जुमले म्हणजे–हस्तलिखित पानांत म्ह-ऐवजीं–म पडला आहे—येक हजारी (म्ह. १२५० घोडे) हें बरोबर व त्यास हजार होन तैनात हेंहि ठीक. पण एका जुमलेदारास अवघी 'पांच' होन तैनात हें कसें सुसंगत ? इतर प्रतींत 'पांचशें' आहेत व ते छापील प्रतींत घेतले

आहेत. १३ व्या ओळींत 'जुमला लोक नांव ठेविले' असें आहे. हेंहि परि. ६६ अनुसार चालेल. पण दुसऱ्या प्रतींत 'म्हणून' नांव ठेविलें असें आहे व तें मुद्रणार्थ घेतलें. १० व्या ओळीचा शेवट व ११ वीचा प्रारंभ सार्थ लागत नाहीं. शेवटच्या ओळींत 'यासि' ह्यांतील सि ऱ्हस्व कशी तें पाहण्याजोगें आहे. मोडीमध्यें सामान्यतः वेलांटी म्हणजे इकार दीर्घ व उकार ऱ्हस्व असतो. फोटोंतील पहिल्या तीन ओळींत आणि मुद्रित पान २२ ओळ ११ ते १३ ह्या ३ ओळींत पाठभेद कसा झाला हें पाहण्याजोगें आहे. गडावर हवालदार, सरनौबत, सबनीस व कारखानीस ठेवण्याविषयीं नियम सांगणें सुरू आहे. लेखकास सांगावयाचें आहे–इतर प्रतींच्या आधारें–हवालदार सरनौबतांकडून हुजरातीपैकीं कोणी जामीन घ्यावा, सबनीसांसाठीं हुजरातीपैकीं कोणाची ओळख घ्यावी आणि कारखानीसाविषयीं छापील प्रतींत कांहीं नाहीं व फोटोतील लिहिणें अर्धवट आहे. म्हणजे येथें आणि वर ५ व्या ६ व व्या ओळीतील लेखनावरून नकलकाराची कांहींतरी गडबड झालेली दिसते. मुद्रित प्रत पहा.


शब्दसूचींत कांहीं शब्द परिचित असलेले अर्थात् उगाच घेतले असें वाटेल. पण पाहणारांच्या ध्यानीं येईल कीं शब्द परिचित पण प्रयोग अपरिचित; कांहीं शब्दांचे अर्थ अनेक. उदाहरणार्थ हवालदार हा शब्द दहा खात्यांकडील अंमलदार म्हणून आला आहे. राज्यव्यहारकोशांतहि हे अर्थ पठित आहेत. रा. व्य. को. तहि जनपदवर्गांत सुभेदार, मुजुमदार आणि हवालदार हे तीन वरिष्ठ अंमलदार देशाधिकारी, देशलेखक व नुसते अधिकारी म्हणजे हवालदार असे श्लो. ३३० मध्यें दिले आहेत. पटवर्धन कोशांत हवालत व हवल्दार असा दोनच ठिकाणीं हा दर्शित केला आहे. पण दहाहि खात्यांकडे हवालदार ह्या एकाच पदाचा अंमलदार आहे. अशीच गोष्ट थोड्या फरकानें हशम-शब्दाची. 'हजार माणूस हशम केला.' (परि. ६६) हिंदु, रजपूत, मराठा हे शब्द परिचितच निःसंशय आहेत. पण सभासदानें कसे व कोणाच्या तोंडीं ते घातले आहेत हें आज कळणें आवश्यक आहे. हिंमत शब्द माहीतच. पण शिवाजीनें 'श्री' प्रसन्न झाली म्हणून हिंमत धरली हा ह्या शब्दामागील भाग लक्षांत येणें हिताचें आहे. 'सुभा' शब्दहि हवालदाराप्रमाणेंच आहे. तात्पर्य, अशादृष्टीनें ह्या सूचींत शब्दसंग्रह केला आहे.

व्यक्तिस्थलसूचींत—टिपणी, कालपट व प्रास्ताविक ह्यांतीलहि नामें

घेण्याचा यत्न केला आहे. ' शि. भा.' ला गुरुवर्यांनीं २ शें पानांची प्रस्तावना लिहिली. कितीतरी विषय व व्यक्तिस्थलांचे निर्देश सहजच तेथें आले. पण सूचींत फक्त शि. भा. तीलच नामोल्लेखांचा संग्रह केल्यामुळें प्रसंगीं ह्या प्रस्तावनेचा उपयोग करणें त्रासाचें होतें. असें होऊं नये म्हणून येथें ग्रंथांतील सर्व ऐ. स्थल व्यक्तींचा निर्देश सूचींत केला आहे. तो अर्थातच उपयुक्त वाटेल हा भरंवसा.

भोसले छत्रपतींची वंशावळ

(*येकोजी जैतोजी ?)



*पृ. १ व ११४ पहा. ' येकोजी व त्याचा पिता जैतोजी ' हीं दोन नांवें आजच्या शिवाजीराजांच्या वंशावळींतील पूर्वजांत नाहींत. वेरूळ येथील शिलालेखांत, बाबाजी जो शहाजीचा पणजा त्याच्याहि आधींचीं म्हणून तीं

तेथें आलीं आहेत. शिलालेखाधारें पाहतां तीं वंशावळींत समाविष्ट केलीं पाहिजेत. ह्यांतील 'येकोजी' नांवाची पुनरावृत्ति तंजावरकर व्यंकोजी राजे या नांवांत दिसते. बाबाजी-चा उल्लेख खं. १५ ले. ३६७ मध्यें आहे इ. १५९७. मालोजी-विठोजींचे उल्लेख इ. स. १६०६ पासूनचे आढळतात खं. १५ ले. ३८८ इ. इ. शिवाजी राजांच्या पूर्वींच्या तीन पिढ्यांतील व्यक्तींचा नामनिर्देश घृष्णेश्वरासारख्या मंदिराच्या उभारणींत येतो व तो त्यांच्या हस्तकासह शिलालेखांत कोरला जातो त्याअर्थीं हें घराणें शंभर वर्षें म्ह. सोळाव्या शतकापासूनच चांगलें प्रतिष्ठित व संपन्न म्हणून विख्यात असलें पाहिजे हें उघड आहे. व्यक्तीपुढील आंकडे जन्ममृत्यूचे इ. स. आहेत.

भोंसले ह्यांचें गोत्र कौशिक. 'पुरोहितस्य प्रवरेण राजा वृणीते' ह्या आपस्तंबसूत्रान्वयें राजानें पुरोहिताचा प्रवर चालवावा. एक गोत्र मानल्या-शिवाय गोत्रांतील प्रमुख ते प्रवर मानावें, असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून प्रवर-संज्ञेनें गोत्रहि घ्यावयाचें. म्ह. क्षत्रियानें उपाध्यायाचें गोत्र लावावें ही जरी प्रथा असली तरी येथें तसें आढळत नाहीं. छत्रपतींच्या दानपत्रांत सदर गोत्रनिर्देश आहे. राजोपाध्यांचें गोत्र 'शाकल्य' आहे. घोरपडे यांचें 'वाजपेय' हें गोत्र आहे. शिसोदे यांचें गोत्र कौशिक नाहीं.

अनुक्रमणिका

प्रकरण ६ वें—आदिलशाहीशीं युद्ध

प्रकरण ७ वें—शिवाजीराजांचा मोंगलाशीं तह व बिघाड

कृष्णाजी अनंत सभासद विरचित

आद्य छत्रपति श्रीशिवाजीराजे यांची बखर

प्रकरण १ लें

थोडें पूर्वजवृत्त व शिवाजी कार्यारंभ

॥ श्रीः ॥

श्रीमंत महाराज राजश्री **राजारामसाहेब**
छत्रपती साहेबांचे सेवेशीं

१. चरित्र लेखनास आज्ञा व निमित्त

विनंती, सेवक **कृष्णाजी अनंत** सभासद [1]राजमंडळ कृतानेक विज्ञापना ऐसी जे. साहेबीं मेहरबानी करून सेवकास पुसिलें कीं, ‘ आपले पिते थोरले राजे याणीं इतका पराक्रम केला व चार पातशाहींशीं दावा लाविला ऐसा पराक्रम केला. ऐसें असतां **औरंगजेब** येऊन [त्यानें] किल्लोकिल्लीं अनर्थ मांडिला. याचा अर्थ काय ? तुम्ही पुरातन, राज्यांतील माहीत[गार] लोक आहां. तरि इस्तकबिलपासून चरित्र लेहून देणें ’ म्हणोन आज्ञा केली. त्याजवरून वर्तमान ऐसी जे :—

२. मालोजीराजे व त्यांस दृष्टान्त

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री **शाहाजीराजे**, यांचे बाप म्हणजे राजियांचे आजे राजश्री **मालोजी**राजे व **विठोजी**राजे **भोंसले**, हे निजामशाही वजीर दौलता करून तोलदारीनें होते. त्यांची निष्ठा

---

१ पाठांतर.

श्रीशंभुमहादेव यांचे भजनीं बहुत होती. त्यास **शिखरीं** यात्रा चैत्र मासीं भरते. पांचसात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहुत संकट. उदक नाहीं. तीन कोशांवरून उदक आणतात. लोक श्रमी बहुत होतात. म्हणून राजश्री **मालोजीराजे** यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें. हें करितांच रात्रौ **श्रीशंभुमहादेव** [२]स्वप्नास येऊन प्रसन्न होऊन बोलिला जे 'तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं. देवब्राह्मणांचें संरक्षण करून म्लेंच्छांचा क्षय करतों. **दक्षण देशाचें** राज्य देतों' म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. त्याजवरून राजे यांस बहुत संतोष होऊन [त्यांनीं] दानधर्म बहुत केला.

३. शाहाजीराजे, शिवाजीजन्म व दादाजी कोंडदेव.

पुढें राजश्री **मालोजीराजे** यांच्या पोटीं राजश्री **शाहाजीराजे** [व] राजश्री [३]**सरफजीराजे** हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाही-मध्यें दौलता केल्या, दौलत करीत असतां निजामशाही बुडाली. यावरि **शाहाजीराजे** इदलशाही वजीर जाले. 'महाराज' [हा] किताब दिला. दाहाबारा हजार फौज चालूं लागली. **शाहाजी** राजियासि दोघी स्त्रिया. प्रथम स्त्री **जिजाई** [४]आऊ. दुसरी स्त्री **तुकाई** आऊ, तिचे पोटीं **एकोजी**राजे पुत्र जाले. **जिजाई** आऊ तिचे पोटीं राजश्री [५]**शिवाजी-राजे** पुत्र होतांच **श्रीशंभुमहादेव** जागृतीं येऊन स्वप्न जालें कीं,

---

२ 'जागृतीमध्यें स्वप्नांत येऊन' प्र. प्रत. जवळजवळ अगदीं असेंच पुढील परि०तच 'जागृतीं येऊन स्वप्न जालें कीं' आलें आहे. वि. स्प. टिपणी पहा.

३ 'सरफजी राजे मोंगलाई वजीरपणा करून चाकर होऊन राहिले' म. प्रत.

४ 'प्रथम स्त्री नांव जिजाई तिचे पोटीं पुत्र संभाजीराजे जाले. दुसरे पुत्र शिवाजीराजे जाले'—म. व सा. प्रत.

५ जन्म श. १५५१ फाल्गुन वद्य ३ शुक्रवार दि. १९।२।१६३० रात्रीं सामान्यतः ८॥ वाजतां. वि. स्प. टिपणी पहा.

'आपणच अवतरलों आहें. पुढें बहुत ख्यात करणें आहे. बारा वर्षेपर्यंत तुम्हीं आपले जवळ ठेवावें. पुढें न ठेवणें. जातील तिकडे जाऊं देणें. आटोप न करणें.' ऐशी जागृति [६]जाली. **शाहाजीराजे कर्नाटक बेंगरूळ** येथें होते. त्यांपाशीं कारभारी राजश्री **नारोपंत दीक्षित** होते. त्यांच्या पोटीं **रघुनाथपंत** व **जनार्दनपंत** हे दोघे पुत्र बहुत शाहाणे जाले. **शाहाजीराजे** यांसि दौलतेमध्यें पुणें परगणा होता. तेथें **दादाजी कोंडदेव** शाहाणा, चौकस ठेविला होता. तो **बेंगरूळास** महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजश्री **शिवाजीराजे** व **जिजाबाई** आऊ ऐशीं गेलीं. ते समयीं राजियास वर्षें बारा होतीं. [निरोप घेते [७]समयीं*] बराबर **शामराव नीळकंठ** म्हणून पेशवे करून दिले व **बाळकृष्णपंत, नारोपंत दीक्षितांचे** चुलतभाऊ,[८] **मजुमदार** दिले व **सोनोपंत डबीर** व **रघुनाथ बलाळ सबनीस** ऐसे देऊन **दादाजीपंतांस** व **राजे** यांसि पुण्यास रवाना केले. ते **पुण्यास** आले. येतांच बारा **मावळें** काबीज केलीं. मावळे देशमूख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यांस मारिलें. त्याजवर कालवशात् **दादाजी कोंडदेव** मृत्यु पावले.

४. शिवाजीराजे सुपेदेश साधून कारभार करूं लागतात.

पुढें **शिवाजीराजे** आपणच कारभार करीत चालले. मग **सुपे** महाल

---

६. यापुढें सा. व म. प्रतींत असें आहे—'दानधर्म दुसरे दिवशीं बहुत केला. दुसरी स्त्री तुकाई आऊ, तिचे पोटीं पुत्र व्यंकोजीराजे जाले. असे तिघे पुत्र जाले. त्यांमध्यें संभाजीराजे वडील. यांसी विजापुराहून वेगळी दौलत जाली होती. यांसि बडे साहेबीण, बाईल सुलतान महंमद पादशाह याची स्त्री, विजापुरी होती तिणे विश्वासघात करून विषाची लुगडी दिली, तेव्हां ते मेले.' 'विषाचीं वस्त्रें' असा पाठ रा. प्रतींत पान ४ वर ओळ २ मध्यें आहे.

७ हा पाठ चिस. मधील आहे. प्रास्ताविक 'प्रतीशुद्धि' पाहा.

८ 'बाळकृष्णपंत व नारोपंत०' असें मुळांत आहे. 'चुलते व भाऊ मुजुमदार' म. प्रत.

येथें कोणे एके जागां **संभाजी मोहिता** म्हणोन सावत्र आईचा भाऊ मामा होता. तो महाराजांनीं महालावरी[९] ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणून गेले. मामास कैद करून ठेविलें. त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्याहि बहुत होतें, वस्तभाव, कापड हस्तगत करून **सुपे देश** साधिला.[१०] **तुकोजी चोर** मराठा म्हणोन लष्करचा सरणोबत केला. **शामराव नीळकंठ** पेशवे व **बाळकृष्णपंत** मजुमदार व **नारोपंत** व **सोनाजीपंत** व **रघुनाथ बलाळ** सबनीस असे कारभारी करून बहूत सावधपणें चौकशीनें वर्तणूक करीत चालले.

५. जुन्नर, नगर मारून कोंढाणा व पुरंदरगडीं ठाणें बसविलें.

पुढें **जुन्नर** शहर मारिलें. घोडे दोनशें पाडाव केले. तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापडजिन्नस, जडजवाहीर, हस्तगत करून **पुण्यास** आले मग **अमदानगर** शहर मारिलें. मोंगलांशीं मोठें युद्ध केलें. सातशें घोडे पाडाव केले. हत्तीहि पाडाव केले. द्रव्य बहुत सांपडलें. ते समयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहाले. अशी तीन हजार स्वारांची बेरीज जाली. तेव्हां **माणकोजी दाहातोंडे** सरनोबत लष्करचें केलें. मग किल्ले **कोंढाणा** इदलशाही होता तो भेद[११] करून घेतला. ठाणें आपलें ठेविलें. सवेंच **पुरंदरगड** इदलशाही येथें **नीळकंठराव** म्हणोन ब्राह्मण गडास खावंद होते, ते मेले. त्यांचे पुत्र दोघे, ते एकांत एक भांडूं लागले. त्यांची समजावीस करावयास म्हणोन राजे **पुरंदरास** गेले. आणि ते दोघे भाऊ कैद करून तोहि गड आपणच घेतला. आपलें ठाणें बसविलें.

६. कल्याणभिवंडी मारली; चंद्रराव मोरे मारून जावली घेतली.

त्याजवरि **कोंकणांत कल्याणभिवंडी** मारिली. आणि **माहुली** किल्ला अदलशाही घेतला. मावळे लोक यांची संचणी करीत चालले.

---

९ 'मोकाशियावर' सा. व म. प्रत.

१० 'सुपे देखील कोट साधिला.' म. प्रत.

११ 'जोरावारीनें घेतला' म. प्रत.

मुरबाद[१२] म्हणोन डोंगर होता त्यास वसविलें. त्याचें नांव **राजगड** म्हणोन ठेविलें. त्या गडाच्या चार माच्या वसविल्या. **कोंकणांत चंदरराव मोरे** म्हणून राज्य करीत होते. व **शृंगारपुरी सुर्वे** राज्य करीत होते. त्यांचे प्रधान **शिरके** होते. असे जबरदस्त गड-कोट, दाहाबारा हजार लष्कर हाशम समेत राज्य करीत असत. त्यांजकडे **रघुनाथ बलाळ** सबनीस बोलावून पाठविलें. विचार करितां '**चंदरराव मोरे** यास मारल्या विराहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्ही त्यांजकडे हेजबीस जाणें.' ऐसें सांगितलें. बराबर निवडक धारकरी शें सवाशें माणूस निवडून दिले. ते स्वार होऊन **जावलीन**जीक जाऊन पुढें **चंदररायास** सांगून पाठविलें कीं, 'आपण **राजियां**कडून आलों आहों. कित्येक बोलणें चालणें तहरह कर्तव्य आहे' असें सांगून पाठविलें. उपरि त्यांनीं त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जाहालें. बिराड दिलें तेथें जाऊन राहिलें. दुसरे दिवशीं मागती गेले. एकांतीं भेट घेतली. बोलणें जाहलें. प्रसंग पाहून **चंदरराव** व **सूर्याजीराव** दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातींनिशीं निघून चालिले. पाठीवर लाग जाहाला, त्यास मारून निघून चालिले. खांसाच पडलियावर लोक काय चालून येतात? असें कर्म करून, परतोन **राजियाकडे** भेटीस आले. तेच खांसा **राजा** चालोन जाऊन **जावली** सर केली. मावळे लोकांस कौल देऊन सचंणा केली. **प्रतापगड** म्हणून नवाच वसविला. **हणमंतराव** म्हणवून **चंदररायाचा** भाऊ **चतुर्बेट** म्हणून जागा **जावली**चा होता, तेथें बल धरून राहिला. त्यास मारल्याविना जावलीचें शैल्य तुटत नाहीं. असें जाणून **संभाजी कावजी** म्हणून महालदार राजियाचा होता त्यास **हणमंतराव** याजकडें राज्यकारणास पाठवून, सोइरिकीचें नातें लावून, एकांतीं बोलीचालीस जाऊन, **संभाजी कावजी** यानें **हणमंतरायासि** कटारीचे वार चालवून जिवें मारिलें. **जावली** काबीज केली. **सिवतर**

१२ 'मुरुमदेव' पाठांतर.

खोरियांत [१३]**बाबजीराऊ** म्हणून पुंड होता. तोहि कैद करून त्याचे डोळे काढिले.

७. शृंगारपूर घेतलें. कारभारियांत बदल व वाढ. संभाजीजन्म.

पुढें **सुर्वे** राज्य करीत होते त्यांजवर चालून गेले. **शृंगारपूर** घेतलें. **सुर्वे** पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी **शिर्के** होते त्यांशीं भेद करून राज्य हस्तगत केलें. त्यांसि महालमुलूख देऊन त्यांची कन्या आपले पुत्रास केली. **राजियानें** याप्रकारें **जावलीचें** राज्य व **शृंगारपूरचें** राज्य ऐशीं दोन राज्यें काबीज केलीं. तेव्हां **मोरो त्रिंबक पिंगळे** ब्राह्मण यांनीं बहूत मेहनत केली. त्याजवरून **शामराव नीळकंठ** यांची ' पेशवाई ' दूर करून **मोरोपंतास** ' पेशवाई ' दिली. व **निळो सोनदेव** यांणींहि मेहनत केली म्हणोन ' [१४]सुरनिशी ' सांगितली. **गंगाजी मंगाजी** म्हणोन होते त्यांस ' वाकनिशी ' सांगितली. **प्रभाकर भट** म्हणून थोर ब्राह्मण उपाध्ये होते. त्यांचे पुत्र **बाळंभट** व **गोविंदभट** हे उपाध्येपण चालवित होते. लष्करचा ' सरनोबत ' **नेताजी**[१५] **पालकर** केला. **नेताजी** सरनोबती करीत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार अशी दाहा हजार फौज जाहाली. मावळे लोकांची संचणी दाहा हजार पावेतों जाली. यांसि ' सरनोबत ' **येसाजी कंक** म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले. **राजियाची** स्त्री **निंबाळकर** यांची कन्या **सईबाई** केली होती ती प्रसूत जाहाली. पुत्र जाहाला. त्याचें नांव **संभाजी राजा** म्हणून ठेविलें. बहुत उत्साह केला. धर्म बहुत केला. **राजगडीं** राहिले.

---

१३ ' बाबाजी कोंडणें ' म. प्रत.

१४ ' बाळकृष्णपंताची मुजुमदारी काढून निळोपंतास सांगितली. आबाजीपंत याणीहि...केली त्यासि सुरनिशी सांगितली.' म. प्रत.

१५ ' जैतोजी पालकर ' म. प्रत.

प्रकरण २ रें

शिवाजी व अफजलखान

८. शाहाजीचें अल्ली आदिलशाहास शिवाजीच्या बंदोबस्ताबद्दल पत्रोत्तर.

मग पुढें या खबरी **दिल्लीस** पातशाहास कळाल्या. **विजापूर** [येथें] **अली** इदलशाहा पादशाही करूं लागले व **बडी साहेबीण** सुलतान **महंमद** याची बायको ही कारभार कुल करीत असतां त्यांस हें वर्तमान कळून बहुत कष्टी जाहाली. पातशाही किल्ले घेतले देशहि काबीज केला. एकदोन राज्यें बुडविलीं. हा पुंड जाहाला. त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें ? म्हणून विचार करून राजश्री **शाहाजी-राजे बेंगरुळाकडे** होते, त्यांस पत्रें लिहिलीं. महालदार रवाना केले कीं, 'तुम्ही पादशाही चाकर आणि **शिवाजी** लेक **पुण्याकडे** पाठवून यांणीं पातशाहाशीं बदलून हरामखोरी केली. चार किल्ले पादशाही घेतले. देश, मुलूख काबीज केला व मारिला. एकदोन राज्यें बुडविलीं व एकदोन राजे पातशाही रुजुवात होते ते मारिले. आतां लेंकास कैदवार ठेवणें. नाहीं तरि पादशाही हवाला घेतील.' असें लिहून पाठविलें. मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं, '**शिवाजी** आपला पुत्र, परंतु आपणाजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकूमांत नाहीं. आपण तो पादशहांशीं रुजुवात एक-निष्ठेनें आहों. **शिवाजी** आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें, आपण दरम्यान येत नाहीं.' असें उत्तर पाठविलें.

९. अफजलखानाची पाठवणी

त्याजवरून **बडी साहेबीण** हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून **शिवाजी**राजियावरि रवाना करावे म्हणोन पुसतां कोणीं कबूल केलें नाहीं. **अफजलखान** वजीर यांणीं कबूल केलें कीं,

'**शिवाजी** काय? चढे घोडियानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों.' असें बोलिल्यावरि पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रें, अलंकार, हत्ती, घोडे, दौलत इजाफा देऊन, नांवाजिक बरोबर उमराव जमाव बारा हजार स्वार, खेरीज पायदळ रवाना केलें.

१०. खानाचा देवादिकांस उपद्रव, वांईस येऊन शिवाजीकडे निरोप.

तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस-चौरस लष्कर उतरलें. आणि पुढें **तुळजापुरास** आलें. तेथें येऊन मुकाम केला. **श्रीभवानी** कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें. भवानीस फोडतांच आकाशवाणी जाहाली कीं, 'अरे **अफजलखाना**, नीचा, आजपासून एकविसावे दिवशीं तुझें शीर कापून, तुझें लष्कर अवघें संहार करून नव कोटी चामुंडांस संतृप्त करितें.' अशी अश्रणी जाहाली. पुढें लष्कर कूच करून **श्रीपंढरीस** आलें. **भीमातीरीं** उतरलें. देवास उपद्रव देऊन, **वांईस** आलें. तेथें येऊन विचार केला कीं, '**राजियाकडे** हेजिबीस पाठवून, सला करून, पातेजून जिवंत हातीं धरावा.' अशी मनांत योजना करून **कृष्णाजी भास्कर** हेजीब यास बोलावून आणून सांगितलें कीं, 'तुमचे बाप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे; त्याजमुळें तुम्ही कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्हीं येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशाहाजवळून तुम्हांस **तळकोंकणचें** राज्य व जाहागिरी देववितों. गडकोट घेतले ते करार करवितों. वरकडहि नांवाजितों. जितकें तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों. पादशाहाशीं भेट घेणें तरी घ्या, नाहीं तरि मुलाजमत माफ करवितों.' ऐशा कित्येक गोष्टी सांगोन 'सल्यांत राजासि भेटीस आणावें; अगर आपण येऊं.' असें [१६]**कृष्णाजीपंतापाशीं** सांगितलें. आणि त्यास पुढें [१७]रवाना करावें [असें केलें.]

---

१६ 'पंतोजीपंतास' म. प्रत. 'कृष्णाजीपंत' सा. व प्र. प्रत.

१७ 'रात्रीं एकांतीं पंताजीपंतास बोलावून आणिला; राजे यांनीं व त्यांनीं

११. अफजलखानाशीं सला नाहीं; युद्धच.

तों या खबरी **राजियासि** पावल्या कीं, '**विजापुराहून अफजलखान** बारा हजार स्वारांनिशीं नामजाद जाहाला.' हें कळून राजानें, आपली कुल फौज लष्कर मुस्तेद करावें, आणि **जावलीस** युद्ध करावें, आपण **प्रतापगडास** जावें, हा विचार केला. तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं, 'जुंज देऊं नये, सला करावा.' त्यास राजे बोलिले जे '**संभाजीराजियास** जसें मारिलें तसें आपणास मारितील. मारितां मारितां जें होईल तें करूं, सला करणें नाहीं.' हा विचार केला. तों रात्रीं **श्रीभवानी तुळजापूरची** [इणें] मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं, 'आपण प्रसन्न जाहालों. सर्वस्वें साह्य तुला आहे. तुझें हातें **अफजलखान** मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं चिंता करूं नको.' म्हणून धीर भरंवसा देऊन अभय दिलें. राजे जागे होऊन **जिजाबाई** आऊस बोलावून आणून स्वप्नाचें वर्तमान सांगितलें. व **गोमाजी नाईक पानसंबळ** जामदार व **कृष्णाजी नाईक** व **सुभानजी नाईक** असे मातबर लोक व सरदार व सरकारकून **मोरोपंत** व **निळोपंत** व **अण्णाजीपंत** व **सोनाजीपंत** व **गंगाजी मंगाजी** व **नेताजी पालकर** सरनोबत व **रघुनाथ बलाळ** सबनीस व पुरोहीत असे बोलावून सर्वांस स्वप्न सांगितलें. [कीं] 'श्री प्रसन्न जाहाली, आतां **अफजलखान** मारून गर्दीस मेळवितों.' हें सर्वांचे मतें कठीण कर्म, सिद्धीस गेलें म्हणजे बरें. नाहीं तरी कसें होईल? म्हणोन विचार पडला. मग राजे बोलिले कीं, 'सला केलियानें प्राणनाश होईल. युद्ध केलियानें जय जाहालियास उत्तम, प्राण गेलियानें कीर्ति आहे. येविषयीं श्लोक

जितेन [जयेन ?] लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगनाः ।
क्षणविध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ॥ १ ॥

दोघानींच बसून आण, शपथ त्यांसि घालून वर्तमान पुसिलें. यथार्थ करीणा सांगणें, खानाचे मनांत काय आहे तें सांगणें, आम्ही तुम्हावेगळे नाहीं, तुम्ही शाहाणे आहां, राज्याचें रक्षण तुम्ही करणें, सर्व राज्यकारभार देतो. इत्यादि ' म. प्रत.

असा नीतीमध्यें विचार सांगितला आहे. त्याजकरितां युद्ध करावें हें खरें. आतां एकच तजवीज करावी. **संभाजी** राजे पुत्र व **मातोश्री** आहेत हीं **राजगडीं** ठेवावीं. जर **अफजलखान** मारून जय जाहला तरि माझा मीच आहें. एखादे समयीं युद्धीं प्राणनाश जाहाला, तरि **संभाजी राजे** आहेत, त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्ही राहाणें.' अशी निर्वाणूक करून, सर्वांस सांगून, **मातुश्रींच्या** पायांवरि डोई ठेवून, निरोप घेतला. **मातुश्रींनीं** आशीर्वाद दिला कीं, '**शिवबा !** विजयी होशील.'

१२. राजे राजगडाहून प्रतापगडास येतात व युद्धार्थ लष्कर योजना.

असा आशीर्वाद घेऊन मग **राजे** निघोन **प्रतापगडास** गेले. **नेताजी पालकर** सरनोबत यास 'लष्कर घेऊन वरघाटावरि येणें' म्हणोन सांगितलें. आणि '**अफजलखानास जावलीस** बोलावितों, सला करून भेटतों, विश्वास लावून जवळ आणितों, ते समयीं तुम्हीं घाटमाथां येऊन मार्ग धरणें' असें सांगितलें. त्याजबरोबर **रघुनाथ बलाळ** सबनीस दिले. व **मोरोपंत पेशवे** व **शामराव नीळकंठ** व **त्रिंबक भास्कर** यांसहि समागमें घेऊन तेहि कोंकणांतून यावें असें केलें.

१३. खान व शिवाजी ह्यांचे वकील एकमेकांकडे जातात.

इतक्यांत **कृष्णाजीपंत** हेजीब खानाकडील आले. त्यांस **प्रतापगडावर** घेतलें. **राजियाची** भेट जाहाली. कित्येक **खानांनीं** गोष्टी सांगितल्या होत्या त्या विदित केल्या. लौकिक बोलणें जाहालें. **राजे** बोलिले कीं, 'जसे महाराज तसे **खान** आपणास वडील आहेत. त्यांची भेट अलबत्ता घेऊं.' असें बोलून **कृष्णाजीपंत** यांस बिराड एक घर दिलें. तेथें जावयास निरोप दिला. दुसरे दिवशीं **राजे** सदरेंत बैसले. सरकारकून सर्व सरदार असे सर्वहि बोलावून आणिले. व **पंताजी गोपिनाथ** म्हणून

राजियाजवळ विश्वासू मातबर होते, त्यांस बोलावून आणून एकांतीं महालांत खलबत बैसले. राजे **पंताजीपंतांस** बोलिले जे ' **खानाचे** हेजीब **कृष्णाजीपंत** हेजिबीस आले आहेत. त्यांस निरोप देऊन खाना करितो व तुम्हांसहि अफजलखान यांजकडे रवाना करितों. तेथें जाऊन **खानाची** भेट घेऊन बोलीचाली करणें. **खानास** क्रिया शपथ मागणें. तुम्हीं ते शपथ मागतील तरि देणें. अनमान न करणें, हरप्रकारें जावलीस घेऊन येणें. या खेरीज सैन्यामध्यें युक्तिप्रयुक्तीनें ज्या रीतीनें शोध मनास आणावयाचा त्या रीतीनें आणा. खानाचें चित्त आमच्या बरियावरि किंवा वाइटावरि आहे असा शोध करणें ' इतकें सांगून **राजे** सभेस आले. **कृष्णाजीपंतांस** बोलावून आणिलें. राजे म्हणों लागले कीं, ' **खानाची** क्रिया पाहिजे. याजकरितां आमचे **पंताजी गोपिनाथ** यांस तुम्हीं आपणांसमागमें खानाच्या भेटीस नेणें. यांजवळ हस्तपंजाची आण देववणें. **खानास जावलीस** घेऊन येणें. **काकाची** भेट घेऊन येऊं. आमच्या मनांत कांहीं कपट नाहीं. ' असें सांगितलें. त्यांस ही गोष्ट मानली. मग **कृष्णाजीपंतांस** वस्त्रें देऊन रवाना केलें. तसेंच **पंताजीपंतांस** वस्त्रें देऊन **अफजलखानाकडे** रवाना केलें.

१४. दोघांच्याहि वकिलांनीं शपथ दिली.

त्यांणीं जाऊन **खानाची** भेट घेतली. खानांनीं सन्मान केला. **कृष्णाजी भास्कर** यांनीं अर्ज केला कीं, ' **शिवाजीनें** हेजिबीस **पंताजीपंतास** पाठविले आहेत. एकांतीं बसून बोलावें ' असें सांगितल्यावरि **खान** एकांतीं बैसून **कृष्णाजीपंत** व **पंताजीपंत** यांस बोलावून आणून वर्तमान पुसिलें. **कृष्णाजीपंत** बोलिले कीं, ' **राजे** तुम्हांवेगळे नाहींत. जसे महाराज **शाहाजीराजे** तसे तुम्ही म्हणून शपथ दिली. **राजे** निर्भय होऊन **जावलीस** येतील. **खानांनींहि** शंका न धरतां **जावलीस** यावें. त्यांची तुमची मुलाजमत होईल. तुम्ही सांगाल तें ऐकतील. ' हा भावार्थ खानास कळल्यावरि मनांत नष्टाई धरून शपथ दिली. **खान** बोलिले कीं,

'**राजा** हरामजादा, काफर, **जावली** कुबल जागा, येथें भेटीस यावें म्हणोन बोलावितों. यास्तव तूं ब्राह्मण मध्यस्थ होऊन शपथ देशील तरि **शिवाजी** राजियाचे भेटीस येईन. मुलाजमत घेऊं.' त्यास **पंताजीपंतीं** क्रिया दिली जे '**राजे** तुमच्या वाइटावरि नाहींत. संदेह न धरणें. भेटीस यावयाचें करणें.' ऐसें **खानास** सांगून सैन्यांत लांचलुचपत देऊन, मुत्सद्दी वजीर यांजवळ शोध करून विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, '**शिवाजी** हरामजादा आहे. याशीं युद्ध करितां सांपडणार नाहीं. याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी, भेटीचे समयीं धरावा. ऐसी **खानांनीं** तजवीज केली [आहे]' म्हणून कळलियावरि दुसरे दिवशीं **पंताजीपंत खानाकडे** येऊन **राजियाकडे** जातों म्हणून हुकूम मागितला. **खानानें** बहुमान करून **राजाकडे** पाठविलें.

१५. शिवाजीचे वकील खानाकडून परत शिवाजीकडे.

पंताजीपंत प्रतापगडास आले. राजाची भेट जाहाली. ते समयीं **पंताजीपंतांस** घरीं जावयास निरोप दिला. रात्रीं एकले **पंताजीपंत** भेटीस बोलाविलें. **राजे व पंत** दोघे बैसून आणशपथ घालून, एकांतीं वर्तमान पुसिलें कीं, 'यथार्थ करिणा सांगणें. खानाच्या मनांत कसें काय आहे हें सांगणें. आम्ही तुम्ही वेगळें नाहीं. आपलें राज्य संरक्षिलें म्हणजे सर्व कारभार तुम्हांस देतों. द्रव्यहि बहुत देतों. आम्हास वर्तमान यथार्थ सांगणें.' ऐसें घरोबियांत घेऊन राजांनीं पुसिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, '**खानाच्या** मनांत दुष्ट बुद्धि आहे. सला करून तुम्हांस भेटीस आणून, दगा करून कैद करून, **विजापुरास** धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली तरि **खानास** नानाप्रकारें भेद करून **जावलीस** घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांतीं एकांगी करून मारणें. आणि लष्कर सर्व लुटणें. राज्य सर्व आपलें करणें.' ऐसा विचार सांगितला. [तो] **राजाच्या** मनांत आला. तेव्हां **पंताजीपंतांस** पांच हजार होन बक्षीस दिले. आणि खानास सांगणें जें, '**राजा** बहुत भितो. **वाईस**

भेटीस यावयास धीर पुरत नाहीं. **खान** वडील आहेत, मेहरबानी करून **जावलीस** येऊन भेट देतात तरी आपण भेटीस येतो. आपण यास हातीं धरून धीर भरंवसा देऊन, पादशाहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन ऊर्जित करतील तरि थोरपण आहे.' ऐसे कित्येक मजकूर सांगून घेऊन येणें. म्हणोन विचार सांगोन **पंताजीपंत** यांस रवाना केलें.

१६. शिवाजीचा वकील पुनः खानाकडे व खान जाउलीस ससैन्य येतो

ते जाऊन **वांईस खानास** भेटले. करिणा जाहीर केला. '**राजा,** कचदील आहे. येथें भेटीस येतां शंका धरितो. तुम्हींच तेथें **जावलीस** चलणें, तेथें भेटीस येतील, दिलासा करून बराबर घेऊन जाणें.' असें सांगितलें. त्यावरून खान बहुत खुशाल होऊन, कूच करून, **जावलीस** रडतोंडीचा घाट उतरून आला. तो **प्रतापगडाखालीं** डेरे देऊन राहिला. आसपास चौगर्दी बारा हजार लष्कर व बंदुखी आराबियाच्या गाड्या, हत्ती, सुतरनाल्याच्या गाड्या, जागां जागां पाणी पाहून उतरले. **पंताजीपंतांस** गडावरि **राजियाकडे** पाठविलें कीं, 'भेटीस येणें.'

१७. पंताजीपंत शिवाजीकडे येऊन खानाच्या येण्याचें निश्चित सांगतो.

त्याजवरून ते **राजियासि** जाऊन भेटले. लौकिक बोलणें जें बोलावयाचें तें बोलिले. एकांतीं मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं, 'आपण बोलल्याप्रमाणें **खानास** घेऊन आलों. आतां तुमची त्यांची भेटी एकांतीं खासे खासे यांची करवितों. तुम्ही हरीफी करून कार्यभाग करणें तो करावा.' म्हणोन सांगितलें. भेटीस एक दिवस आड करून [१८] दुसरे दिवशीं भेटावें असें केलें. '**राजे** गडावरून उतरावे, **खानांनीं** गोटांतून

---

१८ 'भेटीस एक दिवस आड करून तिसरे दिवशीं भेट घ्यावी असा करार केला. प्रतापगडावरून राजे यांनी उतरावें' म. प्रत.

'**राजा** हरामजादा, काफर, **जावली** कुबल जागा, येथें भेटीस यावें म्हणोन बोलावितों. यास्तव तूं ब्राह्मण मध्यस्थ होऊन शपथ देशील तरि **शिवाजी** राजियाचे भेटीस येईन. मुलाजमत घेऊं.' त्यास **पंताजीपंतीं** क्रिया दिली जे '**राजे** तुमच्या वाइटावरि नाहींत. संदेह न धरणें. भेटीस यावयाचें करणें.' ऐसें **खानास** सांगून सैन्यांत लांचलुचपत देऊन, मुत्सद्दी वजीर यांजवळ शोध करून विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, '**शिवाजी** हरामजादा आहे. याशीं युद्ध करितां सांपडणार नाहीं. याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी, भेटीचे समयीं धरावा. ऐसी **खानांनीं** तजवीज केली [आहे]' म्हणून कळलियावरि दुसरे दिवशीं **पंताजीपंत खानाकडे** येऊन **राजियाकडे** जातों म्हणून हुकूम मागितला. **खानानें** बहुमान करून **राजाकडे** पाठविलें.

१५. शिवाजीचे वकील खानाकडून परत शिवाजीकडे.

पंताजीपंत प्रतापगडास आले. राजाची भेट जाहाली. ते समयीं **पंताजीपंतांस** घरीं जावयास निरोप दिला. रात्रीं एकले **पंताजीपंत** भेटीस बोलाविलें. **राजे व पंत** दोघे बैसून आणशपथ घालून, एकांतीं वर्तमान पुसिलें कीं, 'यथार्थ करिणा सांगणें. खानाच्या मनांत कसें काय आहे हें सांगणें. आम्ही तुम्ही वेगळे नाहीं. आपलें राज्य संरक्षिलें म्हणजे सर्व कारभार तुम्हांस देतों. द्रव्यहि बहुत देतों. आम्हास वर्तमान यथार्थ सांगणें.' ऐसें घरोबियांत घेऊन राजांनीं पुसिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, '**खानाच्या** मनांत दुष्ट बुद्धि आहे. सला करून तुम्हांस भेटीस आणून, दगा करून कैद करून, **विजापुरास** धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली तरि **खानास** नानाप्रकारें भेद करून **जावलीस** घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांतीं एकांगी करून मारणें. आणि लष्कर सर्व लुटणें. राज्य सर्व आपलें करणें.' ऐसा विचार सांगितला. [तो] **राजाच्या** मनांत आला. तेव्हां **पंताजीपंतांस** पांच हजार होन बक्षीस दिले. आणि खानास सांगणें जें, '**राजा** बहुत भितो. **वाईस**

भेटीस यावयास धीर पुरत नाहीं. **खान** वडील आहेत, मेहरबानी करून **जावलीस** येऊन भेट देतात तरी आपण भेटीस येतो. आपण यास हातीं धरून धीर भरंवसा देऊन, पादशाहाचे मुलाजमतीस घेऊन जाऊन ऊर्जित करतील तरि थोरपण आहे. ' ऐसे कित्येक मजकूर सांगून घेऊन येणें. म्हणोन विचार सांगोन **पंताजीपंत** यांस रवाना केलें.

१६. शिवाजीचा वकील पुनः खानाकडे व खान जाउलीस ससैन्य येतो

ते जाऊन **वांईस खानास** भेटले. करिणा जाहीर केला. '**राजा**, कचदील आहे. येथें भेटीस येतां शंका धरितो. तुम्हींच तेथें **जावलीस** चलणें, तेथें भेटीस येतील, दिलासा करून बराबर घेऊन जाणें. ' असें सांगितलें. त्यावरून खान बहुत खुशाल होऊन, कूच करून, **जावलीस** रडतोंडीचा घाट उतरून आला. तो **प्रतापगडाखालीं** डेरे देऊन राहिला. आसपास चौगर्दी बारा हजार लष्कर व बंदुखी आराबियाच्या गाड्या, हत्ती, सुतरनाल्याच्या गाड्या, जागां जागां पाणी पाहून उतरले. **पंताजीपंतांस** गडावरि **राजियाकडे** पाठविलें कीं, ' भेटीस येणें. '

१७. पंताजीपंत शिवाजीकडे येऊन खानाच्या येण्याचें निश्चित सांगतो.

त्याजवरून ते **राजियासि** जाऊन भेटले. लौकिक बोलणें जें बोलावयाचें तें बोलिले. एकांतीं मागती सर्व वर्तमान सांगितलें कीं, ' आपण बोलल्याप्रमाणें **खानास** घेऊन आलों. आतां तुमची त्यांची भेटी एकांतीं खासे खासे यांची करवितों. तुम्ही हरीफी करून कार्यभाग करणें तो करावा. ' म्हणोन सांगितलें. भेटीस एक दिवस आड करून [१८] दुसरे दिवशीं भेटावें असें केलें. '**राजे** गडावरून उतरावे, **खानांनीं** गोटांतून

---

१८ ' भेटीस एक दिवस आड करून तिसरे दिवशीं भेट द्यावी असा करार केला. प्रतापगडावरून राजे यांनी उतरावें ' म. प्रत.

पुढें यावें, उभयतांनीं दरम्यान डेरे देऊन खासे खासे भेटावे,' ऐसा निवार्ह[१९] करून **राजाचा** निरोप घेऊन **खानाजवळ** गडाखालीं माचीस उतरून गेले. **खानास** वर्तमान सांगितलें. **खानानेंहि** मान्य केलें.

१८. शिवाजीराजांची खानाच्या–भेटीची सिद्धता.

मग दुसरे दिवशीं गडाखालीं **राजियांनीं** सदर केली. डेरे, बिछाने व असमानगिरी, तिवाशिया व मोतियांच्या झालरी लाविल्या. चित्र-विचित्र बाडें व लोडे, गाद्या, पडगाद्या टाकिल्या, सदर सिद्ध केली. घाटमाथां लष्कर [सुद्धां] **नेताजी पालकर** आणविले होते, त्यांसि इशारत सांगोन पाठविली कीं, 'उद्यां **खानाचे** भेटीस जातों, फत्ते करितों, आणि गडावरि येतों. तेव्हां एकच आवाज गडावरि करितों. तेव्हां तुम्हीं घाटाखालीं उतरोन लष्करांत **खानाच्या** चालोन येऊन मारामारी करणें.' तैसेंच **कोंकणांतून** राजश्री **मोरोपंत पेशवे** आणविले. त्यांसहि गडावरील [२०]आवाजाची इशारत सांगितली. आपण निवडक लोक गडावरून उतरोन जागां जागां झाडींत ठेविले. आणि खांसा राजियांनीं +स्नान करून भोजन केलें. जरीची कुडती घातली. डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें. आणि बराबर **जिऊ महाला** म्हणून मरदाना होता त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग व ढाल तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल ऐसे दोघे माणसें मर्दानी आपणांबराबरि भेटीस घेतलीं. वरकड आसपास धारकरी लोक जागां जागां जाळींत उभे केले. आणि राजियानें (* स्नान करून भोजन केलें) सिद्ध होऊन गडाखालीं भेटीस यावयास उतरले.

१९. खान भेटीच्या डेऱ्यांत येऊन बसतो.

गोटांतून भेटीस यावयास **खानाहि** सिद्ध होऊन चालले. बराबरि लष्कर

---

१९ 'नेम' सा. प्रत. 'निश्चय' म. प्रत. +प्रती शुद्धि पहा.

२० 'भांडीयाचा' म. प्रत. *हें येथें होतें.

हजार दीड हजार बंदुखी मुस्तेद होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले, चालिले. इतक्यांत **पंताजीपंत** पुढें होऊन अर्ज केला कीं, 'इतका जमाव घेऊन गेलियानें **राजा** धाशत खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाहीं. **शिवाजी** म्हणजे काय ? यास इतका सामान काय करावा ? राजा दोघां माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्ही इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तजवीज करणें ते करा.' असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरि उभे राहून खासा **खान** एक पालखी, दोघे हुद्देकरी व **कृष्णाजीपंत** हेजीब असें पुढें चालिले. **सैदबंडा** म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला. **पंताजीपंतहि** बराबरि आहेत. असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळाला कीं, 'शिवाजी म्हणजे काय ? **शाहाजीचा** लेक, वजीर, यास असा जरी बिछाना नाहीं ! अशी मोतीलग सदर म्हणजे काय ? पातशाहास असा सामान नाहीं, येणें जातीचा त्यानें सामान मेळविला.' असें बोलतांच **पंताजीपंत** बोलिला जे, 'पादशाही माल पादशाहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज काय ?' असें बोलून सदरेस बैसले. **राजियास** सिताब आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले.

२०. खान–शिवाजी भेट, खानाचा हल्ला. शिवाजीच्या प्रति-हल्ल्यांत खान मृत्यु.

राजे गडाचे पायीं उभे होते. तेथून हळुहळू चालिले. समाचार घेतां खानाबरोबर **सैदबंडा** मोठा धारकरी आहे हें ऐकून उभे राहिले आणि **पंताजीपंतांस** बोलावूं पाठविलें. ते आले. त्यास म्हणूं लागले जे, 'जैसे महाराज तैसे खान. आपण खानाचा भतीजा होय. ते वडील. **सैदबंडा** खानाजवळ आहे, त्याकरितां शंका वाटते. हा **सैदबंडा** इतका यांतून दूर पाठवणें.' म्हणोन **पंताजीपंतांस** सांगितलें. त्यावरून **पंताजीपंत** [यानें] जाऊन **कृष्णाजीपंतांकडून** खानास सांगोन **सैदबंडाहि** दूर पाठविला. **खान** व दोघे हुद्देकरी राहिले. तेव्हां **राजेहि** हिकडून जिऊ

महाला व **संभाजी कावजी** दोघे हुद्देकरी [यां] सहित गेले. खानहि उभा राहून, पुढें सामोरा येऊन राजियास भेटला. राजियानें भेटी देतां खानानें **राजियाची** मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली. आणि हातींची जमदाड होती तिचे मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों अंगांत जरीची कुडती होती त्यावरि खरखरली. आंगास लागली नाहीं. हें देखोन राजियांनीं डावे हाताचे वाघनख होतें, तो हात पोटांत चालवला. खानानें आंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच **खानाची** चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून, मुंडी आंसडून, चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले. **खानानें** गलबला केला कीं, ' मारिलें ! मारिलें ! ! दगा दिधला ! बेगी धांवा ! ! ' असें बोलतांच भोयांनीं पालखी आणिली. आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इताकियांत **संभाजी कावजी** महालदार यानें भोयांचे पाय मारिले. आणि पालखीखालें भोयांस पाडिलें. **खानाचें** डोंचकें कापिलें. हातीं घेऊन राजियाजवळ आला. इताकियांत **सैदबंडा** पटाईत धांवला. त्यानें राजे जवळ केलें. पस्याचे वार **राजियावरि** चालविले. तों राजियानें **जिऊ महालियाजवळ** आपला हुद्दियाचा पट्टा [होता तो] घेऊन पट्टा व बिचवा असे कातर करून **सैदबंडा** याचे चार वार [21]ओढिले. पांचवे हातानें राजियास [22]मारावें तो इतकियांत **जिऊ महाला** याणें फिरंगेनें खांद्यावरि **सैदबंडियासि** वार केला. तो पट्टियाचा हात हत्यारा–समेत तोडिला. आणि **खानाचें** शीर घेऊन **राजे** सिताब गडावरि **जिऊ महाला** व **संभाजी कावजी** महालदार असे गेले.

२१. शिवाजीच्या सैनिकांनीं खानाचें लष्कर मारलें, लुटलें.

गडावरि जातांच एक भांड्याचा आवाज केला. तेच गडाखालील

---

२१ ' चुकाविलें ' म. प्रत.

२२ ' पांचवे वारानें राजियानें सैदबंडा मारावा तों ' म. प्रत.

लोक व घाटावरील लोक व लष्कर व कोंकणांतून **मोरोपंत** व मावळे असें चौतर्फी चोहोंकडून चालोन **खानाचे** गोटावरि आले. आणि **खान** मारून, शीर कापून **राजे** गडावरि गेले. ही खबर कळोन कुल **खानाचें** बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान खस्त जाहालें. इतकियांत **राजियाच्या** फौजा चौतर्फा मारीत चालले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. दोन प्रहर घोरांदर युद्ध जाहालें. **खानाकडील** मोठमोठे वजीर व लष्करी **महदीन**[23] व **उजदीन**, पठाण, रोहिले, सुनी व आरबी वगैरे मुसलमान आणि जातिवंत मराठे, धनगर व ब्राह्मण तसेंच तोफची, बैले व कर्नाटकी प्यादे बंदुखी, आडहत्यारी, सांगा–बरचीवाले व (दुराटीवाले), (कुराठीवाले), रोचेवार (हिलगेवार) बाजे जातचे इटेकरी, हतुलवे [?] तिरंदाज व छडीवाले व पट्टाईत व बांकाईत व बाणाईत व तोफखाना ऐसे एकंदर जमनिदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र जाहालें. **राजियाचे** लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पायउतारा होऊन मारामारी केल्या. हत्ती तोडिले, ते जागां ठार जाले. कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तींचे दांत तोडिले. कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेंच घोडे एकच वारानें जिवें मारिले. तसेंच **खानाचे** लष्करी कित्येक ठार मारिले. कित्येकांचे पाय तोडून पाडिले. कित्येकांचे दांत उडविले. कित्येकांचीं डोचकीं फोडिलीं. कित्येक मेले. युद्धास आले ते मारून पाडून भुईस रगडिले. तसेच उंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. संख्या न करवें. रक्ताच्या नद्या चालल्या. रणकंदन जालें. ऐसे मारामारी करून हत्ती, घोडे, उंट व मालमत्ता व पालख्या वजीर पाडाव करून आणिले बितपशील

६५ हत्ती व हत्तिणी सुमार.	४००० घोडे सुमार.
२००००० जडजवाहीर	१२०० उंटें सुमार

---

२३ ‘ महंमदद्दीन व रुजेद्दीन पठाण व रोहिले सुनी व शूर वजीर फजी मुसलमान व जातिवंत मराठे ’ म. प्रत.

२००० कापड बोझीं. ७००००० नगद व मोहोरा व होन सोनें रुपये.

भांडी तोफखाना सर्वहि घेतलें. कलम १

कलम १

वजीर पाडाव जाहाले बितपशील

१ सरदार व वजीर मातबर
१ अफजलखानाचे पुत्र
१ नाटकशाळेचे पुत्र
१ मंबाजी भोसले.
१ राजेश्री झुंजारराव घाडगे
याखेरीज लोक

कलम १

येणेंप्रमाणें पाडाव केले. याखेरीजहि जिन्नस, मालमत्ता, गुरेंढोरें, बैल, मबलग मत्ता पाडाव केलें. भांडते लोकांनीं तोंडी तृण धरून शरण आले त्यांसि व बायकामुलें, भट, ब्राह्मण, गोरगरीब असे मुक्त करून सोडिले. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं, याजकरितां त्याचे लोकांनींहि कित्येक अनाथ सोडिले. अफजलखानाचा लेंक फजल हा पायीं चिरगुटें बांधून झाडींत पळोन गेला. तसेंच कित्येक भले लोक पळोन गेले. संख्या न करवे.

२२. शिवाजीनें आपल्या व खानाच्याहि सैन्यांतील जखमी लोकांस केलेला देकार

ऐसी फत्ते करून जय जाहाला. मग राजे याणीं खानाचे पुत्रास व सरदार पळून गेले होते त्यांस धरून आणिलें. राजा खासा प्रतापगडाखालीं उतरोन कुल आपले लोक व अफजलखानाचे लोक व त्यांचे पुत्र भांडते माणूस होते तितकियांस भेटून, पोटाशीं धरून, दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेंकांस चालविलें. पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमे वेतन करून चालवावें असें केलें. जखमी जाहाले त्यांस दोनशें होन व शंभर होन, पंचवीस होन, पन्नास होन, दर असामीस जखम पाहून दिधले. मोठमोठे लोक धारकरी जुमले होते, त्यांस बक्षीस हत्ती, घोडे

दिधले. हस्तकडीं, कंठमाला, तुरे, पदकें, चौकडे, मोत्याचे तुरे, कित्येकांस बक्षीस फार दिलें. ऐसें देणें लोकांस दिधलें. कित्येकांस गांवमोकासे बक्षीस दिधले. लोक नांवाजिले. दिलासा केला.

२३. 'शिवाजी अवतारीच होता.'

मागें **कौरवांचा** क्षय **पांडवीं** केला, [तेव्हां] असा वीरावीरांस झगडा जाहाला. खांसा **खान राजियानें** एकांगी करून मारिला. **अफजलखान** सामान्य नव्हे. केवळ **दुर्योधनच** जातीनें होता. आंगाचा, बळाचाहि तैसाच आणि दुष्ट बुद्धीनें तैसाच. त्यास एकलें **भीमानें** मारिला. त्याचप्रमाणें केलें. शिवाजी राजाहि भीमच. त्यांनींच अफजल मारिला. हें कर्म मनुष्याचें नव्हे; अवतारीच होता. तरीच हें कर्म केलें. यश आलें. असें जाहालें. **खाना**कडील वजीर पाडाव केले होते त्यांस वस्त्रें, भूषणें, अश्व देऊन मुक्त करून सोडिलें. त्या उपरि राजश्री **पंताजीपंतांसहि** उदंड वस्त्रें, अश्व, अलंकार दिधले. अपार द्रव्यहि दिधलें. खुशाली केली. **राजगडास मातुश्रीस** व सर्वांस ही फत्तेची खबर लिहून पाठविली. त्यांनींहि वर्तमान ऐकून साखरा वांटून, नगारे–करणे केले, भांडीं मारिलीं, मोठी खुशाली केली. येणें रीतीनें **राजियाकडील** वर्तमान जाहालें.

प्रकरण ३ रें

प्रतापगडावर देवीची स्थापना व कारभारव्यवस्था

२४. अफजलखानाच्या मृत्यूनें अदिलशाही दुःखी

त्या उपरि **विजापुरास** चवथे दिवशीं जासूद, हरकारे यांणीं खबर पादशाहास व पादशाहाजादीस जाहीर केली कीं, '**अफजलखान** खांसा मारून शीर कापून नेलें. कुल लष्कर लुटून फस्त केलें.' ऐसें सांगतांच **अली अदलशाहा** तक्तावरून उतरोन, महालांत जाऊन, पलंगावरि निजला. [त्याणें] बहुत खेद केला. असेंच **पादशाहाजादीस** खबर लागतांच पलंगावरि बैसली होती तेथेंच 'अल्ला अल्ला ! खुदा खुदा !' म्हणून आंग पलंगावरि टाकून रडत पडली. 'मुसलमानाची पादशाही खुदानें बुडविली' ऐसा कित्येक विलाप करून बहुत शोक केला. पादशाहाजादीनें तीन दिवस अन्नउदक [घेतलें] नाहीं. तसेंच कुल मोठमोठे वजीर व लष्कर व कुल शहर दिलगीर जाहालें. म्हणूं लागलें कीं, 'उद्यां राजा येऊन शहर मारील व कोट घेईल.' ऐसे घाबरे जाहाले. 'खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून मराठ्यांसि दिली असें वाटतें.' असें म्हणों लागलें.

२५. प्रतापगडावर श्रीतुळजाभवानीची स्थापना

त्या उपरांत मग **राजियासि** स्वप्नास **श्रीभवानी तुळजापूरची** येऊन बोलूं लागली कीं, 'आपण **अफजल** तुझ्या हातें मारविला व कित्येक पुढेंहि आले त्यांस पराभवांत नेलें. पुढेंहि कर्तव्य उदंड कारण करणें आहे. आपण तुझ्या राज्यांत वास्तव्य करावें. आपली स्थापना करून पूजापूजनप्रकार चालविणें.' त्या उपरि **राजियानें** *द्रव्य गाडियावरि घालून, **गंडकी** नदीहून गंडकी पाषाण आणून, **श्रीभवानी** सिद्ध करून,

* 'गंडकी नदीस द्रव्य गाडिया०' असें होतें.

प्रतापगडा[वर] देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणें नाना प्रकारें करून दिलीं. महालमोकाशे देऊन सचंतर हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोत्साव चालविला. नवस यात्रा सर्वदां **तुळजापूरच्या** प्रमाणें तेथें चालती जाली. आणि **तुळजापूरचे** यात्रेस लोक जातात त्यांस दृष्टांत स्वप्नें होतात कीं, ' आपण **प्रतापगडास** आहें. तेथें तुम्ही जाऊन दर्शन घेणें व नवस फेडणें. ' असें [देवी] बोलूं लागली. मोठें जागृत स्थान जाहालें.

२६. आदिलशाही तळकोंकण, वरघाट, मोंगली मुलूख यांवर शिवाजी राजांची चढाई

यानंतरि, **विजापूरचा** मातबर वजीर **अफजलखान** होता तो बुडविला, तेव्हां पातशाही कमतर पडली, असें समजून **राजियानें विजापूरचे** किल्ले **तळ-कोंकणांत** होते ते सर्व घेतले. पन्नास-साठ गड घेतले. **तळकोंकण** काबीज केलें. **वर-घाटहि** घेतला. तेव्हां लष्कर पागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार व हशम लोक बारा हजार ऐशी तोलदार फौज जमा जाहाली. लष्कर कुल जमाव घेऊन **नेताजी पालकर** सरनोबत मोंगलाईंत स्वाऱ्या करून **बालेघाट, परांडे, हवेली, कल्याण, कलबुर्गे, आवसें, उदगीर, गंगातीर** पावेतों मुलूख मारीत चालले. खंडण्या घेतल्या. मुलूख जप्त केला. **औरंगाबादचे** पुरे मारिले. मोंगलाकडील फौजदार[२४] **औरंगाबादेंत** होता तो चालून आला. त्याशीं युद्ध[२५] जाहालें. हत्ती, घोडे पाडाव केले. मोंगलाईत धुंद उठविली. ऐसा पराक्रम करीत चालले.

२७. गडावरील कारभारव्यवस्था

जे जे गड घेतले त्या गडावर **राजियानें** कारभारी बंदोबस्ती ऐसी

---

२४ ' सुभेदार ' म. प्रत.

२५ ' त्यासि जिवें मारिलें ' म. प्रत.

पद्धत घातली कीं, गडावरि हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्ल्याचें, सामानाचें अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सात-पांच तट-सरनोबत ठेवावें. त्यांस तट वांटून द्यावे. हुशारी-खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक दाहावा नाईक,' येणेंप्रमाणें जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व [२६]इटेकरी व तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण **राजियांनीं** नजरगुजर [करून] एक एक माणूस पाहून ठेवावें. गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकीं घेऊन मग ठेवावे. सबनीस **ब्राह्मण** हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरएक फितवा-फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रीतीनें बंदोबस्तीनें गडकोटाचे मामले केले. नवी पद्धत घातली.

२८. पागा-लष्कर-व्यवस्था

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना. पागेमध्यें दर घोड्यासि बारगीर एक. पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक 'जुमला' म्हणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशें होन तैनात व पालखी त्यास एक. व [त्याच्या] मजमुदारास शें सवाशें होनांची [तैनात] करावी. पंचवीस घोड्यांस एक पखालजी व एक नालबंद. असे दाहा जुमले म्हणजे एक हजारी. यास एक हजार होन तैनात, एक मजुमदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस परभू

२६ 'हेटकरी' म. प्रत.

कायस्थ त्यांस पांचशें होन. याप्रमाणें असामींस तैनात [व] पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांच हजारी करावा. त्यास दोन हजार होन तैनात. तसेंच मजुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारिया, सरनोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबताचे आज्ञेंत. पागा [व] शिलेदार मिळोन सरनोबत याचे आज्ञेंत वर्तावें. दर हजारी, पंच हजारी, सरनोबत यांजवळून वाकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ **बहिरजी जाधव** नाईक, मोठा शाहाणा, जासुदांचा नाईक केला. तो बहुत हुशार चौकस करून ठेविला.

२९. छावणीस घरीं येणें व स्वारीवर जाणें

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशांत यावें. त्यास दाणा, रतीब, औषधें, घोडियांस [व] लोकांस घरें गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. जातेसमयीं कुल लष्करचे लहानथोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे; आणि मुलुखगिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनीं परमुलखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलखांत पोर बायका न धरावीं. मर्दाना सांपडला तरी धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागां *बोलीप्रमाणें पैका घ्यावा.* कोणी बद [२७]अंमल न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाख मासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या [२८]हक्कांत धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत

* येथें ' ओळखियास ब्राह्मण न घ्यावा ' असें होतें.

२७ ' बदमामला ' पाठांतर. २८ ' तैनातींत ' पाठांतर.

द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारांस जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस आलियावर हिशेब करून सोनें, रुपें, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनीं बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्करच्या लोकांचे हिशेब देणें, [व] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणी केली असेल आणि नामर्दी केली असेल त्याची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून, त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेनें ज्या प्रांतीं स्वारी जावयाची होईल त्या प्रांतीं जावें. अशी लष्करची रीत.

३०. पायदळ–व्यवस्था

तसेच मावळे लोकांत दाहा लोकांत एक नाईक. पन्नास लोक म्हणजे पंच-नायकी यांस एक हवालदार, दोनतीन हवाले मिळून एक जुमलेदार. दाहा जुमले मिळून एक हजारी. जुमलेदारांस शंभर होन तैनात सालिना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारियास पांचशें होन तैनात. [त्याच्या] सबनिसास शंभरसवाशें होनपर्यंत. ऐशा हजारियांस [नेमणुका केल्या]. सात [२९] हजारिया मिळोन एक सरनौबत **येसजी कंक** म्हणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनीं असावें.

३१. तनखा व्यवस्था–मोकासा नाहीं; वरातेनें रोख द्यावा.

सरनौबतास व मजुमदारास व कारकुनास व हुजुरांतीतील लोकांस तनखे वराता देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणें त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणेंप्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाहीं. जें देणें तें वरातेनें द्यावें. अगर

२९ ‘ असे सर्व हजारी ’ पाठांतर.

पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जाहालियानें रयत अफरा होईल आणि बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाहीं. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडें होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहींत.

३२. मुलकी दप्तरव्यवस्था व मानसन्मान

मुलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा–चौकशीस कारकून ठेवाता. आधीं लिहिणार चौकस दप्तरदारी करून, कागद घडणी करून मोकासबा[३०] दिला म्हणजे दप्तरदारीमध्यें शाहाणा पाहून मुलुखांत ठेवावा. आणि माहालची मजमू सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमू सांगावी. पुढें होतां होतां शाहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजमूदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणें येईना, कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा. आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडें घेऊन शिलेदारी करणें, असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे, त्यांस माहाल पाहून [हवाले सांगावे]. हवालदारास तीन होन तैनात अगर चारपांच होन इतकी तैनात; मजमुदारास तीन, चार, पांच; पन्नास पाऊणशें होन, येणेंप्रमाणें करावें. दोन माहाल मिळोन लाख, सवा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशें होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा त्यास शंभरसवाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करवावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. पादशाहींत छत्री वजिरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं, पातशाहावर छत्र आणि चाकर लोकांवरहि छत्र, ही

३० 'हिशेब' पाठांतर. मोसबा हि असेल.

गैर-पद्धत. याकरितां पातशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र लष्कर, हशम, मुलुखगिरीस [जाईल] त्यांत भर सवाशें होन तैनात असेल त्यानें अबदागिरी बाळगावी. मुलुखांत देश पाहून लाख रुपयास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा पाहून मुलुखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार, हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

३३. जमीन मोजणी, मुलुखांतील वसूल व बंदोबस्त

[तशीच] मुलखाची जमीन मोजणी करून [३१]धुरंग, झाड, चावर करून आकार केला. पांच हात पांच मुठींची काठी, हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरसचौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशेंवीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली बिघेयास पिकाचा आकार करून [३२]पांच तक्षिमा पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या, दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या; येणेंप्रमाणें रयतेपासून घ्यावें. नवी रयत येईल त्यास [३३]गुरेंढोरें द्यावीं. बीजास दाणापैका द्यावा. भक्षावयासि दाणेपैका द्यावा तो ऐवज दोहों-चोहों वर्षांनीं आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावें. गांवचा गांव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा. मुलखांत जमीदार, देशमख व देसाई यांचे जप्तीखालीं कैदेंत रयत नाहीं. यांणीं 'साहेबी' करून नागवीन म्हटालियानें त्यांचे हातीं नाहीं. इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कबज केला, त्या देशांत मुलकांचे पाटील कुलकर्णी यांचे हातीं [व] देशमुखांचे हातीं कुल रयत. यांणीं कमाविसी करावी आणि मोघम टक्का

---

३१ हीं जमिनीचीं चौरस मापें. ' दुरंग जाड ' पाठांतर.

३२ ' पांचवी तक्षीम दिवाणांत द्यावी.' ' पांच रयतेस द्याव्या व दोन दिवाणांत ' पाठांतरें.

३३ ' नसल्यास द्यावीं ' म. प्रत.

द्यावा. हजार दोन हजार जे गांवीं मिरासदारांनीं घ्यावे, ते गांवीं दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास भेटणें नाहीं. दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे [३४]राहातात. ये जातीनें पुंड होऊन देश बळाविले. त्यास **राजियानें** देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथें [आपलें] ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचें हातीं नाहींसें ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीनें मनास मानेसारखें आपण घेत होतें तें सर्व अमानत करून जमीनदारास गल्ला व नख्त गांव पाहून देशमुखास व देशकुळकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसि हक्क बांधून दिला. जमिनदारांनीं वाडा बुरजांचा बांधूं नये घर बांधून राहावें. ऐसा मुलकाचा बंद केला.

३४. धर्मादाय व्यवस्था

मुलखांत देव-देवस्थानें जागांजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविलें. वैदिक ब्राह्मण यांसि योग-क्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून त्यांचें कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्या-प्रमाणें धान्य-द्रव्य त्यांस गांवचे गांवीं माहालीं नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनीं पाववावें. ब्राह्मणांनीं तें अन्न भक्षून, स्नानसंध्या करून, **राजियासि** कल्याण चिंतून सुखरूप असावें. असे गड, कोट, लष्कर, हशम, मुलूख हुजरातीची चौकशी करून राज्य करीत चालले.

---

३४ 'दिवाणानें भेटीस बोलाविलें तर झुंजास उभें रहावें.' पाठांतर.

प्रकरण ४ थें

शास्ताखान व राजा जयसिंग ह्यांची शिवाजीवर स्वारी : शिवाजीशीं आग्रा जाण्याविषयीं करार.

३५. शास्ताखान पुण्यास येतो.

मोगलाईंत धुंद उठविली ही खबर **दिल्लीस** औरंगजेब पादशहास कळोन, मनांत बहुत चिंतातुर होऊन "**शिवाजी** बळाविला; **विजापूरच्या अफजलखाना**सारखी फौज, बारा हजार स्वार बुडविले; गडकोट पादशहाचे घेत चालिला; त्याची तरतूद काय करावी ?" म्हणून विचार करून, कुल वजीर उमराव बोलावून आणून एक लाख सुभा फौज घोडा राजियावर दक्षणेस रवाना करावा म्हणून विचार करितां, नबाब **शास्ताखान** म्हणजे पादशहाची प्रतिमाच[३५] दुसरी, आणि नातलग, याची रवानगी करावी असा मजकूर करून नबाबास बोलावून आणून विचार केला. नबाब बोलला जे, 'शिवाजी म्हणजे काय ? त्यासि जातांच कैद करतों. गड-कोट–मुलूख घेऊन फत्ते करितों.' अशा कित्येक गोष्टी बोलून सिद्ध जाहाले. उपरांत पादशाहा बहुत संतोष होऊन शिरची कलगी व पोशागी सनगें व घोडे, हत्ती, अलंकार देऊन खुशाली केली. बराबरि पाऊण लाख घोडा व हत्ती, यांखेरीज कित्येक लोक मुच्छदी वगैरे, तिरंदाज, बरखंदाज, रजपूत व सतेलीवाले तसेंच हत्तीचा तोफखाना, उंटाचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, बरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरि फरासखाना त्यासि शंभर हत्ती, तसेंच भांडते

---

३५ 'शास्ताखान औरंगजेब याचा मावसा, मोठा तोलदार, यासमागमें वजीर उमराव थोर थोर निवडक मर्दाने एक लक्ष स्वार देऊन रवाना केलें. आणि त्यास बुद्धिवाद सांगितला कीं, तुम्हीं जाऊन शिवाजीराजे यांस मारून गर्दीस मेळविणें. गडकोट घेऊन जप्त करणें' पाठांतर.

हत्ती चारशें, असें पांचसाहाशें हत्ती. तैसेच अगणित उंट. याखेरीज बाजारबुणगे, दारुगोळी, बाणांच्या भांडत्या गाड्या, आराबा; असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलयुगींचा **रावणच**! जैसी **रावणाची** संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजिना बेमोइन हत्ती, उंटें, खेचरें, गाडियावर भरून नख्त व सोनें, रुपें, मोहरा, होन, रुपये असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब **शास्ताखान** म्हणजे पादशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तिनिशीं दक्षणेस **राजियावर** चाल करून आला. लष्कर मुकाम करीत तेव्हां दोन गांवें लांब व गांव दीड गांव रुंद लष्कर राहात असे. मजल दर मजल चालून येऊन तीन महिन्यांनीं **पुणियास** आला.

३६. शिवाजीराजे व शास्ताखान

हें वर्तमान, **दिल्लीहून** रवाना होतांच **राजियासि** कळलें. राजे **राजगडास** होते. कुल सरकारकून व मोठेमोठे लोक, सरनोबत बोलावून विचार केला. सर्वांचे मतें कीं, 'सला करावा. भेटावें. युद्ध करितां गांठ न पडे. आपली फौज काय, दिल्लीची फौज काय?' असा [विचार] जाला. **राजियाच्या** मतें सला करावा तरि कोणी मातबर रजपूत नाहीं, जे आपणहि रजपूत, तेहि रजपूत, हिंदुधर्म रक्षून आपलें संरक्षण करील. **शास्ताखान** म्हणजे मुसलमान, पातशहाचा नातलग, येथें लांचलुचपत चालेना. अगर आपणास रक्षीना. सल्यानें भेटल्यानें नाश करील. आपणास अपायच आहे. ऐशी तजवीज केली. तेव्हां निदानीं मारतां जें होईल तें करावें, अशी हिम्मत **राजियानें** धरिली. तों ते दिवशीं रात्रीं **श्रीभवानी** राजियाचे आंगांत बोलूं लागली कीं, "लेंकरास म्हणावें कीं, शास्ताखान येतो त्याची फिकीर न करणें. जैसा **अफजलखान** मारिला तैसा **शास्ताखान** येऊन उतरल्यावरि त्याचे गोटांत शिरून मारामारी करणें. पराभवातें पाववित्यें." असें श्रीनें सांगोन मागती राजे सावध जाहाले. जवळ कारकून होते त्यांनीं श्रीचीं वाक्यें लेहून ठेविलीं

होतीं तीं राजियास सांगितलीं. **राजियांनीं** श्री प्रसन्न जाहाली हें कळोन हिम्मत धरली. आणि आपले लष्करांत व मावळे व हुजूर लोकांत निवड करून, [३६]चखोट धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिले. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. **शास्ताखान पुणियास** आला ही खबर तहकीक आणविली, आणि राजे **राजगडावरून** सडे[३७] होऊन खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. **बाबाजी बापूजी** व **चिमणाजी बापूजी** देशकुलकर्णी, तर्फ **खेड**,[३८] हे दोघे बहुत शाहाणे व शूर, **राजियाचे** प्रीतिपात्र. हे दोघे बंधु बरोबरी घेतले. **राजियांनीं नेताजी पालकर** व **मोरोपंत** पेशवे, यांच्या दोन फौजा केल्या. **नेताजी पालकर** पागा देखील एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज **पेशवे** [यांची] अशा दोन फौजा **शास्ताखानाच्या** गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. आणि खांसा **राजियांनीं** ढाल तरवार हातीं घेऊन, तयार होऊन, हजार माणूस पायउतारा बरोबर घेतले. आणि नबाबाचे गोटांत चालिले. **बाबाजी बापूजी** व **चिमणाजी बापूजी खेडकर** पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्राचें दल थोर, जागां जागां लष्करांत **राजियासी** 'कोणाचे लोक ? कोण ? कोठें गेले होते ?' म्हणून पुसतात. "कटकांतील लोक, चौकी-पहाऱ्यास[३९] गेलों होतों," असें भाषण **बाबाजी बापूजी** व **चिमणाजी बापूजी** बोलत चालिले. इताकियांत मध्यान्हरात्र जाहाली. **नबाबाच्या** डेऱ्याजवळ गेले. हजार माणसांच्या फौजा केल्या. डेऱ्यास जाऊन दोन तर्फांनीं उभे राहिले. दोनशें माणूस त्यामध्यें निवडून खासा राजियानें

---

३६ 'उत्तम' पाठांतर.
३७ 'मुस्तेद' पाठांतर.
३८ 'खेडबारकर' म. प्रत.
३९ 'छबिन्यास' पाठांतर.

चिमणाजी बापूजीस सांगोन बाड कटारीनें चिरून आंत शिरले. तो डेरियांत डेरे, सात बाडांचे फेरे, तितकेहि फाडून चिरून *आंगेंच[४०] आंत गेले. लोक चौकीचे निजले होते. त्यांस कळों दिलें नाहीं. तेव्हां **राजा** खासा **नबाबाचे** डेरियासि पावले. डेरियांत डेरेखान [खोजे ?] व दाया असा[४१] समुदाय बायका होत्या, त्यांस कळलें कीं, गनीम डेरियांत आला. हें कळोन नबाब **शास्ताखान** घाबिरा होऊन, मेणबत्या, समया विझवून बायकांत लपून राहिला. **राजा** बायकांवर हात न करी. असे दोन घटका होते. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर **राजियानें** धरून वार केला. **खानाचीं** बोटें तीन उडालीं. तेव्हां गलबा थोर जाहाला. गनीम आला असें कळून चौतर्फांनीं लष्कर तयार जालें. मग **राजे** बाहेर निघाले. चौकीचे लोक व लष्करचे लोक 'गनीम कोठें' म्हणून धाऊं लागले. त्यांज-बरोबर हेहि 'गनीम कोठें' म्हणोन धांवत धांवत बाहेर निघाले ! आणि आपली फौज सरनौबत व पेशवे होते त्यांत मिळून चालिले. गनिमाची फौज कुल तयार होऊन आपले गोटांतच शोध करूं लागले. यांचा माग लागत नाहीं म्हणून नीट वाटेनें निघोन ठिकाणीं पावली.

३७. शास्ताखान नबाब दिल्लीस माघारा जातो.

दिवस उगवलियावर उपरांत **नबाबाच्या** परामृषास कुल वजीर आले.

---

४० 'समागमें' पाठांतर. * येथें 'आंगेंच...सांगोन' असें होतें.

४१ 'तो डेरियांत बायका व खान असे होते. त्यांमध्यें कित्येक समया व मेणबत्त्या लाऊन जागत होते. हे परके लोक देखोन त्यांणीं गिल्ला केला. इतक्यांत चिमणाजी बापूजी याणें खोजे पांच पुढें पांचजण होते त्यांस मारिलें. वरकडे बायका पळविल्या. त्यांमध्यें उदराबेगीन बेवीस पंचवीस होत्या. त्या गुरगू घेऊन मारीत चालिल्या. तेव्हां राजे यांचे लोकांनीं उरदाबेगीन पांचसात मारिल्या. त्याहि दबून राहिल्या. इतका गलबला होतांच नबाबांस कळलें कीं, गलिमाचे लोक आले. त्याजवरून खासा राहुटींतून उठून बायकांत शिरला' म. प्रत.

पाहातात तों नबाबाचीं तीन बोटें तुटून गेलीं. वरकड कित्येक लोकांचा नाश व बायकांस व खोजेयांसि जखमा जाहाल्या. कित्येक लोक मेले. असें कळून नबाब बोलिला जे, ' गनीम इतका खाशा डेऱ्यापर्यंत येई तों कोणी वजीर हुशार जाले नाहींत, खबरदार कोणी नाहीं. अवघे फितव्यांत मिळाले. आतां इतबार कोणाचा येत नाहीं. आज **राजा** येऊन आपलीं बोटें तोडिलीं; उद्यां मागती येऊन आपलें शिर कापून नेईल. **शिवाजी** मोठा दगेखोर आहे. दगा दिधला. आणखी दगा देईल. आमच्या लष्करचा इतबार येत नाहीं. आतां येथून कूच करून माघारां दिल्लीस जावें. या लोकांबरोबर आपणास राहावत नाहीं. " असा तूट विचार करून तिसरे दिवशीं कूच करून माघारा दिल्लीस चालला.

३८. शास्ताखानास शास्त : शिवाजी फत्तेच्या तोफा मारतो व साखरा वाटतो.

राजे राजगडास आले होते. बातमी खबर शत्रूच्या सैन्यांतून आणली कीं, ' शास्ताखानाचीं तीन बोटें तुटोन गेलीं. उजवा हात थोटा जाहाला. वरकडहि कित्येक लोक मेले. **नबाब** दहशत खाऊन पळोन **दिल्लीस** चालिला. ' हें वर्तमान आलें. त्याजवरून **राजे** बहुत खुशाल जाले कीं, ' फत्ते होऊन आलों. शास्ताखानास शास्त केली. पातशाहानें नांव ठेविलें परंतु नांव [४२] यथार्थ ठेविलें नाहीं. तें नांव आपण शास्त करून नांव रुजू केलें. ' अशी खुशाली करून साखरा वाटल्या. भांडीं मारिलीं.

३९. शास्ताखानास दरबार बंद व जयसिंगाची शिवाजीराजावर पाठवणी.

अशी फत्तेची खबर **दिल्लीस** पादशाहास अगोदरच जाहीर जाहाली होती. पातशहा मनांत आश्चर्य करून मनांत बेदील जाले. ' नबाबाची फौज म्हणजे काय, आणि फौजेंत **राजा** आंगें शिरून [त्यानें] मारामारी केली म्हणजे काय ? **शिवाजी** आदमी नव्हे, बडा सैतान होय. ' ऐशा

४२ 'हें व्यर्थ ठेविले नाहीं.' ' नांवाप्रमाणें करामत केली नाहीं ' पाठांतरें.

कित्येक गोष्टी बोलून राहिला. पुढें **नबाब** आला ऐसें कळोन दर्शन वर्ज्य केलें. एकतर मसलत नामोहरम जाहाली, दुसरी शास्त केली. या दोन गोष्टींवरून भेटीस येऊं न दिलें. आपले हवेलींत जाऊन राहाणें म्हणून सांगितलें. त्याजबरोबरि वजीर गेले होते त्यांस आणून अपमान केला आणि दौलता मना केल्या. त्यांहीं उत्तर दिलें जे, “ सरदार पादशाहांनीं दिला त्याच्या हुकमांत राहाणें म्हणून हुकूम केला. त्याकरितां सरदार नामोहरम होऊन आला, आम्हीं काय करावें ? आतां मर्दांना सरदार देणें. त्याजबरोबरि जाऊन झुंज करून मशागत करूं. ” असें उत्तर देतांच मागती सर्वांचा दिलासा करून मनसबा करार केल्या. पुढें कोण सरदार पाठवावा ? कोण फत्ते करून येईल ? असा विचार करून सरदार निवडितां **मिरजाराजा जयसिंग** रजपूत निवडिला. त्यास आणून घुशालखान्यांत बसोन पादशाहांनीं नानाप्रकारें सांगितलें कीं, ‘ **शिवाजीवर** तुम्हीं जाणें. आपण पातशाहांनीं जावें किंवा तुम्हीं जावें. असें जाणोन तुम्हांस रवाना करितों. बरोबरि फौज देतों. नाना हुन्नरें **शिवाजी** हस्तगत करून बरोबरि घेऊन येणें. ’ म्हणोन हत्ती, घोडे, ढाला, फिरंगा, तर्कशकमान, दौलत, इजाफा देऊन, नांवाजून, तैसेच बरोबरि लढाईच्या तश्रीफा देऊन रवाना केले. **दिलेलखान** पठाण उमराव वजीर मोठा जोरावर त्यास पादशाहांनीं कुल फौजेची हारोळी देऊन, पांच हजार पठाण बरोबरि दिले. **दिलेलखानासहि** हत्ती, घोडे, वस्त्रें दिलीं. ऐशीं हजार स्वार बरोबरि दिले. याखेरीज जेजाला व तोफखाना असे नाना जातीचे दिले. स्वार पठाण उजबाक रजपूत रवाना केले. **पादशाहानें दिलेल-खानास** वेगळे वाटेनें अंतस्थीं बोलावून आणून सांगितलें कीं, ‘ **मिरजा राजा** रजपूत आहे व **शिवाजी** हा हिंदू आहे. कांहीं फितवा करतील. त्यास, तुम्ही आपले इतबारी, पादशाहाचे खानाजाद आहां. अशी बातमी राखोन दगा न खाणें ’ असें सांगितलें आणि पाठविलें.

४०. जयसिंगाचें स्वारीच्या यशःसिद्धीसाठीं अनुष्ठान

ते **दिल्लीहून** निघाले तेव्हां पूर्वीं **शास्ताखान** चालिला त्याप्रमाणें दळभार निघाला. पृथ्वी–आकाशपर्यंत एकच धुरळा उठला. ऐसा सेनासमुद्र दक्षिणेस चालिला. मजल दर मजल चालिले. मुकाम होय तेथें दीड गांव लांब, गांवभर रुंद, लष्कर राहात असे. तेव्हां **जयसिंगराजियांनीं** मनांत विचार केला कीं, ' **शिवाजी** मोठा दगेखोर, मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना शिपाई आंगाचा खासा आहे. **अफजलखान** आंगें मारिला. **शास्ताखानाच्या** डेऱ्यांत शिरोन मारामारी केली. आपणांस यश कसें येईल ? ' म्हणून चिंता केली. तेव्हां मोठमोठे ब्राह्मण पुरोहीत यांनीं उपाय सांगितला. ' देवीप्रयोगीं अनुष्ठानें करावीं म्हणजे यश येईल.' असें सांगितलें. मग **मिरजा** बोलिला जे ' कोटचंडी करावी आणि अकरा कोट लिंगें करावीं, कामनार्थ बगळामुखी काळरात्रीप्रीत्यर्थ जप करावा, असें अनुष्ठान करावें. ' चारशें ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यहीं अनुष्ठान चालिलें. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेविले. आणि तीन मास अनुष्ठान चालून सिद्ध केलें. अनुष्ठानाची पूर्णाहुती करून ब्राह्मणांस दान-दक्षणा देऊन संतर्पण केलें. मग मजल दर मजल चालिले.

४१. शिवाजीराजास जयसिंग–प्रकरणीं श्रीभवानीचा संदेश

याउपरि **महाराज राजगडीं** होते तों जासूद हलकारे आले. त्यांनीं खबर सांगितली कीं, ' **जयसिंग मिरजा राजा** ऐशीं हजार स्वार बरोबरि **दिलेलखान** पांच हजार पठाण ऐशी फौज येत जाहे. ' ऐसें ऐकून **राजश्री** विचारांत पडले. आपले कारकून हुजूर आणून विचार केला. त्यांणीं सर्वांनीं सांगितलें कीं, '**अफजल** मारिला आणि **शास्ताखानास** दगा दिला. ते गैरहुशार मुसलमान होते. हुन्नरहि नवाच केला. [हें] सर्वहि रजपुतास जाहीर आहे. दगा करूं देणार नाहीं. याशीं सला करावा.' ऐसें बोलिले. राजे बोलिले जे, ' रजपूत कैसा तरी वळला जाईल, परंतु

हा **दिलेलखान** मोठा हरामजादा, बेमान आहे. पादशाहाचा मेहेरबानीचा अंतर्गत आहे. तो कांहीं भला नाहीं. तोच काय करील तें न कळे. तो बराबरि नसता तरि आमचा मनोरथ पूर्ण होता. बरें, आतांच काय आहे, **श्रीचें राज्य, श्रीवर भार** घातला आहे. तिचे चित्तास येईल तें ती करील.' असें बोलिले. त्यावर तो दिवस गेला. दुसरे दिवशीं **श्रीभवानी** येऊन बोलूं लागली कीं, 'अरे मुला, या वेळेचा प्रसंग कठीण आहे. **जयसिंगास** मारवत नाहीं. तो सला करीत नाहीं. भेटावें लागतें. भेटून दिल्लीस जावें लागेल. तेथें कठीण प्रसंग होईल. परंतु आपण बराबर येईन. लेंकरास नाना यत्नें करून रक्षून, घेऊन येईन. यशस्वी करीन. चिंता न करणें. म्हणोन लेंकरास सांगणें. लेंकरास आपलें राज्य आपण वरदान दिलें तें आपण कांहीं एक पिढी दिलें नाहीं. सत्तावीस पिढी दिलें. **दक्षणेचें** [राज्य] **नर्मदा**पर्यंत दिले असे. राज्याची चिंता मला आहे. पूर्ण समजणें. लेंकरूं वेडीवांकडी वर्तणूक करील तें सर्व आपणास सावरणें लागतें. कोणेविशीं चिंता न करणें,' असें सांगोन **श्री** अदृश्य जाहाली. तीं वाक्यें लिहिणारांनीं लिहून ठेवून ठेविलीं होतीं. त्याउपर राजे सावध जाहाले. मग श्रीचीं वाक्यें सर्वांनीं निवेदन केलीं. त्याजवरून **राजे** बहुत संतोष होऊन, हिंमत धरली.

४२. जयसिंगाचें शिवाजीच्या वकिलास बोलावणें

ऐशियांत **जयसिंग** [यानें] **पुरंधर, कोंढाणा** या दोहों गडांचे दरम्यान येऊन मुकाम केला आणि **राजियाकडे** जासूदपत्रें पाठविलीं कीं, 'तुम्ही **शिसोदे रजपूत** आम्हीतुम्ही एकाचें एकच आहों. तुम्ही भेटीस येणें. तुमचें सर्वप्रकारें [४३]बरें करूं.' म्हणोन पत्रें पाठविलीं. तीं पत्रें **राजगडास** आलीं. **राजियांनीं** वाचून हेजीब कोण पाठवावा ही तजवीज करून विचार करितां **रघुनाथपंडित** थोर संनिध होते त्यांस पाठवावें, 'रजपुताजवळ प्रसंग पडला तर हे थोर शास्त्रज्ञ आहेत. रजपूतहि शास्त्र

४३ 'गोमटें' म. प्रत.

जाणतो. त्याशीं व याशीं गांठ बरी [४४]पडेल.' असा विचार करून **रघुनाथपंडितांस 'पंडितराव'** म्हणून किताब दिला आणि त्यांबरोबर वस्त्रें, अलंकार देऊन मिरजाराजियापाशीं पाठविलें. ते शत्रुसैन्यांत गेले.

४३. जयसिंग शिवाजीस भेटीस बोलावितो

राजियाचा हेजीब आला हें वर्तमान कळून **मिरजा राजियांनीं** बहुत सन्मान करून भेट घेतली. बोलणें जालें. **जयसिंग** बोलिला जे '**दिल्लीचा पातशाहा** बहुत जोरावर, याशीं शत्रुत्व लावलियानें शेवट लागणार नाहीं. **राजियांनीं** आपले भेटीस यावें. आपण बराबर घेऊन जाऊन पादशाहाची भेट करवूं. जैसा **रामसिंग** आपला पुत्र, तैसे तुम्ही आपले आहां. आपण तुमचें वाईट करणार नाहीं. येविशीं '**श्रीकर्पूर-गौराची**' पूजा करून [४५]बेलतुळशी दिल्या. आणि **पंडितरायासि** वस्त्रें दिलीं व **राजियासि** वस्त्रें, अलंकार पाठविले आणि सांगोन पाठविलें कीं, 'भेटीस येणें. [४६]साहाचार महिने गटकोट भांडवणें. तोलदारी दाखवणें. मग भेटीस येणें.' असें सांगून **रघुनाथपंडितराऊ** यांस गुप्तरूपें निरोप दिला. ते परतोन **राजगडास राजियाजवळ** येऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून **राजे** संतुष्ट जाहाले. जागां जागां गडकोट यांसि ताकीद करून तमाम मजबुदी करविली. आणि गड भांडवणें म्हणून स्थळा-स्थळांस सांगोन पाठविलें.

४४. दिलेलखानाची जयसिंगास भेटून पुरंधरगडावरील चढाई

पुढें **जयसिंगाच्या** लष्करांत **राजियाचा** हेजीब आला होता हें वर्तमान **दिलेलखानास** कळून मनांत कष्टी जाहाला. 'शेवटीं हिंदूस

---

[४४] 'रजपुताजवळ पंडिताचा प्रसंग फार. रजपूत शाहाणा शास्त्र जाणता' पाठांतर.

[४५] 'येविशीं ठाकूरजी पूजा करून तुळशी काढून हातीं दिधल्या' पाठांतर.

[४६] 'साहाचार महिने' वगैरे शब्द म. प्रतींत नाहींत.

हिंदू मिळून काम जायां करतील ' ऐसें म्हणून दुसरे दिवशीं **दिलेलखान** मिरजाराजियाच्या भेटीस आला. आणि बोलूं लागला कीं, ' उगेच काय म्हणून बैसलेत ? गोटाजवळ **कोंढाणा** व **पुरंधर** हे दोन किल्ले आहेत. **पुरंधरास** आपण सुलतानढवा करितो आणि गड घेतो. तुम्हीं **कोंढाणा** गड घेणें. गड घेत चालिलां म्हणजे शिवाजी येईल. ' असे बोलतां, **मिरजा राजा** बोलला जे, ' गड आले तरी बरें, नाहींतर, नामोश जाईल. याजकरितां गडास न लागावें. मुलूक काबीज करावा. गडास सामान चालों न द्यावें, म्हणजे गड आपाप येतील.' असें बोलतां दिलेलखान रागें उठून चालिला. ' आपण आतांच जाऊन **पुरंधर** घेतों. तुम्हीं **कोंढाणा** घ्याल तरि घेणें.' असें म्हणून उठोन, गोटास येऊन नगारा करून, ढाल-फिरंग घेऊन **पुरंधरा** खालें येऊन, मुकाम करून गडावरि येलगार केला. पायउतारा होऊन पांच हजार पठाण व दाहा हजार बैले, [४७]तोफची पायउतारा जाहाले. पेंढारी, आड हत्यारी व खलक लोक वीस हजार लहानथोर पायउतारा होऊन लगट करीत चालले.

४५. दिलेलखान–मुरारबाजीचें पुरंधर–पायथ्याशीं युद्ध

तेव्हां **पुरंधरावरि** नामजाद लोकांचा सरदार **राजियाचा मुरारबाजी** परभू म्हणोन होता. त्याजबरोबर हजार माणूस होते. याखेरीज किल्याचे एक हजार होते. असे दोन हजार लोक होते. त्यांत निवड करून **मुरारबाजी** यांनीं सातशें माणूस घेऊन [ते] गडाखालें **दिलेलखानावरि** आले. **दिलेलखान** तोलदार, जोरावर, पठाण पांच हजार, यांखेरीज बैले वगैरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती, त्यांत जाऊन सरमिसळ जाहाले. मोठें घोरांदर युद्ध जाहालें. मावळे लोकांनीं व खासा **मुरारबाजी** यांनीं निदान करून भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जाहाले. तसेच बहिले[४८] मारिले. खासा **मुरारबाजी** परभू **दिलेलखानाच्या**

---

४७ ' खासा पायउतारा होऊन...आठ हजार रोहिले. ' सा. प्रत.

४८ कांहीं प्रतींत ' रोहिले ' व कांहींत बैले असेंहि आहे. दुसरा पाठ बरा

देवडी[४१] पावेतों, साठी माणसांनिशीं मारीत शिरले. **दिलेलखान** देवडी सोडून माघारां जाहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आडहत्यारी एक हजार लोक यांजकडून मार करविला. त्यामध्यें साठी लोक पडिले. **मुरारबाजी** परभू यांनीं ढालफिरंग घेऊन दिलेलखानावरि चालोन आले. माहाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जाहाले. आतां काय मुख दाखवावं ? म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ घातली. तेव्हां **दिलेलखान** बोलिला जे, 'अरे, तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों.' ऐसें बोलतां **मुरारबाजी** बोलिला जे, 'तुझा कौल म्हणजे काय ? मी **शिवाजी-राजाचा** शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय ?' म्हणून नीट खानावरि चालिला. खानावर तरवारीचा वार करावा तों खानानें आपले आंगें कमाण घेऊन, तीर मारून, पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत आंगोळी घातली कीं, 'असा शिपाई खुदानें पैदा केला.' ऐसें आश्चर्य केलें. **मुरारबाजी**बरोबर तीनशें माणूस ठार जाहालें. वरकड चारशें माणूस गडावर गेलें. **दिलेलखानानें** शीरची पगडी उतरली. आणि गडावर चालून घेतलें कीं, 'गड घेईन तेव्हां पगडी बांधीन,' ऐसा नेम करून चालिला. तों दरवाजाखालें येऊन ढालेचा कोट करून बसला. किल्याचे लोक **मुरारबाजी** पडला म्हणोन गणना न करितां शरतीनें भांडूं लागले. 'एक **मुरारबाजी** पडला तरि काय जालें ? आम्ही तैसेंच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों.'

४६. शिवाजी जयसिंग व दिलेलखान यांस भेटतो

हें वर्तमान **राजियांसि राजगडीं** कळलें कीं, '**दिलेलखानानें पुरंधरास** लगट केला; **मुरारबाजी** परभू पडला. तीनशें माणूस रणास आलें.' हें कळोन मनांत चिंतातूर जाहाले कीं, गड **दिलेलखान** जेव्हां घेतो, तेव्हां वरकड किल्ले आपाप जातात. मग आपण भेटल्यानें रूप

---

४१ 'गोटा पावेतों.' पाठांतर.

नाहीं. जोंवर गड आहेत तोंवर भेटोन आपले हातें जे गड देणें ते देऊन सला करावा, हें उचित.' म्हणोन **रघुनाथभट पंडितराऊ मिरजा राजिया**जवळ पाठविलें कीं, 'आपण तूर्तच भेटीस येतों. **दिलेलखानानें** गड घेतला, मग भेट जाहाल्यानें हलाखी आहे.' असें सांगोन पाठवून भेटीस जावेंसें केलें. **पंडितराऊ** जाऊन **जयसिंगास** भेटलें. वर्तमान श्रुत केलें. मग त्याणेंहि 'उत्तम' म्हणून मागती शफत-क्रिया बळकटी केली. आणि **पंडितराव राजगडास** आले. येतांच खासा **राजा** हजार माणूस निवडक करून बरोबर घेतलें. **श्रीशंभूस** व **भवानीस** नमस्कार केला. व **मातोश्रीस** नमस्कार केला. भेटले. शिष्ट, तपस्वी ब्राह्मणांस नमस्कार केला. सर्वांचा आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालिले. ते एकाएकी **मिरजा राजियाचे** गोटांत गेले. पुढें **पंडितराव** जाऊन सांगितलें कीं, '**राजे** आले.' ही खबर कळतांच **जयसिंग** देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनीं बैसले. आणि **राजे मिरजाराजियासि** बोलूं लागले कीं, 'आपण जैसा **रामसिंग** तैसेंच तुम्हांस. त्याचें रक्षण कराल तैसें आपलें करणें.' असें बोलून बैसले. मग **जयसिंग** बोलला जे, 'हीच गोष्ट खरी. आपण रजपूत, तुम्ही व आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शिर जाईल, मग तुम्हांस काय होणें तें होईल' असा भरंवसा बोलून शपत वाहिली. मग राजे बोलले जे, 'तुम्हांस जे गड पाहिजेत ते आपण देतों. **दिलेलखानास** बोलावून आणवणें. **पुरंधर** तुम्हांस देतों. निशाण तुमचें चढवितों. परंतु मुसलमानास यश देत नाहीं.' अशी गोष्ट बोलल्यावर **जयसिंग** खुशाल जाहाला. आणि बोलिला जे '**दिलेलखान** फामिंदा आहे. बादशाहाचे मेहेरबानीचा आहे. त्यास *तुम्हीं हातीं घ्यावा [*मुजरा हातीं करून*] लागतो. तुम्हींच **दिलेलखानाच्या** भेटीस जावें लागतें. आपण रजपूत आप्तविषयीं तुम्हां बरोबरि देतों. ते तुमची भेट करून आणतील, फिकीर न करावी. तुमचे लवेस[५०] जडभारी तरि आपण पन्नास हजार फौज रजपूत

५० 'केसास' पाठांतर. *प्रथम हे शब्द होते.

[सुद्धां] खस्त होतों.' ऐकून **राजे** म्हणों लागले जे, ' [मी] **शिवाजी** आहे. **दिलेलखानाच्या** गुमान धरितों कीं काय ? तुमचे आज्ञेनें जातों, भेटतों.' म्हणून निरोप घेऊन **मिरजा राजियांनीं सुभानसिंग** आपल मामा थोर योद्धा, मोठा, बळाचा, शूर, **दिलेलखानाचे** सवाईनें[५१] तोलदार, **दिलेलखानहि** त्यास जाणें, असा बरोबर दिला. आणि '**राजा** सांभाळोन घेऊन येणें. तुझे भरवंशावर पाठवितों.' असें बोलून पाठविला. **सुभानसिंग** पन्नास रजपूत आपले जोडीचे समागमें घेऊन चालिला. जेथें **दिलेलखान पुरंधरचे** दरवाजाजवळ होता तेथें राजे गेले. पुढें **दिलेलखानास** खबर पाठविली कीं, '**शिवाजीराजे** येऊन **मिरजा राजियासी** भेटले, तुमचे भेटीस येतात.' हें कळोन **दिलेलखान** मनांत जळला. मनगटें चाविलीं कीं, '**पुरंधर** किल्याचें यश आपणांस आलें नाहीं; आपले विद्यमानें बोलणेंहि नाहीं; यश रजपुतासि आलें.' म्हणून श्रमी होऊन, पुढें सामोरा येऊन, रागें रागें राजियासि जोरानें आंवळोन धरून घडीभर भेटला. **दिलेलखान** म्हणजे मोठा बळकट, एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्तीबरोबरि खाणें, दररोज हत्ती खातो तेणेंप्रमाणें वजेनें खाणें. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच. ऐसा थोर. त्याणें रागें भरून एक घटकाभर रागें, जोरानें **राजियास** आंवळून धरिलें. परंतु सरदार जोरावर, बळकट तैसाच. त्याणें खातरेस आणिलें नाहीं. मग भेटीची मिठी सुटून एकीकडे लोडाजवळ उभयतां बैसले. दुसरे बाजूस लोडाशीं **सुभानसिंग** बैसले. **दिलेलखान** कटारी जवळ करून, वर हात ठेऊन बैसला आणि क्रोधें करून **सुभानसिंग** यासि पुसिलें कीं,[५२] '**राजाबरोबरि** तुम्ही आलां आहां' असें पुसिलें. तेव्हां मनामध्यें हाकारा धरून, **सुभानसिंग** बोलिला जे, '**खानजी**, तुम्हांकडे

---

५१ 'दुप्पट' पाठांतर.

५२ 'व सुभानसिंग यासि पुसिलें कीं, केव्हां आला ? ते म्हणों लागले कीं 'आतांच आलों. मिरजाराजियासि भेट जाली; तुमचे भेटीस आलों.' म.प्रत.

राजे आले. आतां उद्यां तुम्हांस जे गड पाहिजेत ते देऊं. तुम्ही उतरून गोटास येणें. असा **मिरजा राजियाचा** हुकूम आहे.' असें बोलल्यावरि बहूत कष्टी जाहाला जे, आपला मनोरथ सिध्दीस गेला नाहीं. 'तुम्ही साहेब लोक आहां. तुमच्या हुकुमानें येऊं. परंतु हा किल्ला उदईक आपणांस घेऊन देणें. निशाण चढवून येतों.' असें बोलतां **सुभानसिंग** म्हणूं लागला कीं, 'गड आपणांकडे आला. तुम्हीं चलावें.' त्यावरून **दिलेलखान** उतरोन खासा गोटांत आला. चौकी किल्यास ठेविली. **राजियासि** पानविडे देऊन रवाना केलें. 'तुम्हीं मिळोन **मिरजा-राजियाजवळ** जाणें. ते वडील आहेत. ते करतील त्यांत आपण आहों.' [असें खान बोलला].

४७. शिवाजी–जयसिंग भेट शिवाजी दिल्लीस जाण्याचा करार

असें बोलतांच राजे व **सुभानसिंग मिरजा राजियाकडे** आले. वर्तमान सांगितलें. मग **जयसिंगानीं** व **राजियानीं** एकपंक्तीं भोजन केलें. **राजियास** राहावयास डेरा दिला. रात्रीं उभयतांचें बोलणें जालें. 'किल्ले अवघे पादशाहास द्यावे आणि **दिल्लीस** चलावें.' असें बोलतांच **राजे** म्हणूं लागले जे, 'आपल्यांपैकीं सत्तावीस गड देतों आणि आपण व आपला पुत्र **संभाजी** ऐसे पातशाहाचे भेटीस येतों. भेट करून इकडील **दक्षणेच्या** बादशाही इदलशाही व कुतुबशाही व निजामशाही-वरि आपणास नामजाद करणें. तीन पादशाही फत्ते करूं. एक पादशाही निजामशाही त्यांहीं फत्ते केलीच आहे. दोन पादशाही तुम्हांस घेऊन देतों.' म्हणून बोलिले. **मिरजा राजियांनीं** कबूल केलें. आणि **पुण्याहून** कूच केलें. **राजियांनीं संभाजीराजेहि** आणविले. सत्तावीस किल्ले तांब्रास दिले. निशाणें चढविलीं. वरकड **राजगड** व [इतर] कोट **मोरोपंत** पेशवे व **निळोपंत** मुजमूदार व **नेताजी पालकर** सरनोबत असे **मातुश्रीच्या** हवालें केले. आणि आपणहि **दिल्लीस** जावें, पादशाहाची भेट घ्यावी असा करार केला. पुढें पातशहास कळावें म्हणून

जयसिंग राजियांनीं आपला वकील रवाना केला. त्याजबराबरि राजाचा [वकील] जावा, त्यास **सोनाजीपंत डबीर** याचा मेहुणा **रघुनाथपंत कोरडे** यांस दिलें. हे उभयतां पुढें दिल्लीस रवाना केले. **राजियांनीं** अर्जदस्त पादशाहास दिली कीं, ' आपण भेटीस येतों ' म्हणून पत्र लिहून दिलें.

४८. शिवाजी व जयसिंग यांची विजापुरावर चाल

याउपरि **मिरजा राजियाबरोबरि** आपली फौज घेऊन **राजे विजापुराकडे** चालले. मार्ग चालतां **मिरजा राजे** व **शिवाजीराजे** एका हवद्यांत बैसले आणि चालिले. कुल वजीर येऊन सलाम करीत. **दिलेलखान** जोहार न करी. निमित्य कीं, राजे [व] ते एके जागां आणि आपण जोहार कैसा करावा ? ये गोष्टीनें सलाम न करी. पुढें **विजापुरासहि** सला केला. उपरि उभयतांनीं **दिल्लीस** जावें, त्यास **मिरजा** बोलिला जे, " पादशाहा बहूत हुन्नरवंत आहे. बेइमान आहे आम्ही तुम्ही बरोबरि गेल्यानें दगा दोघांसि केलियानें कसें करावें ? आपण मागाहून येतों. **औरंगाबादेंत** राहातो. तुम्हीं **दिल्लीस** जाणें. आपला पुत्र **रामसिंग** हुजूर आहे. तोहि तोलदार, भिडेचा आहे. त्यांस सांगोन पाठवितों. त्याचे हातें भेट घेणें. सरंजाम करून **दक्षणेस** येणें. तुम्ही **दिल्लीहून** निघालां म्हणजे आपण **दिल्लीस** जाऊं. तोंपर्यंत आपण बाहेर आहों. " पादशाहास भेटल्यावर तो तुम्हांशीं बेइमानी न करी म्हणवून तजवीज सांगून **रामसिंगास** पुढें पत्रें पाठवून, ठीक करून, **राजियांसि** रवाना केलें.

प्रकरण ५ वें

शिवाजीराजांचें आग्र्यास जाणें व येणें

४९. शिवाजीराजे कारकून व हुजरे यांसह आग्र्यास जातात

राजियांनीं बरोबरि घेतले कारकून व हुजर बितपशील—

१ निराजी राऊजी शाहाणा	१ माणको हरी सबनीस
१ त्रिंबकजी सोनदेव,	१ दत्ताजी त्रिंबक
सोनाजीपंताचे पुत्र	१ हिरोजी फर्जंद
कलम १	१ राघोजी मित्रा
	१ दावलजी गाडगे
	[कलम १]

मावळे लोक १००० एक हजार लष्कर[५३] ३००० तीन हजार. येणेप्रमाणें यांसहवर्तमान

राजे राजगडास येऊन, सर्वांच्या भेटी घेऊन, सदर्हूप्रमाणें बरोबर घेऊन **राजे** व पुत्र असे उभयतां मजल दर मजल **दिल्लीस** चालिले. **पादशाहास राजे** भेटीस येतात हें कळोन आपले कुल फौजदार व माहालमोकासे यांसि ताकीदपत्रें पाठविलीं कीं, '**शिवाजीराजे** मुलाजमतीस येतात. जे जागां मुक्कामास राहातील तेथील फौजदारांनीं येऊन भेटावें. दाणापाणी जो लागेल तो द्यावा. शाहाजादे यांचेप्रमाणें आदब चालवावी.' ऐसे रोखे पाठविले. त्यावरून **राजे** मजलीस जात तेथें फौजदार[५४] भेटून दाणापाणी जो खर्च लागेल, तो द्यावा. असे दोन महिन्यांनीं **दिल्लीस** पावले.

---

५३ 'स्वार' पाठांतर.

५४ 'ठाणेदार' पाठांतर.

५०. शिवाजी व औरंगजेब–दरबार

राजे आले ही खबर **पादशाहास** समजून **रामसिंग** पुढें भेटीसि पाठविले. **रामसिंग** येऊन भेटले. **रघुनाथपंत कोरडे** पहिले हेजीब पाठविले तेहि येऊन भेटले. पादशहाचें सर्व वर्तमान सांगितलें. बाह्यात्कार समाधान खुशाली सांगितली. 'मनांत पादशाहाचे काय आहे न कळे' असें बोलिलें. **रामसिंग** भेट घेऊन पादशाहापाशीं आले. वर्तमान सांगितलें. पादशाहांनीं एक हवेली जागा सचंतर **शिवपुरा** म्हणून वसवून [तेथें राजे] राहिले.[५५] मुहूर्त पाहून पादशाहाचे भेटीस चालिले. **पादशाहांनीं** सदर करून पांच हत्यारें आपणाजवळ ठेवून, कंबरबस्ती करून, आंगांत [५६]जरीची कुडती घालून खासा तख्तीं बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले. तैसेच आमखास यांमध्यें कुल वजीर मुस्तेद करून उभे केले. मनांत कीं, '**शिवाजी** सामान्य नाहीं, सैतान आहे. **अफजलखान** भेटीमध्यें मारिला. तैसाच उडोन[५७] तख्तावरि आला आणि आपणास दगा केला तरि काय करावें?' असें समजून मुस्तेदीनिशीं[५८] बसला. **राजियासि** भेटीस बोलाविलें. **राजे** व पुत्र **संभाजी** राजे व कारकून व हुजुरे अगत्याअगत्य दहा[५९] जण भेटीस **रामसिंग** घेऊन गेले. पादशाहाची नजर जाहाली. पादशाहा बोलला जे, 'आवो **शिवाजीराजे**[६०].' असें बोलतांच **राजियांनीं** तीन सलाम केले. मनांत भाव धरिला कीं, **श्रीशंभुमहादेव** एक, दुसरा **श्रीभवानी**, तिसरा **महाराज**

---

५५ 'बादशहानी हुकूम केला कीं शिवपुरा आहे तेथें एक हवेली देणें' पाठांतर.

५६ 'जि रे मुडी' पाठांतर.

५७ 'उठोन', 'चालोन' पाठांतरें.

५८ 'खबरदारीनिशीं' पाठांतर.

५९ 'खासे खासे पन्नास असामी' पाठांतर.

६० 'शिवाजी राजा आवोजी', 'हा शिवाजी राजा कीं काय' पाठांतरें.

पितियास, ऐसे तीन सलाम केले. आणि उजवे बाजूस **जसवंतसिंग** महाराज, नव कोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारीं खालते उभें राहावयासाठीं हुकूम [पातशाहांनीं] केला. राजे व पुत्र उभे राहिले. **रामसिंग** यास पुसलें कीं, 'आपणावरते शेजारीं कोण ?' असें पुसिलें. त्यास **रामसिंग** बोलिला जे 'महाराज **जसवंतसिंग**.' असें ऐकतांच **राजा** क्रोधयुक्त होऊन बोलिला कीं, '**जसवंतसिंगासारखा** उमराव ! याच्या पाठी माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील ! ! याचे खालें आपण उभें राहावें म्हणजे काय ?' असें क्रोधें बोलून **रामसिंगाची** कटार माजेची घेऊन 'महाराजा यास मारितों' म्हणवून कटार मागूं लागले. मग **रामसिंग** 'धरि धरणें' म्हणून बोलूं लागले. शब्दाशब्दी होतांच पादशाहास कळलें. पादशाहा म्हणूं लागले कीं, 'काय जाहालें ?' **रामसिंग** बोलिला कीं, 'जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जाहाला. कांहीं करीणा जाहाला.' असें बोलतांच पादशाहाचे मनांत शंका उत्पन्न जाहाली. काय होईल तें न कळे. म्हणून **रामसिंगास** पादशाहा बोलिले कीं, '**राजियास** घेऊन डेरियास जाणें. उद्यांसाद्यां सावकाश मुलाखत होईल.' असें बोलतांच **राजे** व राजपुत्र व **रामसिंग** राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. **राजा** बाहेर गेल्यावरि पादशाहा संतोष जाहाला. आणि 'मोठा अनर्थ चुकला. **शिवाजीची** व आमची नजर[६१] जाहाली होती.' ऐसें बोलून राहिले.

५१. शिवाजी व रामसिंग भेट

राजे डेरियास गेलियावरि **रामसिंग** व आपण बैसोन बोलिले जे, 'कोण पादशाहा ! मी **शिवाजी**, मजला **जसवंताखालतें** उभें करावें ! करीणा कांहीं पादशाहास समजत नाहीं.' ऐसे बोलिले. **रामसिंग** बोलिला जे, 'तुम्ही भेटीस येऊं नये. आले तरि रसरंग राखून निघून जाणें. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हास मोठी जोड जाहाली.' असें बोलून **रामसिंग** आपले हवेलीस गेले.

---

६१ 'शिवाजीची डहूळ नदर झाली होती' म. प्रत.

५२. शिवाजींचे वकील रघुनाथपंत व औरंगजेब

राजियांनीं आपले कारकून, हुजुरे व **रघुनाथपंत** कोरडे यांसि बोलावून आणून विचार केला, 'पुढें तजवीज काय करावी? पादशाहाची मजलस[६२] कळली. ते (ये) थून यश पावून निरोप घेऊन कैसें जावें? पादशाहाजवळ कांहीं एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशाहा निरोप देत नाहीं.' [मग] **रघुनाथपंत कोरडे** यांस सांगोन पाठविलें कीं, 'तुम्हीं पादशाहास उद्यां जाऊन अर्ज करणें कीं, 'स्वामीशीं आमचा दुसरा विचार नाहीं. आपण निखालस आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलों. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. **दक्षणेस** कुल अदलशाही व कुल कुतुबशाही दोनी पातशाही घेऊन हजरतीस देतों. वरकड सुभे रवाना करतां त्यांची कामगिरी पाहाणें आणि आपली कामगिरी पाहाणें' ऐसें कितीएक गोष्टी बोलून एकांतीं घुसलखानियांत भेटीस बोलाविलें [म्हणजे] भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलूं म्हणून अर्ज करणें,' म्हणून सांगितलें. त्याजवरून **रघुनाथपंत कोरडे** दुसरे दिवशीं पादशाहाजवळ जाऊन येणेंप्रमाण करीणा लिहून पाठविला. पादशाहानें रोखा वाचून चित्तांत विकल्प धरिला. आणि पत्राचे पाठीशीं जाब लिहिला कीं, 'सबुरी करणें. तुमच्या मुद्यामाफक करूं.' असा जाब लिहिला. त्याणीं येऊन **राजियासि** सांगितलें कीं 'सबुरी करणें' तेव्हां विकल्प आहे. दिलखुलाशानें जाब दिला नाहीं. असा तर्क राजियांनीं केला.

५३. जाफरखान व औरंगजेब यांच्या मनांत विकल्प

तेच दिवशीं **शास्ताखानानें जाफरखान** दिवाण, पूर्वील पातशहाचे वेळेसहि त्यास दिवाणगिरी चालत होती, परंतु मुतालिकाचे हातून कारभार होत असे, त्या **जाफरखानास** सांगून पाठविलें कीं, "**शिवाजी** मोठा दगेखोर आहे, विद्यावंत असे. आपल्या गोटांत शिरला तेव्हां चाळीस गज

---

६२ 'मसलत' पाठांतर.

जमीन उडाला आणि बाडांत शिरला. असा पातशाहानीं भेटीस नेऊं नये. नेला तरि चाळीसपंनास गज जमीन उडोन दगा देईल." असें सांगून पाठविलें. त्याजवरून **जाफरखानानें** पादशहास हें वर्तमान जाहीर केलें. **पादशहा** मनांत खोंचून त्यानें खरें मानलें. बळकट मनांत विकल्प धरिला.[६३]

५४. जाफरखान–शिवाजी भेट

दुसरे दिवशीं **राजे** यांस कळलें कीं, **जाफरखान** दिवाणानें आपला गिल्ला पादशहाजवळ केला. असें कळोन **रघुनाथपंत कोरडे** यांस **जाफरखानाकडे** पाठविलें कीं, 'आपले भेटीस येतों' म्हणून पाठविलें. त्यानें बहुत वेळ मनांत तजवीज करून 'बरें, येऊं द्या' म्हणोन सांगितलें. त्यावरून **राजे जाफरखानाचे** भेटीस गेले. सन्मान बहुत केला. कित्येक आपले सरंजामाविशीं सांगितलें, परंतु त्याचे मनांत आलें नाहीं. बाहेर 'बहूत बरें' म्हणून बोलिला. **जाफरखानाची** बायको ती **शास्ताखानाची** बहीण; तिनें खानास आंतोन सांगून पाठविलें कीं, "**शास्ताखानाचीं** बोटें तुटलीं. **अफजलखान** मारिला. तसें तुम्हांसहि **शिवाजी** मारील. त्यास लवकर निरोप देणें." मग **राजास** वस्त्रें देऊन निरोप दिला. "पादशहास अर्ज करून सरंजाम करवितों," ऐसें बोलिला. मग राजे डेरियास आले. **जाफरखानाहि दिलखुलाशानें** बोलिला नाहीं. 'बरें, श्री करील तें खरें,' म्हणून बोलून राहिलें.

५५. शिवाजीभोंवतीं चौकी : देवीचा साक्षात्कार

दुसरे दिवशीं **पादशाहा** यांणीं **राजापाशीं** ५००० स्वार व पायदळ [नेमून] **पोलादखान** कोतवाल यास हुकूम केला कीं, "तूं **राजाच्या**

---

६३ एथपासून प्रतापगड प्रतीचे पांच बंद १२१–१२५ गाहाळ आहेत. मधील मजकूर सातारा व खटाव प्रतीवरून घेतला आहे. खटावप्रतहि थोडे दिवसापूर्वी आली. हींत शिवाजीची दिल्लीहून सुटका होईपर्यंत वृत्तान्त आहे. श्री. ठाणेकर भावे प्रतापगडीं गेले असतां त्यांस हे पांच बंद उपलब्ध झाले होते. पण नंतर देवीचा प्रासाद दग्ध झाला त्यांत ते नष्ट झाले !

डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीनें राहणें." त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग **राजे** घाबरे जाले. कष्टी होऊं लागले. **संभाजीराजे** यांस पोटाशीं धरून बहुत खेद केला. **निराजीपंत** व **दत्ताजीपंत** व **त्रिंबकपंत** यांणीं बहुता प्रकारें समाधान केलें. तेव्हां राजे बोलिले जे, "आतां काय हुन्नर करावा ?" असा विचार करितां रात्र जाली. मग **श्रीभवानी** स्वप्नांत येऊन साक्षात्कार जाला कीं, "कांहीं चिंता न करणें. येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें." म्हणोन अभय जालें. मग जागृत होऊन आप्तविषयी लोकांस सांगितलें आणि समाधान मानिलें.

५६. मिठाईचे पेटारे वजिरांना भेटी

दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरांस पाठविला. चौकीच्या लोकांनीं पुसलें कीं, "पेटारे कोणाचे ? कोठें जातात ?" मजुरांनीं उत्तर दिलें कीं, "**राजे** यांणीं चौघां वजिरांस मेवा पाठविला आहे." त्यांणीं एकदोन उघडून पाहिले, तो मेवा खरा. मग जाऊं दिले. असा राबता रोज लाविला. मग आठचहूं रोजांनीं आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसहि 'पळणें' म्हणून सांगून पाठविलें. मग ते कुल पळाले.

५७. शिवाजीराजे संभाजीसह पेटाऱ्यांतून पलायन

मग एके दिवशीं **राजे** व **राजपुत्र** एकच[६४] पेटाऱ्यांत बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून **हिरोजी फरजंद** यास घालून, आपले पलंगावरी निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजविला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून[६५] होते त्यांस

६४ 'दोन पेटाऱ्यांत दोघे' पाठांतर.

६५ 'न होते' येथपासून पुनः प्र. प्रत १२६ बंद सुरू.

अगोदर **दिल्लीपलीकडे** तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केलें होतें. आणि उभयतां आपण पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनीं एकदोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहेर दोन कोसांवरि जाऊन पेटारे टाकून, पायउतारा होऊन, कारकून ज्या गांवीं होते त्या गांवास गेले. कारकून बराबरि घेतले. अवघियांनीं रानांत बसून विचार केला कीं, "आतां जरि नीट आपले देशास जातों तरि तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे जाऊं नये. **दिल्लीपलीकडे** जावें. **वाराणशीकडे** जावें." असें करून **राजे** व **संभाजीराजे** व **निराजी राऊजी** व **दत्ताजी त्रिंबक** व **राघो मित्रा** मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितलें. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे **वाराणशीकडे** आंगास राखा लावून फकिराचे सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

५८. तरी आग्रा येथें शिवाजी आजारी : रामसिंग

मागें **दिल्लीमध्यें हिरोजी फरजंद** पलंगावरि निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे **पोलादखानाचे** लोक कोठडींत येऊन पाहातात [तों] राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, "राजे आज फार वेळ निजले?" पोर म्हणतो कीं, "शीर दुखतें". ऐसें पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस **हिरोजी** निजला होता. तों प्रहर[६६] दिवस असतां **हिरोजी** उठोन, आपलीं पांघुरणें चोळणा, मुंडासें घालून, पोर बराबरि घेऊन, बाहेर आला. चौकीदारांनीं पुसिलें त्यांस **हिरोजीनें** सांगितलें कीं, "शीर दुखतें, कोणी कोठडींत जाऊं लागेल त्यास मना करणें. आपण औषध[६७] घेऊन येतों." म्हणून चौकीदारांस सांगून दोघे बाहेर गेले. **रामसिंगाचे** गोटास जाऊन त्यास एकांतीं वर्तमान सांगोन, आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

---

६६ 'दोन प्रहरा उपरांत' म. प्रत. ६७ 'सौदा' पाठांतर.

५९. रामसिंग व औरंगजेब

मग **रामसिंग** पादशहाच्या दर्शनास गेला. पादशहास अर्ज केला कीं, " **शिवाजी** आपले मार्फतीनें आला होता. त्यास पादशाहानें चौकी आलाहिदा दिली. आपणाकडे कांहीं इलाखा नाहीं. " पादशाहा बोलिलें कीं, " तुम्हांसि त्याचा इलाखा नाहीं. पादशाही बंदा त्यास पादशाहा सर्फराजी करतील. तुम्ही त्याचे दरम्यान नाहीं. " असें बोलल्यावर **रामसिंगानीं** तसलीम करून डेरियास आले.

६०. 'शिवाजी अस्मानामध्यें गेला;' औरंगजेबाची झोंप गेली.

नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, " आज माणसाचा राबता नाहीं. राजा [६८]श्रमी जाहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जातयेत नाहीं, काय वर्तमान ? " म्हणून कोठडींत पाहावयासि गेले तों पलंगावरि कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जाहालें. हें देखोन **पोलादखानानें** पादशाहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, " **राजा** कोठडींत होता. वरचेवर जाऊन पाहात असतां एकाएकीं गइब जाहाला. पळाला किंवा जमिनीमध्यें घुसला, कीं अस्मानामध्यें गेला हें न कळे. आम्ही जवळच आहों. देखत देखत नाहींसा जाला. काय हुन्नर जाहाला न कळे. " ऐसें जाऊन सांगतांच पादशाहास आश्चर्य वाटून बहुत तजविजींत पडला. आणि कुल फौजांत ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयास रवाना केले. त्यांस सांगितलें कीं, ' शिवाजी हुन्नरवंत आहे. एकादा वेष धरून जात असेल. तरि तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडीं, नानापरीचीं सोंगें शोध करून, राजा ओळखून, कैद करून आणणें. ' अशी इशारति सांगोन रवाना केले. फौजा चोहोंकडे स्वार जाहाल्या. आणि **पादशाहांनीं** मनांत शंका धरिली कीं, ' राजा शहरांत

---

६८ 'जहमत', 'काहला' पाठांतरें.

कोठें दडून राहिला असेल. आणि रात्रीस आपणांस दगा करील ' म्हणून तजवीज करून, बहुत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेविले. ये जातीनें राहूं लागले.

६१. शिवाजीराजे राजगडास येऊन पोचतात.

पुढें **राजे** व **राजपुत्र** मजल–दर–मजल चालोन **मथुरेस** गेले. **मथुरेमध्यें** ओळखीचे माणूस शोधितां **कृष्णाजीपंत** व **काशीराऊ** व **विसाजीपंत** हे त्रिवर्ग बंधु ब्राह्मण, **मोरोपंत** पेशवे यांचे मेहुणे, त्यांस **निराजीपंत** ओळखीत होते. त्यांणीं जाऊन, त्यांची भेट घेऊन, वर्तमान सांगितलें. त्यांणीं धैर्य धरून कबूल केलें. त्याजवर त्यांचे घरीं **संभाजीराजे** पुत्र ठेविले कीं, " आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्ही राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधु आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचें सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षीस देऊं. " असें सांगोन राजपुत्रास ठेविलें. आणि त्यांचा एक बंधु **कृष्णाजीपंत** समागमें घेऊन वाराणशीस गेले. " **गयाप्रयागीं** यात्रा तुमचे ओळखीनें तुम्हीं आपल्यास करून देणें. " म्हणून सांगून, त्यास बरोबर घेऊन, **वाराणशीस** आले. तेथें गुप्तरूपें स्नान करून, **श्रीविश्वेश्वरदर्शन** करून **प्रयाग**[६९]–स्नान केलें व **गयावर्जन** केलें. तेथें कर्जहि उदंड घेऊन धर्महि केला. पुढें देशास आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटें यावें तरि पादशाहाच्या फौजा गेल्या त्या मार्गें जातां नये. म्हणून विचार करून **गोंडवणांतून भागानगर, विजापुरावरून राजगडास** आले. मार्गीं कित्येक जागां उदंड शोध पडला होता. उद्गम* होतां दगाच व्हावा असें जालें होतें. परंतु, **श्रीभवानीनें** संरक्षून स्वस्तिक्षेम आणिलें. **निराजीपंत** व **दत्ताजीपंत** व **राघोजी** मराठा असे चौघे आले. **राजगडास** आलियावर थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वाटल्या. तोफांचे आवाज केले. **मातुश्रीनें** व कारकुनांनीं लष्कर, गड, कोट, हशम, सर्वांनीं, संतोष करून खुशाली केली.

---

६९ ' प्रयाण ' पडलें आहे. हस्तदोष. * ' अपाय ' असें होतें.

प्रकरण ६ वें

आदिलशाहीशीं युद्ध

६२. किल्ले परत घेण्याची योजना.

पुढें, सत्तावीस गड मोंगलास दिले [होते] ते मागती घ्यावे ही तजवीज केली. **मोरोपंत पेशवे** व **निळोपंत मजमदार** व **अणाजीपंत सुरनीस** यांसि सांगितलें कीं, 'तुम्हीं राजकारण यत्न करून किले घ्यावे.' आणि **राजियांनीं** मावळे लोकांस सांगितलें कीं 'गड घेणें'.

६३. तानाजी कोंडाणा घेतो.

त्याजवरून **तानाजी मालसुरा** म्हणून हजारी मावळियांचा होता. त्यानें कबूल केलें कीं, '**कोंडाणा** गड आपण घेतों.' असें कबूल करून वस्त्रें विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखालीं गेला. आणि दोघे मावळे बरे मर्दाने निवडून रात्रीं गडाच्या कड्यावरून चढविले, जैसें वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले आणि कडा चढून गडावर जाऊन तेथून माळ लावून वरकड लोक, देखील **तानाजी मालसुरा**, चढून गडावरि तीनशें माणूस गेले. गडावरि **उदेभान रजपूत** होता. त्यास कळलें कीं, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा बार घेऊन, हिलाल चंद्रजोती लावून बाराशें माणूस तोफाची व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या, आडहत्यारी, ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपुतांचे चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर जालें. पांचशें रजपूत ठार जाले. चाळीस पन्नास मावळे ठार जाले. **उदेभान किल्लेदार** खासा त्याशीं व **तानाजी मालसुरा** सुभेदार याशीं गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकावर पडले. वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून, त्याजवरि वोढ घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें

पडले. दोघे ठार जाले. मग **सूर्याजी मालसुरा, तानाजीचा** भाऊ, यानें हिंमत धरून, कुल लोक सांवरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला. आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड **राजियांनीं राजगडाहून** पाहिला आणि बोलले कीं, 'गड घेतला. फते जाली.' असें जाहालें. तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, '**तानाजी मालसुरा** यांनीं मोठें युद्ध केलें; **उदेभान किल्लेदार** यास मारिलें. आणि **तानाजी मालसुराहि** पडला.' असें सांगितलें. 'गड फत्ते केला', असें सांगतांच **राजे** म्हणूं लागले कीं, "एक गड घेतला परंतु एक गड गेला." असे तानाजीसाठीं बहुत कष्टी जाहाले. पुढें गडावरि ठाणें घातलें. **सूर्याजी मालसुरा** भाऊ नांवाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं कडीं दिलीं. द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम **कोंडाणा** घेतला.

६४. इतरहि सव्वीस गड घेतले.

पुढें **मोरोपंत** पेशवे याणीं व **निळोपंतीं** व **अंणाजीपंतीं** व मावळे यांणीं सवीस गड ऐसेंच ख्यात करून चौ महिन्यांनीं घेतले. सल्यानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले.

६५. संभाजी मथुरेहून राजगडास : अधिकारी नेमणुका.

राजगडास वाराणशीहोऊन सुखरूप पावलियावरि **मथुरेस** माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून **कृष्णाजीपंत** व **काशीराऊ** व **विसाजीपंत** या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित **संभाजीराजियास** जानवें धोत्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून [ते] **राजगडास** आले आणि **राजियासि** भेटले. मग **राजे** पुत्रास भेटले. आनंद थोर जाहाला. मोठा दानधर्म केला. आणि **कृष्णाजीपंत** त्रिवर्ग बंधूंस '**विश्वासराव**' म्हणून नांव किताब दिला. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूंस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिलें. तसेंच **निराजीपंत** हे बराबरि बहुत श्रमसाहस करून आले व **दत्ताजीपंत** बरोबरि

होते व **राघो मित्राहि** बरोबरि होता. त्यास **निराजीपंत** नीतिन्याय सर्व जाणते, चतुर, चौकस, निजामशाई ब्राह्मण, त्यास न्यायाधिशी सरकारकुनी सांगितली. जितकी राज्यांतील न्यायमनसुबी तितकी त्यानें करावी. त्यांचे पुत्र **प्रल्हादपंत** धाकटे बारा-चौदा वर्षांचे होते. शाहाणा, बुद्धीचा देखोन त्यास लष्करची सबनिशीची मुतालकी सांगोन लष्करासमागमें सरनौबताजवळ ठेविला. '**प्रल्हादपंत** मोठे माणूस होतील, थोर भार घेतील', असें राजे बोलले. **दत्ताजीपंतास** हुद्दा काय सांगावा म्हणून तजवीज केली. तों **गंगाजीपंत** वाकनीस मृत्यु पावला. त्याची वाकनिसी **दत्ताजीपंतास** सांगितली. सरकारकुनामध्यें गणना केली. **राघो मित्रा** यासि हुजूर लोकांचा हवाला सांगितला. समागमें जे जे लोकीं श्रमसाहस केला त्यांस नांवाजिलें.

६६. शिवाजीचें रक्षक-पथक.

पुढें **राजियांनीं** आपले पालखी बरोबरि चखोट माणूस पाहून निवडक असामी ठेविले. चहूं पादशाहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो. तेव्हां जवळ आहेत ते कार्यास येतील. असें जाणून मावळे लोकांत पाहाणी परीक्षा करून, निवडक माणूस पाहून, पतकें केलीं त्यांचीं [नांवें] नांवनिशीवार.

१ शंभर लोक म्हणून नांव ठेविलें. १ तीस लोक म्हणून नांव ठेविलें.
१ साठ लोक म्हणून नांव ठेविलें. १ वीस लोक म्हणून नांव ठेविलें.
१ चाळीस लोक म्हणून नांव ठेविलें. कलम १

येणेंप्रमाणें पतकापतकांचीं नांवें ठेविलीं. मावळ्या-मावळ्यांमध्यें लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतकें मिळून दोन हजार माणूस ठेविले. त्यांत कांहीं बंदुखी, कांहीं विटेकरी, वरकड आड-हत्यारी, फिरंग [वाले] असे माणूस सजले. तितके माणसांस साज करून दिले. डोईस मंदील, आंगास सखलादी फतू, दोहों होतीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारांस अबनाळ तैनाळ, सोनेरुप्याचे, बंदुकीस कट रुप्याचे व विटियांसि कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची,

येणें प्रमाणें अवघे लोकांस साज–सरकार निसबतीनें देऊन लोक सजविले. अवघ्यांचे एकच साज. मर्दाने म्हणावे तरि एकापेक्षां एक अधिक. अशी परीक्षा करून हमेशा २००० मावळे लोक पालखीबरोबर जवळ असावे. तसेच त्यांस तैनाती सरदार हजारी हशमांत केले. त्याप्रमाणें जुमलेदार प्रमाण केले. आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. रहस्तां असावें. चालते वेळेस पालखीबरोबरि चौतर्फा चालत असावें. ये जातीनें लोक ठेविले.

६७. पन्हाळागड घेतला व दिला.

त्यावरि **पनाळा** किला अदलशाईचा तेथें भेद करून गड घेतला. राजे गडावरि राहिले. मग विजापुराहून **शिद्दी जो[हा]र** वजीर, वीस हजार स्वार, [याणें] **राजियासि** वेढा घातला. गड नवाच घेतला होता. सामान करून मजबुती करावयासि अवकाश जाहाला नाहीं. परंतु गड बरा भांडविला. **नेताजी पालकर** सरनोबत **राजियाचा** त्यास पत्रें जासूद पाठविले कीं, 'तुम्हीं लष्कर घेऊन उपराळयास येणें आणि **शिद्दी जो[हा]र** यास मारून चालवणें.' म्हणून पत्रें पाठविलीं. त्यास लष्कर दूर लांबलें. समयास यावयासि फावलें नाहीं. आणि गडावर सामान नाहीं. मग **राजियांनीं** विचार केला आणि गड **शिद्दी जो[हा]रास** दिला. आपण उतरोन आले. गड **शिद्दी जो[हा]रांनीं** घेऊन आपलें ठाणें बसविलें.

६८. नेताजीवर इतराजी व कडतोजीस सेनापती.

मग **राजियांनीं नेताजी पालकर** यास बोलावून आणिला; आणि 'समयास कैसा पावला नाहींस?' म्हणून शब्द लावून, सरनोबती दूर करून, **राजगडचा** सरनोबत **कडतोजी गुजर** म्हणून होता, त्याचें नांव दूर करून, **प्रतापराव** नांव ठेविलें, आणि सरनोबती दिधली. **प्रतापरावांनीं** सेनापती करीत असतां शाहाण्णव कुळींचे मराठे चारी पादशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविले. पागेस घोडीं खरेदी केलीं. पागा सजीत चालिले व शिलेदार मिळवीत चालिले. असा जमाव पोख्त केला. चहूं पादशाईत दावा लाविला.

प्रकरण ७ वें

शिवाजीराजांचा मोंगलाशीं तह व बिघाड

६९. शिवाजी मोंगलांचा हस्त हजारी सरदार.

राजे दिल्लीहून पळोन आपल्या देशास पितापुत्र सुखरूप आले. येऊन चहूं महिन्यांत सतावीस गड घेतले. मोठी ख्यात केली. हें **औरंगजेबास** कळोन मनांत चिंतातुर जाला. तेव्हां **शाहाआलम** वडील पुत्र यास पादशाहानीं कित्येक विचार राजकारण सांगून त्यासि फौजेनिशीं रवाना केलें. शाहाजादियास सांगितलें कीं "जोरावारीनें **शिवाजी** हातास लागत नाहीं. तुम्ही जाऊन **औरंगाबादेस** राहाणें आणि सलामामला **राजियासि** करून त्याचें सख्य करणें. आणि भेटी न ये, तरी मुलाज माफ करणें. आणि दौलत त्याचे नांवें अगर मुलाचे नांवें देऊन त्याची फौज चाकरीस आपणाजवळ आणणें. त्यास मुलुक-मोकासा, पैकाटका, ठाणीं जें पाहिजे तें देऊन **शिवाजी** आपला चाकर जालासें करणें. येवढें यश तुम्हीं घेणें. म्हणजे सर्व यश आलें असें करणें." म्हणून बुद्धिवाद सांगून शाहास फौजेनिशीं रवाना केलें. तो साठसत्तर हजार स्वारांनिशीं निघाला. तो मजल दरमजल **औरंगाबादेस** येऊन राहिला. आणि **राजियाकडे** पत्रें, जासूद, हलकारे, हेजीब पाठविले. ते **राजगडास** दाखल जाहाले. शाहाजादियाचीं पत्रें दिलीं. तीं वाचून पाहिलीं. तेथें लिहिलें होतें जें, "सला करून तुम्हीं आम्हीं एक व्हावें." असें लिहून पाठविलें. त्यावरि राजे बहुत संतुष्ट होऊन **रघुनाथपंत कोरडे** यांस **औरंगाबादेस** पाठविलें. कित्येक जडजवाहीर वस्त्रेंहि शाहास पाठविलीं. **रघुनाथपंतीं** जाऊन भेट घेतली. शाहानें बहूत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलिला कीं, "राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एक विचारें राहून. तुम्ही भेटीसहि येणें. तुमचे पुत्राचे नांवें दौलत देतों. एक सरदार फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवूं. तुम्हीं पातशाही

रुजुवातीनें असणें. " **संभाजी** राजाचे नांवें हप्त हजारी दौलत द्यावी. पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा असें केलें. उत्तम भूषणें वस्त्रें देऊन रवाना केले.

७०. शिवाजीची फौज शाहाजाद्याच्या पदरीं.

ते परतून **राजाच्या** दर्शनास आले. भेट जाली. शाहाजादियाचे अलंकार वस्त्रें, पत्रें, दिलीं.: दौलतीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व भावार्थ कळलियावरि **राजियांनीं** विचार केला कीं, " आपणास एक **विजापूरचे** पातशाहीशीं दावा, **भागानगरकरांशीं** दावा व **मोंगलाशीं** दावा; असे तीन दावे सोसवत नाहींत. आपलें राज्य नवें. त्याहिमध्यें दोन–तीन चपेटे होऊन हलाखी जाली आहे. त्यास एक शत्रु तरि [एक] मित्र करावा आणि दोन वर्षें बळ धरून सांवरावें. मग पुढें जें कर्तव्य तें करावें. " असा विचार करून, मोंगलाशीं सला करावा हा विचार करून फौज **प्रतापराऊ सरनोबत** याबराबरि पांच हजार स्वार देऊन समागमें **निराजीपंत** सरकारकून दिधले. व **मोरोपंत पेशवे** व मजमदार व सुरनीस यांचे मुतालीक दिले. **प्रल्हादपंत निराजीपंताचे** पुत्र, यांस लष्करची सबनिशी दिधली. मुलूख मोकासा देतील त्यास सुभेदार **राउजी सोमनाथ** कारकून करून दिधले. ऐसे रवाना केलें. मोंगलाशीं सला केला. **संभाजीराजे** यांस हप्त हजारी कबूल करून **निराजीपंत** व **प्रतापराव औरंगाबादेस** गेले.

मग शाहानें बहूत सन्मानें भेट घेतली. सचंतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें सर्वांस दिधलीं. वऱ्हाड देश जागा जाहागीर पंधरा लक्षांचा होनांचा दिधला. त्या मुलखांत **राउजी सोमनाथ** सरसुभेदार ठेविले. हुजूर वाटणीहि दिली. टकापैका लोकांस बहूत पावला. खुशाल राहिले.

७१. औरंगजेबाचा कैद करण्याचा विचित्र हुकूम.

मग शाहाजादियानें दिल्लीस पादशाहास खबर लिहून पाठविली.

त्यावरि **पादशाहास** कळतांच बहूत खुशाल जाला. आपला देश सुखरूप राहिला हा संतोष पादशाहास जाहाला. असें दोन वर्षे फौज [सुध्दां] **औरंगाबादेस** होते. आणि इकडे **राजास** फुरसत जाहाली. टकापैका मुलखांत मेळविला. कित्येक अदलशाही गड, कोट, देश काबीज केला. शाहाचा व राजियाचा घरोबा बहुत चालिला. परस्परें वस्ताभावा धाडूं लागले. याकरितां **दिलीस औरंगजेबास** शंका उत्पन्न जाली कीं, " **शाहाजादे** व **शिवाजी** एक जाहाले. एखादे वक्तीं फितवा होऊन आपणास दगा करतील. " अशी कल्पना केली कीं, ' आतां या उभयतांत कज्या वाढवावा. ' म्हणून शाहास लिहिलें कीं, ' **शिवाजी** हरामी आहे. त्याचा सरदार **प्रतापराव** व **निराजीपंत** हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यांस पातेजों नये. एकादे वक्तीं **दौलताबादेस** भेद करतील. तरि तुम्हीं त्या दोघांस कैद करणें. त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें. येविषयीं रयात न करणें. ' म्हणून लिहिलें. हें वर्तमान शाहाचा वकील पादशाहाजवळ होता त्यांनीं टाकोटाक इशारतीनें पुढें शाहास पाठविलें कीं, ' येथें मजकूर असा जाहाला असे. तुम्ही हुशार राहाणें. '

७२. शिवाजीचे सरदार परत राजगडास.

असें वर्तमान **पादशाहाजादे** यांनीं **निराजीपंतास** एकांतीं बोलावून हें वर्तमान सांगितलें. आणि वस्त्रें अलंकार देऊन गुप्तरूपें निरोप दिधला कीं, 'तुम्हीं उद्यां रात्रीचे कुल फौजेनिशीं उठून पळून **राजियाकडे** जाणें. तुमची बिशाद राहिली तर पावेल. पायदळ लोक घरोघरीं ठेवणें. मागून वस्तभाव सावकाश नेणें. दोचौ रोजांत पादशाहाचे कागद येतील मग तुम्हांस कैद करावे लागेल. याकरितां अगोदर निघून जाणें ' असें सांगितलें. त्याजवरून **निराजीपंत** येऊन **प्रतापराव** यांस व अवघे लोकांस सांगून, दुसरे दिवशीं तयारी करून रात्रीस फौजेनिशीं निघोन गेले. तेच मजल-दर-मजल **राजियाजवळ** आले. भेटी जाहाली. कित्येक खजिना व चित्रविचित्र वस्त्रें भूषणें घेऊन आले. **राजे** खुशाल जाहाले.

आणि बोलिले कीं, 'दोन वर्षें लष्कराचें पोट भरलें. आणि **शाहाजादा** मित्र जोडला. ही बरी गोष्ट जाहाली. आतां मोंगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला' असें बोलिलें. मग **औरंगाबादेस** [हून] **राजियाची** फौज निघोन गेली.

७३. शिवाजीचे सरदार पळाले. औरंगजेब थक्क.

यावरि आठा दिवशीं **पादशाहाचीं** पत्रें हुजूरचे लेख आले. वर्तमान कळलें. मग शाहा बोलिला कीं, 'मराठे हरामजादे. आठ दिवस अगोदर पळाले. हजीर असते तरि कैद करतों'. असें बोलिलें. आणि **दिलीस** पादशाहास जाब लिहिला कीं, "हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी, परंतु मराठे आठ दिवस अगोदर पळाले. कैद करावयास विलंब नव्हता." म्हणून लिहून पाठविलें. त्याजवरून **पादशाहास** कळोन थक्क जाहाला. मराठे हरीफ बहुत आहेत असें बोलिले. ये जातीचें वर्तमान जालें.

प्रतापरायाची व **राजियाची** भेट जाहाली. पागा सजली. गनिमाची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालवून मोंगलदेश मारून धुंद उठविली.

७४. रांगणा किल्ल्यावरील लढाई. विजापूरकर पराभूत.

मग **रांगणा** किला **राजियाचा** होता त्यास **विजापुराहून रुस्तुमजमा** वजीर सातआठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्तीं गडकरी यानीं थोर भांडण केलें. व **राजियांनीं** लष्कर पाठवून उपराळा करून **रुस्तुमजमा** मारून चालविला. आणि गड राखिला. **रुस्तुमजमा** नामोहरम जाहल्यावर **अबदुल करीम** व [७०] **बलोलखान** वजीर **विजापुराहून** बारा हजार जमाव स्वार घेऊन **रांगणियास** वेढा घातला. गडकरी यांणी बहुत मारामारी केली व **राजियांनींहि** लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. **बेलोलखानाचा** थोर वाखा केला. आणि पाऊस पडला. झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती, घोडे, उंटें मेलीं. लष्कर

---

७० 'व' नको. अबदुल करीम बलोलखान हें एकाचेंच नांव.

सडलें, अशी अवस्था जाहाली. **बेलोलखान** जीव वांचवून पळोन गेला. गड सुखरूप राहिला.

७५. सुरतेची लूट : वणींदिंडोरीची लढाई

पुढें जितकीं शहरें मोंगलाईंत होतीं ते जागां चारपांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावें. तेथें हुशार राहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं, ही तजवीज केली. तों इतक्यांत सुरतेहून पाळती **बहिरजी जासूद** आला कीं, " सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल. " असें सांगितलें. त्याजवरून **राजियानीं** विचार केला, ' लष्कर चाकरी-नफरी काम मनाजोगें होणार नाहीं. याजकरितां, जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें ' असा विचार केला. आणि **मकाजी आनंदराव** म्हणजे महाराज शाहाजी यांचा फरजंद पाळलेला व **वेंकाजी दत्तो** ब्राह्मण मोठे लष्करी नामोशाचे सरदार, हे माहाराजांकडून सेवा सोडून **राजियाकडे** आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि **प्रतापराव सरनोबत** व **वेंकाजी दत्तो** व [**मकाजी**] **आनंदराव** व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असें वीस हजार जमाव लष्कर, तसेंच सात-पांच हजार मावळे लोक निवडक व सरकारकून **मोरोपंत पेशवे** व **निळोपंत** व **अंणाजीपंत** व **दत्ताजीपंत** व **बाळ परभू** चिटणीस असे बरोबर घेतले. **कोळवणांतून** नीट **सुरतेस** पांच गांव, सात गांव एक मजल करून एकाएकीं **सुरतेस** पावले. **सुरतेचे** लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशीं **सुरतेच्या** दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलाचीहि फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहाली. तांब्राकडील लोक बहूत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबीज करून सोनें, रूपें, मोतीं, पोवळें, माणीक, हिरे, पांच, गोमेदराज, वैडूर्य असें नवरत्नें, नाणें, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, असफर्‍या, होन नाणें नाना जातींचे इतक्या जिनसांच्या धोंकटिया भरल्या. कापड, भांडें तांब्याचें

वरकड हान [अन्य] जिन्नस यास हात लाविलाच नाहीं. असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकारांच्या घरांत सांपडले तितके घेतले. आणि **राजियांनीं** विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडीं भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियावरि धोंगटिया मालाच्या घातल्या. पाईच्या लोकांस हमेण्या करून त्यांजजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी करून, वोझीं घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा म्हणून शहर मारून चालिले. ही खबर मोंगलांचे सुभेदार वीस उमराव व **मोहबतखान** व **दाऊदखान** [यांस कळून ते] असे सात गांवची दवड करून, बराबर हजार स्वार, एक एक सुभ्याबराबर, चालून आले. त्यांनीं **राजियास** गांठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. **राजा** खासा घोड्यावर बसून बख्तर घुगी घालून, हातीं पटे चढवून मालमत्ता घोडीं, पाईचे लोक पुढें रवाना करून, आपण दहा हजार स्वारांनिशीं सडे सडे राऊत उभे राहिले. **वणी दिंडोरी** म्हणवून शहर आहे. ते जागां उभे राहून सुभ्याचे लोक आले त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. **मोहबतखान दाऊदखान** यांनीं युद्ध केलें. **राजियांनीं** आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. **प्रतापराव** सरनोबत व **त्र्यंकोजी दत्तो** व **आनंदराव** वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली. आणि मोंगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध जालें. मराठे यांनीं शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीनचार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून आले.

७६. रायबागीण : उंबरखिंड युद्ध

तों पुढें **उदाराम वजीर** मोंगलांचा याचा लेक **जगजीवन**[व] **उदाराम** [याची] बाइल **रायबागीण** असे व सरदार पांच हजार मोंगल घेऊन [७१]उंबरखिंडीस आले. त्यांस मारून चालविलें. **रायबागीण** कोंडली. तिणें दांतीं तृण धरून लेंक राजियाची म्हणून बोलून कौल

७१ 'उंदीरखिंडीस' पाठांतर.

घेतला. मग तीस कौल देऊन अनात [मुक्त] करून सोडिली. आणि माघारे राजे राजगडास आले.

७७. गड बांधणी : कोंकण काबीज

मालमत्ता **सुरतेची** आकार करितां सर्व बिशात [७२]पांच क्रोड होनांची आणली. चार हजार घोडीं आणिलीं तीं पागा केलीं. पागेस खूण चौकटीचा डाग घोड्याचे उजवे टीरीवर देऊन, अशी ओळखण करून, पुढें ज्या ज्या मुलखांत अदलशाही, निजामशाही, गड होते तितके घेतले. कित्येक डोंगर बांके जागेंत होते ते गड बसविले. जागांजागां गांवावरि मुलखांत नूतन गड बसविले. गडाकरितां मुलूख जप्त होतो असें समजून गड बांधिले व **कोंकणांत कल्याण, भिवंडी, राजापूर** पावेतों देश काबीज केला. काबीज करितां करितां जागां जागां पुंड पाळेगार होते व देशमुख होते. त्यांमध्यें जे युद्धास आले त्यांस मारून गर्दीस मेळविले. आणि ज्यांनीं कौल घेतला त्यांस यथायोग्य चालवून रक्षिलें.

७८. बाजी पासलकर काय सावंत युद्ध

रेवदंडा राजपुरी दर्यामध्यें किला निजामशाही आहे. तेथें हबशी किलेदार जागियाचा खावंदच. याचीं पाणियांतील जाहाजें गुराबा चाळीस पन्नास आरमार त्यानें करून मुलूख मारून, पैदा करून जागा जतन आहे. त्याचे लोकांनीं राजियाचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियानें **बाजी पासलकर** यास लष्कर मावळा हजार दोन हजार [दिला]. त्याजवरी **राजपुरीहून** काय सावंत म्हणोन पांच हजार फौजेनिशीं युद्धास आला. मोठें युद्ध होतां रणखंदल जालें. **काय सावंत** खासा व **बाजी पासलकर** महा योद्धा–याच्या मिशा दंडायेवढ्या, यांस पीळ घालून वरि केशांच्या आधारें निंबें दोहींकडे दोन ठेवीत होता, असा शूर मर्द ठेविला–याशीं व त्याशीं खासाखाशीं गाठ पडली. एकास एकानी पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेलें.

---

७२ 'साडे आठ कोट होनांची जागा आनिली' पाठांतर.

७९. पिते शहाजीमहाराज ह्यांचा मृत्यु

इतकियांत **राजियाचे** बाप **शाहाजी माहाराज बेंगरूळीं** होते ते **विजापुराकडे** येत असतां एकाएकीं **चित्रदुर्गांत** विलायतीमध्यें **बोगदरी**[७३] गांवीं घोडियावरून पडून मृत्यु पावले. हें वर्तमान **राजियांस** कळलें. बहुत शोक केला. सर्वहि विधान करून दानधर्म अपार केले. आणि बोलिले कीं, " मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पाहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा ? मागें **अफजलखान** मारिला, व **शास्ताखानास** शास्ती केली, पराभवातें पावविला आणि **मिरजा राजियाची** भेट घेऊन **दिल्लीस** गेलों, पादशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा, शिलेदार, लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचें वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट जाले. समाधानपत्रें आपणांस वरचेवर येत होतीं. तैशींच अलंकार–वस्त्रें पाठवीत होते. याउपरि त्यांमागें आपणांस कोणी आतां वडील नाहीं. " म्हणून मोठा खेद केला. त्याउपरि **मातुश्री** अग्निप्रवेश करीत होती, तिचे मांडीवर बैसून, गळां मिठी घालून, आण घालून राहाविली. " आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाहीं. तूं जाऊं नको. " म्हणून मोठा यत्न करून **राजियांनीं** व सर्व थोर थोर लोकांनीं राहाविली. असें वर्तमान जालें.

८०. शिद्दीचा पराभव : दर्यास पालाण

पुढें **राजियास** **राजपुरीचे** शिद्दी, घरांत जैसा उंदीर तैसा शत्रु, यास कैसें जेर करावें म्हणून तजवीज पडली. तेव्हां **रघुनाथ बलाळ** सबनीस यांनीं आंगें अर्ज केला कीं, आपण शिद्दीवर स्वारी करितों. असें म्हणून सातपांच हजार मावळे *खलक पाईचे घेऊन **राजपुरीवरि** चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरीपावेतों, **तळें, घोसाळें** कुल देश मारून **राजपुरी** पावेतों सरद दरियाकिनारा मोकळा केला. शिद्दीच्या एकदोन फौजा आल्या

---

७३ ' बोदेगिरगांवीं ' पाठांतर. * पूर्वीं ' खकम ' होतें.

त्या मारिल्या. तेव्हां **राजपुरीकडून रघुनाथपंतांशीं** राजकारण करून सला केला. देश थोडाबहुत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून, आणशफत देऊन **रघुनाथपंतांस** भेटीस नेलें. भेट जाहाली. सल्याची बळकटी करून सख्य जालें. **रघुनाथपंतांस** वस्त्रें, घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार **रघुनाथपंत** मृत्यु पावले. त्यानंतर शिद्दीचे शैल तुटलें. यावरि हबशीयांनीं बदल खाऊन देशास उपद्रव करूं लागले. मग **राजियांनीं व्यंकाजी दत्तो** फौजेनिशीं नामजाद रवाना केले. त्यांनीं जाऊन त्याचा मुलूख मारून तलफ केला. मग शिद्दीनें आपले जातीचे हबशी, लष्कर, घोडेस्वार व हशम नामजाद **व्यंकोजी दत्तोवर** रवाना केलें. यांशीं त्यांशीं युद्ध जालें. तीनशें हबशी **व्यंकाजीपंतीं** मारिले. घोडे पाडाव केले. **व्यंकाजीपंतीं** कस्त फार केली. बारा जखमा **व्यंकाजीपंतांस** लागल्या. असा चौका बसवून आलें. शिद्दीनें सल्याचे नातें लाविलें होतें. परंतु **राजियांनीं** सला केलाच नाहीं. तें स्थळ हस्तगत करावें म्हणून **राजियांनीं** जागांजागां डोंगर पाहून गड वसविले, कीं येणेंकडून दर्या जेर आहे. आणि पाणियांतील राजे जेर होतील. असें जाणून कित्येक पाणियांतील डोंगर बांधून दर्यामध्यें गड वसविले. पाणियांतील म्हणजे केवळ जंजिरे असें करून गड जाहाजें मेळवून दर्यास पालाण **राजियांनीं** घातलें. जोंवर पाणियांतील गड असतील तोंवर आपलें नांव चालेल; असा विचार करून अगणित गड जंजिरे जमिनीवर व पाणियांत वसविलें. असें कर्म केलें.

तें स्थळ [राजपुरी] जेर करावें म्हणोन त्याचे देशांत जागांजागां गड कोट नवेच बळावून राहिले. **राजपुरीन**जीक डोंगर बळाविला होता, तो घेऊन, गड बांधून कुल देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं. मग त्याचा इलाज चालेना. पांचसात हजार हशम व सुभे ठेविले, असें केलें. मग **राजपुरीस** मुलूख नाहीं. दाणे कोठून यावें ? त्यास पाणियांतील जाहाजें होतीं. तेणें करून वरकड मुलूख मारून सामान आणून खाऊं लागलें. त्यास **राजियांनीं**

जाहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तरांडीं व तारवें, गलबतें, शिबाडें, गुराबा, पगार अशीं नाना जातींचीं जाहाजें करून दर्यासागर (सारंग) म्हणोन मुसलमान सुभेदार व **मायनाईक** म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जाहाजें एक सुभा, असें आरमार सजलें, त्यास व शिद्दीचे जहाजांत [·स] युद्ध होऊन शिद्दीचीं जाहाजें पाडाव केलीं. युद्ध बहुत जाहालें. दर्यांत तरांडें फिरेना असें जालें. त्यावर हमेषा युद्ध करीत चालले. मग चोरून मारून हबशी सामान नेत होता. **राजियाचीं** जाहाजें जागांजागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज, इंग्रज, किलाताव ऐशा सत्तावीस पादशाहा पाणियांत आहेत, त्यांचीं शहरें **बेदनूर, सौंदे, श्रीरंगपट्टण,** ऐशीं दर्याकिनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागांजागां युद्ध करीत मालमत्ता मेळवून, आपलें पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रीतीनें सातशें जाहाजें पाण्यांतील जालीं. समुद्रामध्येंहि एक लष्कर जालें. हा एक हात* सजिला. पाण्यांतील एक **राजपुरी** निजामशाही उरली. याकरितां अद्याप निजाम-शाहाचें नांव चालतें.

---

* ' बेत ' होतें.

प्रकरण ८ वें

आदिल– व मोगल–शाहीशीं युद्ध

८१. लखम सावंत व बाजी घोरपडे यांचा पराभव

कोंकणांत कुडाळीं लखम सावंत देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमांनिशीं राहात असे. **कुडाळ** म्हणजे आदलशाही, त्यानें **विजापुरास** सांगून पाठविलें कीं, "फौज घोडा राऊत, हशम मेळवून आपण **राजियावरि** चालोन जातों आणि **कोंकण** सोडवितों." म्हणोन सांगोन पाठविलें. त्याजवरून **विजापुरींहून खवासखान** सरलष्कर, मोठा योद्धा, दहा हजार स्वारांनिशीं **कुडाळास** आला. **लखम सावंत** बारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत **राजास** खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्यांजवर घेतलें. **खवासखानास विजापुराहून** मदतीस **बाजी घोरपडे**, दीड हजार, स्वार येत होते. घाट उतरोन कोंकणांत राहिले. त्याजवर **राजियांनीं** लष्कर पाठवून छापा घालून **बाजी घोरपडे** कुल भाऊबंद सहवर्तमान बुडविलें. बाराशें घोडीं पाडाव केलीं. मोठें युद्ध जालें. पुढें **कुडाळावरि खवासखानावरि** जावें, त्यासहि यासारखें बुडवावें, तों त्यांनीं हें वर्तमान ऐकिलें. **बाजी घोरपडे** दीड हजार घोडे समवेत बुडविलें. ही खबर ऐकून, धास्त खाऊन घाटावर पळून गेला. नीट **विजापुरास** पावला. पुढें **लखम सावंतावरि राजियांनीं** नामजादी केली. त्याचीहि फौज कित्येक मारिली. सावरि **लखम सावंत कुडाळ** प्रांत सोडून **फिरंगणांत** बाहेर देशांत पळाला. **कुडाळ** देश **राजियांनीं** काबीज केला. **फिरंगी** यास **राजियाचा** धाक, तेथें त्यास ठेवून घेववेना असें जालें. जागा कोठें नाहीं. तेव्हां **राजियांशीं** राजकारण लावून **पितांबर शेणवी,** मत्स्याहारी ब्राह्मण, म्हणून **कुडाळीं** हेजीब पाठवून दिला. **राजियाचा** कौल घेऊन भेटीस आला. भेट जाली. 'आपण

सावंत–म्हणजे **भोसले** यांचा गोत्रज. आपलें तुम्हीं चालविणें उचित आहे.' असें कित्येक बोलिल्यावरि **राजियांनीं** देशमुखी **कुडाळची** करार करून तनकादाखल साहा हजार होन वेतन करार करून द्यावें असें केलें. वाडा-हुडा बुरजांचा बांधूं नये, **कुडाळीं** राहावें. जमाव करूं नये, असें करून ठेविलें. त्याचे सरदार **राम दळवी** व **तान सावंत** यांस हशमांच्या हजारिया देऊन आपले आलाहिदा चाकर तिथे तीन जागां नामजाद ठेविले. पुनः **लखम सावंताची** व त्यांची भेट होऊं न दिली. असा **कुडाळ** देश काबीज केला.

८२. फोंडा, गोंवे–फिरंगी : कोंकण काबीज

फोंड कोट इदलशाही होता. तेथें **मोहबतखान** राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागां वेढा घालून, सुरंग लावून हुडे बुरुज उडविले. फोंड घेतलें. **मोहबतखानास** कौल देऊन **विजापुरास** जावयास निरोप दिला. तेव्हां **राजियाकडील** सरदार **इभ्रामखान** मुसलमान मोठा धारकरी, लष्करचा हजारी, बरोबरि होता. त्यानें कष्ट मेहनत बहुत केली. **फोंड** घेऊन **कडवाड, शिवेश्वर, मिरज, अंकोलें, कद्रें, सुपें, उडवें** हे कोट कोंकणचे कुल घेऊन, **गोकर्ण–महाबळेश्वर**, वरघाट **सुपें**, येथवर सरद लाविली व गोंवियाचे फिरंगी यांस दबावून त्यांजवळून तोफा नख्त, जडजवाहीर घेऊन, आपलेसें करून, त्यास उदमास कौल देऊन आमद–रफ्ती करावयासि निरोप दिला. असें कुल कोंकण काबीज केलें.

८३. शिवाजीची आरमारी स्वारी

पुढें **बिदनुरीं शिवापा** नाईक जंगम होता. त्याचें शहर **बसनूर** म्हणून थोर नामांकित होतें. दर्याकिनारा, येथें पालती पाठवून पालती आणून वरघाटें जातां मार्ग नाहीं म्हणून पाणियांतील आपलीं जहाजें आणून सिद्ध करून, आपण **राजा खासा** जाहाजांत बसून जाऊन **बसनुरास** एकाएकीं दिवस उगवावयासि गेले. शहरचे लोक बेहुशार होते. एकाएकीं जाहाजांतून उतरले. शहर मारिलें. एक दिवस शहर

लुटून फन्ना केलें. जैसी **सुरत** मारून मालमत्ता आणिली, त्याप्रमाणें **बसनूरची** मत्ता अगणित माल जडजवाहीर कापड जिन्नस घेऊन आपले देशास आले. मत्ता सर्व पाहातां दोन कोटी होनांची आणली.

८४. कारंजें लुटलें, औरंगाबाद मारिलें.

त्याउपरी **कारंजें** मोंगलाईंत मोठें शहर होतें. तेथून पालती आणून खासा **राजियांनीं** लष्कर बराबर घेऊन चालिलें. जातां जातां **औरंगाबादेची** पेठ मारिली. सात गांवची दौड करून जाऊन **कारंजियावरि** तीन दिवस मुक्काम करून, कुल शहरचे वाडे काबीज करून, मत्ता खणती लावून काढली. नक्त, जडजवाहीर, सोनेंरुपें, उंच कापड, असें घेऊन स्वारी करून चालिलें. मोंगलांचे सुभे जागां जागां **दिलेलखान** व **बहादुरखान, एखलासखान** व **बेलोलखान** व **इंद्रमणी** असे उमराव, जागां जागां, कोणी दहा हजार, कोणी बारा हजार असे चौतर्फा चालून आले. त्यांशीं युद्ध करीत भांडत चालिले. मोठेंमोठें झुंझ करून मोंगल मारून, गर्दीस मेळवून, हत्ती, घोडे, उंट, मालमत्ता पाडाव करून आणिली. आणि कुल गनिमाचे वजीर माघारे नामोहरम होऊन गेले. **राजे** आपले फौजेनिशीं सुखरूप देशास आले. पाठीवर **दिलेलखान** बारा हजार स्वारांनिशीं दहाबारा गांवें, अंतरानें **भीमातीर** पावेतों आला. मग **राजे राजगडास** [गेले]. मालमत्ता संख्या पाहातां सात कोटींचा आकार जाला.

८५. रायगड राजधानी बांधकामें

पुढें **रायरीगड** अदलशाही होता तो घेतला. **राजा** खासा जाऊन पाहातां गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच. पर्जन्य काळीं कडियावरी गवत उगवत नाहीं. आणि धोंडा तासींव, एकच आहे, [असा चखोट]. **दौलताबादाहि** पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणीं गड उंच. असें देखोन बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले, 'तक्तास जागा गड हाच करावा.' असें

करारीं करून तेच गडीं घर, वाडे, माडिया, सद्रा, चौसोपे आणि अठरा कारखाने यांस वेगळाले महाल व राणियांस महाल तैशींच सरकारकुनास वेगळीं घरें व बाजार, पंच हजारियांस वेगळीं घरें व मातबर लोकांस घरें व गजशाळा व अश्वशाळा व उष्टरखाने, पालखी महाल व वहिलीमहाल, कोठी, थटी महाल चुनेगच्ची चिरेबंदी बांधिले.

८६. राजाराम जन्म : कोळवण काबीज

राजियास प्रथम स्त्री **संभाजीराजियाची** माता होती, ती निवर्तली. त्याजवरी **राजियांनीं** साहा स्त्रिया केल्या. त्यांमध्यें **मोहित्यांची** कन्या **सोईराबाई** गरोदर होती. तीस पुत्र जाहला. तो पालथा उपजला. **राजियास** वर्तमान सांगितलें. राजे म्हणूं लागले कीं, '**दिल्लीची** पातशाही पालथी घालील' असें बोलिले. मग ज्योतिषी म्हणों लागले कीं, 'थोर राजा होईल **शिवाजीराजियाहून** विशेष कीर्ति होईल.' असें भविष्य केलें. मग **राजियांनीं राजाराम** म्हणोन नांव ठेविलें. आणि बोलिले कीं, '**राजाराम** प्रजा सुखी राखील. आपणांपेक्षां याचा पराक्रम होईल, नांवाची कीर्ति बहुत होईल. आपलें नांव रक्षील तर एवढाच रक्षील.' असें बोलिलें. आणि दानधर्म बहुत केला.

पुढें **मोरोपंत पेशवे** यांनीं **त्रिंबकगडापासून सालेरी** किल्यापावेतों किले कित्येक घेतले. कितीएक नवे वसविले. असे चाळीस गड नवे कदीम त्याणीं घेतले. **कोळवण** काबीज केलें. **रामनगर** व **जवाहीर** हा देश घेतला. त्या देशांतहि गड वसविले; अशी ख्यात केली.

८७. सालेरी युद्ध सुरू व कणेरा गडीं रामाजी पांगेराचा पराक्रम

हें वर्तमान **दिल्लीस** पातशाहास सर्वहि कळलें कीं, **सुरत** मारिली, **बसनूर** मारिलें, **बराणपूर, औरंगाबाद** मारिली. **सालेरी आदिकरून** सर्व किले घेतले. **खानदेश, बागलाण, गुजरात, वऱ्हाड देश** बांधीत चालिले. असें ऐकून बहूत कष्टी होऊन बोलिले कीं, 'काय इलाज करावा? लाख लाख घोड्यांचे सुभे रवाना केले ते बुडविले. नामोहरम

होऊन आले. आतां कोण पाठवावें? **शाहाजादे** पाठवावे तरी तिकडेच फितवियांत मिळून **दिल्लीच** घेतील. याकरितां कोणी पाठवावयास दिसत नाहीं. याउपरी आपण **खासा** कंबरबस्ती करून **शिवाजीवर** जावें, तर, **शास्ताखानाचा** न्याय जालियास काय करावें? याकरितां शिवाजी जोंवर जिवंत, तोंवर दिल्ली आपण सोडीत नाहीं.' असा विचार केला. आणि **इखलासखान** म्हणजे केवळ शूर व **बेलोलखान** यास बोलावून आणून वीस हजार स्वारांनिशीं **सालेरीस** रवाना केलें. **सालेरी** घेऊन फस्त करणें. तसें **दिलेलखान** यांस दहा हजार स्वारांनिशीं **अहिवंत** [किल्ल्यावर] रवाना केलें. **दिलेलखान** येऊन **रवळाजवळयास** लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध जालें. गड हातास आला नाहीं. **मोरोपंत पेशवे यांनीं** उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. **रामाजी पांगेरा** म्हणून हशमांचा हजारी [त्यानें] हजार लोकांनिशीं **कणेरागड** आहे त्याखालें **दिलेल-खानाशीं** युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून **दिलेलखान**, यानें फौजेनिशीं चालून घेतलें. **रामाजी पांगेरे** यांनीं आपले लोकांत निवड करून निदान करावयाचे आपले सोबती असतील ते उभे राहाणें, म्हणून निवड करितां सातशें माणूस उभे राहिले. ततकियांनीं निदान करून भांडण दिधलें. **दिलेलखान** याची फौज [इनें] पायउतारा होऊन चालून घेतलें. चौफेरां मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी जैसी शिम-ग्याची दणाणते तैसें मावळे भांडिले. **दिलेलखानाचे** बाराशें पठाण रणास आणिले. मग सातशें माणूस व **रामाजी पांगेरा** सर्वहि उघडे बोडके होऊन, एकएकास वीस वीस तीस तीस जखमा तिराच्या, बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युद्ध जालें. मग **दिलेलखान** यांनीं तोंडांत आंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें.

८८. सालेरगडचें युद्ध : मोंगल पराभूत

त्याजवर **इखलासखान** नबाब यांणीं येऊन **सालेरीस** वेढा घातला.

आणि गडाखालें उतरला. हें वर्तमान **राजियास** कळोन राजियांनीं **प्रतापराव** सरनोबत लष्कर देऊन मोंगलाईत पाठविले होते, त्यांस पत्रें व जासूद पाठविले कीं, 'तुम्ही लष्कर घेऊन सिताबीनें वरघाटें **साले-रीस** जाऊन, **बेलोलखानावरि** छापा घालून **बेलोलखान** मारून चालविणें. आणि **कोंकणांतून मोरोपंत पेशवे** यांस हशमांनिशीं रवाना केले. हे इकडून येतील आणि तुम्हीं वरघाटीं येणें. असें दुतर्फा चालून घेऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणें.' अशीं पत्रें पाठविलीं. त्यावरून **प्रतापराव लष्कर** घेऊन वरघाटें आले. **मोरोपंत** पेशवे **कोंकणांतून** आले. उभयतां **सालेरीस** पावले. एकतर्फेनें लष्करानीं घोडीं घातलीं. एक तर्फेनें मावळे लोक शिरले. आणि मारामारी केली. मोठें युद्ध जाहालें. चार प्रहर दिवस युद्ध जाहलें; मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटें, आराबा घालून युद्ध जाहालें. युद्ध होतांच पृथ्वीचा धुराला असा उडाला कीं, तीन कोश औरसचौरस आपलें व परकें माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहाले. घोडीं, उंट, हत्ती [यांस] गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहाले त्यामध्यें रुतों लागलें. असा कर्दम जाहाला. मारतां मारतां घोडे जिवंत उरले नाहींत. जे जिवंत सांपडले ते साहा हजार घोडे **राजियाकडे** गणतीस लागले. सवाशें हत्ती सांपडले. साहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता खजिना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाईत, हातास लागली. बेबीस वजीर नामांकित धरले. खासा **इखलासखान** व **बेलोलखान** पाडाव जाले, ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडे सडे पळाले. असें युद्ध जालें. त्या युद्धांत **प्रतापराव सरनोबत**, व **आनंदराव** व **व्यंकाजी दत्तो**, व **रूपाजी भोसले** व **सूर्यराव काकडे**, **शिदोजी निंबाळकर** व **खंडोजी जगताप** व **गोंदजी जगताप**, व **संताजी जगताप** व **मानाजी मोरे** व **विसाजी बलाळ**, **मोरो नागनाथ**[७४] व **मुकुंद बलाळ**, वरकड बाजे वजीर, उमराव असे यांणीं

---

७४ 'रंगनाथ' प्रतापगड प्रत.

कस्त केली. तसेंच मावळे लोक यांणीं व सरदारांनीं कस्त केली. मुख्य **मोरोपंत** पेशवे व **प्रतापराव** सरनौबत या उभयतांनीं आंगीजणी केली. आणि युद्ध करितां **सूर्यराव काकडे** पंचहजारी मोठा लष्करी धारकरी, याणें युद्ध थोर केलें. ते समयीं जंबुरियाचा गोळा लागून पडला. **सूर्यराव** म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारती जैसा कर्ण योद्धा त्याच प्रतिमेचा, असा शूर पडला. वरकडहि नामांकित शूर पडले. असें युद्ध होऊन फत्ते जाहाली.

हें वर्तमान **प्रतापराव** यांणीं, **मोरोपंत** पेशवे यांणीं **राजियास** पत्रें लिहून जासूद पाठविले. **राजियांनीं** खबर ऐकून बहुत खुशाल जाले. तोफा मारल्या. साखरा वाटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांच्या हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. आणि **प्रतापराव सरनोबत** व **मोरोपंत** पेशवे, **आनंदराव, व्यंकाजीपंत,** यांस बक्षिस अपार द्रव्य दिलें. सरदार हजारी, पंचहजारी लष्करचे मावळे त्यांस बक्षिसें दिधलीं. नांवाजिलें. वजीर जे पाडाव जाले त्यांस वस्त्रें अश्व देऊन सोडणें म्हणोन हुकूम पाठविला. त्यावरून पेशवे व सरनोबत [व] सरदार खुशाल जाहाले. **बेलोलखान** व नबाब व वजीर पाडाव जाले त्यांस वस्त्रें व अश्व देऊन सोडिलें. **दिलेलखान** सालेरीहून चार मजलींवर होता. त्याणें ही खबर ऐकून माघारा पळोन गेला.

८९. बहादुरखान पेंडीचें गुरूं

ही खबर **दिल्लीस** पातशहास कळून बहुत दिलगीर झाले. तीन दिवस बाहेर आले नाहींत. आमखास [मध्यें] तीन दिवस आले नाहींत. असे कष्टी जाले. ‘ खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून **शिवाजीसच** दिधली असें वाटतें. आतां **शिवाजी** अगोदर आपणांस मृत्यु येईल तरी बरें, आतां शिवाजीची चिंता जिवीं सोसवत नाहीं ’ असें बोलले. मग **बहादूरकोका** पातशहाचा दूधभाऊ, याणें येऊन पातशहाचें समाधान केलें कीं, ‘ तुम्ही **दिल्लीची** पातशाई खुशाल

करणें. आपण **शिवाजीवरी** जातों. त्यास हालखुद ठेवितों. त्याचें लष्कर पातशाही मुलखांत न ये असें करितों. नाना हुन्नर करून त्यास जेर करितों. पातशहांनीं फिकीर न करावी.' असें समाधान करून, पातशाहास आणून तख्तावर बसविलें. **बहादूरखानास** नांवाजून वस्त्रें अलंकार, आपले गळ्यांतील पदक व शिरची कलगी जडावाची, दोन हत्ती व घोडे असें देऊन दौलत जाफा दिधली आणि समागमें सत्तर हजार स्वार दिले. हारोलीस **दिलेलखानास** हुकूम करून दिल्हा. येणेप्रमाणें फौज दक्षिणेस **राजियावर** पाठविली. ती मजल दरमजल **दिल्लीहून** चालिली. **राजियास** ही खबर बातमी दिल्लीहून आली. राजे बोलिले कीं, "**बहादुरखान** पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे ? त्यास आपले मुलकांत यावयास दोन वर्षें लागतील !" असें बोलिले.

प्रकरण ९ वें

आदिलशाहीशीं युद्ध

९०. पन्हाळा रायबाग घेणें : कारभार व्यवस्था

मग **अणणाजी दत्तो सुरनीस** यांनीं **माल सावंत**, मावळे यांचा हजारी, यांस सांगून हल्ला करून **पन्हाळा** किल्ला अदलशाही होता तो घेतला. व **सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, परळी** असे किले घेतले. राजा खासा किल्ले देश पाहावयास रायरीहून निघोन आले. **वांईचा** कोट [७५]येतांच घेतला; तसाच कोट **कऱ्हाडचा** घेतला. **सिरोळ, कोल्हापूर** हे कोट घेतले. **हुकेरी रायबागपर्यंत** देश घेतला.

मुलूख चौतर्फा सुटला. मुलकांत आटोप कैसा होय ? तेव्हां

(१) **मोरोपंत पेशव्यांचा** हवाला **कल्याणभिवंडीपासून** देखील **कोळवण सालेरीपर्यंत वरघाट** व **कोंकण**, त्यांचे स्वाधीन देश केला. **लोहगड** व **जुन्नर** देखील बारा मावळें, [७६]**हाराळयाचे** घाटापासून **पेशव्याचा** हवाला केला.

(२) **अंणाजी दतोचे** स्वाधीन **चेऊलपासून**[७७] **दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपलपर्यंत** कोंकण **अंणाजी सुरनीस** याचे स्वाधीन केलें.

(३) वरघाट **वांईपासून कोपल तुंगभद्रा** पावतों देश नेमून **दत्ताजीपंत** वाकनीस याचे स्वाधीन केला. **दत्ताजीपंतास** पन्हाळा ठेविलें. असा **देश तीन सरकारकुनांच्या** हवालां केला.

याखेरीज मोंगलाई देश येथें सुभेदार ब्राह्मण सात पांच ठेविले. तेहि

---

७५ 'येतां येतां' म. प्रत.

७६ 'हेळूच्या' म. प्रत. 'देवाळ्याचें' सा. प्रत.

७७ 'चौक दाभोलसुभा, राजपुरी, कुडाळदेश, बांदे, खारें व अंकोला' म. प्रत.

पेशव्यांचे आज्ञेंत ठेविले. गडकोट किले येथें सरकारकुनांनीं परामर्ष करावा. परंतु किल्लेदार कारकून लोक जे ठेवणें ते **राजियांनीं** आपले नजरगुजर करून ठेवावे. कामाचा माणूस पाहून तैनात जाजती हशमांस करणें ती सरकारकुनांनीं करावी. ये जातीनें तह केला. सरकारकुनांचे मुतालीक **राजिया**जवळ असावे. वर्षास हिशेब मुलकाचा व रसद घेऊन सरकारकुनांनीं **राजदर्शनास** यावें. येणेप्रमाणें कारभार करीत चालले.

९१. बेलोलखान पराभूत : प्रतापराव याचा पराक्रम व मृत्यु

पुढें **विजापुराहून अबदुल करीम बेलोलखान** बारा हजार स्वारांनिशीं इकडे चाल करून आला. तो फौजेनिशीं हिकडे चालिला. ही खबर **राजियास** कळोन कुल लष्कर **प्रतापराव** यास हुकूम करून आणविलें. आणि हुकूम केला कीं, ‘ **विजापूरचा बेलोलखान** येवढा वळवळ[७८] बहुत करीत आहे त्यास मारून फत्ते करणें. ’ म्हणोन आज्ञा करून लष्कर नबाबावरि रवाना केलें. त्यांनीं जाऊन **उंबराणीस** नबाबास गांठिलें. चौतर्फा **राजियाचे** फौजेनें कोंडून उभा केला. पाणी नाहीं. असा जेर केला. युद्धहि थोर जाहालें. इतक्यांत अस्तमानहि जाला. मग निदान करून नबाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला. त्याजवरि **प्रतापराव** सरनौबत यास आंतस्त कळविलें कीं, ‘ आपण तुम्हावरि येत नाहीं. पादशाहाचे हुकमानें आलों. याउपरी आपण तुमचा आहें. हरएक वक्तीं आपण **राजियाचा** दावा न करीं. ’ असें कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सला केला. मग राजियाचें लष्कर निघोन गेलें. **राजियास** खबर कळून लष्करास ताकीद करून फजित केलें कीं, ‘ सला काय निमित्य केला. ’ असे रागास आले. पुढें **प्रतापराव** फौजेनिशीं मोंगलाईंत **भागानगरचा** देश, **देवगड**, **रामगिरी**, बाजे देश मारून लुटून माघारे आले.

तों राजियाजवळ **निळो सोनदेव** मजमदार होते, त्यांस एकाएकीं मृत्यु जाहाला, त्यांची मजमदारी त्यांचे पुत्रास सांगावी असें केलें. ‘त्यांस

७८ ‘ चळवळ ’ प्रतापगड प्रत.

वडील पुत्र **नारोपंत** होते ते कांहीं शाहाणे नाहींत. **रामचंद्रपंत** धाकटे पुत्र, तो शाहाणा. **राजियाचा** लोभ फार.' कीं हा मोठा शाहाणा, दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षां लक्षगुणीं थोर होईल. असें म्हणून **नारोपंतास** मजुमदारी मात्र सांगून हुद्दा चालविला.

त्याजवरि मागती **विजापुराहून बेलोलखान** पन्हाळे प्रांतास **पादशाहांनीं** रवाना केला. तो सदर प्रांतांत आला. त्याजवरि **राजियांस** कळलें कीं, **बेलोलखान** मागती आला आहे. मग **राजे** म्हणूं लागले 'हा घडोघडीं येतो.' याकरितां मागती **प्रतापराव** यांस पाठविलें कीं, "तुम्हीं लष्कर घेऊन, **बेलोलखान** येतो यांशीं गांठ घालून, बुडवून फत्ते करणें. नाहीं तर तोंड न दाखविणें." ऐसें **प्रतापराव** यांस निक्षून सांगून पाठविलें. त्यावरि **प्रतापराव** जाऊन **बेलोलखानाशीं** गांठलें. **जेसरीवरी** नबाब आला. त्यानें गांठिलें. मोठें युद्ध जालें. अवकाल होऊन **प्रतापराव** सरनोबत तरवारीचे वारानें ठार जाले. रण बहुत पडिलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. त्याजवर **बेलोलखान** विजापुरास गेला. आणि **राजियाचें** लष्कर **पन्हाळ्याखालें** आलें.

९२. हंबीरराव मोहिते : संपगांव लूट

प्रतापराव पडले, ही खबर **राजियांनीं** ऐकून बहूत कष्टी जाले. आणि बोलिले कीं, 'आज एक बाजू पडली !' **प्रतापराव** यास आपण लेहून पाठविलें कीं, "फत्ते न करितां तोंड दाखवूं नये. त्यासारिखें करून बरें म्हणविलें. आतां लष्करचा बंद कैसा होतो ? सरनौबत कोण करावा ?" अशी तजवीज करून, आपण खासा* लष्करांत येऊन, लष्कर घेऊन कोंकणांत **चिपळून** जागा **परशुरामाचें** क्षेत्र आहे, तेथें येऊन राहिले. मग लष्कराची पाहाणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकांस खजिना फोडून वांटणी केली. आणि सरनोबतीस माणूस पाहतां **हसाजी मोहिते** म्हणून पागेमध्यें जुमला होता, बरा शाहाणा, मर्दाना, सबुरीचा,

* 'स्वस्थ' पूर्वी होतें.

चौकस, शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास '**हंबीरराव**' नांव किताबती देऊन सरनोबती सांगितली, कुल लष्करचा गाहा करून **हंबीरराव** यांचे ताबीज[७९] दिधलें. आणि फौज [सुद्धां] **वरघांटीं** रवाना केला.

त्यानंतर **शाहाजी** राजे पडले. **विजापूरचे** पादशाहानी त्यांची दौलत त्यांचे धाकटे पुत्र **व्यंकाजी राजे** होते त्यांस दिधली. **नारो दीक्षित** कुलकारभारी महाराजांचे होते, ते मृत्यु पावले. त्यांचे पोटीं **रघुनाथ नारायण** व **जनार्दन नारायण** हे दोघे बंधु सर्व विद्येनें निपुण व राजकारणी, बुद्धिवंत, चतुर, शाहाणे होते. त्यांचा व **व्यंकाजी राजियाचा** बनाव बसेना. मग ते उभयतां बंधु त्याजवळून निघून राजियाकडे आले. येतांच **रघुनाथपंत** व **जनार्दनपंत** व **बाळकृष्ण** चुलत भाऊ व **बाळकृष्णपंतांचे** पुत्र **कमळाजीपंत** व **जनार्दनपंताचे** पोटीं **गंगाधरपंत** म्हणोन सुबुद्ध जाहाले. असे पांचजण व घरचीं माणसें, घोडीं व हत्ती असें सामान बायकांसहवर्तमान **राजियांकडे** आले. हें वर्तमान **राजियांस** कळतांच **राजे** सामोरे जाऊन भेट घेतली. वरकडहि सरकारकून जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांस सर्वांस मिळून, देखील घोडीं, चाळीस हाजार होन तैनात सालिना करून, तनखे वराता देऊन, सरकारकुनांमध्यें श्रेष्ठत्व गौरवें देऊन, त्यांचें चालवून ठेवून घेतलें.

हंबीरराव लष्कर घेऊन **संपगावास** गेले. इतकियांत **विजापूरचा** सरदार, **हुसेनखान मायाणा** पठाण मोठा तोलदार, पांच हजार पठाण, तिरंदाज, बरचीवाले, आडहत्यारी असे पंचरूढ; तसे बहिले, बंदुकी, तोफखाना असा होता. **हुसेनखान** म्हणजे जैसा नबाब **बेलोलखान** याच्या जोडीचा सरदार. तो **हंबीरराव** याजवर चालून आला. मराठे म्हणजे मोठे हरीफ, त्यांनीं शर्त करून भांडण दिधलें. नीट [ग?] चडते घोडीं घालून मारामारी केली, **हुसेनखानाचे** कित्येक लोक मारिले. व घोडीं मारिलीं व हत्ती रणास आणिले. मोठें युद्ध बळकट दोन प्रहर

---

७९ 'स्वाधीन केलें' म. प्रत.

दिवसापासून चार प्रहर रात्रपर्यंत जालें. साहा प्रहरांत कुल फौज बुडविली. **हुसेनखान** खासा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले. तसे उंट व बाजे जिन्नस, बिछाईत, खजिना व कापड बेमुहिन[८०] सांपडलें. मोठें झुंज करून फत्ते केली. रण दुतर्फा अपार पडलें.

९३. किले कोपल, रायदुर्ग काबीज, हंबीरराव व बहादुरखान

यानंतर फत्तेची बखर [लिहून] **राजियाकडे** जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं. त्यांनीं जाऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे बहूत संतोष पावून खुशाल जाले. **हुसेनखानाचा** भाऊ किले कोपल येथें होता त्याशीं राजकारण **मोरोपंत** पेशवे यांनीं केलें. आणि **कोपल** घेतले. **कोपल** म्हणजे दक्षणचा दरवाजा, तक्ताची जागा, असा किल्ला घेतला. मोठें स्थळ प्राप्त जाहालें. **कोपल** म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. **तुंगभद्रा** पावेतों देश हस्तगत जाहाला. [८१]**कोपला**–करितां **कनकगिरी हरपनहल्ली, रायदुर्ग** व **चित्रदुर्ग** व **विद्यानगर** [८२]**बुंदी कोट** बाजे पाळेगार [रुजू] जाले. असें कार्य जालें.

यानंतर पुढें **दिल्लीहून, बहादुरखान** देखील हरोल **दिलेलखान,** हे फौजेनिशीं **अहमदनगरास** येऊन राहिले. हें वर्तमान **राजियास** कळलियावर राजियांनीं गड-कोट-किले यांस खबर केली आणि मजबुतीनें राहिले. मग जासूदपत्रें नबाब **बहादुरखान** यांजकडे गुप्तरूपें पाठविलीं. ‘[८३]हरद्र सोधावें. पुढें तजवीज करणें ती करावी.’ असें केलें. आणि **राजियांनीं** आपले लष्करास हुकूम करून, **हंबीरराव** सरनौबत फौज घेऊन मोंगलाईंत शिरले. **खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद,**

---

८० ‘बेमुचलक’ सा. प्रत.

८१ ‘कोपल हस्तगत करितां’ सा. प्रत.

८२ ‘चुडीकोट’ सा. प्रत.

८३ ‘इरिद्र घ्यावें’ सा. प्रत.

बऱ्हाणपूर, **वऱ्हाड**, **माहूर**, **वरकड** देश **नर्मदापावेतों**, देखील **जालनापूर**, या देशांत स्वारी करून, मुलूख मारून, खंडणी करून जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तों **बहादुरखान** यांनीं कुल जमाव घेऊन **हंबीररायाचे** पाठीवर चालून आले, **राजियाची** फौज तोलदार गांठली. मोंगल बहुत धास्तीनें घाबिरा होऊन सातआठ गांवचे अंतरानें चालिला. **दिलेलखान** उतावळा होऊन फौजेशीं गांठ घातली. **हंबीरराव** यांनीं नजरेंत धरला नाहीं. तोलदारीनें मत्ता घेऊन आपले देशास आले. मालमत्ता **राजियास** दिली.

प्रकरण १० वें

शिवाजीराजे यांस राज्याभिषेक

३४. राज्याभिषेक

पुढें वेदमूर्ति राजेश्री **गागाभट** म्हणून **वाराणशीहून राजियाची** कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसांवी, थोर पंडित, चार वेद–साहा शास्त्रें–योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगीचा ब्रह्मदेव असे पंडित, त्यांस **राजे** व सरकारकून सामोरे जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन, द्रव्यहि उदंड देऊन पुजिलें. **गागाभट** बहूत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांचे मतें, मुसलमान बादशहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि **शिवाजीराजे** यांनींहि चार पादशाही दबाविल्या. आणि पाऊण लाख घोडा लष्कर गडकोट असें [मेळविलें] असतां त्यांस तक्त नाहीं. याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि [तें] **राजियांसहि** मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करतां सर्वांचे मनास आलें. तेव्हां भट गोसांवी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें. तेव्हां **राजियाचे** वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्री, शिसोदे उत्तरेहून दाक्षिणेस एक घराणें आलें. तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षात्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणें व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसांवी यांनीं **राजियाचा** क्षेत्री व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रीय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला. कुल आपले देशांतून परदेशांतून [८४]पन्नास सहस्र वैदिक ब्राह्मण थोरथोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वहि समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें. [म्हणून] तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें,

---

८४ ‘पन्नास सहस्र’ हे शब्द प्र. प्रतींत मात्र आहेत.

सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यांमध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें. **रायरीचें** नांव **रायगड** म्हणोन ठेविलें. तक्तास स्थल तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थक्षेत्र नामांकित, तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्टप्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून, सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. **शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुद्ध** [८५]**१३ स मुहूर्त** पाहिला. ते दिवशीं **राजियांनीं** मंगलस्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामि उपाध्ये **प्रभाकर भटाचे** पुत्र **बाळंभट** कुलगुरु व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन [केली.] सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर बसले. अष्टप्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्णकलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडश महादाने इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या [८६]स्थानीं अष्टप्रधानांनीं उभे राहावें. पूर्वीं कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं कलयुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले. त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वहि साहित्य सिद्ध केलें. अष्टखांबीं अष्टप्रधान उभे राहिले. त्यांचीं नांवें बितपशील :—

अष्टप्रधान

१ **मोरोपंत, त्रिंबकपंताचे** पुत्र, पेशवे, **मुख्य प्रधान**	१ **हंबीरराव मोहिते सेनापती**

८५ मिती प्रतापगड प्रत देत नाहीं; महाड प्रत देते.

८६ ‘ स्तंभीं ’ म. प्रत.

१ **नारो नीळकंठ** व **रामचंद्र नीळकंठ** मुजुमदार यांचें नांव **अमात्य.**

१ [८८]**अंणाजीपंत** सुरनीस, यांचें नांव **सचिव.**

१ **दत्ताजी त्रिंबक** वाकनीस यांचें नांव **मंत्री.**

१ **त्रिंबकजी** [८७]**सोनदेव** डबीर यांचे पुत्र **रामचंद्रपंत सुमंत**

१ [८९]**रावजी** पंडितराव होते त्यांचे पुत्रास रायजीराज [१]

१ **निराजी रावजी** यांस **न्यायाधिशी.**

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्टप्रधानांचीं नांवें ठेविलीं ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. **बाळ प्रभु** चिटनीस व **नीळ प्रभु** पारसनीस वरकड अष्टप्रधानांचे मुतालीक व हुजरे प्रतिष्ठित सर्वहि यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वहि उभे राहिले. छत्र जडावाचें, मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. **छत्रपती** असें नांव चालविलें. कागदीं-पत्रीं स्वस्ति श्री [राज्याभिषेक] शक, सिंहासनावर बसले त्या दिवसा-पासून नियत चालविला. पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. यावेगळें तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नाना जाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. **गागाभट** मुख्य अध्वर्यु, त्यांस अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन जाले. अष्टप्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्याखेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार असें देणें दिलें. येणेंप्रमाणें **राजे** सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. **मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला** ही गोष्ट कांहीं सामान्य जाली नाहीं.

---

८७ 'त्रिंबक सानदेव होते त्यांचे पुत्र रामचंद्रपंत डबीर' प्र. प्रत.

८८ 'अनाजी दतो' म. प्रत.

८९ 'रघुनाथराव पंडितराव त्यांचे पुत्र दानाध्यक्ष' म. व प्र. प्रत.

प्रकरण ११ वें

" उभयता छत्रपती " भेट

९५. सर्व पातशाहांनीं दुःखाचे पर्वत मानिले

हीं वर्तमानें **बहादुरखान** कोका यासि कळलीं. त्यानें पुढें **पेडगांव** भीमातीर येथें येऊन छावण्या केल्या. आणि **दिल्लीस** पातशाहास हें वर्तमान सिंहासनाचें लिहिलें. पातशाहास कळून तक्तावरून उतरून अंतःपुरांत गेले. आणि दोन्ही हात भुईस घांसून, आपले देवाचें नांव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्नउदक घेतलें नाहीं. आणि बोलिले कीं, 'खुदानें मुसलमानाची पादशाई दूर करून, तक्त बुडवून मराठियास तक्त दिलें. आतां हद्द जाली !' असो. बहुत खेद दुःखाचे पर्वत मानिले. मग मोठे मोठे वजिरांनीं नानाप्रकारें समाधान करून, आणाखुणा घालून तक्तावर बसविलें. ऐसेंच **विजापूरचे** पातशाहास व **भागापूरचे** पातशाहास वरकड सर्वांस वर्तमानें कळून खेद जाहाला. **रूमशाम, इराण, तुराण,** व दर्यांतील पातशाहांस खबर कळून मनांत खेद करूं लागले. खेद करून आशंका मानिली. ये जातीचें वर्तमान जाहालें.

९६. छत्रपती शिवरायांच्या भेटीचें कुतबशाहांशीं बोलणें.

पुढें **राजे** तक्तीं बसून राज्यभार करूं लागले. निजामशाही देश काबीज केला व मोगलाईहि जप्त केली. **भागानगरच्या** पादशाहांनीं राजे यांशीं सला करून **निराजीपंताचे** पुत्र **प्रल्हादपंत** मोठे बुद्धिवंत यांस हेजिबीस ठेवून घेऊन करभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळीं राज्यें होतीं तीं घेतलीं. कितीएकांनीं करभार देऊन अंकित होऊन राहिले. **तुंगभद्र** देशापासून **कावेरीपर्यंत** कर्नाटक साधावें, हा हेत मनांत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावें, तरि दिवसगतीवर पडतें. म्हणून खुद्द **राजियांनीं** आपण जावें असें केलें. त्यास **पेडगांवीं बहादुरखान** गनीम पाठीवर येईल म्हणून **निराजीपंत** न्यायाधीश पाठविले.

कित्येक द्रव्य अलंकार [भूषणें] रत्नखचित पाठविलीं. " त्यास अंतरंगें सख्य [करून] एक वर्षपर्यंत आपणांस **कर्नाटक** साधावयास लागेल. तुम्हीं राज्यास उपद्रव न करणें." असें त्यास सांगून ठायीं ठेविलें. आणि कर्नाटकास जावयास समागमें निवडून पागेपतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून **रघुनाथ नारायण** व **जनार्दन नारायण** हे कर्नाटकचे माहीतगार यांस बरोबर घेतले. वरकड पेशवे व सुरनीस व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें. आणि विचार केला कीं, **कर्नाटक** साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेचूं नये. नूतन मिळवावें. आणि [तें] वेंच करुनु देश साधावा. असा विचार करितां **भागानगरचे** पातशाहींत द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें तरि वर्षास करभार **भागानगर**कर देतात. तेथें निष्ठुरता करूं नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वहि अनुकूल करून देतील. असा विचार करून **भागानगरी प्रल्हादपंत** हेजीब **राजियाचे** होते त्यांसि हें वर्तमान लिहून भेट घ्यावी, हा विचार केला. **तानाशाहा** पातशाहा भागानगरकर यांनीं मनांत बहूत शंका धरिली कीं, ' जैसा **अफजलखान** बुडविला, कीं **शास्ताखान** बुडविला, **दिल्लीस** जाऊन अलमगीर पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावें ? भेट मात्र राजियाची न घ्यावी; जें मागतील तें देऊं.' असें बोलिला. मग पातशाहाशीं व **अकंणापंत** व **मादंणापंत** कारभारी यांशीं **प्रल्हादपंतें** आण, शपथ, क्रिया बहूत दिधल्या. अपाय नाहीं; स्नेहाची भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली.

९६. ' छत्रपती व पातशहा–भागानगरीं भेट '

येणेप्रमाणें **राजियाशीं** घटाई केली. उभयतांच्या भेटी व्हाव्या ऐसा नेम करून मग **राजे** मजल दर मजल लष्कर घेऊन **भागानगरास** चालिले. **भागानगरची** विलायत लागल्यावर ताकीद केली. एक काडी रयतेची तसनस न व्हावी ऐसें केलें. कित्येक गर्दीना मारून जाबता बसविला; आणि

मजलीस जाऊन तेथें खुष-खरेदी सर्व पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. असें जातां पुढें पातशाहास खबर कळून बहूत संतुष्ट जाहाला. पातशाहा पुढें दोन चार गांवें सामोरे यावें असें केलें. **राजा** मोठा साधक, आण घालून पातशाहास सांगून पाठविलें कीं, "तुम्हीं न येणें. आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ, आपण पुढें न यावें" असें सांगून पाठविल्यावरि पातशाहा बहूत संतुष्ट जाहाले. आणि **मादंणापंत** व **अकंणापंत** म्हणजे *दुजा पातशाहा; सर्व पातशाही [मध्यें] धणी; हे उभयतां पुढें येऊन, **राजियास** घेऊन शहरास गेले. राजियांनीं आपले लष्करास कुल जरी सामान केलाच होता. सुमुहूर्त पाहून पातशाहाचे भेटीस नगरामध्यें चालिले. पातशाहांनीं कुल नगर शृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकम-केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणें, पताका, निशाणें नगरांत लाविलीं. नगर–नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनीं मंगळआर्त्या अगणित उजळून **राजियास** वंदिलें. सोनें–रुपियाचीं फुलें राजियावरि [९०]उधळलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्य वस्त्रें अगणित दिलीं. आणि सर्व सैन्यासहित दाद–महालास पावले. पातशाहास 'खालते उतरूं नका, आपण खांसा येतो' म्हणून शफत घालून सांगून पाठविले. पातशाहा महालावरि राहिले. राजियांनीं आपले लष्करचे लोक कंबरबंदी करून [९१]महालाखालीं बसविलें आणि शिडीवरून चालिले. खासा **राजा** व **जनार्दन नारायण** व **प्रल्हादपंत** व **सोनाजी नाईक** दौलतबंकी[९२] व **बाबाजी**[९३] **ढमढेरे** पांच जण चढले. महालांत गेले. पादशाहा पुढें येऊन क्षेम आलिंगन केलें. उभयतां एकासनीं बसले. **मादंणापंत** व **अकंणापंत** व **जनार्दनपंत**, **प्रल्हादपंत**, **सोनाजी नाईक बंकी** व **बाबाजी ढमढेरे** असे होते.

* 'ब ज या' असें प्रथम होतें. दुसरा पातशहाच.

९० 'पुण्यें बलायत दूर केली' म. प्रत.

९१ 'जिन्याखालीं' म. प्रत.

९२ 'सोमाजी नाईक हकीम' म. प्रत.

९३ 'बाजी ढांसरे' म. प्रत.

पादशाहा व **राजे** व **मादंणापंत** त्रिवर्ग बसले; वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय. बोलणें जालें. पातशाहाच्या स्त्रिया झरोकियांतून जाळया[१४] आंतून **राजा** पाहतां बहूत थक्क जहाल्या. पातशाहाहि बहुत खुशाल जाहले. एक प्रहर बसून **राजियाच्या** पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या. कित्येक अलंकार रत्नजडित, व वस्त्रें, हत्ती, घोडे **राजियास** व **राजिया**-कडील लोकांस सर्वांस देऊन निरोप दिला. राजे व पातशाहा महाला-खालीं येऊन राजे आपल्या स्थळास चालिले. महालाखालीं **रघुनाथपंत** व **हंबिरराव** वरकड सरदार लष्कर ठेविले होते, त्यांसहि समागमें घेऊन आपले जागियास आले. मार्गीं येतां नगरलोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावरि पादशाहाचें समाधान जालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें, क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून **प्रल्हादपंतास** कित्येक बक्षिसें पादशहांनीं दिलीं कीं, तुम्ही प्रामाणिक, [असें] म्हणून नांवाजून **राजियाकडे** पाठविलें.

९७. कुतुबशहा शिवाजी राजांचें सहाय मागतो.

दुसरे दिवशीं **मादंणापंतीं** राजियास आपले घरास मेहमानीस नेले. आणि आपले मातोश्रीचे हातीं पाकसिद्ध करून **मादंणापंत** व **अकंणा-पंत** जवळ बसून **राजियांस** भोजन घातलें. आणि अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडीं देऊन स्थळास पोहोंचविलें. पातशाहांनीं **मादंणापंतांस** बोलावून नेऊन विचारलें कीं, '**राजियास** काय पाहिजे तें देऊन राजियास संतुष्ट करून निरोप द्यावा ' असा विचार करून सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले. आणि जडजवाहीर रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरमित दिधले. कुल सरकारकून व **हंबीरराव** व वरकड सरदार वरकड सरदार यांचे मुजरे महालावरि **उभयतां छत्रपती** बैसून, मुजरे घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून, सर्वांस अलंकार, वस्त्रें, हत्ती-घोडे मनुष्य पाहून दिधलें. आणि पातशाहा बोलिले कीं, ' सर्वां प्रसंगीं आपणास

---

१४ हा पाठ म. प्रतींतील. ' जाळपालांतुन ' प्र. प्रत.

तुम्हीं साहाय असावें.' ऐशी बळकटी करून **राजियाची** आणशपथ घेऊन निरोप दिला. 'प्रतिवर्षीं करभार जो देणें तो येणेंप्रमाणें देऊन, **प्रल्हादपंत** नेहमीं आपणाजवळ ठेऊन आपले निजबतीनें आमचेजवळ असो देणें,' ऐसें बोलिलें. राजे आपले स्थळास आले. त्याउपरी **राजियास भागानगरचे** मोठमोठ्या सरदारांनीं मेहमान्या केल्या. ऐसे एक महिनाभर भागानगरीं होते. तेथील द्रव्य वस्तभाव घेऊन **चंदीकडे** सेनासमुदाय घेऊन चालिले.

९८. शिवाजीचें श्रीशैल्यपर्वतगमन व मल्लिकार्जुन-दर्शन.

मग **श्रीशैलास** आले. **नीळगंगेचें** स्नान करून श्रीचें दर्शन जालें. तीर्थविधी जाला, **राजियांनीं** स्थळ देखोन परम आनंद जाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें. [ते] समयीं **श्रीभवानी** अंगांत आविर्भवली आणि बोलली जे 'तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं. हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यहि उदंड तुझे हातें करणें आहे.' असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध जाल्यावरि **राजियास** कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला.

प्रकरण १२ वें

चंदी, व्यंकोजी व संभाजी

९९. चंदी व त्रिमल महाल काबीज.

पुढें **कर्नाटकचा** देश साधावा म्हणोन **चंदीस** वेढा घातला. चंदीमध्यें खानखान विजापूरकरांचा वजीर याचे पुत्र **रुहलखान**[९५] व **नासरीखान** हे उभयतां होते त्यांस राजकारण करून, त्यांस कौल देऊन, बाहेर काढिले, आणि स्थळ साध्य केलें. **त्रिमल**[९६] महाल म्हणून आहे तेथें **शेरखान विजापूरचा** वजीर पांच हजार स्वारांनिशीं होता. पठाण तोलदार, हत्ती सामान द्रव्य अगणित होतें. तो **राजावर** चालून आला. त्याशीं युद्ध करून त्यास बुडविला. जिवंत खासा **शेरखान** धरिला. पांच हजार घोडे व बारा हत्ती पाडाव केले. द्रव्य जवाहीरहि अपार हस्तगत जालें. मोठें युद्ध केलें. असें कर्म करून[९७] **त्रिमल** महाल फत्ते केला.

१०० शिवाजी-व्यंकोजी भेट.

त्या उपरि राजश्री **व्यंकाजी राजे,** धाकटे भाऊ **राजियाचे** यांनीं **चंदावरचें** राज्य साध्य करून [ते] राज्य करीत असत. त्यांनीं आपले कारकून होते ते समागमें घेऊन **राजियाचे** भेटीस आले. भेट बंधुबंधूंची जाली. **एकाजी** राज्याचे कारकून **काकाजीपंत** पेशवे भेटले व **कोन्हेर महादेव** मुजूमदार भेटले. **जगंनाथपंत, व्यंकाजी दत्तोचे** पुत्र, सर्व सैन्य भेटलें. व **भिवजी राजे** व **प्रतापजी राजे** नाटकशाळेचे पुत्र महाराजांचे होते, तेहि भेटले. बहूत संतोष जाला. उभयतां बंधूंची मेहमानी परस्परें जाली. देणेंहि उभयतांनीं उदंड दिलें. आठ दिवस एकत्र

---

९५ ‘ रुद्लखान व नासीर महमद्खान ’ म प्रत. ‘ रूपलखान ’ असें होतें.

९६ ‘ त्रिवादी ’ म. प्रत.

९७ ‘ असें कर्म जालें ’ प्रत. वरील पाठ म. प्रतींतील.

होते. मग **राजियांनीं व्यंकाजी राजे** यांसि प्रश्न केला कीं, "**महाराज** तुमचे आमचे पिते. आपण त्यांजकडून निरोप घेऊन पुण्याकडे जाऊन येवढें राज्य साधिलें. कीर्त केली. ऐशियासि वडिलांचीं बारा बिरदें तुम्हांजवळ आहेत. तीं तुम्ही चालवीतच आहां. ऐशियास आपण वडील पुत्र आणि पराक्रमी, तुम्हाहून पराक्रम विशेष केला. बारा बिरदें मात्र तुम्हांजवळ आहेत तीं आपणांस देणें. आपण चालवूं. नवीं बिरदें करावयाची काय आशंका आहे. परंतु वडिलांचीं हातचीं आहेत तेवढीं आपणाजवळ असावीं म्हणून मागितलीं." त्याजवरून त्यांनीं विकल्प चित्तांत आणून दिलीं नाहींत. त्याजवर **एकाजी** राजे यांच्या कारकुनांनीं व कारभारी यांनीं त्यांचे पोटांत भय घातलें कीं, राजे तुम्हाशीं खटखट करून बिरदें जोरावारीनें घेतील. असें सांगून त्यांस धास्त उत्पन्न करून रात्रीचे वेळेस **वेंकाजीराजे** पळून **चंदावरास** बिरदें घेऊन गेले.

त्यास दुसरे दिवशीं **राजियास** वर्तमान कळलें कीं, **व्यंकाजी राजे** पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, "काय निमित्य पळाले? आम्ही त्यांस धरीत होतों कीं काय? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमचीं बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं कीर्त आपली जाली आहे. तेथें बिरदें काय करावयाचीं? वडलांची वस्त असावी म्हणून मागितली होती. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरी न देणें. उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धिहि धाकटेपणा योग्य केली." असें बोलिले. मग त्यांचे कारकून व सरदार पळत होते ते **राजियाच्या** लोकांस सांपडले. त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियांस वस्त्रें भूषणें, अश्व देऊन, **चंदावरास** बंधुसंनिध पाठविलें. **संताजीराजे** म्हणून महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते **राजियाच्या** भेटीस आले. भेट जाली. त्यांस कर्नाटकांत हजार घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती–घोडे–वस्त्रें देऊन रवाना केले.

१०१. येलूर–कोपल–बलवाड घेऊन शिवाजी पन्हाळयास

आणि **येलूरकोट** यामध्यें इदलशाई ठाणें होतें. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं. असें [पाणी]. उदकांत दाहा हजार सुसरी, कोटाचे फांजियावरून[९८] दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुती. पडकोट तरी चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट. त्या कोटास वेढा घालून कोट घेतला. वरकडाहि जागां जागां गढी कोट घेतले. कित्येक नवे वसविले. असे शंभर कोट त्या प्रांतीं केले. वीस लक्ष होनांचें राज्य साध्य केलें. **चंदी** म्हणजे जैसें **विजापूर,** तैसाच तक्ताचा जागा. येथें **राजियांनीं** राहावें. परंतु इकडेहि राज्य उदंड. त्याचें संरक्षण जालें पाहिजे. याजकरितां **चंदीस रघुनाथ नारायण** ब्राह्मण त्यास मजमू संपूर्ण राज्याची सांगितली, आणि त्यास तो प्रांत स्वाधीन करून **चंदीस** ठेविलें. त्यापाशीं तूर्त फौज असावी म्हणून **हंबीरराव** सेनापती सेनेसहित ठेविले. आणि **राजियांनीं आनंदराव** व **मानाजी मोरे** हे दोघे सरदार फौजेनिशीं बराबर घेऊन चंदीहून निघाले. घाट चढून वरतें आले. **कोल्हार, बाळापूर** हे कोट घेतले. देश काबीज केले. कित्येक गड वसविले. पुंडपाळेगार मारून गर्दीस मिळविले. त्या प्रांतीं **रंगो नारायण** म्हणून कारकून सरसुभेदार ठेविले. तोहि प्रांत **रघुनाथपंताचे** स्वाधीन केला. **कोल्हार** प्रांतें **मानाजी मोरे** सरदार फौजेनिशीं ठेविले. **आनंदराव राजियांनीं** बराबर घेऊन **कोपलास** आलें. तेथून लक्ष्मेश्वरास आले. तेथून मजल-दर-मजल संपगांव प्रांतीं आले. [१००]**बलवाडा** म्हणून कोट होता तेथें देसाईण बायको होती. तिनें राजियाचे लष्करचे कहीकबाडी बैल नेलें. हें वर्तमान **राजियास** कळलें. बलवाडास वेढा घातला. कोट घेऊन **देसाईण** धरिली. तीस शिक्षा केली. मग पुढें **पन्हाळियास** आले. आणि

९८ ‘ सफेली ’ म. प्रत. ९९ ‘ बारा लक्ष ’ म. प्रत

१०० याच्यापुढें ‘ लक्ष्मेश्वरचा किल्ला वेढा घालून घेतला. खानगौडा देसाई यास धरून शिक्षा केली ’ असें म. प्रतींत आहे.

राज्याचाहि परामृष केला. मग राजे आले हें वृत्त सर्वांस कळलें. त्याजवरून **निराजीपंत बहादुरखानाजवळ** ठेविले होते तेहि दर्शनास आले. व खानांनींहि जडजवाहीर, वस्त्रें **राजियास** पाठविलीं.

१०२. ' व्यंकोजीचें राज्य बुडवूं नका. '

त्याउपरीं **कर्नाटकांत हंबीरराव** फौजेनिशीं व **रघुनाथ नारायण** ठेविले होते हें वर्तमान **व्यंकाजी राजे यांस** कळोन राजियांनीं आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली. आणि **हंबीरराव** यावरि चालून आले. ते समयीं **हंबीरराव** याचे चौगुणी घोडा राऊतहशम अगणित **व्यंकाजी-राजे** यांचे होते. मग यांस त्यांस युद्ध जालें. मग **राजियाचा** पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय. **हंबीरराव** यांनीं **व्यंकाजी** राजियाची फौज मोडली. मोठें युद्ध जाहालें. अगणित रण पडलें. आणि **व्यंकाजी राजियाचे** चार हजार घोडे पाडाव केले व हत्ती जडजवाहीर बाजे सरदार **भिवजी राजे** व **प्रतापजी राजे** वरकडहि नामांकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली. यश आलें. आणि पाडाव केले सरदारांस वस्त्रें देऊन सोडिलें. यावरि **रघुनाथपंत** व **हंबीरराव** चालोन **चंदावराकडे** गेले. मग **व्यंकाजी राजे** यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्त घालून 'सख्य करावें' असें जालें. त्याजवर **रघुनाथपंतीं** व **हंबीररायांनीं राजियाकडे** जासूद पत्रें देऊन पाठविले. मग **राजियास** वर्तमान कळोन या उभयतांस उत्तर पाठविलें कीं, " **व्यंकाजी राजे** आपले धाकटे बंधु आहेत. मूलबुद्धि केली. त्यास तोहि आपला भाऊ त्यास रक्षणें. त्याचें राज्य बुडवूं नका." अशीं उत्तरें आलियावरि उभयतांनीं **व्यंकाजी राजे** यांशीं सला केला. आणि द्रव्यहि उदंड घेतलें. मग **रघुनाथपंतीं हंबीरराव** यांस लष्कर सहवर्तमान निरोप देऊन **राजियां-कडे** पाठविलें. आणि **रघुनाथपंत** आपण तिकडे कर्नाटकांत फौज दाहा हजार स्वार पागा व शिलेदार जमा करून तें राज्य रक्षून राहिले.

१०३. शिवाजीची जालनापुरास स्वारी.

हंबीरराव याची व **राजियाची** भेट जाहाली. कित्येक नांवाजिलें,

बक्षिसें दिलीं आणि पुढें खासा **राजियांनीं** अवघें लष्कर घेऊन **जालनापूर**, मोगलाईत, त्यास वेढा घातला. पेठा मारिल्या. शहर लुटून फन्ना केलें. अगणित द्रव्य, सोनेंरुपें, जडजवाहीर, कापड, घोडे, हत्ती, उंटें फस्त केलीं. मोंगलांची[101] फौज [घेऊन] **रणमस्तखान** चालोन आला. युद्ध जालें. **सिदोजी निंबाळकर** राजे यांजकडील [पडला] पांच हजार फौज, तीन दिवस युद्ध केलें. **रणमस्तखान** यासि कैद करून आणिला. त्यासि बुडवावें तो त्याचे कुमकेस **केसरसिंग** व **सरदारखान** व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसांवर राहिलो. मग केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, 'उभयपक्षीं भाऊपणा आहे. आमची गांठ पडली नाहीं तोंवर तुम्हीं कूच करून जाणें.' हें वर्तमान कळतांच **राजे** तेथून निघाले. लष्कर जड, गिरी मार्गानें जावें अशी तजवीज केली. ते समयीं **बहिरजी जासूद** यानें कबूल केलें कीं, ' मोगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें.' तीन रात्रीं खपोन रात्रंदिवस अवकाश न करितां ***पटागड** येथें लष्कर घेऊन आला. राजे **बहिरजी** नायकावर खुशाल झाले. त्याजकडे फाजील होतें तें माफ करून आणखीहि बक्षीस दिलें. तेथून सावकास लष्कर घेऊन राजे **पुरंदरास** आले.

१०४. संभाजी दिलेरखानाकडे जातो व येतो.

इतकियांत **संभाजीराजे राजियाचे** पुत्र ज्येष्ठ **राजियावर** रुसून **मोगलाईत** गेले. ते जाऊन **दिलेलखानास** भेटले. मग त्यांनीं बहूत सन्मान करून चालविलें. पातशाहास दिल्लीस **दिलेलखानांनीं** लिहून पाठविलें कीं, '**राजियाचा** पुत्र **संभाजीराजा** रुसून आपणाजवळ आला आहे. त्यास

---

१०१ मोंगलाच्या फौजा, रणमस्तखान व केसरसिंग बडा, व लष्करखान व बाजे उमराव अशा फौजा पंचवीस, तीस हजार चालून आले. त्यांशीं व राजियाचे फौजेशीं युद्ध बहुत जाहले. मोगल नामोहोरम करून, हत्ती, घोडे पाडाव केले. गनिमाचे वजीर निघोन गेले. ते वख्तीं सिदोजी निंबाळकर पंच हजारी वजीर राजियाचा पडला, पुढें छावणीचा दिवस. फौजाहि निघोन देशास आल्या. राजे पुरंधरास आले.' पाठांतर.

*' पा व गड ' असें पूर्वीं होतें.

गौरव करून आम्हीं ठेऊन घेतला आहे. तर पातशाहांनीं मेहेरबान होऊन त्यास नांवाजावें म्हणजे राज्यांत दुई होईल. राज्यांतील लष्कर उठोन आपोआप येईल आणि किलेकोट साधतील ' म्हणून लिहिलें. त्याजवरून पातशहानीं विचार केला कीं, '**राजियाचा** पुत्र आला आहे त्यास नांवाजितां पातशाहींत फितवा करून पातशाही बुडवितील. नांवाजूं नये. हुजूर आणून कैदेंत ठेवावा. ' ऐसा विचार करून **दिलेलखानास** लिहून हुकूम पाठविला कीं, '**संभाजी** राजियास घेऊन हुजूर येणें ' असें लिहिलें. तों अगोदर **दिलेलखानाचा** वकील पातशाहाजवळ होता. त्यानीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच **संभाजी** राजियास सूचना करून पळविलें. ते पळून **पन्हाळियास** आले. हें वर्तमान **राजियास पुरंधरास** कळतांच संतोष पावून पुत्राचे भेटीस **पन्हाळियास** आपण आले. मग पितापुत्रांची भेट जाहाली. बहूत [१०२] रहस्य जाहालें. त्याउपरि राजे म्हणूं लागले कीं, " लेंकरा मजला सोडूं नको. **औरंगजेबाचा** आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता. परंतु **श्रीनें** कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र, थोर जालास, आणि सचंतर राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणास कळलें. तर मजला हें अगत्य आहे. तरि तुजलाहि राज्य एक देतों. आपले पुत्र दोघेजण, एक तूं **संभाजी** व दुसरा **राजाराम**. ऐसियास हें सर्व राज्य आहे. यास दोन विभाग करतो. एक **चंदीचें राज्य**, याची हद्द **तुंगभद्रा** तहद **कावेरी** हें एक राज्य आहे. दुसरें **तुंगभद्रा** अलीकडे **गोदावरी** नदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसीं दोन राज्यें आहेत. त्यास तूं वडील पुत्र, तुजला **कर्नाटकीचें** राज्य दिधलें. इकडील राज्य **राजारामास** देतों. तुम्ही दोघे पुत्र दोन राज्यें करणें. आपण श्रीचें स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतों. " असें बोलिले. तेव्हां **संभाजीराजे** बोलिले कीं, " आपणास साहेबाचे पायांची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचें चिंतन करून राहीन. " असें उत्तर दिधलें. आणि राजे संतुष्ट जाहाले.

---

१०२ ' हर्ष झाला ' पाठांतर.

प्रकरण १३ वें

शिवाजीच्या राज्याची मोजदाद

१०५. अठरा कारखाने, बारा महाल, नाणें इत्यादि.

मग पितापुत्र बैसून कुल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजिना काय आहे ? व कारखाने व मुत्सद्दी सरकारकून[103] लोक कोण कोण ? लष्कर पागा शिलेदार किती ? सरदार काय काय ? गड कोठें, किती, हशम काय, समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जाहाजें किती ? इसमांचा आकार केला. कारखाने अठरा व महाल मुलूख नाना जिन्नसवार संख्या करणें... तो केला. बितपशील.

आठरा [1]कारखाने (' कार्यस्थानं तु कार्खाना, ' ।)

१ खजीना (' कोशागारं खजाना स्यात् ')

१ जव्हाहीरखाना (रत्नशाला)

१ आंबारखाना (धान्यकोश)

१ आबदारखाना ' जलस्थानं '

१ नगारखाना (नौबतखाना) ' आनकस्तु नगारा स्यात् '

१ तालीमखाना (व्यायामशाळा) ' बलशिक्षा तु तालियम् । '

१ जामदारखाना (वसनागार)

१ जिरातेखाना (शस्त्रागार)

१ मुदबखखाना (पाकालय)

---

१०३ ' कारकून मोख्तेसर लोक ' पाठांतर.

१ कोठें खालीं दिलेल्यांपैकीं कांहींकांबद्दल हीं नांवें आढळतात. ' तासेखाना ' (तास–घटका–वाजण्याचें ठिकाण), ' शिलेखाना ' (शस्त्रागार), ' खलबतखाना ' (एकांताची खोली), ' सराफखाना ' (मूल्यवान् धातूसंबंधीं स्थान), ' बंदीखाना ' (कारागार).

१ शरबतखाना [‘पानकादि रसस्थानं’]
१ शिकारखाना [‘पक्षिशाला’]
१ दारूखाना (अग्न्यस्त्रगृह)
१ शहतखाना [खं. ८ पृ. २०३ सिहतखाना-सिहहत्-संडास-आरोग्यगृह]
१ पीलखाना (हत्तीशाला)
१ फरासखाना (राहुट्या, डेरे, वगैरे वस्तु ठेवण्याची जागा)
अस्तरणागार
१ उष्टरखाना (उंटशाला)
१ तोफखाना
१ दप्तरखाना (लेखशाला)

(वर कंसांत दिलेले प्रतिशब्द राजव्यवहार कोशांतील आहेत.)

बारा महाल

१ पोते (कोषागार)
१ थट्टी (गोशाला) गोवाटिका
१ सेरी (तृप्ति, समाधान)
१ वहिली (रथशाला)
१ कोठी (धान्याचें कोठार)
१ सौदागिर (व्यापारी)
१ टंकसाळ
१ दरुनी (अन्तःपुर)
१ पागा (अश्वशाला)
१ इमारत (बांधकाम) शिल्पकार्य
१ पालखी (शिबिका)
१ छबीना ‘ रात्रिरक्षणम्।’

खजीना नाणेंवार व कापड जिन्नसवार बी

सुवर्ण ———————————— नाणें

१,००,००० गंबार एक लक्ष
२,००,००० मोहरा दोन लक्ष (सुवर्णनिष्कं)
३,००,००० पुतळ्या तीन लक्ष
१३,६४,५२५ पातशाही होन [तेरा लक्ष चौसष्ट हजार पांचशें पंचवीस]

१२,७४,६५३ सणगरी [1]होन [कांहीं प्रतींत नाहीं]
२,५४,०३० अच्युतराई होन
३,००,४५० देवराई होन
१,००,४०० रामचंद्रराई होन (१०४०० पाठांतर)
१,००,००० गुती होन
२,००,००० धारवाडी होन
१,००,००० सतलाम्या एक लक्ष [इब्राहिम अदि. तांबें सोनें नाणें]
१,००,००० इभ्रराम्या एक लक्ष
४,००,००० [2]शिवराई होन
१५,००,००० कावेरी (पाक) [होन]
२,००,००० होन मलयघाटी.
१,००,००० पाक (म) नाईकी होन (एक लक्ष)
३,००,००० आदवणी होन
५,००,००० जडमाल होन
१,४०,००० ताडपत्री होन
१,००,००० साधें सोनें नग कांबी (एक लक्ष) वजन खंडी १२॥ (साडे बारा)
२,००,००० [3]फलम नाणेवार

पुरवणी होनांचीं नांवें (फलम याचे पोटीं)

१ अफरजी १ बिलधरी १ वेंकेटराई १ त्रिवाळुरी *
१ उलफकरी १ देवनहली १ त्रिसुळी १ महंमदशाई
१ रामनाथपुरी १ चंदावरी १ वेळुरी १ कुनगोटी

---

१ होन = ५० पासून ६० ग्रेन वजनाचें सोन्याचें नाणें, पॅगोडा अथवा वराह यासारखें. होन्नु या कानडी नांवाचें सोन्याचें नाणें अर्ध्या पॅगोड्यायेवढें होतें. त्यावरून होन हा शब्द रूढ झाला असावा असें Coins of India–by Brawn, Page 57 येथें लिहिलें आहे. रु. ३॥ किंमतीचें. २ शिवाजीच्या नांवाचे होन पाडले असावेत. ३ फलम = सोन्याचें नाणें. 'मराठेकालीन समाज-दर्शन ' शं. ना. जोशी सत्कार ग्रंथ पृ. २०८ पहा. * ' त्रिमलारी ' पाठांतर.

रुपये	जडजवाहीर
५,००,००० रुपये	१ माणकें
२,००,००० आसरपद्या (असर्फ्या)	१ पाच
१०,००,००० आबाशा	१ वैडूर्यें
२५,००,००० दाभोळी कबरी (लाहारी)	१ नीळ
१०,००,००० चुली (हुर्मुजी)	१ पैराज
५,००,००० बसरी कबरी (लाहारी)	१ मोतीं
१०,००,००० रुपें साधें व मीनगारी	१ पोंवळें
व भांडीं नग वजन खंडी ५०	१ पुष्कराज
(पन्नास)	१ हिरे
	९

कापड जरी व साधे व रंगाचे व खुमास जिन्नसवार छपन्न देश व दर्यावरील अजमासें किंमत होन

धान्यसंग्रह रससंग्रह अगणित होता. कोठार व देशांत अमर्याद होती.

कलम

१,००,००,००० [एक कोटी] एकूण चंद्रमें (चक्रें[१]) संख्या २५,००,५००
५०,००० निशानी होन (पंचवीस लक्ष पांचशें)
५,००,००० येळुरी* होन

[पुढें दिलेल्या याद्या मूळ सभासद बखरींत आल्या तेवढ्या सर्व आहेत. पण संदर्भासाठीं व अभ्यासाच्या सोयीसाठीं त्या याद्या अकारादि वर्णानुक्रमानें वेगळ्या वेगळ्या दिल्या आहेत. स्थल-, वा व्यक्ति-सूची पुढें दिली आहे तींत फक्त बखरींतील नांवेंच घेतलीं आहेत. ह्या यादी वेगळ्या होत्या व वेगळ्या दिल्या. ह्या यादी वर्णानुक्रमानें दिल्या ह्यांची निश्चितच उपयुक्तता फार आहे, हें सांगणें नको.

रा. ब. साने ह्यांनीं ह्या यादींतील व्यक्ति वा स्थल नामांनाहि टीपांतून पाठांतर दर्शित केलें आहे. तीं पाठांतरें व्यक्तिनामापुढेंच कंसांत दिलीं आहेत. कांहीं नांवें व्यक्तिनामांत वर कांहीं आडनांवांत पाठांतर सुचविलीत.]

* ह्या आकड्यांत कोठें कोठें फरक आहे. १. सेनापती दाभाडे दफ्तर प्रस्तावना किंवा 'मराठेकालीन समाजदर्शन' पृ. २०१. शं. ना. जोशी पहा.

१०६. पागा शिलेदार, सुभेदार व आरमारी सरदार

पागा शिलेदार

घोडे राऊत संख्या पागा १०५००० एक लक्ष पांच हजार तपशील.
सिलेदार ४५००० पागा यांचे सरदार नांवें [२९]

अनंदराव हशम हजारी
उदोजी पवार (दादाजी पाठभेद)
कृष्णाजी घाटगे
खंडोजी जगताप
गणोजी शिरके
गोंदजी जगताप
जेतोजी काटकर
तुकोजी निंबाळकर
तलंगराव सरदार
[शिवाजी तेलंगराव ऐ. सं. सा. ६ ले. ९६ पर्णाल प. ग्र. अ. ५।७९]
धनाजी जाधव
निळोजी काटे
निंबाजी पाटोळे
(बिंबाजी किंवा बुबाजी पा.)
नेतोजी पालकर (नथोजी प्र.)
परसोजी भोसले

भवानराव सरदार
बाळोजी काटकर
मानाजी मोरे
येसाजी काटकर
रामजी काकडे
(बाबाजी किंवा दादाजी पा.)
रूपाजी भोसले चि. (संताजी पा.)
वाघोजी शिरके (राघोजी पा.)
व्यंकटराव खांडकर
शामाखान
संताजी घोरपडे
संताजी जगताप
संभाजी हंबिरराव
सावजी मोहिते
हंबिरराव सरनौबत
हरजी निंबाळकर (मालोजी पा.)

शिलेदार व मुलखींचे सुभेदार [३१]

अमरोजी पांढरे
उचाले
कृष्णाजी भांदडे (जावदेव पा.)
केरोजी पवार

खेमणी
खंडोजी आटोळे
गणेश तुकदेव
गणेश शिवदेव

चंदो नारायण
चंदो हिरदेव
जानराव वाघमारे
त्रिंबक विठ्ठल
देवाजी उघडे
नरसोजी शितोळे
नागोजी बलाळ
नेमाजी शिंदे (नेतोजी पा.)
बयाजी गडदरे (रामाजी पा.)
बळवंतराव देवकांते
बहिरजी घोरपडे
बहिरजी वडगरे (बहिर्जी मुरग पा.)
बाळाजी नीळकंठ
बाळाजी बहिरव
बाळोजी शिवतरे
महादजी नारायण
मालोजी थोरात (मानाजी पा.)
मुधोजी थोरात
राघो बलाळ
रामाजी जनार्दन
रामाजी भास्कर
संकरोजी माने
हिरोजी शेळके

आरमारी सरदार [३]

इब्राइमखान
दर्यासारंग–सागर
मायनाईक

१०७. पायदळावरील सरदार

हशम मावळे सरदार (३५) असामी १,००,००० यांचे सरदार

इंद्रोजी गावडे (गरवडे पा.)
कलधोंडे (कलदंड)
कोंडजी फर्जंद
कोंडजी वडखले
कोंडाळकर
कृष्णाजी भास्कर
गणोजी दरेकर
चांगोजी कडू
जावजी महानलाग
जावजी पाये
ढवळेकर
तानसावंत भोसले
तानसावंत मावळे
तानाजी तुंदुसकर (मांदुसरा पा.)
तुकोजी कडू
त्रिंबकजी प्रभु
दत्ताजी इडिलकर
नागोजी प्रल्हाद
पिलाजी गोळे
पिलाजी सणस

बाळाजीराव दरेकर	राम दळवी
भिकजी दळवी	रामाजी मोरे
महादजी फरजंद	विठोजी लाड (कवडे पा.)
माल सावंत	सूर्याजी मालुसरे
मुबाजी बेनमणा	सोन दळवे
मुधोजी सोनदेव	हिरोजी भालदार
येसजी दरेकर	हिरोजी मराठे
येसाजी कंक सरनौबत चि. (दरेकर पा.)	

१०८. गड, कोट, जंजिरे

गड, कोट, जांजिरे व देशांतील जंजिरे, गट-कोट बितपशील

गड रास पहिली (४९)

अचलगिरी	ठकरीगड
अहिवंतगड	तानवडा
अंकोले–कोट	त्रिंबक ऊर्फ श्रीगड
कुरडू ऊर्फ मंदरगड	नौबदगड
कुष्टगी कोट	पन्हाळागड
केचर कोट	परळीगड ऊर्फ सज्जनगड
कोपलगड	पाली ऊर्फ सरसगड
कोंढाणा ऊर्फ सिंहगड	पांडवगड
खेळणा ऊर्फ विशालगड	पुरंदरगड
धनगड (धनगड पा.)	फोंडा कोट
चंदन	बहादुरगड
चाउड ऊर्फ प्रसन्नगड	भोरप ऊर्फ सुधागड
जयगड	मदगिरीगड
जवळेगड	मनोहरगड
जीवधन	मसीतवाडे ऊर्फ मानगड

माहुलीगड	वंदनगड
मंगळूर कोट	शिवेश्वर कोट
येलबर्गीगड	सातारागड
रसाळगड	सालेरीगड
रांगणा ऊर्फ प्रसिद्धगड	सालोभागड
रोहिडागड	सुपे कोट
लावड कोट	हडपसर ऊर्फ पर्वतगड
लिंगाणागड	हरुषगड
लोहगड	हलियाळ (कोट)
वल्लभगड	

+याशिवाय दुसरे प्रतींत नांवें सांपडतात तीं: केदारगड, कोरागड, कासेगड, कोलजागड, कनकगड, कोहीमगड, कोठारगड, कंकणीगड, कृष्णागिरीकोट कुलागड, कैहातकोट, कुडाळकोट, कडवरीगड, कारडीगड, कोचनागड, कल्याणगड, नागिरीगड, नांदगिरीगड ऊर्फ कल्याण, नळदुर्ग, तरूगड, देवगड, गुणवंतगड, गंधर्वगड ऊर्फ भुजबळ, ढालगड, चंद्रगड, चतुरगड, चा (र) दी गड, रायगड (तक्ताची जागा), रत्नगड, राजहंसगड, राजमाची गड, हसूरकोट, हेमाद्रिगड, हंसगड, सुधाकरगड, सुंदरगड, सिंधुदुर्ग, जंजीरा, सुगाणागड, सबळगड, सामत्रागड, सिंहगड, सज्जनगड, सेरगागड, सुमारगड, येशवंत दुर्ग, व्यंेद्रगड, वरूपगड, विंदाविदगड, विश्वासीईश्वरकोट, शरगागड, शेवळगड, माचणागड, मंगलगड, कांगरी, महीधरगड, महानगड, मानाडगड, मत्तगड, मृगंगड, (पिटगड ?), महोगड, महीतळीगड, मित्रगड, मकरंदगड, भोरगिरी, भिलवडी, भुजबलगड, भूपाळगड, भद्रगड, प्रचीतगड, पराक्रमगड, पाराशरदनाम, पैना (जा) रगड, प्रल्हादगड, पहारगड, बीरकोट, बळराजगड, बाळाकोट. (एकूण सत्त्याहत्तर संख्या) यांपैकीं कांहीं नांवें वरील यादींत आहेत.

राजियांनीं नवे गड वसविले त्यांची नांवनिशीवार सुमारी गड रास दुसरी (१०८)

अंजनवेली	जंजिरें विजयदुर्ग
कठोरगड	,, सिंधुदुर्ग
कनकाद्रिगड	,, सुवर्णदुर्ग
कपलगड	ढोलागड
कमरगड	तिकोना ऊर्फ वितंडगड
कमलगड	तुंगगड ऊर्फ कठिणगड
कलानिधीगड	तोरणा ऊर्फ प्रचंडगड
कंबलगड	दहीगड
कांगोरी ऊर्फ मंगळगड	नरगुंदगड महदगड
काचणागड	नाचणागड
कांगोरगिड	नाकगडगड
कुंजरगड	पटगड
केळंजा	पताकागड
कोथळागड	पद्मागड
कोहजगड	पवित्रगड
खोलगड	पारगड
गगनगड ऊर्फ बावडा	पावनगड
गजेंद्रगड	प्रचीतगड
गडागड	प्रतापगड
गहनगड	प्रौढगड
गंधर्वगड	बळवंतगड
गंभीरगड	बहिरवगड ऊर्फ सारंगा
जंजिरे कुलाबा	बहूलगड
,, खांदेरी	बालेराजा
,, रत्नागिरी	बोटगिरी कोट

भास्करगड
भिवंगड (भिमगड)
भूधरगड
भूषणगड
मच्छंद्रगड
मदनगड
मर्दनगड
मनरंजनगड
महींद्रगड
मयोरगड ऊर्फ नवलगुंद
महिपतगड
महिपालगड
महिमानगड
मंगलगड
मंडणगड
मंदरगड
माणिकगड
मुरगोड
मोहनगड
येळूर कोट
रजेगड
रवळागड
राजकोट
राजगड
राजगड चारी माच्या
रामदुर्ग ऊर्फ भुजबळ
रामसेजगड
रुद्रमाळगड
लोकलगड (कलोल)
लोणजागड
वर्धनगड
वनगड
वसंतगड
वल्लभगड
वारुगड
वासोटा ऊर्फ व्याघ्रगड
वीरगड ऊर्फ घोसाळा
वैराटगड
व्यंकटगड
श्रीगलडवगड
श्रीमंतगड
श्रीवर्धनगड
सबलगड
सरगड
सहज (न) गड
सामानगड
सारंगगड
सिदीचा गड
सिद्धगड
सुबकरगड
सुमनगड
सुरगड

सुंदरगड
सेवणागड
सेवकगड
सोनगड
स्वरूपगड
हरिश्चंद्रगड

गड रास तिसरी कर्नाटकप्रांतींचे गड केले नवे एकूण सुा ७९ बितपशील कोल्हारं, बाळापूर—वरघाट

श्रीवर्धनगड
अहिनिजादुर्ग
अर्काटगड
अर्जुनगड
कट्टरगड
कैलासगड
कोलार कदीम
कोल्हार
गणेशगड
चंदनगड
ठमकूर कोट
दुर्गमगड
नंदीगड
पडवीरगड
पालेगड
पिपला ऊर्फ प्रकाशगड
बाळापूर भोर
बिदनूर
बुरवडगड
बुंदी कोट
ब्रह्मगड
भंजनगड
भातूरगड
भास्करगड
भीमगड नजीक कपशेरी
भूमंडणगड
मकरंदगड
मर्दनगड
मदोन्मत्तगड चंदी
महीपालगड
महीमंडणगड
मुखणे गड कोटवेल
मेज कोल्हारगड
येलूर कोट
राजगड चंदी
वज्रगड
सरसगड
सोमशंकरगड
हातमलगड

घाटाखालीं गड कोट (४१)

अरकोटगड
कर्नाटकगड
कस्तुरीगड
केवळगड
कृष्णागिरी चंदी
कृष्णागिरीगड
कुंजरगड
गगनगड
गर्वगड चंदी
चवीकोट
चेलगड चंदी
चिंताहर कोट
जगदेवगड
त्रिचंदी कोट
त्रिकळूर
त्रिमल कोट
देवगड
देवणा पाटी कोट
निलसाजित गड
पतनगदनेगड
प्रबळगड
प्राणगड
बहिरवगड
बिगे वाळुंगड
मदगड
मनगड
मल्लकार्जुनगड
महाराजगड
मार्तंडगड
यशवंतगड
रत्नगड
रंजनगड
रामगड
लागगड चंदी
विशाळगड
वेटवल ऊर्फ केमल
वृद्धाचल कोट
सारंगगड चंदी
सिदगड
सुदर्शन गड
सुभाकोट एकंदर गड बेरीज ७९

(२६) एकंदर गडबेरीज–५० प्रथम पन्नास. १११ नवे राजियांनीं वसविले. ७९ कर्नाटक प्रांतीचे, एकूण २४०

१०९. दोन प्रांत एक राज्य.

एणेंप्रमाणें आपलें राज्य **सालेरी** किल्यापासून **गोदावरी** नदी अलीकडे कुल देश वरघाट तळघाट **तुंगभद्रा** पावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रेपलीकडे देखील **कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर,** सरद **कावेरी** पावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे. ऐशी तजवीज करून **संभाजी** राजियास **पन्हाळ्यास** ठेविलें. त्याजवळ **जनार्दन नारायण** सरकारकून व **सोनोजी नाईक** बंकी व **बाबाजी ढमढेरे** असे ठेविले. आणि पुत्राचें समाधान केलें कीं, 'आपण **रायगडास** जातों. धाकटा पुत्र **राजाराम** याचें लग्न करून येतों. मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करूं. तूं वडील पुत्र आहेस. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा.' असें बोलून **रायगडास** गेले.

११०. राजाराम लग्न.

धाकटा पुत्र **राजाराम** यास वधु पाहातां **प्रतापराव** पूर्वील सेनापती होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली आणि लग्न सिद्धीतें पावविलें. वधूचें [नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें. मोठा महोच्छाह केला. दानधर्म अपार केलें.

प्रकरण १४ वें

' राजियाचें देहावसान '

१११. अंतकाल-ज्वराची व्यथा. राज्य-चिंतन.

मग कांहीं दिवसांनीं **राजास** व्यथा ज्वराची जाहाली. राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणे. विचार पाहातां आयुष्याची मर्यादा जाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य, भले लोक बोलावून आणिले. बितपशील--

कारकून (८)

१ निळोपंत-प्रधानपुत्र **१ प्रल्हादपंत** **१ गंगाधरपंत**-
१ रामचंद्र नीलकंठ **१ रावजी सोमनाथ** **जनार्दनपंतांचे** पुत्र
१ आबाजी महादेव **१ जोतीराव** **१ बाळप्रभु** चिटणीस

हुजरे लोक (६)

१ हिरोजी फरजंद **१ बावाजी घाटगे**
१ बाजी कदम **१ मुधोजी सरखवास**
१ सूर्याजी मालुसरा **१ महादजी नाईक पानसंबळ**

असे मातबर लोक जवळी बोलावून आणिले. मग त्यांस सांगितलें कीं, आपली आयुष्याची अवधी जाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून **पन्हाळियावरि** संभाजीराजे वडील पुत्र यांस सांगितलें [होतें] कीं, " तुम्ही दोघे पुत्र आपणांस. यांस राज्य वांटून देतों. आणि उभयतां सुखरूप राहाणें. " म्हणोन सांगितलें. परंतु वडील पुत्र **संभाजीराजे** यांनीं ऐकिलें नाहीं. शेवट आपला तों निदान समय दिसत आहे. राज्य म्यां **शिवाजीनें** चाळीस हजार होनाचा **पुणें** महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसें मेळविलें. परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित् धाकटा कुंवार **राजाराम** वांचला तर

तो एक हें राज्य वृद्धीतें पाववील. **संभाजीराजे** वडील पुत्र जाणता आहे, परंतु बुद्धि फटकळ[1] आहे. अल्पबुद्धि आहे. त्यास काय करावें! आपण तों प्रयाण करतों. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कदीम या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या.

११२. अंतकालच्या गोष्टी–पुत्र लक्षणें–संभाजी फत्तेखान.

आपणां माघारें **संभाजीराजे** पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील. लष्करहि थोरला राजा संभाजी म्हणून त्यांजकडे डौल देऊन मिळतील. **राजाराम** धाकटा म्हणून याजकडे लष्कर येणार नाहीं. सरकारकून राजारामाचा पक्षपात करून उभयतां बंधूंस राज्य वांटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनांचे विचारांत येणार नाहींत. शेवट अवघे सरकारकुनांसि विश्वास देऊन धरतील. **संभाजीराजे** हे आपले वेळचे थोर थोर ब्राह्मण यांस मारील. ब्राह्मणहत्या करील. पुढें मराठे यांस लष्करचे सरदारांसहि मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा पगडा पडेल. आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल, गांजा ओढील, इषकबाजी करील. गड-कोट-देशामध्यें अनाइक होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजिना सर्व उडवील. सर्व राज्य गमावील. **संभाजीचे** गुण ऐकून **औरंगजेब** दिल्लीहून चालून येईल. **भागानगर, विजापूर** मोगल घेईल. हें राज्यहि घेतील. आणि **संभाजी** शेवट दगा खाईल. जे गती **मलिकअंबर, निजामशाहा** [-ही] त्याचा पुत्र **फत्तेखान मलिका** माघारां जाहाला आणि पातशाही बुडविली, तैशीच **संभाजी**राजा करील. मग **राजाराम** राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. हीं पुत्रांचीं लक्षणें.

११३. मोडिलें राज्य सावरणार. तिघे ब्राह्मण, तिघे मराठे.

आतां कारकुनामध्यें माझे वेळचे कारकून यांस तों **संभाजी** वांचूं देणार नाहीं. त्यांपैकीं एक **प्रल्हादपंत निराजीपंतांचे** पुत्र व **रामचंद्रपंत**

१ अनीतीची–पाठांतर.

निळोपंताचे पुत्र, हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. **निळोपंत,** प्रधानाचा पुत्र, हाहि नांव धरील. यावेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्यें बहुतेक संभाजी मोडील. उरल्यापैकीं **संताजी** घोरपडे व **बहिरजी** घोरपडे व **धनाजी** जाधव हे जरि वांचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील. मोडिलें राज्य हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे सांवरतील" असें बोलले.

११४. अंतकाल–जडशरीरत्याग.

येणेंप्रमाणें **राजे** बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवूं लागलें. परम दुःख जालें. त्याउपरि राजे बोलिले कीं, "तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. यामागें किती उत्पन्न जाले तितके गेले. आतां तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा. **आपण** श्रीचें स्मरण करतों." म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागिरथीचें उदक आणवून स्नान केलें. भस्मधारण करून रुद्राक्ष धारण केलें. आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्र नाम संवत्सरे, चैत्र[1] शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं जाला. त्यानंतर शिवदूत विमान घेऊन आले, आणि [राजे] विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर, [त्याचा] मृत्युलोकीं त्याग केला.

११५. अंतकाल–अशुभचिन्हें, उत्तरक्रिया.

राजियाचें देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. **श्रीशंभुमहादेवीं,** तळ्याचे उदक रक्तमय जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमासवणी उदक जाहालें. ऐशीं अरिष्टें जाहालीं. मग राजियाचें कलेवर चंदनकाष्ठें व बेलकाष्ठें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं, धाकटा पुत्र **राजाराम** यांनीं क्रिया करावी. सर्वांनी खेद

---

१ ही मिति महाडप्रतींत मात्र आहे.

केला. **राजाराम** यांनीं अत्यंत शोक केला, त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र **संभाजीराजे** वेळेस नाहींत, याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें **राजियाचें** चरित्र–आख्यान उत्पन्नकाळापासून देहावसानापर्यंत जाहालें.

११६. राजा अवतारी–चरित्रपठण फलश्रुती, लेखनकाल.

राजा साक्षात् केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. **नर्मदापासून रामेश्वरपर्यंत** द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाही, कुतुबशाई, निजामशाई, मोगलाई ह्या चारी पातशाह्या व समुद्रांतील बेवीस पादशाहा असे जेर जप्त करून, नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहाला. प्रतिइच्छा मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहाला नाहीं. पुढें होणार नाहीं. असें वर्तमान माहाराजांचें जाहालें. कळलें पाहिजे.

चरित्र पुण्यश्लोक **राजियाचे** जे घरीं लिहून ठेवतील त्यांच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यांस मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियांस पुत्र होतील व दरिद्रियांस लक्ष्मीवंत होतील व अपेशियांस यशवंत होतील व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यांसहि पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेंप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही **बखर संपूर्ण** जाहाली. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दिवशीं वर्णन [1]समाप्त जाहालें. ईश्वर* संवत्सर. मुकाम चंदी. शालिवाहन शके १६१६ [त] जाहाली कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? हें विनंती.

समाप्त

---

१ 'ते दिवशीं राजा कैलासवासी जाला' असें प्रतापगडप्रतींत आहे तें सर्वथा चूक होय. *सर्व प्रतींत संवत्सरनाम व शकाचा आंकडा असाच आहे.

टिपणी

[ही **टिपणी** वाचतांना पुनः पुनः मूळ सभासद बखर ग्रंथ पाहावा. तसेंच मूळ बखर ग्रंथ वाचतांना टिपणींतील तो तो परिच्छेद पाहावा. टिपणीमध्यें क्वचित् व्याकरण, बखरींतीलच इतर परस्पर संदर्भ, आवश्यक वाटलेली नवीन माहिती, इतर ग्रंथांतील अनुकूल प्रतिकूल उल्लेखांचा थोडासा विचार, हस्तलिखितांतीलहि आढळलेल्या माहितीचा अंतर्भाव, शब्दांच्या उपपत्ती व वाक्याचे उलगडे देऊन मूळ बखर जरा अधिक बोलकी करण्याचा यत्न केला आहे.

जेथल्या तेथेंच ह्या टीपा दिल्या नाहींत. तेथें फक्त पाठांतरें व पाठभेद एवढेंच दर्शित केलें आहे. टीपा ह्या एका दृष्टीनें स्पष्टीकरण आहे व म्हणून तें वेगळें दिलें आहे. पुढील आवृत्तींत जमल्यास इष्ट तो बदल करूं.

बखर ग्रंथांत दुर्बोध वाटणारे शब्द व त्यांचे अर्थ स्थलनिर्देशासह स्वतंत्र दिलेले असल्यामुळें ग्रंथांतर्गत शब्द येथें घेतले नाहींत.

श्रीशिवाजीराजांच्या चरित्रासंबंधीं मराठी, संस्कृत, फार्सी, इंग्रजी, पोर्तुगीज इत्यादि भाषांमधील साधन ग्रंथ म्हणतां येतील असें बरेंच साहित्य प्रसिद्ध आहे. सिद्ध ग्रंथहि बरेच आहेत. पण साधन ग्रंथांपुरतें पाहातां ह्या बखर ग्रंथाच्या अभ्यासाबरोबर ते ग्रंथहि म्हणजे त्या त्या ग्रंथांतील उल्लेखहि लक्ष्यांत घेणें अवश्य आहे. पण तो विषय अगदीं स्वतंत्र होईल व इतक्याची आवश्यकता येथें नाहीं.]

प्रकरण १ लें—थोडें पूर्वजवृत्त व शिवाजी कार्यारंभ

परि. १ विनंती—इतिहासकालीं कोणीं, कोणास, कोणचे व कसे मायने लिहावयाचे ह्याविषयीं समाजमान्य कांहीं नियम होते. त्यांतील 'दंडवत, नमस्कार, आशीर्वाद, जोहार, रामराम, विनंती' इत्यादि लिहिण्यावरून लेखक व वाचक कोणत्या यातीनात्याचा आहे हें सामान्यतः ओळखतां येतें. विद्या, अधिकार, वय, ह्यापेक्षां व ह्याबरोबर वर्ण–व ज्ञाति–दृष्ट्या मायनेनियम ठरलेले दिसतात. त्यावरून सामाजिक म्हणजे धर्मशास्त्रीय वर्णाश्रमदृष्टि प्रधान होती हें अंदाजतां येतें. कृष्णाजी अनंत हा ब्राह्मण आहे; तो क्षत्रिय असलेल्या

आपल्या स्वामी छत्रपतीस ‘ विनंतीविज्ञापना ’ लिहितो. **सभासद**—ह्या अधिकारवाचक शब्दास ‘ राजमंडळ ’ ह्या शब्दाची जोड अवश्य पाहिजे. साने पाठांतर म्हणून ती जोड टीपेंत देतात. पण स. चित्र. मध्यें हा सजोड शब्द आहे (समस्त हा शब्द तेथें अधिक आहे.) प्रास्ताविकांत दिलेले ‘सभासदसंज्ञा व अधिकार’ हें विवेचन पहा. **चरित्रलेखनास आज्ञा**—लेखकानें छत्र० राजारामाची ही आज्ञा सांगतांना आधीं एक प्रश्न केला आहे. **पुसिलें**=प्रश्न केला. चौकशी करणें, प्रश्न करणें ह्याअर्थी पुसणें हाच धातु मूळचा; विचारणें हा धातु नंतरचा. विचारणें ह्यांत चर्चा,-विचार,-वाटाघाट करणें हा अर्थ. चर्चा-प्रसंगीं प्रश्नोत्तरें होतात व त्यामुळें विचारणें म्हणजे प्रश्न करणें हाहि अर्थ विचारणें-चा झाला व तोहि रूढ झाला. पण ‘पुसणें’ हाच येथील शब्द युक्त आहे. (श्रोते पुसती कोण ग्रंथ । दास०) पुढेंहि परि. ४६ पहा. प्रश्नार्थक प्रयोग आहे. (‘ उठतां बहु त्वरेनें ’ ह्या कविवर्याच्या आर्येंत दोनदां हेंच क्रियापद आलें आहे इ. इ.) औरंगजेब इ. १६८३ पासून इ. १७०७ मध्यें मरेपर्यंत दक्षिणेंतच होता. पैकीं शेवटचीं दहा वर्षें बाकी असतांनाच ह्या बखरग्रंथाचें लेखन (इ. १६९७) झालें आहे. म्हणून औरंगजेबाचें येणें हें राजाराम— छत्रपतींस अनर्थकारक वाटलें व ‘हा काय प्रकार’ असा प्रश्न उत्पन्न झाला. स. चित्र. मध्यें औरंगजेब येण्याचा निर्देश नाहीं. **दावा लाविला**—‘ बरोबरी ’ संपादन करून घेऊन इच्छित साधण्यासाठीं यशस्वी युद्धें केलीं. **चार पातशाही**—(१) आदिलशाही–विजापूर इ. १४९०–१६८६; (२) कुत्बशाही–भागानगर इ. १५१२–१६८७; (३) मुघलशाही–दिल्ली इ. १५२६–१८५८ (४) निजामशाही–अहमदनगर इ. १४९०–१६३६; पुढें जंजिरेकर सिद्दी नबाब ह्या अवशेषानें निजामशाहीच आहे हें शिवाजी स्वतः पुढें परि. ८१, ८४ मध्यें सांगत आहे.

परि. २—व त्यांचे बंधु ‘ विठोजीराजे ’ म्ह. चुलत आजे. खेलोजी व मालोजी यांच्या दौलतीचा निर्देश स. पत्रें पृ. १०८ ले. १३ मध्यें : ‘ ४ परगण्याची दे०खी व ‘ १ गांवाची मोकादमी ’ असा आला आहे. ह्या उल्लेखाला काल नाहीं. ‘दौलताबादेस चाकर असता. भोगवटा होता. पण (कांहींच्या) सनद्रा जाहल्या नाहींत ’ असें तेथें लिहिलें आहे. ह्यापेक्षां मोंगलाकडे मालोजी होता व त्याचीं खुर्द सतें आणिलीं असा उल्लेख इ. १६२०

मधील त्रै. वर्ष ४ मध्यें आहे. तो प्रमाण आहे. **त्यास** = आणि, इकडे. **शिखरीयात्रा**—शिखर-शिंगणापूर असें जोड नांव. यादवराजा शिंघण (इ. १२०९-४७) ह्याशीं ह्या ग्रामनामाचा संबंध आहे. शिंगणापूरगांवालगतच्याच डोंगरावर शंभुमहादेवाचीं जुनीं प्रेक्षणीय मंदिरें. सातारा जिल्ह्याचे ईशान्येस दहिवडी किंवा माण तालुक्यांत हें ठिकाण आहे. तें त्या देवाच्याच नांवानें म्हणजे 'शंभुमहादेवाचा डोंगर' असें ओळखलें जातें. शंभुमहादेवाचें मंदिर असलेल्या डोंगरास 'शिखर' म्हणतात. (आणि त्या डोंगररांगेस महादेवाचेंच नांव आहे.) चैत्र शुद्ध ११ ते १५ अशी फार मोठी यात्रा ह्या शिखरावर पूर्वी भरत असे व आजहि भरते. '**माणदेसीं माहादेव। तेथें उदंड मोहोछाव। मिळे यात्रा समुदाव। सिखरीचा संभया देव रे**' १२ (समर्थ तीर्थावळी) '**सोरटीचा देव माणदेसा आला।**' यात्रेकरूंसाठीं पायथ्याशीं असलेल्या शिंगणापूर गांवास लागूनच फार मोठें तळें—४० एकरांचें रान तळ्यानें व्यापिलेलें आहे-मालोजीनें जणूं नवें बांधलें. म्हणजे पूर्वीचें फार पडझड होऊन गाळ साचून अगदीं निरुपयोगी झालें होतें. त्याचा तट, पायऱ्या, भिंती बांधून गाळ सर्व काढून नवीनच बांधणी मालोजीनें केली. शि. भा. अ. १ मध्यें '**दक्षिणस्यां दिशि श्रीमान् मालवर्मा नरेश्वरः। स शंभुप्रीतये शंभोर्भक्तः सागरसन्निभम्। मधुरं खानयामास तडागं शंभुपर्वते**' ५४ असें सांगितलें आहे. तसेंच रा. मा. वि. चंपूंतहि '**तयाचे कुळीं माल भूपाल जाला। जयानें जळें शंभु संपूर्ण केला ॥**' ८५ उल्लास ११. जयरामकवीनें असेंच लक्षणा करून सांगितलें. ह्या मालोजीच्या तळे-बांधणीचा उल्लेख ऐ. पत्रांतूनहि आला आहे स. प. पृ. १०९ ले. १४. (व खं. ८ ले. ७१ पृ. ९३ हें स्मरण टिपण दिसतें.) शिखरावर तळें नाहीं. होळकरांनीं बांधलेली 'साखर बाव' विहीर आहे. ह्याशिवाय 'सोनटाकें' 'राजमळा' इत्यादि विहिरी पायथ्याशीं आहेत. 'घोरपडे तळें' म्हणून—(आज ती जमीनच)—आहे. केवळ शिंगणापूर येथें तळें बांधलें एवढ्यानेंहि देव प्रसन्न होईल. पण मालोजी व विठोजी ह्यांनीं कसबे वेरुळ (येरुळ) येथें, ज्याचें दुसरें नांव 'घृष्णेश्वर' हें द्वादश-ज्योतिर्लिंगांत घेतलें जातें त्या, 'आनंदसिद्ध ज्योतिर्लिंगाचेंहि देवालय बांधलें होतें (स. प. पृ. १०६ ले. ९ हें पत्र काल वगैरेदृष्ट्या संशयित आहे)

[घृसण = केशर. ह्या घृष्णेश्वर मंदिराच्या प्राकारावर "येकोजि भोसला, दास मालोजि बाबाजि व विठोजि बाबाजि भोसळे, सेवक आउजि गोविंद हणवत्या (= हणमंते)" असा लेख असल्याचें मागें विज्ञावि. वर्ष ६४ पृ. १२४ वर प्रसिद्ध झालेलें आहे. देवालय दोघांनीं व येथें तळें फक्त मालोजीनें बांधलें. म्हणून मालोजीस स्वप्नदृष्टांत] **स्वप्नास** स्वप्नांत. **दक्षिण देशचें राज्य**— देव जरी प्रसन्न झाला तरी त्यांतहि भक्ताधीनत्वच दिसतें. म्हणजे वर देण्यांतहि क्रम, भक्ताची शक्ति व अपेक्षा ध्यानांत घेतलेली दिसते. 'सर्व हिंदुस्थानचें,' 'भारताचें,' राज्य नाहीं; तर फक्त आधीं 'दक्षिण देशचें' राज्य. मालोजीस व पुढल्याच परि०त शहाजी(चें प्रत्यक्ष नांव नाहीं. पण त्या) सच प्रसन्न होतो तो **शंभुमहादेव** आणि पुढें शिवाजीस प्रसन्न होते ती **श्रीभवानी**. तो भाग पुढें येईलच.

परि. ३—दोघांनीं **पातशाहीमध्यें** दौलता केल्या. व पुढेंच सांगितलें 'दौलत करीत असतां निजामशाही बुडाली.' म्हणजे निजामशाही पातशाहींत दौलता करून होते असा संबंध लावणें सरळ आहे. पण 'सरफजी हा मोगलाई वजीरपणा करी' असा पाठ महाड प्रतींत आहे. **महाराज**—हा शहाजीचा किताब. मुहम्मद आदिलशहाकडून गैरसमजामुळें शहाजीस कैद केलें गेलें, पण लवकरच कैदेंतून सोडतांना सन्मान केला व 'महाराज' हा किताब दिला. (इ. स. १६४८-४९) शि. च. नि. पृ. १२८ वर शक १५७० पर्यंतच्या पत्रांतून ही पदवी आढळत नाहीं असें म्हटलें आहे; तेथें 'मराठी' पत्रांतून अशी भर समजणें भाग आहे. कारण, फार्सी पत्र इ. १६४८ जाने. २१ चें आहे त्यांत हा किताब आहे (ऐ. फा. सा. १ ले. १९). म्हणजे १५६९ पौष हा शककाल येतो. शि. भा. अ. १५ मध्यें शहाजीच्या मुक्ततेचा व सन्मानाचा दरबार झाला, हत्ती-घोडे दिले, हें सांगितलें. तेथें ह्या पदवीदानाचा निर्देश देणेचा राहिला. फार्सी पत्रांतील 'महाराज फर्जंद' हा उल्लेख आदरार्थी व मायनेवजा मानला म्हणजे सर्व सुसंगत जमतें आणि जे. श. तील १५७१ ज्येष्ठ शु. १५ (इ. १६४९ जून १९) ही मिती तुर्त ग्राह्य धरतां येईल. १६४९ मधील मोगलाकडून शहाजीस आलेल्या पत्रांत हा किताब नाहीं. (खं. ८ ले. ३ पहा.) सारांश, 'सरलष्कर' हा किताब जसा आदिलशाही तसाच 'महाराज' हाहि किताब शहाजीराजांना आदिलशाहीकडून होता. **जिजाई आऊ**—ही

शिंदखेडचे लखुजी जाधवराव देशमूख ह्यांची कन्या. पश्चिम खानदेशांत शिंदखेड हें तालुक्याचें ठिकाण. अंबा-अनुस्वाराचा लोप व ब-चा व होऊन अवा आवा–आऊ. अंबा = आई. **तुकाई आऊ**—मोहितेकन्या. **एकोजी**—वेंकोजी–व्यं-ए-कोजी, येकोजी. **शिवाजी जन्म**—श. १५५१ फाल्गुन वद्य ३ शुक्रवार–इ. १६३० फेब्रु. १९–रात्रीं ८॥ चा सुमार. जे. श., शि. भा., कुंडली २; शिचसा १० पृ. ५५. परि. ३ च्या टीपेंत पृ. २ व ३ वर सा. व. म. प्रतींतील शिवाजीचा वडील भाऊ संभाजी ह्याविषयीं पाठभेद दिला. ह्या संभाजीस मोंगलाकडून पूर्वीप्रमाणें मनसब मिळेल व नवीनहि कांहीं मिळेल ह्यासंबंधानें इ. १६४९ मधील मुरादबक्षाचें-औरंग० चा धाकटा भाऊ–शहाजीस पत्र आहे. खंड ८ ले. ३ म्हणजे आदिलशाहीकडे जाण्यापूर्वी दिल्लीकर मोंगलाकडे जाण्याचा हा बेत होता. परि. ११ पहा.

शिवाजीजन्माचे वेळीं 'शंभुमहादेव जागृती येऊन स्वप्न जाहालें' आणि 'आपणच अवतरलों आहे. बारा वर्षें जवळ ठेवावें पुढें न ठेवणें.' 'बारा वर्षें' इत्यादि दृष्टान्तांतील शब्दावरून हा दृष्टान्त शहाजीस झाल्याचें लेखकास दर्शवावयाचें आहे. शहाजी ह्यावेळीं दर्याखान रोहिला ह्या मोगली सरदारावरील स्वारीसाठीं निजामशाहीमार्फत खानदेशांत व नगर–संगमनेरच्या बाजूस गेला होता. इतक्या बारकाव्यानें येथील बखरलेखकाचें लिहिणें ध्यानीं घ्यावयाचें नाहीं. शिवाजी हा अवतार होता व अवतारी पुरुषाबद्धल म्हणून दृष्टांत, एवढेंच लेखकास ध्वनित करावयाचें आहे.

शहाजीराजे बेंगरूळ येथें - शि. भा. त 'बिंगरूळाभिधं पुरम्' अ. ९-४४, 'बिंगरूर' १५-३९,५१; १३-३६; असेंच सर्वत्र आलें आहे. र–ल–योरभेदः ह्या न्यायानें मराठींत बंगरूरचें बंगरूळ झालें. प्रस्तुत शेवटच्या दोन अक्षरांत विपर्यय होऊन 'बंगलूर' असें म्हटलें जातें. इ. स. १६३८–३९ पासून शहाजी बंगलूर येथें राहूं लागला. तिकडे दादाजी कोंडदेव वगैरे गेले असतां परत पुण्याकडे येतांना शिवाजीबरोबर शामराव नीलकंठ वगैरे चौघेजण कामदार दिले. येथें 'निरोप देतेवेळीं' हे शब्द सचित्र. मधील घेणें अवश्य.

परि. ४—'पुढें शिवाजीराजे आपणच कारभार करीत चालले' ह्या वाक्यानें ह्या परिच्छेदाचा प्रारंभ आहे आणि मागील मजकुरांत 'त्याजवर कालवशात्

दादाजी कोंडदेव मृत्यु पावले' असें वाक्य आलेलें धरून तो परिच्छेद पुरा केला आहे. शिवाजी ज्या चार कारभाऱ्यांसह दादाजी कोंडदेवाबरोबर पुण्याकडे आला तेच कारभारी आतांहि आहेत. ह्याचा अर्थ हा कीं, दादाजी कोंडदेव असेपर्यंत दादाजीप्रमुख सर्व कारभार चाले व ते मरण पावल्यानंतर 'आपणच कारभार करूं लागले' असें शिवाजीविषयीं बखरकार सांगत आहे. दुसरीहि लक्ष्य गोष्ट कीं, ह्या चवथ्या परिच्छेदाच्या शेवटीं तेच पहिले कारभारी पुनः सांगून 'चौकसीनें वर्तणूक करीत चालले' असें म्हटलें आहे. म्हणजे दादाजी कोंडदेवानंतर शिवाजीच्या पुणें–सुप्याकडील कारभारास प्रारंभ झाला. **संभाजी मोहिता** ह्यास कसें पकडलें व सुपे देश कसा साधिला ह्याविषयीं स्वतंत्र विवेचन 'अ. म. राज्यकारभाराचा अभ्यास' ह्या पुस्तकांत (पृ. १९३–२०८) दिलें आहे तें वाचावें. सुपे देश शिवाजीच्या आधीन झाल्यानंतर लष्करचा सरनौबत हा अधिकारी शिवाजीनें नवा केला आणि चार अधिकारी पूर्वीचे तेच आहेत.

ह्या ठिकाणीं 'नारोपंत' हें नांव उगाच आलें कीं काय? कारण, मागील ३ ऱ्या परि. त 'बाळकृष्णपंत मुजुमदार' हे कोण तें सांगतांना शहाजी-महाराजांच्या पदरीं असलेल्या 'नारोपंत दीक्षितांचे चुलत बंधु' असा संबंध दाखवून हें नांव आलें. येथें त्यांस अमुक कारभार दिला व म्हणून पुनः नांव आलें असें म्हणावयाचें तर कारभारीपण निर्दिष्ट नाहीं. आणि मुख्यतः हे शहाजीमहाराजांपाशीं कारभारी म्हणून कर्नाटकांत आहेत. व ते तिकडेच वारल्याचें पुढें आलें आहे. म्हणून 'आपणच कारभार करीत चालले' हें सांगतांना कारभारी कोण कोण ते पहिलेच व त्याच क्रमानें सांगितलें व त्यांत हें नारोपंताचें नांव आलें. तेंच पुनः सांगतो असें 'नारोपंत' एवढें लिहून होतांच लेखकास वाटलें व तें लिहिणें बंद केलें. ह्यामुळें नुसतें हें नांव मात्र मजकुरांत राहून गेलें.

परि. ५—ह्या परि. त 'जुन्नर अमदानगर **मारिलें**' असें म्हटलें. मागील परि. त 'सुपे देश **साधिला**' असें लिहिलें. म्हणजे सुपे परगण्यावर शिवाजीची सत्ता सुरू झाली, तशी जुन्नर अहमदनगरवर नाहीं. दोन्ही ठिकाणीं घोडे वगैरे मिळाले. आणि त्यामुळें शिवाजीनें आपल्या वाढत्या लष्कराकरतां लष्करी अधिकाऱ्याची बदलीहि केली. पण स्वसत्तेंतील मुलुखाची वाढ म्हणजे सुपेपर-

गणा; जुन्नर-नगर हीं सत्तेंतील शहरें नव्हत. तीं फक्त ' मारलीं. ' म्हणजे तेथील कांहीं मत्ता मिळविली, सत्ता नाहीं. पण तेच कोंढाणा व पुरंदर घेऊन तेथें शिवाजीनें आपलें ठाणें ठेविलें ' आहे. म्हणजे हे दोन गड स्वसत्तास्थान केलें.

परि. ६—मोगली सत्तेंतील मुलूख मारणें आणि आदिलशाही सत्तेंतील मुलूख मारणें ह्यांत फरक आहे. ह्या परि०त ' कल्याण–भिवंडी मारिली ' असेंच आहे. पण हा आदिलशाहींतील मुलूख असल्यामुळें ह्या दोन्ही ठिकाणीं शिवाजीनें आपले अधिकारी नियुक्त–नामजाद हवाला—करून पाठविल्याचें अन्यत्र आलें आहे. (ज. श. व करिना पृ. १८ व ४२). तरीहि 'मारली' ह्या प्रयोगाचें दुसरें कारण हें कीं, ह्या ठिकाणीं शिवाजीचा फिरंग्याशीं म्ह० पोर्तुगीजांशीं संबंध आला; व तेथील त्यांचीं तारवें कांहीं मारलीं म्हणजे तीं मिळविण्याचा (व नवीं बनविण्याचा) प्रयत्न केला. **माहुली** किल्ला, जि. ठाणें, ता. शहापूर येथें आहे. हा दोन कारणांनीं शिवाजीनें घेतला. एक वडील शहाजी राजे हे तेथें राहून निजामशाही चालवीत होते आणि हा घेतल्याशिवाय कल्याणभिवंडीकडील मुलूख सुरक्षित व स्वसत्तेंत राहणें कठीण. ह्याच परि०त कोंकणांतील **दोन राज्यांची** प्रथम माहिती देऊन पैकीं त्यांतील एक म्हणजे चंद्रराव मोरे ह्यांचें राज्य कोंकणांत त्यांस मारून तें राज्य घेतलें हें मुख्यतः सांगितलें आहे. दुसरें राज्य सुर्वे यांचें. तें घेतल्याची वार्ता पुढील परिच्छेदांत. पण येथें आधीं मोरे व नंतर सुर्वे ह्यांची माहिती देऊन पैकीं 'मोरे यांजकडे,' असें न म्हणतां एकदम ' त्यांजकडे रघुनाथ बलाळास पाठविलें इ.' आलें आहे. त्यांजकडे म्हणजे मागेंच लगत चिकटूनच सुर्वे माहिती असल्यामुळें त्यांजकडे म्हणजे सुर्वे यांजकडे, असा संदर्भ सहज म्हणून वाटेल. पण तो तपशील शिर्केराज्याचा मानावयाचा. व ' मोरे राज्य करीत होते ' – कोंकणांत व मावळांत–त्यांजकडे अशी जुळणी करावयाची. **त्यास** = पण. **जमातीशीं**–जमातीनिशीं, जमावासह. **नि**–गळंत. चंद्रराव व सूर्यराव–सूर्याजीराव हें जर भाऊ तर चंद्रराव ही मात्र पदवी. ' चंद्रराजपदाकांक्षी ' असें शि. भा. तहि आहे.

परि. ७—सुर्वे यांचे कारभारी शिर्के. त्यांशीं भेद करून, धनी सुर्वे यांजपासून फोडून शृंगारपूरचें राज्य हस्तगत केलें. पण शिर्के यांची कन्या आपल्या पुत्रास ' केली ' म्ह० संभाजीस करण्याचें बोलणें केलें. म्हणजे मुलीची मागणी घातली असावी. कारण ह्याच परि. च्या शेवटीं संभाजीच्या जन्माची वार्ता

आली आहे. अर्थातच येथें लेखकाचा घोटाळा झाला हें उघड आहे. कारण, ज्याच्या लग्नाविषयीं बोलावयाचें त्याचा जन्म तरी आधीं व्हावयास पाहिजे; तो नंतर सांगितला. संभाजी जन्म (इ. १६५७ मे १४) श. १५७९ ज्येष्ठ शु. १२ स; आणि जर शृंगारपूर घेतांना शिरके यांशीं हें लग्नाचें बोलणें आहे तर शृंगारपूर नंतर घेतलें म्हणजे १६६१ एप्रि. २९ श. १५८३ वैशाख शु. ११ स; म्हणून परि. च्या शेवटीं आलेलीं सहा वाक्यें प्रारंभीं म्हणजे परि. ६ च्या शेवटीं पाहिजेत. कारण जावली घेतल्यानंतर एक वर्ष पांच महिन्यांनीं संभाजी जन्म आणि संभाजी जन्मानंतर लग्नाचें बोलणें व शृंगारपूर राज्य घेणें. ह्या परि. त शिवाजीनें पेशवाईवरील अधिकारी बदलला आणि सुरनिस म्हणजे सचिव व वाकनीस (मंत्री) हे अधिकारी नवे केले. अष्टप्रधानांत समाविष्ट करतां येतील असे पहिले तीन व हे नवे दोन एकूण पांच झाले. ह्याशिवाय पायदळावरील व पागेचा म्हणजे घोडदळावरील असे दोन वेगळे सरनोबत केल्याचें सांगितलें आहे. शिवाय कीं, मोरोपंतास ' बहुत मेहनत केली ' म्हणून जर पेशवाई द्यावयाची तर मोरोपंतांची कामगिरी अफजल प्रसंगांत उल्लेखण्याजोगी झाली आहे. सुपें, जावली इ. घेण्यांत त्यांच्या कामगिरीचा निर्देश नाहीं. म्हणून हा परिच्छेद अफजलप्रसंगोत्तरच (म्ह. परि. २३ नंतर) येणें इष्ट व तसा घेतला म्हणजे शृंगारपूर घेणें, इतर अधिकारी मंडळींत वाढ करणें इत्यादि हेंहि अन्यत्र आलेल्या कालाशीं कांहीं जमतें. अंतर्गत मजकुराशीं तर जमतेंच.

प्रकरण २ रें

शिवाजी व अफजलखान

परि. ८—आदिलशाहीमध्यें एकंदर ९ पातशहा झाले. त्यांतील अली आदिल० दुसरा, हा ८ वा. तो, त्याचा बाप मुहम्मद० (१६२७ ते) १६५६ मध्यें मेल्यानंतर गादीवर आला (वय १९). पण त्याची आई हीहि मोठ्या घराण्यांतील म्ह० महमद कुतुबशहाची मुलगी, बडे साहेबा, हीच कारभार पाहात असे. ह्या परिच्छेदांत अफजलखानास शिवाजीवर पाठविण्यापूर्वीं आदिलशाही दरबारनें चांगलीच सावधता घेतली. पिता शहाजी हा जर विद्यमान आहे आणि तो तर आदिलशाहीविषयीं निष्ठा बाळगून आहे, तर त्याच्याकडूनच जर पुत्र शिवाजीचा बंदोबस्त झाला तर बरें; नाहींतर, शहाजी हाहि प्रतिष्ठावान् आणि

फौजबंद व राज्यांच्या उलथापालथी केलेला असा कर्तृत्ववान् सरदार आहे, त्याला न कळवितां शिवाजीवर एकदम परस्पर हल्ला केल्यास तो सहजच संतप्त होईल व तो प्रसंग आणखी वेगळाच उद्भवेल. म्हणून अल्ली आदिलशहानें प्रथम शहाजीस 'आपल्या लेकास कैदवार ठेवणें' असें सुचवून त्याजकडून सोडवणूक करून घेतली आणि नंतर अफजलखानाची पाठवणी केली. व ह्याचें निदर्शक म्हणून शि. भा. कारानें '**शाहराजो दुर्विनीतं तं न शिक्षयितुं क्षमः**'॥ अ. १७–२४ असें आदिलशाहाचे तोंडीं वाक्य घातलेलें येथें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. तसेंच अल्ली अदि० नें शहाजीस, ह्याच वेळीं बहुधा शहाजीच्या पत्रोत्तरानंतर, पत्र पाठवून 'होय, तुमचा मुलगा अराजनिष्ठ; तुम्ही राजनिष्ठ आहां,' असें पत्र लिहिलें (१६५८ मे २६ हौस ऑफ शि. जदुनाथ सर.). '**मग** पुढें' दोन्ही अन्वयें योजिलीं.

परि. ९.—चढे घोड्यानिशीं—हा वाक्प्रचार इतिहासकालांत फार रूढ होता. घोडा हेंच मुख्य वाहन. 'ज्याचे अश्व त्याची मेदिनी' (ज्याचे घोडे त्याची पृथ्वी). माणसाची किंमत सर्वदांच श्रेष्ठ. पण माणसें मेल्यापेक्षां घोडे मेल्यानें नुकसान फार झाल्याचें मानिलें जाई. घोडा हा शब्द व तदनुषंगिक खोगीर, लगाम, पायबंद, गाशा, तोबरा, तबेला इत्यादि शब्दहि निरनिराळे विचार व्यक्त करण्याकरतां उपयोजिलेले आढळतात. 'चढे घोड्यानिशीं' हा त्यांतील एक वाक्प्रचार आहे. झटक्यासरशीं, एका धावणींत; ह्यांत दोनहि बाजू आहेत. जाणारा एका घोडदौडींत जाईल व पकडून आणावयाचे तोहि चढे–घोड्यानिशीं असला तरी पकडून आणील. इजाफा–पुढें देऊन–शब्द आहे तो पायदळच्या पुढें घ्यावयाचा.

परि. १०— तुळजापूरची **श्रीभवानी** कुलदेवता 'फोडून जातियांत घालून भरडून' 'नीचा २१ वे दिवशीं' इत्यादि हा भाग चित्रस. मध्यें नाहीं. उलट 'गंडकीमूर्ति होती ती जळांत गुप्त ठेविली; अन्य नूतन पीठस्थानीं ठेविली ती खानानें फोडिली' असें आहे. पंढरपूर येथील विठ्ठलाविषयींहि चित्र. स. मध्यें पृ. ९ असेंच आहे. शे. ब. त सभा० प्रमाणें आहे. पृ. २५ शिभा. अ. १८-१९ मध्यें '**अवाज्ञायत वै देवी तुलजापुरवासिनी**' दुष्टानें–दुर्नयेन–तुळजापूरच्या भवानीदेवीचा मोठा अपमान केला, असें आलें आहे. 'कार्तिकांत' असें

मोघम सांगून खान व शिवाजी यांचे वकील आले गेले असल्याचें जे. श. त फक्त आहे आणि येथें 'एकविसावे दिवशीं' असा उल्लेख आहे. म्हणजे कार्तिक वद्य १ स खानाचा मुक्काम तुळजापुरास होता असें दिसतें. **पातेजून**-विश्वासून. 'कसे पातेजूं तुझी बालबुद्धी।' (नलदम० आख्यान. रघु. पंडित.) 'पातेजत नाहीं लोकां। तुका देवावांचोनी॥' (१६९९ मुनियांचा हाचि भाव०)

परि. ११—येथें 'सरकारकून' शब्दाचा प्रथमच उल्लेख आला आहे. व ते संख्येनें आठ दर्शित असून आणाजीपंताचा उल्लेख नवा आहे. सबनीस हा अधिकारी अष्टप्रधानांतील नाहीं. सरकारकून व अष्टप्रधान हे दोन वेगवेगळे कीं काय पाहिलें पाहिजे. मागें परि. २ मध्यें सांगितल्याप्रमाणें येथें शिवाजीस श्रीभवानीदेवीचा स्वप्नसाक्षात्कार झाल्याचें आलें आहे. पुढेंहि चार ठिकाणीं असा दृष्टान्त झाल्याचें आलें आहे. शि. भा. तहि देवीचें दर्शन व भाषण दिलें आहे. अ. २० श्लोक १२-२३. हा मुख्यतः भावनेचा व श्रद्धेचा विषय असून हें गणित त्याच दृष्टीनें सोडविलें पाहिजे. दृष्टान्ताचा विचार अदृष्टानें म्हणजे अतींद्रियत्वानेंच लक्षांत घ्यावयाचा आहे. 'स्वाध्यायात् इष्टदेवता संप्रयोगः' ४४ (पातंजल योगदर्शन-साधनपाद) ह्या सूत्रान्वयें पाहतां महान्, थोर पुरुषांच्या ठिकाणीं ही एक तत्कार्य-देवतेची म्हणून संवेदना होते. ही संवेदना ते पुरुषहि कार्यरूपानेंच सांगतात; एऱ्हवी ती त्यांनाहि कारणरूपानें म्हणजे उपपत्तिपूर्वक उघड करतां येत नाहीं. ह्या सूत्रांत सुद्धां 'स्वाध्यायात्' ह्या पदाला महत्त्व आहे. स्वप्नदृष्टान्त ही जीवावस्था वेगळी सांगितली आहे. दिवसांसुद्धां दृष्टान्त होतांना नेहमींच्या जागेपणाहून वेगळी अवस्था जीवाला प्राप्त होते व तेथून तो पूर्वावस्थेप्रत आला म्हणजे दृष्टान्ताचें त्याला स्मरण व अनुचिंतन करावें लागतें. त्याची स्पष्टता 'कारकुनांनीं वाक्यें सांगितलीं' ह्या प्रकारें लेखक अशा स्थलीं करतो. चरित्रनायकाबरोबर चरित्रलेखकाचाहि भाग अशा प्रसंगीं ध्यानीं घ्यावयाचा असतो. अधिक विवेचन येथें नको. येथेंच फक्त भवानी प्रथमपुरुषी पुल्लिंगी प्रयोग करते. पुढें रीतीप्रमाणें स्त्रीलिंगी प्रयोग आहे.

परि. १२ वरघाट—कोंकण, मावळ, वरघाट, घाटमाथा आणि देश असे पश्चिमेकडून पूर्वेकडील भूविभाग सांगितले जातात. समुद्रकांठ २५ मैल रुंदी व लांबी सुरत ते कारवारपर्यंत कोंकण, कोंकणाची पूर्वेकडील सह्याद्रीची रांग

ओलांडतांना जो पश्चिमेकडील तसाच लांबट डोंगराळ भाग तो मावळ. मावळांतून पूर्वकडे येतांना जो डोंगरचढ तो वरघाट, तसेंच पुढें आलें म्हणजे घाटमाथा आणि घाटमाथा ओलांडून पूर्ण सपाट प्रदेश तो देश. येथें मोरोपंतास ' पेशवे ' म्हटलें आहे आणि पहिला पेशवा शामराव नीळकंठ हाहि नुसता उल्लिखित केला आहे.

शिवाजीचा सख्खा थोरला भाऊ संभाजी हा कर्नाटकांत शहाजी महाराजांबरोबर असे. त्यानें आदिलशाही सरदार फर्हादखान व तानाजीराव डुरे ह्यांचा पराभव (इ. १६४८ बंगलूर) केला व अफजलखानाबरोबर कनकगिरी-वरील स्वारींत असतां खानाच्याच कुचराईमुळें किंवा चिथावणीमुळें हा मेला (इ. १६५५). ह्या गोष्टीस अनुलक्षून शिवाजीचें हें बोलणें लेखकानें सांगितलें आहे. ' मारितां मारितां जें होईल तें करूं. ' ह्यांतील होईल तें ' होवो ' असा परिपाठ. पण येथें ' करूं ' असें आहे. शिवाजीनें ज्या मंडळीस बोलावून स्वप्न सांगितलें व पुनः एकदां सल्ला करण्याचा विचार रद्द केला व त्यास आधार म्हणून एक सुभाषित श्लोक दाखल केला. तो श्लोक ' **जये च लभते लक्ष्मीं मृते चापि सुरांगनाः। क्षण-विध्वंसिनः कायाः का चिंता मरणे रणे॥** (हितोपदेश २ : १७२ निर्णय० प्रत) बखरींत आलेला अशुद्ध आहे. ' काया ' असा शब्द संस्कृतमध्यें स्त्रीलिंगी नाहीं.

परि. १२ मध्यें शिवाजी राजगडीं असलेल्या आपल्या मातेचा आशीर्वाद घेऊन प्रतापगडीं आला हें स्पष्ट आहे. मागील परि० तहि ' आपण प्रतापगडास जावें ' हा विचार आला आहे. अर्थात् राजगडास आहे म्हणून ' प्रतापगडास जावें ' हें बोलणें. कांहीं ग्रंथांतुन अन्य प्रश्न व विचार आले आहेत. पण सभासदांचें लिहिणें हें असें आहे व तेंच योग्य. पण ' सला करावा ' ह्या इतरांच्या म्हणण्यास शिवाजी दोनदां नकार देतो. (मागील परि. पहा.) आणि ह्या परि. त मात्र ' खानास जावलीस बोलावतो व सला करून भेटतो ' असें आलें आहे. हा विरोध वाटेल. पण मागील ' सला ' व ह्या परि० तील सला ह्याचे अर्थ वेगळे आहेत. ' वांईस जाऊन सला करणें ' आणि ' जावलीस आणून सला करणें ' ह्यांत शिवाजीची सावधता आहे व त्यामुळें हा फरक लक्ष्यांत येणें थोडेसें सोयीचें होईल. सला व्हावयाच्या भेटींत नेमकें काय होईल हें कळलेलें नाहीं व कळतहि नाहीं. पण जावलीस

आणून भेटणें व सल्याचें बोलणें हें आपल्या स्थलसीमेंतील; म्हणून ' घाटमाथां येऊन मार्ग धरणें ' इत्यादि शिवाजीस सांगतां आलें. शिवाजीचे व खानाचे वकील परस्पराकडे जाऊन भेटतच होते आणि खान व शिवाजी हे एकमेकांस भेटणारच होते. पण दोन्ही भेटींतील फरक न सांगतांहि लक्ष्यांत येतो. शामराव नीलकंठ व त्रिंबक भास्कर हीं दोन नांवें येथें आहेत. मागील परि. त तीं नाहींत, त्रिंबक भास्कराचा निर्देश शि. भा. त पन्हाळगड व प्रभानवल्ली येथील अधिकारी म्हणून आला आहे.

परि. १३, १४—म्हणवून = म्हणून. **पंताजी गोपिनाथ**—मूळ नांव गोपिनाथ रंगनाथ बोकील. पुढें झालें गोपिनाथपंत. मग झालें पंताजी गोपिनाथ, आणि नंतर गोपिनाथ अजिबात जाऊन नुसतें पंताजी; पंताजीसहि पुनः पंत—पद लागून पंताजीपंत. ह्याच गोपिनाथपंत बोकील—हिवरेकर घराण्यांतील पेशवाईतील प्रसिद्ध सखारामबापू = सखाराम भगवंत होत. (स. सं. श. १८४१ पृ. ५४–५७) **खलबत** महाल—महालांत खलबत बैसले = एकान्तीं खलबत—महालांत बसून विचारविनिमय केला. राज्यांतील बारा महाल, अठरा कारखाने ते वेगळे. आणि राहत्या वाड्यांतील दाद—महाल (परि. १०९), राणियांस महाल = दरुणी महाल. (परि. ८८) हे वेगळे. त्याचप्रमाणें वाटाघाट, चर्चा, करण्यासाठीं विचारमन्दिरांत बसले. खलबत = खलबतास, खलबत करण्यासाठीं; चतुर्थ्यर्थीं प्रथमा. बसलें म्ह० चालिलें हा शब्द घेतला तर खलबत हा कर्ता होईल; पण उभयतां महालांत खलबतास बसले, हेंच सरळ व सुबोध होईल. **हस्तपंजराची**—मोडी लेखन असलें तरी पंजा-चें पंजर वाचन होणें कठीण. पंजरच शब्द पंजाकरितां, लिहिला. पंजा उठविलेलें फर्मान ह्याची प्रतिष्ठा मोठा मानली गेली आहे. अफजलखान कशाकरतां पाठविला आहे हें, त्या वेळच्या मावळच्या देशमुखांना जीं आदिलशाही फर्मानें आलेलीं उपलब्ध व प्रसिद्ध आहेत त्यांवरून ' हरामखोरास दफे (नष्ट) करावे. यासाठीं, त्याचे लोक व जनावरें ह्यांची जेथें सांपडतील तेथें कत्तल करावी यासाठीं ' खानास रवाना केलें असल्याचें शिवाजीस कळलेंहि असणें शक्य आहे. तसेंच शिवाजीस, आपल्या येण्याचें निमित्त कळलें असावें हें खानासहि कळलें असणें शक्य आहे. फर्मानेंच मिळालीं आहेत. तर तीं येथील विवेचनांत लक्ष्यांत घेतलीं पाहिजेत. जर घेतलीं तर बखरींतील हें लिहिणें कसें ध्यानांत येण्याजोगें मानितां येईल ? बखरींतील सगळा

भर ' भेट ' यावर आहे. फर्मानांत काय करावयाचें तें सांगितलें; तें घडवून कसें आणावयाचें तें सांगितलेलें नाहीं. आणि तें एका अर्थीं बरोबरहि आहे. तें स्वातंत्र्य खानास होतें. आणि म्हणून खानाचें सैन्य, मुत्सद्दी यांजपाशीं, शिवाजी आपल्या वकिलांस, ' शोध मनास आणण्यास ' जें सांगतो तें याचसाठीं. खानाचे मनांत, ' शिवाजी युद्ध करतां सांपडणार नाहीं. ' त्यांतुन ' तो कुचल जागेंत. ' म्हणजे डोंगरी व चौगीर्द जाळ्या-झाडींच्या मुलखांत. म्हणून खानास त्यांतल्या त्यांत हातचें अनुभवाचें यशःसाधन म्हणजे ' भेट ' हें वाटलें.

परि. १४ मध्यें, खानानें कृष्णाजीपंत व पंताजीपंत ह्या वकिलांसह एकान्तीं विचारणा केल्यावर ' कृष्णाजीपंत बोलिले ' असें आहे, तेथें ' पंताजीपंत बोलिले ' असें पाहिजे. कारण, शिवाजीकडील वकील पंताजीपंत व त्यांशीं खान बोलत आहे. व पुढेंहि तेथेंच 'तूं मध्यस्थ होऊन शपथ देशील तर भेटीस येईन' इ. खान सांगत आहे. व त्याप्रमाणें ' पंताजीपंतीं ' शिवाजीतर्फे ' क्रिया ' दिली आहे.

परि. १५—पंताजीपंत प्रतापगडास येऊन राजास भेटले. शिवाजीनें ह्या आपल्याच वकिलास–पंताजीपंतांस–एकांतीं इतक्या अनुनयानें विचारलें व बोलणें केलें कीं जसा कांहीं तो खानाचाच वकील आहे ! व त्यास आपलासा करून, आमीष दाखवून, खानाचें मनोगत काढून घ्यावयाचें आहे. खानाचा वकील असल्याप्रमाणेंच ह्या पंत वकिलांनींहि शिवाजीस तेव्हांच म्हटलें कीं, ' खानाच्या मनांत दुष्ट बुद्धि आहे; भेटींत दगा करून पकडून तुम्हांस धरून न्यावें असें आहे. तथापि जावलीस आणतो, ' इत्यादि. शिवाजीनेंहि हें सर्व ऐकून पंतांना पांच ह. होन बक्षीस दिले व परत खानाकडे पाठवून ' राजा बहूत भितो, वांईस येण्याचा त्याला धीर होत नाहीं. तेव्हां जावलीस राजाच्या भेटीसाठीं घेऊन येणें ' असा परत निरोप पाठविला. ह्यावरून मागील परि०त जसें पंताजीच्या जागीं कृष्णाजीपंत पडलें; तसें येथें आतां पंताजीपंत हें कृष्णाजीपंताच्या जागीं पडलें कीं काय असा संशय वाटण्यासारखें लिहिणें घडलें आहे.

परि. १६—रडतोंडीचा घाट–हा घाट चढण्यास तर निश्चितच पण उतरण्यासाहि इतका अवघड व कठीण आहे कीं नांवाप्रमाणें रडवें तोंड होतेंच. दुसराहि

घाटमार्ग असाच कठीण आहे; कीं, बसूनच, बेतानेंच, तो क्रमिला पाहिजे. त्याचें नांव बोचेघोळी घाट.

परि. १७—निर्वाह. प्रथम तेथें निर्वाद होतें. व टीपेंत दोन पाठभेद नेम, निश्चय, हे दिले आहेत. पण ते शब्दार्थ वाटतात. मूळ वाचन ' निर्वाह ' हेंच पाहिजे. निर्वाह = निर्णय.

परि. १८—ह्याच परि०तील सतराव्या ओळींतील चार शब्द दहाव्या ओळींत घेतले आहेत. प्रास्तविकांतील ' प्रतशुद्धि ' पाहा. **तोडा बांधिला**–डोक्याच्या रक्षणासाठीं चांदीचा (किंवा सोन्याचा वर्ख लावलेला) तारांचा विणलेला मुकुटवजा बसकर टोप. हा घालून त्यावर मंदील बांधावयाचा. चोळणा म्हणजे विजार, पायजमा, तो घातल्यानंतर कमर वेगळ्या धोतरवजा वस्त्रानें बांधणें हीच कास कसणें असें वाटतें. **भेटीस घेतलीं**—भेटीस जातां वेळीं बरोबर घेतलीं.

परि. १९—इतका सामान काय करावा. एवढी तयारी, इतके सैनिक पाहिजेत कशाला ! इतक्यांचें काय करावयाचें !

परि. २०—' राजे जवळ केले ' = (सैयद बंडा) राजांचे जवळ गेला. **हुद्देकरी** (खानाबरोबर दोघे होते तसे शिवाजीजवळहि होते) म्हणजे धन्याचें हत्यार घेऊन चालणारे शूर अधिकारी. तो स्वतः लढाऊच असावयाचा. पण धन्याचेंहि हत्यार घेऊन धन्याबरोबर असावयाचा अधिकार ज्याला तो हुद्देकरी. जिऊ महालाजवळ शिवाजीचा पट्टा होता. त्या पट्ट्यास 'हुद्धियाचा पट्टा' म्हटलें आहे. **ओढिले**–चार वार ओढिले. ह्या क्रियेचा हा अर्थ लक्ष्य आहे. निवारण केले, चुकविले. स्वतःवर ओढवून घेतले पण ते चुकविले. शिवाजी व सैय्यद बंडा ह्यांमध्यें येथें हातघाई, खडाखडी, समशेरासमशेरी झाली. शिवाजीनें सैय्यद बंडाचे चारहि पट्ट्याचे डोक्यावर येणारे वार कातर करून चुकविले. **हातानें**–वारानें.

परि. २१—भांडें–तोफ. राव्यको. त ' भांडें नाम महायंत्रं ' असें म्हटलें व ' उल्का ' ह्या शब्दानें तोफ व हुका हे दोन अर्थ दिले. खानाकडील लष्करांतील मंडळींचीं जीं नांवें दिलीं त्यांमधील कांहीं नांवें बरोबर लागलीं नाहींत. आडहत्यारी-चे पुढें ' रोचेवार ' हें नांव आहे. ' चंदीस राचेवार मराठे ' असा निर्देश जे. क. त पृ. ४० मध्यें आला आहे. इतर जे लोकवार,

चेलगेवार, हतुलवे त्यांचा उलगडा झाला नाहीं. स. चित्र वरूनहि होत नाहीं. **क्षेत्र**—रणक्षेत्र शब्दाचा हा एकदेश आहे. क्षेत्र-शब्दानें जसें रणक्षेत्र समजावयाचें तसें रण शब्दहि 'मृत्यु' ह्या लक्षणेनें लक्ष्यांत घ्यावयाचा. पुढें 'रण अपार पडलें,' 'रणास आणिले' इ. प्रयोग आले आहेत. तेथेंहि मृत्यु हीच लक्षणा घ्यावयाची. **जमानिदान**—यमाशीं जसा निदानीचा म्हणजे शेवटचा झगडा; त्या तोलाचा झगडा. **पायउतारा** = पायी चालणारे, विनवाहनी लोक. पदाती, (पायदळ,) असें न म्हणतां ज्याअर्थी 'पायउतारा' हा शब्द योजला आहे त्याअर्थी घोडा, हत्ती, उंट, पालखी इत्यादि वाहनांतुन, वाहनावरून उतरून पायीं चालणारे, असा अर्थ लेखकास सांगावयाचा आहे. विशेषणोत्तर कर्मधारय समास म्हणतां येईल. शिवाजीच्या सैनिकांनीं खानाच्या सैन्याची जी तोडातोड केली व त्यांना खानाच्या लष्करांत जी लूट व घोडे इत्यादि मिळालें त्याचें वर्णन शि. भा. अ. २३ मध्यें आलें आहे. **सुमार** = सुटे मोजलेले. अंदाज, सामान्यतः, हा अर्थ नंतरचा. कांहीं पदार्थ तोलून, कांहीं मापून तसे कांहीं सुटे मोजून; तेथें सुमार म्हणावयाचें. कैली म्हणजे मापी, वजनी, तशी 'मोजणी. परिसंख्या' म्ह० बेरीज 'सुमारः परिसंख्या स्यात्' सुमार = निश्चितच पण सुटे, मोजून. जडजवाहीर तीन लक्ष असें बखरींत; शि. भा. त अ. २३. ३, ४ 'राशी' असें मोघम म्हटलें. अफजलसैन्यापैकीं जे कैद केले गेले त्यांत लां-कं-बाजी भोसले असें होतें. पण तेथें **मंबाजी** हें वाचन पाहिजे. ह्याचा उल्लेख 'भृशबलं भ्रातरं शाहभूभुजः। '**मंबो भृशबलस्तथा।**' अ. २२·४६; १७·५७ असा शि. भा. त आला आहे. समासदांनीं तो पाडाव म्ह. कैद केला गेला म्हटलें. शि. भा. त तो मृत्यु पावला असें म्हटलें आहे. तसेंच '**खानाचे पुत्र**' असें मोघम बखरींत आलें आहे, पण ते तीन होते 'तनयः त्रयः' अ. २२·१०, ४४ अशी थोडीशी सूक्ष्म माहिती अन्यत्र आहे. **घांटगे** = 'घांटिकः' पण झुंझारराव ऐवजीं 'राजजिन्नाम' राजाजी (अ. २२·५२) अशी नामभिन्नता असली तरी झुंझारराव ही ह्या घांटग्यांची पदवी होती. ह्यामुळें सभासदानें पदवी व शि. भा. नें व्यक्ति-नांव सांगितलें.

परि. २२—शिवाजीराजांनीं अफजल-मृत्यूनंतर त्याच्याहि सैन्यसरदारांना देकार केल्याचा तपशील बखरींत आला आहे. त्याऐवजीं '**उपायनान्युपानीय नमतस्तान् महाभुजान्**' **आत्मनीनतया श्रीमांश्छिवः श्रीभिः**

समार्धयत ५७ अ. २३. नजराणे अर्पण करून प्रणाम करणाऱ्या (खानाच्या पराक्रमी) सरदारांस शिवाजीनें आपलेपणानें संपत्ति देऊन समृद्ध केलें एवढेंच आलें आहे. **चालविलें**-उत्पन्न-वेतन देऊन चरितार्थ चालविला.

परि. २३—वीरावीरास—' परस्पर, एकमेक, उभयतां ' असें न लिहितां ' एकांत एक, ' ' बंधुबंधूस ' असें लेखन इतिहासकालीं होत असें. त्यांतील हा शब्दप्रयोग. वीरांवीरांचा झगडा. **एकांगीं**—मागें परि. १५ मध्यें हा शब्द असाच आला आहे. एकांगी करून मारिला. एकांगी ही येथें प्रथमा, पण तृतीयाअर्थी प्रथमा आहे. (अंगेजणीनें, आंगें, स्वांगें असे प्रयोग पुढें आले आहेत.) म्हणून तृतीयेचा सहकारी प्रत्यय ' करून ' तोहि आला. आणि ह्याच परि०त पुढेंच त्याचा अर्थहि सुचविला आहे. ' दुर्योधनास एकलें भीमानें मारिला. ' त्याप्रमाणें ' एकांगी करून म्हणजे स्वतःच्या एकट्याच्या बुद्धिशक्तीनें. ' येथें भीम व दुर्योधन ही जोडी शिवाजी व खान ह्यांसाठीं उपमेस घेतली. शि. भा. तांत ह्या यवनपुंगव खानास देवीनें रावणाची उपमा दिली आहे. अ. २०–१४. **साखरा**—साखर. अनेकांनीं व आनंदातिशयामुळें अनेक ठिकाणीं वाटली. साखर-चें साखरारूप केलें. **नगारे करणे केलें**—ह्यांचें वादन **केलें**. पण '**भांडीं मारिलीं** ' असें आहे. भांडें शब्द संस्कृत आहे. पण अर्थ तोफ हा नाहीं. राज्यको. त ' भांडें ' यास ' महायंत्र ' हा प्रतिशब्द दिला आणि उल्का शब्दानें ' हुका ' व ' तोफ ' हा अर्थ सुचविला. शिवाय ' शत घ्नी ' ह्या संस्कृत शब्दानें ' जंबुरा ' व लघुयंत्र म्हणजे ' जबर्जंग ' हे फार्सी शब्द लक्ष्यांत घ्यावे असें म्हटलें आहे. सारांश, भांडें मारणें, तोफ डागणें,-उडविणें ही फार्सीतील रचना आहे ? परि. २१ पहा.

प्रकरण ३ रें

प्रतापगडावर देवीची स्थापना व कारभारव्यवस्था

परि. २४—शहर मारील–'शहर मारील व कोट घेईल.' ह्या प्रयोगावरून मागील ' जुन्नर, नगर, मारणें ' ह्या प्रयोगाचें स्मरण येईल. (परि. ५) तसेंच इतिहासकालीन शहराच्या व राजधानीच्या वस्तीची कल्पना येईल. शहर व कोट वेगवेगळा. कोट = भुईकोट. ह्या कोटांत परिवार, मोठे लोक, लष्कर इ.

शहरवस्ती बाहेर. (गोवलकोट वेगळा व भागानगर किंवा हैद्राबाद तें वेगळें.) परि. ७८ ' सुरत–शहर मारलें. ' पण ' सुरतेचा कोट घेतला नाहीं. ' इ. इ.

परि. २५—त्या उपरांत–त्या उपरि = इकार गेला उपर+अनंतर = उपरांत? **सचंतर**–स्वतंत्र चें विकृत रूप–मंत्र-चें मंतर, यंत्र-चें यंतर तसें स्वतंतर–लेखनाचें वाचन व उच्चार करण्याची पद्धत ह्यामुळें सचंतर झालें. (एक त गळाला) **तुळजापूरची**—प्रतापगडावर श्रीभवानीदेवीची स्थापना--शि. भा. त अ. २० मध्यें ' **इदानिमपि दैत्यारे विमुच्य तुळजापुरम्। उपेतास्मीति जानीहि साहाय्यायैव ते स्वयम् २०** (हे दैत्यशत्रो शिवाजी, सध्यांच तुळजापूर सोडून केवळ तुझ्या साहायाकरतांच मी येथें प्रतापगडावर आहें असें समज) शि. भा. तांत स्थापनोल्लेख नाहीं. पण समर्थांनीं ' **तुळजापूर ठाकेना। चालली पश्चिमेकडे। पारघाटीं जगन्माता। सद्य येऊनि राहिली॥** ' ३६·११ असें सांगून पुनः प्रत्यक्ष ' **प्रतापगिरिचे ठायीं । आदि शक्ति विराजते । कामना पुरती तेथें । प्रचीति रोकड्या जनीं** ६७·२२ **तुळजापूरची माता । प्रतापेंचि प्रगटली । आदि शक्ति महामाया। कुळीची कुळस्वामिनी** २३ ' सभासद बखरीशीं पूर्ण जुळता हा मजकूर आहे. ह्या देवी स्थापनेपेक्षां देवीपूजा–व्यवस्थासंबंधांत असें सांगावयाचें कीं, ह्या श्रीदेवी भवानीचें पुजारीपण म्हणजे भोपेपण शिवाजीराजांनीं स्वतःकडे घेतलें आणि आपलें भोपेपणाची मुतालकी मंबाजी बिन गोमाजी नाईक पानसरे सोनवणी यास दिली. (केसरी प्रबोध पृ. ८३४-३५ व पोतदार गौरवग्रंथ मराठी वि. पृ. ३०). दुसरेंहि असें कीं, स्थापनेच्या वेळीं देवीच्या मूर्ति दोन केल्या. एक स्वतःबरोबर नेहमीं पूजेसाठीं व दुसरी प्रतापगडीं स्थापना केली ती. बरोबर नेहमीकरतां केली ती मूर्ति लहान असेल पण त्याबाबत लक्ष्य गोष्ट कीं, ह्याबरोबरच्या देवीची पूजा **परमानंद** यांनीं करावयाची आहे. परमानंद पोलादपूरकर ह्यांचा निर्देश शि. दि., शेडगांव ब., म. सा. व ९१ क. आहे. (दोन मूर्ति व परमानंद कवींद्राकडे पूजा हा भाग नवीन व तो राजवाडे संग्रह भा. इ. सं. मं. तील एका त्रुटित बखरीचीं पानें आढळलीं त्यांत आहे.)

परि. २६—ह्या परि०त खानमृत्यूनंतर विजापूरची पातशाही कमतर पडली असें जाणून शिवाजीनें तळकोंकण काबीज केलें हें सांगितलें. तें ठीक. पण लगेच वरघाटहि घेऊन बालेघाट, कलबुर्गे, परांडें, आवसे, उदगीर, गोदातीर,

पर्यंतच्या मुलुखावर नेताजी गेला व खंडण्या घेतल्या, औरंगाबादेंतहि युद्ध, अशी 'मोगलाईत धुंद उठविली ' हें जें लिहिलें तें तितकें सर्व एव्हां खरें नाहीं. हा भाग बराच पुढला आहे. एवढें खरें कीं, शिवाजीनें अफजलखानाला मारलें ना; मग थांबा आतां थोडें; असें मुळींच केलें नाहीं. दुप्पट जोरानें राजा स्वतः उद्योगाला लागला व आदिलशाही मुलुखावर स्वतः गेला आणि नेताजी व मोरोपंत ह्यांना स्वारीस पाठविलें. मग लेखकानें हें येथें कां लिहिलें तर लेखकास आतां शाघिस्तेखानाचें प्रकरण सांगावयाचें आहे आणि तो दिल्लीकर मोंगली सरदार म्हणून 'मोंगलाईत धुंद उठविली ऐसा पराक्रम करीत चालिले ' हें सांगितलें.

परि. २७--ह्या परिच्छेदापासून तों परि० ३४ अखेर ८ परिच्छेदांत शिवाजीनें आपल्या राज्यांतील गडावरील, पागा म्ह० घोडदल, स्वारी, म्ह. लष्कराची रीत, पायदळ; त्यांचें वेतन, दप्तरपद्धती, जमीन मोजणी व सारा-वसुली आणि देव-देवस्थानाकडील नेमणुका इत्यादि राज्यकारभारव्यवस्था सांगितली आहे. **एका प्रतीचा**—तिघेजण आपापल्या कामांत निष्णात व सारख्या योग्यतेचे; ह्या तिघांनीं एकमतानें कारभार करावा. लष्करी लोकांकडून जामीन घ्यावा, सबनीस लोकांकडून ओळख घ्यावी, **प्रतीमेळ**—एकास एक असे तिघे असले तरी एकाच मेळाचे. प्रतीचे = सारखे, तुल्य.

परि. २८ लष्करांत पागा—(हुजरातीचे) खास घोडदळ, व दुसरे शिलेदारी स्वार मिळून लष्कर.

बारगीर २५ = १ हवालदार.
हवालदार ५ = १ जुमला बारगीर १२५ ' शताधिपः ' ७७
जुमले १० = १ हजारी „ १२५० ' साहस्रिकः '
पंचहजारी ५ = १ सरनौबत „ ६२५० ' चमूपालः '

परि. २९— ' खंडणी केल्या जागा ओळखियास ब्राह्मण न द्यावा ' असें पूर्वी होतें. पण ही वाचनांतील चूक होय. मोडी अक्षरवळणांतील सारखेपणा व लपेटबंद लिहिणें ह्यामुळें ही चूक झाली. प्रास्ताविकांतील प्रतशुद्धि पहा. **सरदेस**--मुलखाचे सरहद्दीस. परमुलुखांतून आपल्या मुलुखांत येतांच आपली सरहद्द लागल्याबरोबर. मधील दोन अक्षरांचा विपर्यय झाला व

सद्रेस–चें सरदेस असें नाहीं. सरहद्द ह गळाला. कारण 'मुलखाचे सरदेस' असें आहे. **छावणी**चे अर्थ दोन. स्वारीवर असतांना सैन्याचा तळ जेथें ती, (शिबिर) गोट; आणि स्वारी आटोपून आपापल्या गावीं घरीं येणें त्यासहि 'छावणीस येणें' म्हटलें आहे. शिवाजीचें सैन्य कोकणांत चिपळूण तर्फपैकीं मौजे दलवटण ह्या ठिकाणीं तळ देऊन राहिलें त्यास 'छावणी' म्हटलें आहे. खं. ८ ले. २८. हें पत्र अवश्य अवश्य वाचावें.

परि. ३० नाईक—गडव्यवस्थेंत 'नऊ पाईक दहावा नाईक' ह्राच न्याय येथें. दाहा लोकांत एक नाईक, घोडदळांत पंचवीस बारगिरांवर एक हवालदार, पायदळांत पंचनायकी म्ह० पन्नास लोकांवर एक हवालदार. जुमलेदाराचे पदरीं दोन अथवा तीन हवालदार म्ह० शंभर अथवा दीडशें पदाती सैनिक असावयाचे.

पदातीं सैनिक	९ = १	नाईक	नायकवाडी
,, ,, ...	५० = १	हवालदार	'पत्तिपाल'
(हवालदार २।३) १०० वा	१५० = १	जुमलेदार	'पत्तिस्तोभी'
(पदाती १ ह. वा १॥ ह.)जुमले	१० = १	हजारी	'नायकवाडी ?
(पदाती ७ ह. किंवा १०॥ हजारी	७ = १	सरनौबत्	'दलवाही'

ह्या हिशेबानें एका सर्नौबताचे हाताखालीं ७ किंवा १०॥ ह. पायदळ सैन्य असावयाचें.

परि. ३१— ह्या परि०तील 'वराता देत होते,' 'आकार हक्कांत धरीत होते,' 'साळझाडा करीत होते' असे प्रयोग आहेत. म्हणजे वराता 'द्याव्या' इत्यादि विद्ध्यर्थी प्रयोग नाहीं, रीतिभूत काळ आहे. हें लेखन ध्यानांत घेण्याजोगें आहे. ह्याचा अर्थ लेखक पाहिलेलें तें येथें लिहीत आहे असा आहे. **मोकाशी**–ज्यांना मोकासा दिला आहे ते मोकाशी बलिष्ठ व वरचढ जाहालियास रयत 'अफरा' होईल म्हणजे गांव सोडून जाईल किंवा बळावेल. आणि=किंवा. मोकाशी –शब्दानें मोकासपणाचा गुण वरचढपणा, चढेलपणा हा घ्यावयाचा. वरील 'देत होते' हे प्रयोग लक्ष्यांत घेतले म्हणजे 'मोकासे कोणास देणेचे नाहींत' ह्याचा अर्थ 'देत नसत' असा उघड होतो.

परि. ३२ सरबरा–चौकशीस ह्यामध्यें डॅश पाहिजे. 'दप्तरदारी, कागदघडणी, मोसबा करून दिल्हा' असा संदर्भ लावून हें वाक्य उलगडावयाचें. 'दप्तरदारी

करून ' म्ह० निरनिराळे वसूल, वराता दिल्या त्या, वसाहतीनिमित्त बीज दाणा दिला तो इ. इ. कशा पद्धतीनें लिहिणें करावयाचें तें सांगून, कागदघडणी म्ह० प्रांतवार, गांववार व कूलवार केलेल्या खतावणीचे सुटे कागद (= बोटखत) करून हिशेब दिला म्हणजे त्याप्रमाणें दप्तरी कारभार करण्यामध्यें जो शाहाणा तो पाहून ठेवावा. पहिल्या दप्तरदारीचा अर्थ दप्तरीकामाचा माहितगार व पुढल्या दप्तरदारीचा अर्थ दप्तरीअंमलदारींतील तज्ज्ञ हा असावा. **पादशाहींत चाकरी**—ज्याला ही दप्तरी लिहिण्याची कामगिरी झेपणार नाहीं त्याला ' अन्यत्र नोकरी पहा ' हें सांगण्याऐवजीं ' एखाद्या पादशाहींत जा,' किंवा ' स्वतःचें घोडें घेऊन सैनिकी शिलेदारी कर ' हें सांगावयाचें. असें हें दप्तरी–काम सैनिकीपेक्षां कठीण आणि जाणकारीचें होतें. **सुभेदार** व कारकून नेमतांना उत्पन्नाचें प्रमाण लक्ष्यांत घेतलेलें दिसतें. लाख होन उत्पन्न असेल तेवढ्या प्रांतावर सुभा नेमावा असें म्हटलें आहे.

परि. ३३—तसू, हात, काठी, बिघा व चावर अशीं पांच चढतीं मापें जमीन मोजणीचीं दिसतात. १४ तसूंचा हात, पण ५ हात ५ मुठींची म्हणजे ८२ तसूंची काठी सांगितली. म्हणजे ५ मुठींचे १२ तसू धरले आहेत. **आयुर्दाव** = (आयुर्दाय – य – चा व झाला.) प्राप्ति. **जमीदार**- हेंच, देशमुख ह्या देशी शब्दाचें फारसी नांव. वतनदार जे, त्यांस ' मिरासदार ' म्हटलें आहे.

परि. ३४—व्यवस्थेसंबंधीं सांगितलें त्याचें सामान्यतः संकलन करतांना ' **हुजुरातीची** चौकशी ' हा शब्द आला आहे. म्ह० पागा, लष्कर, पायदळ ह्या संबंधांत आला नाहीं. गड व तनखाव्यवस्था ह्यामध्यें आला आहे. पण त्याचा प्रत्यक्ष संबंध लष्कराशीं नाहीं. आणि येथेंहि ' हुजूरहून, ' हुजरातीकडून म्ह० स्वतः शिवाजी किंवा सरकारकून यांकडून चौकशी ह्या अर्थानें आला आहे.

शिवाजीची ही सर्व राज्यकारभारव्यवस्था अफजलखान वधानंतर ह्या बखरींत दिली आहे. पण ती एव्हां शक्य दिसत नाहीं. आग्र्याहून आल्यानंतर जी मोगलाईच्या बाजूनें तीन वर्षें सामान्यतः स्वस्थतेचीं गेलीं (इ. १६६७–७०) त्या कालांत हा व्यवस्था–विभाग मानतां येईल. विशेषतः ' एकानें सिद्धसंरक्षण करावें, एकानें साध्य करावें ' हा जो ' सरंजामी ' खात्यांतील नियम खं. ८ ले. १० मध्यें आला आहे (ले. १९, २१, २२) त्या कालांत म्ह. १६७०–७२

हा ह्या व्यवस्थेचा काल मानणें आज इष्ट वाटतें. तथापि शि. भा. कारांनीं शृंगारपूर घेतल्यानंतर '**नयवर्त्म प्रतनं प्रवर्तयन्** ' प्राचीन राजनीतिमार्ग चालू केल्याबद्दल अ. ३२ श्लोक १ मध्यें ओघांत सांगितलें आहे. तेंहि लक्ष्यांत घेतलें पाहिजे. जसजसा प्रांत वाढत गेला, कारभाराचा विस्तार होत चालला तसतसे नवीन अधिकारी नेमणें, जुन्या अधिकारांत वाढ करणें, नवे नियम आंखणें इत्यादि शिवाजीस करावें लागलें असणें हेंच क्रमप्राप्त आहे. एकदमच सर्व व्यवस्थापद्धति केली असेल असें नाहीं. सभासदाच्याच लिहिण्यावरून सैन्यव्यवस्थेंत वगैरे दोनतीन ठिकाणीं हा व्यवस्था–प्रकार दिसून येतो.

प्रकरण ४ थें

शास्ताखान व राजा जयसिंग स्वारी

परि. ३५—'मोंगलाईत धुंद उठविली' हें जें परि. २६ चे अखेरीस लिहिलें व तें कां लिहिलें हेंहि तेथें सांगितलें, त्याच कारणाकरतां व तेंच वाक्य प्रारंभीं घेऊन ह्या प्रकरणास व परिच्छेदास प्रारंभ केला आहे. **शास्ताखान**–पातशहाचा 'नातलग' असें मोघम जरी म्हटलें तरी पाठांतरांत 'मावसा' हें नातें दिलें आहे. शि. भा. अ. २५, २७, २८ मध्यें 'बलिना मातुलेनाद्धा शास्ताखानेन रक्षिताम्।' (३३) 'दिल्लीपतेर्मातुलः। (५२) 'इंद्रप्रस्थेंद्र-मातुलः। (४६) हे उल्लेख आले असून 'स्वामिनो मातुलस्तावच्छास्तिखानोऽतिवीर्यवान्' किंवा 'शास्तिखानोऽपि छद्मना केन निर्गतः' हे निर्देश पर्णाल ग्र. अ. २ मध्यें आले आहेत. 'मातुर्भ्राता तु मातुलः।' मामा हें नातें आहे.

गोटांत शिरून मारामारी करणें हें देवीनें सांगितलें. देवीच्या संदेशांत मुख्यतः अभय असतें; मार्ग, उपाय कथन केलेला नसतो. पण येथें 'गोटांत शिरून मारामारी' हा उपाय सांगितलेला दिसतो. येथें ही विचारणा कीं 'रात्रीं जर **देवी आंगांत** बोलूं लागली' तर जवळ कारकून कोठले ? येथील भाग असा कीं, दिवसांसुद्धां अशी कांहीं संवेदना होत असतां व्यक्ति जागीच; पण नेहमींच्याहून वेगळ्या अवस्थेंत असते. म्हणजे, आपलेंच आपण बोललेलें, पण नेहमींच्या अवस्थेंत आल्यानंतर तेंच आपलें बोलणें स्वतंत्रपणें पुनः ध्यानीं आणावें लागतें. हा प्रकार लेखकास मुख्यतः सांगावयाचा

आहे व त्यासाठीं 'कारकून होते त्यांनीं श्रीचीं वाक्यें राजियास सांगितलीं' इत्यादि लिहिलें. **मध्याह्नरात्र** – 'अह्न' पद गळंत मानावयाचें. मध्याह्न = मध्य. **आंगेंच** – 'राजियानें आंगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन' असें नाहीं. "सांगोन बाड कटारीनें चिरून 'आंगेंच' आंत शिरलें" हें युक्त. 'आंगें शिरून' असाच शब्दप्रयोग पुढें ३९ व्या परि०त आला आहे. त्यावरून हें साधार होत आहे. **यांचा** – शिवाजीराजांचा.

परि. ३६—(चालू) 'डेरियांत डेरे सात व दाया असा समुदाय बायका होत्या.' 'सात'–चें खानहि वाचतां येईल. पण 'खोजे' हें युक्त दिसतें. 'खोजे व दाया असा समुदाय बायका होत्या' हें सरळ व सहज दिसतें. पुढील परि०त 'खोजे यांसि जखमा जाहाल्या' असें आलेंच आहे. प्रतशुद्धींत हें दिलें नाहीं.

परि. ३७—'उगवालियावर-उपरान्त' वर आणि उपरांत दोन्ही अव्ययें योजिलीं. उपरांत–उपर व अनंतर ह्यांचा उच्चार उपरांत झाला ? उपरि–तील इकार गळाला, रीति–रीत, गति–गत–प्रमाणें. उपर म्ह० नंतर असा एकार्थक सजोड शब्द वापरण्याच्या–नामाभिधान प्रमाणें–थाटांत झालें ? नंतर–र-गेला. परामृषास–परामर्ष–चें मराठींत त्या कालांतील लेखन. परामृष = समाचार, आस्थापूर्वक चौकशी. **खोजेयासि**–मागील परि. पाहा. **तूट** विचार–जोडता नव्हे तोडता, धैर्यापासून तुटक. विसंगत, अयुक्त. धैर्य खचलेल्याचा; विचार तो तूट विचार.

परि. ३९—'आंगें शिरून' परि. ३६ पहा. **त्याकरतां**–अशा स्थितींत. **निवडितां**–निवड करतां करतां. **जाणोन**–जणूं मीच जातों असें समजोन. **नाना जातीचें** 'युद्धसाहित्य' हा शब्द अध्याहृत घ्यावयाचा–दिलें. **उजबाक** –साने प्रतींत उन्माद आहे. मागें परि. २१ मध्यें उजदीन पठाण असें आलें आहे. मोडी अक्षरवळण आणि लेखकाची लपेट ह्यामुळें हीं दोनहि नांवें वाचलीं जाणें शक्य आहे. उजबेक हेंहि वाचन होईल. शि. भा. त अ. २५ मध्यें व शायिस्तेखानाबरोबर दिलेल्या सरदारादि वीरांचीं नांवें ५५ दिलीं आहेत; त्यांत '**हैदखानोऽप्युजबखस्त्रयोऽमी समरोन्मुखाः ॥**' ३८ ॥ असा उल्लेख आला असून उजबख हें नांव आलें आहे. महमद कासम फेरिस्ताच्या इतिहासांत आग्र्याचा अधिकारी उजबग-शिकंदर-खान-हा दिला आहे. **त्यास**=परंतु.

परि. ४०—देवी प्रयोगीं—शक्तिपंथांतील किंवा तंत्रपंथांतील पूजाप्रयोगाप्रमाणें. 'शाक्तप्रमोद' ग्रंथामध्यें पृ. ३०८–३३२ **बगळामुखी तंत्र** दिलें आहे. घोड,–गज,–सिंह मुख असलेले जसे मुनि, देव आहेत; त्याप्रमाणें **बगळा–मुखी.** ही दश महाविद्यांपैकीं एक विद्यादेवता असून रुद्रयामल तंत्रामध्यें बगळामुखी-स्तोत्र आहे. ही द्विभुजा आहे. '**देवी श्री बगलामुखी रिपुकुलारण्याग्निरूपा च या। तस्याश्चापविमुक्तमन्त्रसहितं प्रीत्याऽधुना ब्रूहि माम्॥** असें हिचें स्तवन पठित आहे. **कालरात्रि**–प्रसिद्ध 'सप्तशती' मध्यें '**कालरात्रि-र्महारात्रिर्मोहरात्रिश्च दारुणा**' (अं. १·५९) ह्याप्रमाणें उल्लेख असून त्यास अनुसरून कालरात्रिसंबंधीं कामनासिद्ध्यर्थ अनुष्ठान सांगितलें आहे. कालरात्रि–चा सर्वसामान्य अर्थ अमावस्या. पण विशिष्ट विधिप्रसंगीं आश्विन वद्य १४ हा अर्थ आहे. हें अनुष्ठान झालें असल्यास तें बहुधा दिल्लीस झालें असावें. पुढल्या कोठल्याहि मुकामांत (बऱ्हाणपूर, औरंगाबाद इ.) इतकी सवड दिसत नाहीं. दिल्लीस मात्र आश्विन ते मार्गशीर्ष ह्या अवधींत हें शक्य आहे. 'सप्तशती'चे कोटि संख्येपर्यंत पठण. चंडी हें देवीचें नांव. ह्यालाच कोटचंडी म्हटलें व तशी रीतिहि आहे. नवचंडी म्हणजे नऊ वेळां सप्तशतीचे पाठ करणें.

राजांच्या कर्तबगारीप्रमाणें राज्याच्या व त्याबरोबर भारतांतीलहि सीमा रेषा बदलतात. दक्षिणेंतील होयसल यादव ३ रा वीर बल्लाल १२९२–१३४२ राजानी प्रथम तुंगभद्रा, नंतर कृष्णा ही नदी आपली उत्तर सीमा रेषा सांगितली आहे. पराक्रमांत वाढ व संकोच हा, ही सीमा कोणती तें ठरवितो. नद्या आहेत तेथूनच वाहतात. कर्तृत्व वर्धमान झालें; नदी ओलांडली म्हणजे सीमा बदलली.

परि. ४१—बेमान–बे-इमान इ-गळंत. **पातशहाचा** अंतर्गत; नाहींतर 'पात०च्या मेहेरबानीचा' असें सामान्यरूप पाहिजे. ह्याहि प्रसंगीं श्रीभवानीचा संदेश लेखकांनीं दाखल केला आहे. राज्य २७ पिढी दिलें. अनेकवचन पिढीच ठेविलें आहे. दक्षण म्ह० नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील पण गोदावरीपर्यंतच शिवराज्य–दाक्षिण सीमा गोदा पुढें दोन तीन ठिकाणीं दिली आहे. वाक्यें लिहून

ठेवून ठेविलीं होतीं ' ठेवून ' आधिक. राजे ' यास ' तरी पाहिजे किंवा संतोष-चे जागीं ' संतुष्ट ' होऊन पाहिजे. ' राजियानीं ' ह्या तृतियान्त कर्ता अध्याहृत.

परि. ४२ — एकाचें एकच–' आम्ही तुम्ही एकच ' आहों, एवढें चालेल. पण दुजोऱ्यासाठीं ' एकाचे ' शब्द अधिक घातला.

परि. ४३ — जोरावर–जोरदार. वर ह्या अव्ययाचा दार-प्रत्ययार्थी उपयोग. ' त्यांनीं ' सांगितलें; ' त्यांनीं ' अध्याहृत.

परि. ४४ — गड=गिरिदुर्ग, घेणें हें जयसिंगास कठीण काम वाटत होतें. शिवाजीराजांचें राज्यवैभव म्हणजे हे गडकोट. त्याचें महत्त्वाविषयीं ' आज्ञापत्र व राजनीति ' पृ. ३९–५१ प्रकरण ८ पहा. ह्याच बखरींत ' गडाकरितां मुलूख जप्त होतो ' असें आलें आहे.

परि. ४५ — नामजाद शब्दसंबंध सरदार-शब्दाकडे लावावयाचा. **घोरतर**-चें घोरांदर. ' साठी लोक ' हेंच पथकाचें नांव. त्या पथकांत तितकेच लोक असावयाचे. हें पथक अत्यंत शूर म्हणून निवडलेल्यांचें असे. परि. ६६ पहा. ' ते ' अध्याहृत, 'यानीं घेऊन ' ते 'चालून आले.' ' एक मुरारबाजी पडला तरि काय जालें ? ' आम्ही तैसेंच शूर व निष्ठावंत आहों, त्याच्याप्रमाणेंच लढणार. ' ह्या ठिकाणीं परि. ६ पृ. ५ वरील ' खासाच पडलियावर लोक काय चालून येतात ? ' हें चंद्रराव मोरे प्रकरणांतील वाक्य लक्ष्यांत आणावें. म्हणजे शिवसैनिकांचें वैशिष्ट्य ध्यानीं येईल. **असा शिपाई** खुदानें पैदा केला. हाच अर्थ ' हा ईश्वराच्या घरचा शिपाई ' (दत्ताजी शिंदे भा. ब.) ह्या वाक्यानें सांगितला आहे. अशासाठीं ' ईश्वरी देणें ' हें समर्थ सुचवितात.

गणना न करतां=न कचरतां, मनानें न खचतां. **शर्त** हा अरबी शब्द जोडाक्षर सुटें करून लिहिला आहे —शरतीनें.

परि. ४६ — आपाप-आपोआप. आत्मन: आपणहून. ' गड घेईन तेव्हां पगडी बांधीन ' अशा प्रकारची ' होड, ' ' पण ' इतिहासकालीं करीत. अमुक काम केलें तरच तोंड दाखविणें; एक मिशी उतरून ठेवणें, डाव्या हातानें रामराम करणें, अंगावरील जखमा–अर्थात् छातीवरील मुख्यत:–हेंच भूषण म्हणून दरबारांतहि उघडेंच बसण्याची परवानगी मागणें; इ. इ. इतिहासकालांतील जीवनांगांतील ह्या मानसन्मानाच्या खुणा लक्ष्य आहेत. पगडी ' बांधीन ' म्हटलें आहे.

हलवारी असें मुळांत. शे. ब. त 'हलकेपणा' आहे. स. चित्र. मध्यें नाहींच. तेणें वजेनें–तत्तुल्य. [शहरवजा हें खेडेगांव आहे.] (अरबी वजह्=सारखें, सम)

परि. ४७—'आणि पुण्याहून कूच केलें' अन्य उल्लेखांवरून व येथील संदर्भ पाहतां जयसिंहाचा गोट पुरंदर व सिंहगड ह्यांचे दरम्यान (म्हणजे सासवडजवळ) आहे. व तेथें शिवाजीचा वकील व मागाहून स्वतः शिवाजी जयसिंह-भेटीस गेला. व तेथून, दिलेरखानाला बरें वाटावें, मान द्यावा व आपलासा करावा असें जयसिंहाच्या सांगण्यावरून वाटून शिवाजी पुरंदरच्या पायथ्यास खानाचा गोट, तेथें भेटीस जाऊन परत जयसिंगाकडे आला. रात्रीं डेऱ्यांत शिवाजीचा मुक्काम व जयसिंगाशीं बोलणें व लगेंच हें वाक्य. म्हणजे ह्या वेळीं कोण पुण्यास व तो तेथून, निघतो व कोणीकडे जातो? जात्या ठिकाणावरूनहि कोणीं कूच केलें हें हेरतां आलें असतें. पण तसें सूचक कांहींच नाहीं. जयसिंह किंवा शिवाजी पुण्याहून कूच करण्यापूर्वी ते दोघे किंवा एक पुण्यास आल्याचा आढळ होत नाहीं. तूर्त शिवाजीचें हें कूच असावें व तें जयसिंगाबरोबर विजापुरावरील स्वारीप्रसंगानें असावें, असें म्हणणें इष्ट.

परि. ४८—**त्यास**=परंतु; **तोंपर्यंत**–एका अर्थी दोन अव्ययें.

प्रकरण ५ वें

शिवाजी राजांचें आग्र्यास जाणें व येणें

परि. ४९—'**येणेंप्रमाणें**' व पुढेंच 'यांसहवर्तमान' दोहोंपैकीं एक चालेल. त्याहिपेक्षां पुनः 'सदर्हूप्रमाणें बरोबर घेऊन' हेंहि आणखी ह्याच वाक्यांत आलें आहे. **आग्रा** कीं दिल्ली? सर्व मराठी बखरलेखक शिवाजी दिल्लीस पातशहाच्या भेटीसाठीं गेल्याचें लिहितात. ह्याचें कारण दिल्ली हीच मोगल पातशहांची राजधानी व हें सर्वांना माहीत. तसेंच औरंगजेब पातशहा हाहि दिल्लीसच (इ. स. १६६६ जाने. २२) होता. पण औरंगजेबानें थोरल्या भावास ठार करून, बापास–शहाजहान–तुरुंगांत (इ. १६५८–६६) ठेऊन स्वतः पातशाही मिळविली तरी बाप जिवंत असेंपर्यंत, औरंगजेब आग्र्याला कधीं गेलाच नाहीं. कारण आग्रा येथें बाप कैदेंत होता व तेथेंच तो मेला. बापाच्या मृत्यूनंतर व आग्रा येथेंच औरंगजेबानें आपला पन्नासावा

वाढदिवस फार मोठ्या प्रमाणांत करण्याचें ठरविलें. आग्रा येथें पातशाही तख्त आणविलें व सर्व तयारी केली. सारांश, जयसिंहामुळें शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस जाण्याची वेळ व औरंगजेबाची वरील कारणामुळें आग्र्यास येण्याची वेळ एक आल्यामुळें भेट–प्रसंग आग्रा येथें घडला. जेधे शकावली, जेधे करिना ह्यांमधून 'अगरियास पाऊन', 'आगरियांतून पेटारियांत बैसोन' 'त्रिंबकपंत व रघुनाथपंत' अगरा धरिले' (पृ. २३, २४) 'आगरियास जाऊन पातशहाची भेटी (पृ. ४७) असे उल्लेख आहेत. म्हणून आग्रा हेंच शिवाजी–औरंगजेब ह्यांच्या भेटीचें ठिकाण. तथापि दिल्ली हीच सर्वांना राजधानी म्हणून अधिक माहीत आणि ह्या आग्राप्रसंगांतील कांहीं घटना दिल्लीसहि घडल्याचे निर्देश आहेत. वरील त्रिंबकपंत व रघुनाथपंत हे जरी 'अगरा धरिले' तरी सोडतांना 'दिल्लीहून सुटले' असे जेधे श०तच म्हटलें आहे. इत्यर्थ कीं, भेट आग्रा येथें हें खरें.

परि. ५०—आमखास–दिवाण–इ–आम व दिवाण–इ–खास म्हणजे 'सर्वांच्यासाठीं' आणि 'निवडक–विशेष लोकांसाठीं' असे वस्तुतः दोन दर्बार. पण आमखास हा एकच शब्द धरून त्याचा अर्थ दर्बार असाहि सांगितला आहे. आग्र्याला गेल्यानंतर 'मुहूर्त पाहून' पातशाहाचे भेटीस चालले.

ही घटना घटकेच्या दृष्टीनें चालेल. पातशहाच्या भेटीचा दिवस ठरलेलाच होता. **तीन सलाम**–लेखकास पिता शहाजीचा मृत्यु आग्रा प्रसंगानंतर सांगावयाचा असल्यामुळें तिसरा सलाम 'महाराज पितियास' ह्या भावनेचा लिहिला. वस्तुतः शहाजीमृत्यु आधींच झाला आहे. आणि नमस्कारासाठीं पिता विद्यमानच पाहिजे असें नाहीं. पण लेखकाचा भाग तो आहे.

परि. ५० हवेली—'पातशहांनीं एक हवेली जागा सचंतर शिवपुरा म्हणून वसवून [तेथें राजे] राहिले.' ही 'हवेली' आणि 'शिवपुरा' म्हणजे शिवाजीच्या राहण्यासाठीं उभारलेला तंबू–डेरा असावा. कारण, दरबारांतील भेटप्रसंग झाल्यानंतर 'डेरियास जाणें' सांगितलें. त्याप्रमाणें रामसिंग व राजे यांचें बोलणें झालें (परि. ५१). परि. ५४ मध्यें शिवाजी जाफरखानास भेटून परत 'डेरियास' आले. परि ५५ मध्यें पोलादखान कोतवालानें राजाच्या 'डेऱ्याभोंवतीं' चौकी दिली असें आहे. म्हणजे डेऱ्यालाच हवेली, कोठी म्हटलेलें दिसतें.

उद्यां साद्यां–उद्यां–परवां किंवा उद्यां–बिद्यां असें न म्हणतां 'साद्यां' असा शब्द आला आहे. 'बि'–चें वाचन 'सा' झालें कीं न कळें ! 'संतोष' परि ४१ पाहा.

परि. ५१—'आम्हांस मोठी जोड जहाली.' जें पाहिजे होतें तें मिळालें= मिळेल. मोठ्या यशाची प्राप्ति होईल. यश, ईप्सित हें नेहमीं गळंत असतें- म्हणून मोठी; नाहींतर मोठ्या असतें.

परि. ५३—पूर्वील ह्यांतील ईल–प्रत्यय षष्ठ्यर्थक आहे. (पूर्वील = पूर्वीचा; वरील, खालील—इ.)

परि. ५४ कळोन—कळल्यामुळें.

परि. ५७ – दोन कोसांवरि—तीन कोसांवर गांव होता तेथें आधीं गेलेल्या मंडळींनीं रहावें असें योजिलें होतें. पण शिवाजी दोन कोसांवरच पेटाऱ्यांतून उतरले. म्हणजे पेटारेवाल्यांना उतरले हें कळलें तरी कोठें गेले हें न कळावें. **लाग** करून = पाठलाग क०. असें **करून** = योजून, पाठलाग न व्हावा म्हणून जर जाणें तर तें उत्तरेकडे. म्हणजेहि दिल्ली नसून आग्रा हेंच भेटीचें ठिकाण ठरतें.

परि. ६०—त्याजवर–त्याजमुळें. **फौजांत ताकीद करून**–फौजेस; घोडदळ, पायदळ, उंटदळ अशा प्रत्येक सैन्यास स्वतंत्र फौज म्हटलेलें दिसतें. लष्कर–शब्दांत सर्वांचा समावेश, सैन्य शब्दाप्रमाणें. पण फौज म्ह० घोडेस्वार. फौजेस ताकीद असें नाहीं, फौजांत–फौजांस ताकीद. पुढेंहि 'फौजा स्वार जाहाल्या' असें फौज–चें अ. व. आहे. पुष्कळ, मोठें ह्या अर्थीं बहुवचन वापरलें. नाना परींचीं सोंगें शोध '–सोंगें ' घेऊन त्या त्या प्रकारांतील वेषधाऱ्यांत शोध किंवा नुसत्याच त्या त्या पंथीयांत शोध. दुसरा अर्थ गृहीत.

परि. ६१—'आपल्या राज्यांत जाऊन' असें आहे. शिवाजी स्वसत्तेंतील मुलखास आपलें 'राज्य' म्हणतो.

प्रकरण ६ वें

आदिलशाहीशीं युद्ध

परि. ६२—मागती = परत. ' राजकारण यत्न करून ' राजकारण हें यत्नाचें विशेषण नव्हे. राजकारणी म्हटलेलें नाहीं. राजकारण करून व यत्न करून, असा अर्थ. **मालसुरा**–तानाजी, सूर्याजी मालसुरा हें आडनांव आहे. मालुसरा असें नाहीं. शि. भा. तांत ' मल्लसूरः असेंच आहे. २२. २ तानजिन्मल्लसूरश्च, ३०. ४२, ४६, ५१, ३१–१ म्हणजे सभासद व शि. भा. ह्यांत एकरूप आहे. पण रा. खं. २० ले. २८८ पृ. ४२९ मध्यें ' तानाजी मालुश्रा ' हें नांव मौजे गोडवलीचे पाटील म्हणून आलें आहे. जे. श. वगैरे मालुसरा असें नांव देतात. **दोघे महारागास पेटले** हा प्रयोग मोठा लक्ष्य आहे. महारागास हें क्रियाविशेषण किंवा तृतीयार्थी चतुर्थी.

परि. ६४—' चौ महिन्यांनीं घेतलें. ' = महिन्यांत. परि. ६९ पहा. ' आपलें राज्य करूं लागलें. ' ह्या वाक्यानें मोंगलतह झुगारून दिला; मोगली सप्त हजारी, मांडलिकी सर्व संपली हें स्पष्ट केलें.

परि. ६५—' सरकारांतुन ' न्यायाधिशी सांगितली असें होतें. पण ' न्यायाधिशी ' हें जें अष्टप्रधानांतील पद तें दिलें. म्हणजे सरकारकुनी दिली. सरकारांतुन ही वाचनाची चूक. पुढें परि. ७० व १०५ पहा. ह्याच परि. त पुढें निराजीपंताप्रमाणें आग्राप्रसंगांत बरोबर असलेले दत्ताजी त्रिंबक यास वाकनिशी सांगितली; तेथें म्हटलें ' सरकारकुनामध्यें गणना केली. '

संभाजी मथेरेहून येतो. कृष्णाजीपंत, काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग संभाजीस घेऊन आले, असें सभासद सांगतात. रा. खं. ८ ले. २३ मध्यें कृष्णाजी विश्वासराऊ व काशी त्रिमल ह्या दोघांचा निर्देश त्यांच्या मातुःश्रीसह आला आहे. ह्यांचें आडनांव जोशी, ह्यांस कुसुर गांव दिला. म्हणून कुसुरकर जोशी म्हणतात. आणि मथुरेहून आले म्हणून ' मथुरे ' हेंहि नांव पडलें. ' पन्नास ह. रु. रास काशी त्रिमल व मातुःश्री ' ह्यांना ' पाववीत पाववीत पाववावे ' असें ' वर्क–सनदेंत ' आहे. वर्क = पृष्ठ. ' पर्णांशो वरखः स्मृतः ' ३२२ शब्द चवर्खा–कागद--ह्याच संबंधानें ' चवर्खी चतुरस्त्रं स्यात् ' आला आहे.

परि, ६६—जवळ **आहेत** = 'असतील' ते कार्यास येतील. पतकांच्या नांवांत संस्कृत शब्द योजले म्हणजे वाटतें कीं हें ठीक. सेनासप्तसहस्री, पंच सहस्री इत्यादि. इकार-विरहित मराठी शब्द योजून येथें पतकांचीं नांवें ठेविलीं आहेत. 'शंभर लोक', 'साठ लोक' हेंच पथकाचें नांव. प्रत्यक्ष वहिवाटींत 'साठी लोक' असें म्हटलें आहे. परि. ४५ पृ. ३८ पहा. हीं पथकें पालखी-बरोबर चालणारीं आहेत. अर्थात् पतक हाच शब्द युक्त. पत्ति-पतक-पदाति-लोक. ह्यांत ५ प्रकार सांगितले. म्ह० २५० चें मुख्य पतक जरी धरलें तरी ४ पतकें मिळून 'दोन हजार' माणूस होत नाहीं. ५०० चें तरी पतक किंवा ८ पतकें घेतलीं पाहिजेत. मागील परि० ३० प्रमाणें जुमलेदारास १०० होन तैनात केली.

परि. ६७—'भेद' करून पन्हाळा गड घेतला हें नुसतें वाक्य जे. श. शी बरोबर जमतें. १·२६ पुढलेंच वाक्य 'राजे गडावरि राहिलें' हें असल्यामुळें गड राजे यांनीं घेतला असा संदर्भ लावावासा वाटणें सहज प्राप्त दिसतें. पण हा सर्व भाग म्हणजे पुढलीं संदर्भित सर्वच सभासदांचीं वाक्यें जे. श. तील (पृ. २०) श. १५८१ (इ. १६६० मार्च) मधील पन्हाळा घेण्यादेण्याशीं जमतात आणि श. १५९४ मधील पन्हाळा घेण्याचा जो प्रसंग जयराम कवी-रचित पर्णाल० आख्यान काव्यांत वर्णिला आहे तो, सभासद पुढें पृ. ७६ परि. ९५ मध्यें सांगत आहे. शि. भा. अ. २३. ६२ ते ७२ आणि अ. २४–२८ मध्यें पन्हाळा युद्ध सांगून शेवटीं '**संगराभिनिविष्टोऽपि प्रभोराज्ञां प्रमाणयन् । अल्लीशहाय तं शैलं विततार विनीतवत्**' ६ पन्हाळा, अल्लाशहालां; सभासद शिद्दी जोहारास, दिला हें परमानंद सांगत आहे. म्हणजे सभासद व शि. भा. ह्यांच्या कार्यकथनांत एकता आहे. कारण-कथनांत नाहीं. कारण सभासद सांगतो 'नेताजी समयास आला नाहीं व गडावर अधिक दिवस राहावें तर सामान नाहीं' म्हणून शिद्दी जोहरास गड दिला. आणि शि. भा. तांत 'तुलजादेवीनें शिवाजीस सांगितलें, तिकडे मोंगलांनीं चाकण वेढलें, तुं येथें राहूं नको. तें अधिक महत्त्वाचें काम '**अहं तु निजयोगेन मोहयिष्यामि जोहरम्**।' मी माझ्या योगमायेनें जोहरास मोहांत टाकते, तुझे योद्धे येथें लढतील, तुं निघून जा.' (अ. २६ श्लो. ४८) ह्याप्रमाणें देवीचा संदेश व मोगलाशीं लढणें हें कारण दिलें आहे. ह्यांत आणखी

विचाराचा भाग हा आहे कीं ह्या प्रसंगीं सभासदानें नेताजीच्या वेळेवर न येण्यामुळें त्यास सेनापतिपदावरून दूर केलें हें पुढील परि. ६८ त जें सांगितलें त्याशीं ह्या कारणाचा संबंध लाविल्यामुळें सभासदाचें लिहिणें अधिक ध्यानांत घेतलें पाहिजे. पन्हाळा अदिलशहास दिल्याचें सर्वच सांगतात; पण त्यांतून निघालेला हा सेनापतिबद्दलाचा भाग अन्य कोणी सांगत नाहींत (शि. भा॰ किंवा जे. श.).

जरी गदग--लक्ष्मेश्वरपर्यंत खंडणी घेण्यास नेताजीस शिवाजीनेंच पाठविलें होतें, तरी त्वरेनें यावेळीं परतावयास पाहिजे होतें. शिवाजीच्या कार्यांत त्वरा हा एक मोठा भाग आहे. जे. श. शि. भा.

परि. ६८—वर परि. ६७ मध्यें ह्यांतील उल्लेखाचा विचार सहजच झाला आहे. नेताजीच्या जागीं कडतोजी गुजर हा जो नुसत्या राजगडचा सरनौबत होता त्यास ' प्रतापराव ' हें नांव देऊन सर्व सैन्याचा सरनौबत म्हणजे सेनापति केलें. कडतोजीनें ह्या आपल्या वरिष्ठ अधिकाराचा उपयोग आपल्या प्रांतांत आणि मुसलमान पातशाहांकडेहि जे शहाण्णव कुळीचे मराठे होते त्यांना (विचारविनिमयार्थ) एकत्र आणण्यांत केला व ही मुख्य गोष्ट सभासदानें सांगितली आहे. म्हणजे नेताजीला सेनापातिपदावरून दूर करण्यांत आणखी कांहीं भाग गर्भित असल्याचें सभासद ध्वनित करतो आहे.

प्रकरण ७ वें

शिवाजी राजांचा मोंगलाशीं तह व बिघाड

परि. ६९—' चहूं महिन्यांत ' ह्या येथील उल्लेखावरून परि. ६४ मधील ' चौ महिन्यांनीं ' ही सप्तम्यर्थी तृतीया समजावी हें जें सूचित केलें तें बरोबर आहे हें ध्यानीं येईल. **जोरावारीनें** —झोरवर फा. ह्यास नें प्रत्यय लावतांना अन्त्य व उपान्त्य वर्णालाहि वृद्धि व इ--कार झालेला आहे. जोरानें, जबरदस्तीनें, बळानें. **भेटी**—भेटीस. भेट समक्ष भेट घेणें ही इतिहासकाळीं व्यवहारांतील फार मोठी महत्त्वाची बाब समजली जात असे. भेटीमध्यें सामोरे जाणें; बरोबरी वा कोणतें नातें, देकार-घेकार, अशा दोन चार गोष्टी अंतर्भूत होत्या. म्हणून औरंगजेब, शिवाजी भेटीस न आला तर मुलाज = भेट माफ करणें.

मुसलमान हे स्वतःस, आपण पातशाही करणारे–करणाऱ्या जातीचे मानीत आणि हिंदु कोणीहि कितीहि मोठा असो तो आपला नोकर असणें ही त्याची स्थिति मानीत. रजपुतांना, उदेपूर सोडून, तसें त्यांनीं नोकर करून टाकलें; तसें दक्षिणेंतील सर्वांनीं राहावें हा कोणत्याहि पातशाहीचा प्रयत्न. त्यास अनुसरून, औरंगजेब शिवाजीविषयीं आपल्या मुलास सांगतो, 'शिवाजी आपला चाकर जालासें करणें म्हणजे सर्व यश आलें'. हा परक्या मुसलमानांचा समजच उधळून लावणें हें शिवाजीच्या चरित्राचें सारसर्वस्व आहे. **प्रल्हादपंत** ह्यास पूर्वी लष्करच्या सबनिशीची मुतालकी होती (परि. ६५), आतां सबनिशीच दिली. **दोन तीन चपेटे** ! आग्रा, शायिस्तेखान व पन्हाळा हे ते तीन हलाखीचे प्रसंग दिसतात. शाहा = शाहाजादा. **लक्षांचा होनांचा**– आणि १५ लक्ष होनांचा हेंहि परि. ६९ मध्यें आलें आहे. शिवाजीस मुलाच्या नांवें कां होईना पण मोगलांकडील हप्त हजारी मनसब दिली व त्यासाठी १५ ल. होन उत्पन्नाचा वऱ्हाड खानदेशांतील मुलूख दिला. ह्या ठिकाणीं 'हुजूर-वाटणीहि दिली' हें सभासद सांगतो तें अवश्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे. म्हणजे ह्या एवढ्या उत्पन्नावर मोगली सरकारचा म्हणून जो हुजूर हिस्सा असेल तोंहि उत्पन्न शिवाजीला मिळावयाचें. षष्ठी तत्पुरुष समास.

परि. ७०—चहूं पातशाहीचे आपण दावेदार–येथें तीन पातशाहींचा उल्लेख आहे. पण अन्यत्र चहूं पातशाहीचे दावेदार असें स्वतः शिवाजी (पृ.५६), गागाभट (पृ. ८२), बखरलेखक (पृ. १०६) सांगतो. रा. मा. वि. चंपूमध्यें **'टिकेचा धणी लेक ज्याचा शिवाजी, करी तो चहूं पातशाहाशि वाजी'** असें जयरामकविहि सांगत आहे.

परि. ७१—वस्ताभावा = निरनिराळ्या वस्तु. वस्तु–वस्न, अ. व. वस्ता.

कष्ट करितां सेत पिके । उंच वस्त तत्काळ विके ।
जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती २५ द. १२ स. ७

भाव = तुल्य इतर पदार्थ. समाहारद्वंद्व समास. **कीं**–आणि याकरितां = तथापि. परि. ७० व ७१ मध्यें निराजीपंताचा उल्लेख आला आहे. सनदापत्रें पृ. ९५ ले. ७१ मध्येंहि 'निराजी रावजी शिवाजी महाराज यांजकडून वकिलीस औरंगाबादेस गेले' असा निर्देश आला आहे. शिवाजीची प्रतापराव, निराजीपंत इ. मंडळी औरंगाबादेस आहेत. औरंगजेब म्हणतो कीं ही मंडळी 'दौलताबादेस' भेद करतील.

परि. ७२—' मग० निघोन गेली ' ह्या वाक्याची आवश्यकता नाहीं.

परि. ७३—विलंब नव्हता = विसंबणार नव्हतों.

परि ६९ ते ७३—ह्या ५ परि. मध्यें शिवाजीचा मोंगलाशीं तह झाला म्हणजे परि. ६९ मध्यें म्हटल्याप्रमाणें शिवाजी औरंग०चा हप्त हजारी मनसब पत्करून चाकर झाला. पण ह्या जहागिरदारीची किंवा मनसबी सरदारीची मुदत किती ? तीन, दोन कीं दीड वर्ष ? इ. १६६७–७० प्रारंभ असें मोघम म्हणण्यानें जरी तीन वर्षें होत असलीं तरी १६६७ आक्टो. ते १६६९ डिसें. म्ह. २ वर्षें २ महिने हा काल येतो (शिव. शकावलि पृ. ३०). पण खरा काळ वर्ष दीड वर्षच होय (म्ह. १६६८ मार्च १६६९ डिसें.) '**तन्मध्ये सार्धवर्ष वा वर्ष वा सख्यतो ह्यसौ** ' (पर्णा० अ. २·५०) असें जयराम कवि औरंग०च्या बहादुरखान दिलेलखान इत्यादि सरदारांच्या तोंडून वदवीत आहे.

परि. ७४—रुस्तुमजमा व अबदुल करीम बेलोलखान ह्या दोघांनाहि लागोपाठ पराभूत करून रांगणा गडाचें रक्षण केलें.

परि ७५ – ते = त्या (जागां–ठिकाणीं). सुरतलुटीची ही स्वारी दुसरी असें सभासद सांगत नाहीं, पण जयराम कवि ' **ततः श्रीमच्छिवेनेयं सुरती लुंठिता पुनः ।** ' (अ. १-२९) असें पुनः ' हें पद स्पष्ट घालून ' ती लूट दुसरी ' हें स्पष्ट करीत आहे.

परि. ७६—उदाराम राजे वजीर हा मोंगलाकडील सरदार; ह्याची बायको रायबागीण व लेक जगजीवन ह्यांचा उल्लेख अन्य प्रसंगानें शि. भा. तांत आला आहे. तो आणि सभासदांचा येथील उल्लेख यावरून हे मायलेक मोगल सैन्यांत नेहमीं युद्धार्थ सज्ज असत असें दिसतें. प्रस्तुतचा प्रसंग सुरत लुटीहून परत येतांना झालेल्या लढाईनंतर सांगितला आहे. स्थल उंबरखिंड देऊन रायबागिणीस कोंडलें असें म्हटलें आहे. '**जायामुदयरामस्य जगज्जीवनमातरम् । राजव्याघ्रीति यां प्राहुर्युधि व्याघ्रीमिवोद्धताम्** ५२ अ. २५ अथोदुंबर खंडाह्वगह्नांतरवर्तिनीम् । ७९ अ. २८ उंबरखिंडींत राजव्याध्रीस–रायबागीस कोंडलें असेंच शि. भा. मध्यें आलें आहे.

हा 'सावंत' वाडीकर म्ह० कुडाळचे जे लखम सावंत त्यांच्या घराण्यांतील दिसत

नाहीं. लखम व खेम सावंत हे जसे आदिलशाहीच्या बाजूनें शिवाजीशीं लढले त्याप्रमाणें हा काय सावंत शिद्दीचा सहायक झाला होता व त्यास शिवाजीच्या बाजी पासलकराशीं लढण्यासाठीं शिद्दीनें पाठविलें. ह्या प्रसंगाचा नेमका व पुरता उल्लेख कोणतेच शिवचरित्रलेखक करीत नाहींत असें दिसतें. ह्या प्रसंगाचा कालहि अर्थात् अनिश्चितच आहे. पण इ. स. १६६० हा असावा.

परि. ७९—बेंगरूळ परि. ३ पहा. **बोगदरी**—हें ग्राम-नाम व कानडी; लेखन मोडी यामुळें लेखनांत-वाचनांत फरक होणें साहजीकच. जि. धारवाड ता. चन्नगिरी मौजे होद्दिगेरे ह्या गांवीं शहाजी स्वारीवर असतां घोड्यासह पडला व त्या आजारांत मृत्यु पावला. चित्रदुर्ग = जेन्नगिरी, बोगदरी = होद्दिगेरे. केरे-गिरे = तलाव. कुदुरे = घोडा. लाय लायद ह्या (घोडदळाची किंवा हत्तींचीहि पागा असलेल्या) जागीं शहाजी महाराजांचें वृंदावनस्मारक आहे. तुंगभद्रातीर बसवापट्टणजवळ हें गांव असून बेदनूरकरावरील विजयी स्वारी वरून परत येत असतां हा प्रसंग घडला.

सभासदांनीं सुरतेची पहिली लूट दिली नाहीं. दुसरी दिली. दुसरी लूट, त्या लुटीला जोडून वणीदिंडोरीची लढाई पाठोपाठ झाली व ह्यामुळें ती एका दृष्टीनें अधिक लक्ष्य झाली. पण म्हणून 'सुरत लुटीनंतर शहाजी राजे मृत्यु' ह्यापैकीं 'नंतर' म्हणजे पहिल्या कीं दुसऱ्या लुटीनंतर आणि लक्ष्य लूट दुसरी; म्हणून दुसऱ्या लुटीनंतर शहाजी-मृत्यु सांगितला. ह्यामुळें पावणेसात वर्षांनंतर सांगितला गेला. नुसतें कालांतरच घडलें एवढेंच ह्यामुळें झालें असें नाहीं; तर त्याच्या जोडीस 'मी मिरजाराजास भेटलों,' दिल्लीस जाऊन आलों, त्यानंतरहि गडकोट घेतले हें पराक्रमवृत्त ऐकून महाराज संतुष्ट झाले व अलंकार वस्त्रें पत्रें येत होतीं' इत्यादिहि लिहिणें घडल्यामुळें लेखक काल व माहिती, दोन्ही लिहिण्यांत चुकीचें व फुगीर लिहितो असें म्हणण्यास अवसर होतो.

परि. ८०—**सरद**-सर्हद्द. हद्दीपर्यंत. ह-गळंत व द्वित्त द गेला. 'सरद' शब्द झाला. ह-हा महाप्राण शब्दांत येतो तसा जातोहि. **राजपुरीकडून**—व्यक्तिवाचक कर-प्रत्ययाचें कार्य नुसत्या स्थलवाचक नांवानेंच केलें.—'राजपुरीकर-करा-कडून' म्हणण्याऐवजीं 'राजपुरीकडून' एवढेंच म्हटलें. 'आलेल्या मध्यस्थानें' असे दोन शब्द अध्याहृत घेतले पाहिजेत. '**शैल**' = सह्य

सख्य. सला–चें भाववाचक सैल्य–शैल केलेलें दिसतें. मागें पृ. ५ परि. ६ वर शल्यचें शैल्य रूप आलें आहे. **यावरि० लागले.** ह्या वाक्यांत 'ते' म्हणजे हबशी हा कर्ता पूर्वानुगामित्वानें घ्यावयाचा. तृतीयांत कर्ता आणि कर्तरि प्रयोग आला आहे. 'पुराण कर्मणी' हा जसा एक कर्मणि प्रयोगांतील भेद 'शास्त्रीय व्याकरणांत' पृ. ७६४ वर सांगितला; तसाच प्रकार–भेद कर्तरी प्रयोगांत 'ऐतिहासिक कर्तरी' असा केला पाहिजे. असो. **व्यंकाजी दत्तो** ही द्वितीयार्था किंवा चतुर्थ्यर्थी प्रथमा आहे. राजियांनीं व्यंकाजीस रवाना केलें हा शुद्ध प्रयोग. पण 'व्यंकोजी' रवाना केले असें वाक्य आहे. केलें हें आदरार्थी बहुवचन. असेंच दुसरें पुढलेंच वाक्य शिर्द्दीनें...हशम रवाना केले. **नामजाद** हें व्यंकोजीचें दोन्ही ठिकाणीं विशेषण आहे. **बळावणें**—ह्याचे दोन अर्थः (१) बळकावून घेणें, (२) बलिष्ठ–बळकट असणें. **त्यास**—त्याची. **त्यास** = इकडे. त्यास हें अव्यय असल्याचें अनेक ठिकाणीं आलेल्या त्याच्या प्रयोगावरून दिसून येतें. मागें सांगितलेंहि आहे. संस्कृतमध्यें 'स्थाने', 'तस्मात्,' 'अर्थात्' हीं जशीं सविभक्तिक नामें असून अर्थतः अव्ययें म्हणून त्यांचे प्रयोग केलेले आढळतात. तसेंच मराठींतील त्यास–चें आहे. **गुराबा हें नांव** दुबार पडलें आहे. **जहाजांत** = जहाजांस; चतुर्थ्यर्थी सप्तमी. **सत्तावीस**–अनेक ह्या अर्थासाठीं लेखक ही संख्या वापरतो कीं काय ? मागें परि ४१ पृ. ३५ वर हीच संख्या आली आहे. चालले, लागले—ले–चे जागीं ळीं पाहिजे. कारण जहाजें हा कर्ता आहे.

परि. ८१—**सोडवीत चालले**–खवासखान व लखम सावंत हे दोघे, म्हणून अनेकवचन. **मत्स्याहारी**–गौड सारस्वत ब्राह्मण. **पाठवून दिला**– 'लखम सावंतांनीं' हा अध्याहृत कर्ता. ह्या परिच्छेदांत ज्या तिघांवर शिवाजीची स्वारी; त्यांत, पत्र क्र. १०४१ दृष्टीनें पाहतां, व्युत्क्रम घडला आहे असें दिसतें. **जमाव करूं नये**–स्वतंत्रपणें फौज ठेवूं नये. सावंत याशीं जो करार व तह केला तो मागें पृ. २७ परि. ३३ शीं जुळताच आहे. पसासं. (७६५) पहा. करार सामान्यतः बरोबर; कालांत फरक आहे.

परि. ८२—**फोंड घेतलें**–शहर व कोट वेगवेगळे. फोंड कोट होता; नंतर लिहिलें फोंड घेतलें. म्हणजे शहर घेतलें. मोहबतखान मोंगलाकडील तो वेगळा

परिं. ७५ पृ. ६१ पहा. कडवाड = कारवार, कर्दें = काद्रा, राजपिंड–राजबिंडा = प-चा व ब होतो.

परि. ८३— कारंजें - ततः कारंजनगरं...लुंठयित्वा समागतम् । ३१ अ. १ पर्णा०. **परि. ८५—करारीं** करून–निश्चित करून. करार–नामाचें सविभक्तिक अव्यय. करार = निश्चय. **पृथ्वीवर**–आसपास. प्रकरणानुरोधानें आणि लेखकसापेक्ष ह्याचा अर्थ करावयाचा. परि. ९४ व पृ. १५३ पहा.

परि. ८६—नांवाची कीर्ति– राजगुणाधिक्यानें 'राजाराम' हेंच नांव विख्यात होईल. **त्र्यंबकगड**–सुरतेच्या (दुसऱ्या लुटीनंतर) त्रिंबक गड घेतला असें **ततः श्रीत्र्यंबको नाम विख्यातः पुण्यपर्वतः । हर्षेण सहसाप्यस्मिन् प्रयाणे स्ववशीकृतः** ॥ ३० ॥ पग्र. अ. १. नंतर त्याच मोहिमेंत हा गड आनंदानें एकदम हस्तगत केला.

शिवाजीच्या स्त्रिया एकंदर आठ. पहिलीचा उल्लेख परि. ७ मध्यें निंबाळकर कन्या सईबाई हा आला आहे. येथें ती मृत्यु पावल्याचें सांगून व नंतरच्या 'सहा स्त्रिया' असें म्हटलें आहे. त्या अशा २ सगुणाबाई (इ. १६४१ एप्रिल), ३ सोयराबाई शिर्केकन्या (?) (इ. १६५० पूर्वी. राज्या० वेळीं पुनः समंत्रक विवाह), ४ पुतळाबाई मोहिते (इ. १६५३ ही सती गेली), ५ लक्ष्मीबाई–विचारे (इ. १६५६ पूर्वी), ६ सकवारबाई गायकवाड (इ. १६५७), ७ काशीबाई जाधव (इ. १६५७); ८ गुणवंताबाई–इंगळे (इ. १६५७).:लेखक मोहित्यांची कन्या सोयराबाई असें सांगतो. तसेंच 'परमानंद–काव्य' मध्यें विभाग १ अ. १·५४; वि. २ अ. १·१०७; वि. ३ अ. ४ व ५. ४५ व १६ अशा चार ठिकाणीं आलें आहे. बृहदीश्वर–शिलालेखांतहि मोहित्यांची असेंच आहे.

ह्याच अनुसंधानांत शिवाजीनें आणखी कोणकोणते गड व प्रदेश घेतला ह्याची माहिती ह्याच परि० त ४० गड घेतले अशी अगदींच मोघम दिली. त्याची कांहीं स्पष्टता पर्णा० ग्र. अ. १ मध्यें ३२ ते ४१ ह्या श्लोकांतून आलेली लक्ष्यांत घेतली पाहिजे. तेथें १६ स्थलनामें दिलीं आहेत. परि० त आलेली सालेरी गड–युद्धवार्ता पुढें स्वतंत्र आली आहे. कोळवणसंबद्ध जें जव्हार व रामनगर त्याविषयींहि खुलासा '**जवार इति यद्राज्यं किरातानां पुरातनम् । विक्रमाख्यस्य नृपतेर्विक्रमेणाग्रहीन्नृपः ३९ तथैव रामनगरं**

सोमशाहस्य विश्रुतम् । जगृहे लीलयैवायं लीलाविग्रहवान् शिवः ४०
म्हणजे विक्रमशहापासून जव्हार आणि सोमशहापासून रामनगर शिवाजीनें घेतलें.

परि. ८७—' सालेरी घेऊन फस्त करणें ' हें वाक्य, आहे तेथेंच असावयाचें असेल तर वाक्याआधीं ' व म्हटलें कीं ' हे शब्द गृहीत धरावयास पाहिजेत, नाहींतर सदर वाक्य अधांत्रीं राहतें. खरें म्हटलें तर, मागील वाक्यांतील ' बोलावून आणून ' ह्याच्यापुढें सदर वाक्य घेऊन ' असें सांगून ' हे दोन शब्द अध्याहृत समजून सर्व वाक्य पूर्ण करणें इष्ट.

परि. ८८—" निवड करून–रामाजी पांगेरे याचे युद्ध--वर्णनांत ' निवड करून ' हे पहिल्याच वाक्यांत आलेले शब्द गळंत मानावे. म्हणजे ' आपले लोकांत निदान करावयाचे ' असें वाक्य समजावयाचें. कारण ' निवड करितां ' हे शब्द तेथेंच पुनः आले आहेत. येथील शिमगा सणांतील टिपऱ्यांच्या खेळाचा दृष्टान्त फारच उचित आणि कौतुकास्पद आहे. हा सण व खेळ अति प्रसिद्ध व महत्त्वाचा. ह्या खेळांत टिपरी बरोबर दोनदोन चारचार ढोल वाजतात. आणि जेव्हां खेळ रंगांत येतो तेव्हां दुगण चौगण होते. म्हणजे इतक्या त्वरेनें ही टिपरीची टेप चालते कीं नुसत्या पाहणारासहि अवसान चढावें. मग खेळणारे तर केवळ बेभान होऊन जातात हें सांगणें नको. ही अगदीं खेळाची अखेरी असते. ह्यांतच जेव्हां पट काढून गिरकी घ्यावयाची असते म्हणजे पायांत, डोक्यावर, मागच्या व पुढच्या खेळगड्याच्या टिपरीस टिपरी भिडविणें चालतें तेव्हांचा आवेश व संचार ह्याची कल्पनाच करतां आल्यास पाहावी. लढाईतील हातघाई शिकण्याचाच हा खेळ आहे. डोक्यावर येणारा वार कातर करून चुकविणें हा ह्या खेळांतीलच एक भाग आहे. दांडपट्ट्याच्या मर्दांनी खेळांत कैची किंवा कातर हा एक पवित्रा आहे, शिवाजीनें सैयदबंडाचे वार चुकवितांना डोकीवर कातर करून ते परतविले ती ही कातर. कातरीप्रमाणें डोकीवर दोन्ही शस्त्रें धरणें. असो. असा हा खेळाचा दृष्टान्त भा. ब. तहि आला आहे. ह्या टिपरीखेळानें लेखकानें सहजच हें सुचविलें कीं ह्या लढाईत दोन्ही हातीं शस्त्रेंच असतात; ढाल नसते. अशी ही केवळ कालझुंज असते. ह्या रामाजी पांगेऱ्याच्या सातशें लोकांनीं दिलेलखानाचे बाराशें पठाण मारले. व पांगेऱ्याच्या सातशेंहि मावळे वीरांना वीस वीस तीस तीस जखमा झाल्या. हा रामाजी पांगारा अफजलप्रसंगीं खानाच्या सैन्याची दाणादाण करणाऱ्या

योद्ध्यांत प्रमुख होता. शि. भा. कार सांगतात, शिवाजीचे जे पंचाग्नितुल्य पांच योद्धे ह्या प्रसंगीं होते त्यांतील ' **रामः पांगारिकश्चामी पंच पंचाग्नितेजसः**' ३ अ. २२. असें हें कणेरागडचें रामाजीचें युद्ध सभासदांनीं केवळ वीररसांनीं ओथंबलेलें आपल्यापुढें उभें केलें आहे.

शिवाजी व मोगल ह्यांमध्यें झालेलीं जीं मोठीं युद्धें सभासदांनीं सांगितलीं, त्यांत सालेरीचें युद्ध अग्रमानाचें गणलें पाहिजे. एवढें भयंकर व चिकाटीचें युद्ध ह्यापूर्वी व पुढेंहि झालें नाहीं. दुसरें एक युद्ध ह्यापेक्षांहि मोठें म्हणतां येईल असें आलें आहे. पण त्याचें असें वर्णन मुळींच नाहीं. परि. ९२. ह्या युद्धांतील मोंगलांच्या पराभवामुळेंच औरंग०नें म्हटलें ' **मृतं किमिति नो तस्मिन् युद्धात् (द्धे) सालेरिपर्वते** '। ' सालेरीच्या लढाईत तुम्हांस मरण कां नाहीं आलें ! ' इतका खेद व संताप त्याला ह्या पराभवामुळें आला होता. अर्थात् ह्याच्या अगदीं उलट शिवाजी व त्याचे सरदार ह्यांची स्थिति होती. सभासदांनीं ह्या युद्धप्रसंगांतील तेरा योद्ध्यांचीं नांवें सांगितलीं आहेत. इतकीं व्यक्तिनामें अन्य कोणच्याहि प्रसंगीं लेखकानें दिलीं नाहींत. लेखकाच्या लेखनांत प्रत्यक्ष परिचित भाग कोणता हें अंदाजण्याचें ही नामसंख्या हें एक गमक आहे. ह्या सालेरी युद्धांत इतर दोनतीन उपयुद्धें होतीं. हें युद्ध चार प्रहर म्हणजे सर्व दिवसभर = बारा तास चाललें होतें.

परि. ८९—दिवाण-इ-आम व दिवाण–इ–खास. आम = सर्वसामान्य व खास= निवडक सरदार. परि. ५० पहा. ह्या दोहोंच्यासाठीं दोन दिवाण दर्बार असत. या दोन्ही दरबारला औरंग० आला नाहीं. म्हणजे सिंहासनावर–तख्तावर बसणेंच सोडलें. इतका तो मनानें खचला व म्हणून तर पुढेंच ' तक्तावर बसविलें ' असें लिहिलें. **हालखुद**—जागच्या जागीं. ह्याचा आणखी उलगडा पुढल्याच वाक्यांत आहे. ' त्याचें लष्कर पातशाही मुलखांत न ये असें करितों; आणि नाना हुन्नर करून त्यास जेर = हैराण करतों.'

' पेंडीचें गुरूं ' उधळलेल्या तट्टाची गोष्ट, तें तट्टू शेवटीं एका चाणाक्ष गड्यानें ह्याच पद्धतीनें धरलें. त्याच्यापुढें गवताची पेंडी धरली व त्यास पकडलें. तसा बहादुरखानास पुढें (परि. ९६ पहा.) निराजीपंतांकरवीं ठायीं ठेविलें. म्हणजे बहादुरखानानें शिवाजीस जागच्या जागीं गप्प बसविण्याऐवजीं त्यालाच शिवाजीनें पेडगांवास ' हालखुद ' ठेविलें.

प्रकरण ८ वें

आदिलशाहीशीं युद्ध

परि. ९०—पन्हाळा दुसऱ्यांदा शिवाजीनें घेतला ती वार्ता फारच थोडक्यांत सभासदांनीं येथें दिली. शि. भा. कार पन्हाळ्याचा निर्देश 'प्रणाल' आणि जयराम कवि 'पर्णाल' असा करतो. मागें परि. ६७ मध्यें हा किल्ला घेतल्याचें व दिल्याचेंहि वृत्त आलें आहे. दुसऱ्यांदा पन्हाळा घेतल्याचें विस्तृत वर्णन पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानांत अ. ३ मध्यें १·६० श्लोकांत जयराम कवींनीं केलेलें अवश्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे. पन्हाळा घेतांना माल सावंत पदाती सेनासहस्त्री ह्यास आणाजी दत्तोनें पाठविलें होतें हा उल्लेख कोणींच केलेला दिसत नाहीं. पन्हाळा हातीं येतांच शिवाजी किती उत्सुकतेनें रायगडावरून निघून श्रीभवानीचें दर्शन घेऊन पन्हाळा पहाण्यास निघाला तेंहि वर्णन जयरामानें अ. ४ मध्यें काव्यमय पद्धतीनें मोठें मनोहर केलें आहे. ह्यावेळीं शिवाजीच्या हातीं आणखीहि प्रदेश तेथील किल्ल्यांसह आल्यामुळें राज्यविस्तार झाला व पुनः थोडी व्यवस्थाविभागाची आवश्यकता उत्पन्न झाली. म्हणून मोरोपंत, आणाजी दत्तो व दत्ताजीपंत मंत्री ह्यांचे हातीं तीन विभाग करून ते तिघांकडे सोंपविले. इतरहि कांहीं व्यवस्था म्हणजे मुख्य मुख्य अधिकाऱ्यांचे मुतालीक आपल्याजवळ नेहमीं असावे. इत्यादि कांहीं नियम नवीन अवलंबिलेले सभासद सांगतो. परि. २७, २९ पहा.

परि. ९१—वळवळ—शिवाजीराजा व सहकारी ह्यांचा आत्मविश्वास आतां इतका वाढला होता कीं शत्रूंच्या आक्रमणाला ते आतां 'वळवळ' म्हणून म्हणजे तुच्छतादर्शक लेखून तिचा बंदोबस्त करूं लागले. विशेषतः आदिलशाहींत जो दक्षिणीविरुद्ध परदेशी पक्ष होता तो अधिकारारूढ झाला कीं शहाजी–शिवाजीचें मन अधिक संतप्त होई. तसा प्रसंग प्रस्तुत आला. उंबराणी–उमराणी विजापुरच्या पश्चिमेस १८ मैल. बहिलोलखान पठाण हा प्रमुख होऊन त्यानें जेव्हां पन्हाळा शिवाजीनें जिंकल्यानंतर शिवाजीवर पुनः स्वारी केली तेव्हां त्याचा प्रतिकार एक तर थोडेसें चिडून व दुसरें त्या स्वारीस क्षुल्लक लेखून शिवाजीनें केला. **प्रतापरावानें** ह्या बहलोलखानास असा चौतर्फ कोंडला कीं त्याला पाण्यावांचून

हैराण केलें व शरणागतीची भाषा बोलावयास लाविलें. बहिलोलखान हा प्रसंग पडेल तसें वागणारा, मोठा गुप्त शत्रू होता. प्रतापरावानें त्याच्याशीं तह करून त्यास जीवदान दिलेलें ऐकतांच शिवाजी म्हणतो 'सला काय निमित्य केला' 'निमत्य' शब्द दंततालव्य उच्चार धरून तृतीयार्थक अव्यय ह्या अर्थानें लिहिला आणि वाटतें तसाच उच्चारहि होत असावा. 'निदान करून' (लढत बाहेर पडून) हे शब्द पाहिजेत. ह्याच परि०त मजमदारीचा फक्त हुद्दा एका भावाला व मजमदारीचें काम मात्र त्याच्याच दुसऱ्या भावाला दिल्याचें आलें आहे व त्यास अनुसरून पुढें राज्याभिषेकसमयीं अमात्य म्हणून ह्या दोघा भावांचीं नांवें सांगितलीं. येथें आलेल्या वळवळ–च्या जागीं पुढें म्हटलें 'घडोघडीं येतो.' म्हणून पुनः प्रतापराव-बहलोलखान युद्ध. **अवकाल** = (अव–उपसर्ग+काल, पण असा जोडशब्द क्वचित्.) अकाल, अपकाल, किंवा अपमृत्यु हा अर्थ लेखकास अभिप्रेत असावा.

परि. ९२—ताबीज–ताबीन. मोडी न–चा ज वाचला गेला. हीं दोन्ही वळणें अगदीं सारखीं असतात. **पोटीं**=पोटचे षष्ठ्यर्थी सप्तमी. **येतांच**–चा संबंध पांचव्या ओळींतील कळतांच येथपर्यंत आहे. 'येतांच' 'राजे सामोरे' इ. लेखक जसा राजाराम–पक्षाकडील आहे तसा कर्नाटकांतील माहितगार व दीक्षित हणमंते घराण्याविषयींहि आस्था असलेला व घरोब्यांतील दिसतो. **पंचरूढ** मोडींत स ढ सारख्या वळणांतील. अमात्यांच्या आज्ञापत्रांत प्र. ३ पृ. २० वर हा शब्द आला आहे. पठाण व बहिले हीं जातीवाचक नांवें आहेत; उरलीं, तें पंचरूढ सैन्य होय. अमात्य व सभासद–कथित पंचप्रकार वेगवेगळे असतील पण ते पांचच आहेत. 'असा होता' ह्याच्या पूर्वी 'ज्याचा,' किंवा 'बाळगलेला' अशासारखा शब्द पाहिजे. हुसेनखान व हंबिरराव ह्यांचें युद्ध अठरा तास चाललें होतें.

प्रकरण ९ वें

शिवाजीराजे यांस राज्याभिषेक

परि. ९४—गागाभट्ट हे महामीमांसक. त्यांचें मूळ नांव विश्वेश्वर भट्ट. लडिवाळपणामुळें लहानपणांत गागा हें नांव वडीलमंडळी म्हणत तेंच रूढ राहिलें. त्यांनीं निरनिराळ्या शास्त्रांत १४ ग्रंथ लिहिले. पूर्वमीमांसाशास्त्रांतील त्यांचा अध्ययन-अध्यापनाधिकार फार मोठा. त्यांचा संचार व दृष्टिक्षेपहि मोठा. त्यांच्या हें सहज ध्यानीं आलें कीं राज्याधिकाराची सर्व योग्यता शिवाजीराजांच्या ठिकाणीं असतां ' सर्व पृथ्वीवर म्लेच्छ पातशहा ! शिवाजीस तख्त कां नाहीं ! मराठाराजा छत्रपती व्हावा '. ' मग हें बोलणें राजियांस व सर्वांसहि मानलें ' आणि ' तक्तीं बसावें ' हें ठरलें. शिवाजीस व त्यांचे आजे, चुलते, पणजे ह्या सर्वांनाहि व इतरांनाहि राजे म्हणतच असत. आदिलशहानें तर शहाजीस ' महाराज ' पद्वी दिली होती व औरंग०नें शिवाजीसहि ' राजा ' पद्वी बहाल केली होतीच. पण राज्याभिषेकविधीपूर्वक राज्यसिंहासनारूढ होऊन छत्रपती हें अभिधान धारण केल्यानंतरचें राजेपण हें खरें. शकाचें नांव राज्याभिषेक हेंच आहे. 'राज्ये अभिषिच्य' असे प्रयोग रामायण-महाभारतांत आढळतात. सारांश, हें 'राजेपण' स्वीकारण्याचा जो मुख्य धार्मिक विधी व कर्मलोपामुळें जे तदंगभूत इतर उपविधी त्यांचें वर्णन सभासदानें आवश्यक तें केलें आहे. सभासद विरोधाचा निर्देशहि करीत नाहीं, उलटच सांगतो. विशेषतः शकनामांतील लेखन विचारार्ह निश्चित.

नाना प्रकारें—प्रकारचे. षष्ठ्यर्थी तृतीया. पहिल्या 'देऊन'च्या पुढें [केली] पाहिजे. **शोधिलें**–शोध घेतां कळलें, ठरलें. **क्षेत्री**–क्षत्रीयज्ञातीसाठीं सांगितलेल्या शास्त्रपद्धतीनें. कलश आणि तांबे ह्यांत फरक म्हणजे पूजनप्रसंगीं आम्रादि यज्ञीय पल्लव घालून जे तांबे चौरंगावर ठेवतात ते कलश. दिवसांतलाहि जो उचित वेळ तो 'मुहूर्त.' मूळ अर्थ बारा क्षण. मुसलमानांच्या म्ह० फार्सीच्या साहचर्यामुळें छत्रपतीपदाची ओळख सांगतांना ' पातशहा ' ह्या शब्दानें सांगावी लागली. छत्रपती शिवाजीराजाला येथें जसें ' पातशहा ' म्हटलें तसें पुढेंच पातशहालाहि ' छत्रपति ' म्हणून समानता कथन केली आहे. परि. ९७ पाहा.

प्रकरण ११

' उभयता छत्रपती ' भेट

परि. ९५—शिवाजी सिंहासनारूढ झाल्याचें वृत्त कळतांच औरंगजेबादि पातशाहा आपापल्या तख्तावरून खालीं उतरले. **आणाखुणा** समाहारद्वंद्व. आणाशपथा म्ह. एका अर्थी दोन शब्द. खुणा हें उत्तरपद असलेला समास वेगळा. खाणाखुणा. येथें आणा—खुणा म्हटलें आहे. म्ह० अनुप्रासासाठीं णा–वर्णान्त खुणा शब्द घेतला इतकेंच. वस्तुतः खुणा हा स्वतंत्र प्रचलित सार्थ शब्द आहे. पण तो येथील नाहीं. मागें जसें ' उद्यांसांया ' म्हटलें (परि. ५० पृ. ४५ पहा.) तसें हें आहे. भा. ब. मध्यें इराणच्या अहमदशहा बादशहालाच दुराणी म्हटलें आहे. इराणदुराण एकच.

परि. ९६—राज्यभार–नुसता भार शब्द असेल तर ' उचलला, ' ' घेतला ' हें म्हणणें ठीक. पण ' करूं लागले ' हें जर क्रियापद आहे तर ' राज्यकारभार ' असा शब्द पाहिजे. **त्यास**=पण. एकनाथ पंडित व मदन पंडित किंवा माधवराव पंडित ह्या नांवांची तेलगू प्रांतांतील रूपें अकण्णा व मादण्णा अशीं झालीं. हे अति कर्तृत्ववान् व विद्वान् होते. तानाशा बादशहा कुतुबशाहीं गादीवर आला तेव्हां हेच सर्व पातशाही कारभार पाहात असत. सभासदानें ह्यांना हे दुसरे–बिजा–पातशहाच म्हटलें आहे. ' माधवराव ' हें कुत्बशहा म्हणतो. शिचसा. २·३९४.

कित्येक = कित्येकांना, पुष्कळांच्या. **जरी सामान**—जरीचा पोशाख. **नगरामध्यें**–नगरामधून. ' शहरास ' आधीं आलेच होते.

परि. ९६-९७ मध्यें आलेल्या मजकुराबरोबर पसासं मधील क्र. (१९०१) हें शिवाजीराजांचें स्वतःचें पत्र अगत्य वाचनांत यावें. ह्या आपल्या व कुतुबशहाच्या भेटीचा उल्लेख शिवाजीच स्वतः व्यंकाजीस लिहिलेल्या पत्रांत करीत आहे. पसासं (२३३१)हि पहा.

परि. ९८—देह–शब्द पुल्लिंगी व नपुं. हि आहे. येथें ' हें देह ' म्हटलें आहे. ये सामान्यरूप = या गोष्टी, तृतीया. (जरी देह अर्पण केला) तरी स्वाधिकाराचेनि नांवें। जें वांटिया आलें स्वभावें। ते आचरें विधिगौरवें। शृंगारौनि ज्ञा. १८·२००

प्रकरण १२

चंदी, व्यंकोजी व संभाजी

परि. १००—यांनीं राज्य करीत असत. तृतीयारब्ध कर्तरी प्रयोग. तृतीया विभक्तीनें वाक्याचा प्रारंभ पण कर्तरी प्रयोगाप्रमाणें वाक्याचा शेवट. ऐतिहासिक कालांत अशी वाक्यरचना फार आढळते. साने ह्यांनीं भाऊसाहेबांच्या बखरप्रस्तावनेंत ह्याविषयीं बरेंच लिहिलें व त्यासंबंधानें माझ्या भाऊसाहेबांच्या आवृत्तींत मीं कांहीं खुलासा केला. पण येथेंहि तीच रचना पाहून अधिक विचार करतां, दामले यांच्या शास्त्रीय व्याकरणांतील व गु. राजवाडे यांच्या विवेचनांतील भाग लक्षांत आणून 'तृतीयारब्ध कर्तरी प्रयोग' हें नांव ह्या प्रयोगार्थ देणें इष्ट व पुरेसें होईल. दामले यांनीं 'कर्माणि प्रयोगांत' 'पुराण' कर्मणी, 'नवीन' कर्मणी, 'शक्य' कर्मणि हे उपभेद दिले आहेत. पण ह्यावरून भेदस्वरूप, भेदलक्षण ध्यानीं येणें कठीण. म्हणून 'ऐतिहासिक कर्मणि' असा एक आणखी उपभेद सांगण्यानें त्याची गुणविशिष्टता कशी ध्यानीं येणार? म्हणून 'तृतीयारब्ध कर्तरि' हें नांव दिल्यानें त्या प्रयोगाचें लक्षण ध्यानीं येण्यास साहाय्य मिळेल. असो. अधिक विवेचन येथें नको. **आशंका—**'आ' हा येथील प्रत्यय स्वार्थी आहे; आसमंतात् इत्यादि अर्थाचा नाहीं. काय आशंका आहे? काय शंका आहे किंवा अवघड आहे? **बिरुद**-वीरस्तुति किंवा पुढें ध्येयवाक्य-उच्च स्वरानें घोषित करणें. विरुदः विरुद्. ब-वयोरभेदः ह्या न्यायानें आणि रकार पूर्वाक्षरांत मिळाल्यानें विरुद्-चें बीद झालें. ह्याचे अर्थ दोनः एक गुण वा अधिकारनिदर्शक अलंकार, वस्त्र, शस्त्र अशी वस्तु आणि घराण्याचें, व्यक्तीचें व्रत, ध्येय. पुढें बिरुद म्हणजे नुसता अलंकार एवढाच अर्थ कांहीं ठिकाणच्या उल्लेखावरून दिसतो. येथें स्तवनार्ह गुणाढ्यतेचा भाग नाहीं. शिवाजीराजांना बाराव्या वर्षी पुण्याकडे पाठवितांना **बिरुदैश्च ध्वजैरुच्चैः कोषेणापि च भूयसा** पुष्कळ द्रव्य व बिरुदें व उच्च ध्वज दिले असें शि. भा. अ. १० श्लो २६ मध्यें आलें आहे. त्यास = नंतर.

परि. १०१—म्हणजे हें स्वरूपदर्शक उभयान्वयी अव्यय.

परि. ९९ ते १०२ मध्यें आलेलें युद्धवृत्त, त्यांतील सरदार बंधु व्यंकाजी यांची भेट, वाटा आणि बिरुदें मागणी; व्यंकोजी व शिवाजी यांच्या सैनिकांची लढाई व शेवटीं झालेला तह ह्या संबंधांत शिवाजी राजांचेंच पत्र प्रसिद्ध आहे.

बखर व पत्रें परस्परांस पूरक आहेत. बखरींतील मजकुरास दुजोरा देत आहेत असें आढळून येईल. पसासं (२३३२), (२०९५), शिवदिग्विजय बखर पृ. ३२६-३६ किंवा इ. सं. तंजावरचें राजघराणें पृ. ३९ ते ४१ पहा.

पृथ्वीवर— लेखकाच्या दृष्टिक्षेप्रमाणें अर्थात् पुढेंहि परि. ११५ 'पृथ्वीकंप' आला आहे तेथें, आसपासच्या बऱ्याच मुलुखांत. परामर्ष शब्द-लेखन परामृष असेंहि इतिहासकालीं करीत. आणि वाटतें कीं उच्चारहि तसाच असावा.

परि. १०२ जालें-योजिलें **त्यास**-तथापि.

परि. १०३ कित्येक = पुष्कळ, अनेक; हें विशेषण. 'प्रकारें' हें पद अध्याहृत घ्यावयाचें. विशेषणानें नामाचा अर्थ सांगण्याची पद्धत. कित्येक-शब्द बक्षिसें ह्यांकडेहि घ्यावयाचा. येथील जालनापूरवरील शिवाजीच्या स्वारीसंबंधानें स्वतः शिवाजीनेंच व्यंकाजीस पत्र लिहिलें तें येथें जरूर वाचावें. पसासं (२२३६). त्या पत्रांत ह्या स्वारीप्रसंगीं सिदोजी निंबाळकर पडला हें नाहीं. पण बखरींतील हें नांव सर्वांशीं प्रमाण समजून तें वृत्त घेतलें पाहिजे. गडनाम-दुरुस्तीहि बरोबर आहे हें त्या पत्रावरून ध्यानीं येईल.

परि. १०४—संभाजी 'राजियावर रुसून मोगलाईंत गेले' इत्यादि. ह्या परिच्छेदांतील वृत्तान्तासंबधानें स्वतः शिवाजीराजांच्या पत्रांतील वाक्यें अशीं "चिरं. रा. संभाजी राजे मोगलाईत गेले होते. त्यास आणावयाचा उपाय बहुत प्रकारें केला. त्यासहि कळो आलें की ये पातशाहींत अगर विजापूरच अगर भागानगरचे पातशाहींत आपले मनोगतानरूप चालणार नाहीं. ऐसे जाणोन त्यानी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसें समाधान करून ये तैसें केलें. हें सविस्तर वर्तमान तुम्हास कळावें म्हणोन लिहिलें असें.' पसासं (२२३६) पृ. ६८४ पहा.

प्रकरण १३

शिवाजीच्या राज्याची मोजदाद

परि. १०५—ते १०८ अखेर शिवाजीच्या राज्यांतील गडकिल्याबरोबर, शिलेदार--सरदार, नाणीं, इत्यादींचींहि नांवें दिलीं आहेत. हीं नांवें प्रस्तुत दिलीं आहेत तशीं मुळांत, नाहींत. येथें तीं व तितकींच नांवें वर्णानुक्रमानें दिलीं आहेत. ह्या नांवांपैकीं जीं नांवें पत्रांतून आलीं आहेत म्हणजे त्यांबद्दलचें

प्रामाण्य वाढलें आहे, तसेंच ज्या ऐ० घटनाप्रसंगानें तीं आलीं, तसेंच शि. भा. अथवा पर्णा० ग्र. आ. मध्यें आहेत त्यांचा विचार साकल्यानें स्वतंत्र करावयास हवा. तो विषय येथें अशक्य. ह्या मोजदादीबद्दल प्रास्ताविकांत कांहीं विचार मांडला आहे. तानाजी दुदुसकर (मोरे) परि. १०७.


परि. १०९—ह्या परिच्छेदांत सभासदानें शिवाजीच्या राज्याचे दोघां भावांचे दोन वांटे ह्या दृष्टीनें प्रांत व राज्य केवढे तें सांगितलें. हें लक्षांत घेतां सामान्यतः महाराष्ट्र व कर्नाटक असेच हे दोन विभाग दिसतात. ह्याच्याच जोडीला परि. ९० मध्यें त्या वेळेपर्यंतच्या राज्यापैकीं तीन विभाग करून तें तिघां सरकारकुनांकडे सोंपविले हें जें आलें आहे तें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांत कोकण व मावळ भाग आणि थोडा घाटमाथा किंवा देश ह्याला प्राधान्य आहे. आणि येथें (महाराष्ट्र) देश व कर्नाटक ही दृष्टि प्रधान आहे.

प्रकरण १४

राजियांचें देहावसान

परि. १११—कालज्ञान–आपला अंतकाल आला हें जाणणें. शिवाजीराजे पन्हाळा येथें संभाजीस भेटले तेव्हांच त्यांनीं हे जाणल्याचें लेखक पुढेंच सांगत आहे. ह्या परिच्छेदापासून शेवटच्या ११६व्या परिच्छेदाअखेर सर्व मजकूर शिवाजीराजांच्या अंतकाळची स्थिति सांगणारा आहे. लेखक कृष्णाजी अनंत हे, शिवाजीची ही स्थिति पाहिलेले, तसेंच संभाजीचीहि राजवट ज्यांच्या डोळ्याखालून गेलेली, असे आहेत. ते राजारामपक्षाचे आहेत. म्हणजे इथून तिथून सर्व संभाजीचे विरुद्ध तेवढें लिहावयाचें किंवा सरळ असलें तरी वांकडें करून संभाजीच्या विरुद्ध होत आहेना मग लिहावयाचें, इतका त्या पक्षपातित्वाचा अर्थ करणें योग्य होणार नाहीं. तात्पर्य, शिवाजीचा अंतकाल सांगतांना, तो अंत, शारीरिक आजारापेक्षां कोणच्या प्रकारच्या मानसिक चिंतेंत झाला हें सभासदास व्यक्त करावयाचें आहे. दुसरें व मुख्य हें कीं, स्वतः शिवाजीच जेथें आपल्या वडील पुत्राविषयीं संभाजीविषयीं स्पष्टपणें वेगळें आणि गुणानें उणें सांगत आहे (परि.१०४ पहा पत्रोल्लेख) तेथें संभाजीस सोडून इतरच दोषी आहेत हें म्हणणें एकतर्फी होईल. असो. सभासदानें शिवाजीच्या तोंडीं ' हीं पुत्राचीं लक्षणें ' असें म्हणून संभाजी, औरंगजेब

विशेषतः मलिकंबर व त्याचा पुत्र फत्तेखान ह्यांचा दाखला दिला आहे (परि. ११२) तो अवश्य लक्षांत घेतला पाहिजे. आणि संभाजीस अनुलक्षून फत्तेखानाची जी घटना निजामशाही रक्षणाच्या कामीं प्रतिकूल झाली ती वाचकांनीं ध्यानीं आणावी असा लेखकाचा हा दृष्टान्त देण्यांतील हेतु असणार हें उघड आहे. फत्तेखान निजामशाहीचा प्रसिद्ध व कर्तबगार दिवाण मलिकंबर त्याचा मुलगा. मलिकंबर इ. स. १६२६ (मे १२) मध्यें मेल्यानंतर बुऱ्हाण निजामशहा व फत्तेखान (वजीरदिवाण) हे दोघे राज्यकारभार पाहात असतांच हमीदखान हाहि कर्तबगार सरदार बुऱ्हाणजवळ असे व त्याचें महत्त्व वाढून फत्तेखान कैद झाला. (इ. १६२९). पण इतर परिस्थितीमुळें इ. १६३१ मध्यें त्याची सुटका झाली. याकुतखान, उदाजीराम हे जरी फत्तेखानाच्या बाजूचे होते तरी हमीदखान, मुकरबखान ह्यांनीं शहास सांगितलें फत्तेखान गर्विष्ठ, खुनशी, स्वार्थी आहे त्यास बंधमुक्त करूं नये. फत्तेखानानें दिवाणसूत्रें हातीं येतांच बुऱ्हाण निजामशहालाच वेड लागलें असें म्हणून कैदेंत टाकलें. कैदेंत हा शहा मेला. (पण हा आजारानें मेला कीं विष देऊन मारला ह्याबद्दल आदिलशाही व मोगली इतिहासकारांत मतभेद आहेत.) व ह्यानें आपल्याविरुद्ध असलेले जुने कारभारी व मुत्सद्दी काढून टाकले. पंचवीस सरदारांना एका दिवसांत ठार केले आणि पुढें ऐन युद्धाचे वेळीं मूर्तजा निजामशहास ठार केलें. यामुळें निजामशाही सरदारांचीं मनें फत्तेखानाविषयीं अत्यंत कलुषित झालीं आणि फत्तेखान हा अत्यंत चंचल वृत्तीचा असल्यामुळें मूर्तजानंतर हुसेनशहा निजामी तख्तावर आला. पण त्यालाहि फत्तेखानानें काळाकोटांत ठेऊन कैद केलें. तात्पर्य, अशा ह्या बिनधोरणी व कठोर वागणुकीमुळें महबतखानाकडून फत्तेखानास डेऱ्यांत बोलावून डेऱ्याच्या कनाथी एकदम तोडून खानास पकडलें व निजामशाही परतंत्र झाली. (ह्या निजामशाहींतील पातशहांच्या नांवांत अनिश्चितता आढळते.) सभासदानें संभाजीविषयीं शिवाजीचे म्हणून सांगितलेले उद्गार आणि स्वतः शिवाजीच्या पत्रांतील संभाजीसंबंधीचा उल्लेख ह्यांत एकवटपणा दिसतो. दुसरी गोष्ट कीं, सभासद ह्या ठिकाणीं मागें जसा पौराणिक दृष्टान्त क्वचित् देतो तसा न देतां इतिहासकालांतीलच देतो हेंहि अवश्य लक्ष्य आहे. ह्यानंतर बखरसमाप्ति, चरित्रफलश्रुति व अशुभ चिन्हें होणें ह्या संबंधीं विशेष सांगण्याजोगें नाहीं. आणि प्रास्ताविकांत त्याहिबद्दल आवश्यक तें लिहिलें आहे.



श्री *महादेव*

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ५ कालयुक्त संवत्सरे आ (श्विन बहु)ल द्वितीया रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रप (ति)

××	याणी मोकदमानी पेठ सिंगणापूर पठ मलेवाडी (या)-सी आज्ञा केली येसी जे श्री देवाचा फुलाचा × ×

× × × पुलारी कैलासवासी मातुश्रीसाहेबी दस्ती (बाद) क (रुनु) (दरोबस्त) इनाम करून दिल्हा आहे. तेणेप्रमाणें चालतच आहे हाली (न) वी सनद पाहिजे म्हणून उजुर केला त्या करितां फुलारी येउनु विदित केले तरी इस्किल कराया गरज काय आहे ? याउपारी ईस्कील न करणे यांचा (बाग) खेरीज दस्त करून इनाम दिल्हा आहे आणि चा

लत आहे तेणेचप्रमाणें पेस्तरहि चालवणें तालिक घेउनु असत्ल पुला रीसी देणे **लेखनालंकार** ' मर्या देयंविरा जते ' (मर्यादेंतील वाचन).


हें ११ ओळींचें **शिवाजीराजांचें पत्र** आहे. पत्रांत राजशक काल आहे. म्ह. राज्याभिषेक शक ५ = शा. श. १६०० आश्विन वद्य २ = इ. १६७८ सप्टें. २२ रविवार ही मिती व तारीख येते. पत्राच्या प्रारंभीं श्रीकाराजवळ 'महादेव' हें बालबोधींत लिहिलेलें आहे. हें नांव पत्रांत ४ थ्या ओळींत श्रीपुढें जी जागा मोकळी रेघेसह सोडली आहे तेथें वाचावयाचें. म्हणजे 'श्री महादेव (शिखर शिंगणापूरचा) देवाचा **फुलबाग** ' इत्यादि. इतिहासकालीं पत्रांत अशी जागा सोडीत आणि तेथें वाचावयाचा शब्द वर लिहीत. अर्थातच हें नांव देव, गुरु, वडील, छत्रपती अशासारखें आदरणीय व श्रेष्ठ असावयाचें. आदर, मान्यता ह्या दृष्टीनें हें नांव आपल्या पंक्तींत न घेतां त्याचें स्थान वरचें आहे हें ह्या लेखनपद्धतीनें व्यक्त करीत असत. शिवाजीनें मालोजी घोरपड्यांना जें पत्र लिहिलें त्यांतहि श्रीकाराजवळ असेंच 'महादेव' लेखन आहे. आणि त्या

पत्रांतहि 'श्री देवाची आण असें जें लिहिलें तेथेंहि असेंच नांव वाचावयाचें. (पहा पसासं. १९०१ शेवटून ५ वी ओळ.)

पत्राचें वाचन मूळ पत्रावरून करण्यास सोपें जावें म्हणून ओळीस ओळ छापलें आहे. राज्याभिषेक शक असलेल्या पत्रावर सामान्यतः शिवाजीची मुद्रा नसावयाची हा नियम. पत्रांत प्रारंभीं दोन ओळी सोडून दुवळयी चार ओळींची लंब वर्तुळी मुद्रा प्रधानांची आहे. तींमधील मजकूर–" श्रीशिवराजें,द्र हर्षनिदान ॥ ऱ्यं, बक सुत मोरेश्वर, मुख्य प्रधान ॥ " असा आहे. आणि शेवटीं समाप्तिमुद्रा आहे. व त्या अलीकडील 'लेखनालंकार' हेंहि मोडी लिहिणें वेगळ्या अधिकाऱ्यांचें आहे.

मुद्रा—प्रतिपच्चंद्र, लेखेव वर्धिष्णुर्वि, श्ववंदिता ॥ शाहस्, नौः शिवस्यैषा मुद्रा, भद्राय राजते ॥ ओळी ५


शिवाजीची मुद्रा मर्यादा




महाराजांची 'मुद्रा' आणि 'मर्यादा'



छत्रपतींचा 'शिवराई' (निराळा नमुना)



छत्रपतींचा 'शिवराई'



राज्याभिषेकापूर्वीचा 'शिवराई'

कालपट

सभासद बखर ग्रंथामध्यें शिवाजीराजांच्या हालचाली बऱ्याच आल्या आहेत. युद्धें, लुटालुटी, लग्नें, मुलांचे जन्म, मुलांचीं लग्नें, भेटी, किल्ले घेणें, ठाणीं बसविणें इत्यादि इत्यादि. पण ह्या सर्वांचे काल दिलेले नाहींत. फक्त, अफजलवध, राज्याभिषेक आणि निर्याण एवढ्या तीन प्रसंगांचा काल लेखकानें दिलेला आहे. बाकीच्या घटनांचा काल सांगितला नाहीं ह्याचा अर्थ लेखकास तो माहीत नाहीं ह्यापेक्षां काल देण्याची आवश्यकता त्यास वाटली नाहीं हा आहे. म्हणजे जर त्यास ती आवश्यकता वाटली असती तर त्याला तो मिळविणें व मिळणें सहज शक्य होतें. तेव्हां आवश्यकता वाटली नाहीं हेंच खरें. युद्धांत जय झाला की पराजय हें महत्त्वाचें; लुटींत किती प्राप्ति झाली हें मुख्य, भेटींत काय ठरलें ह्याला महत्त्व; ह्या गोष्टी केव्हां कोणत्या दिवशीं घडल्या हें कळलें काय आणि न कळलें काय सारखेंच; ही तेव्हांची समजूत. आणि घटनांच्या निकट-वर्तित्वामुळें, पुराणादिकांच्या श्रवणवाचनामुळें काल दार्शित केला गेला नाहीं. पण आज ही स्थिति नाहीं. घटनेच्या वस्तुस्थितीसाठीं, प्रामाण्यासाठीं आणि शक्य तितका आवश्यक बारीक तपशील कळण्यासाठीं, इतिहासकालीन वाता-वरण व जीवनराहणी कळण्याच्या दृष्टीनें स्थल–व्यक्ति–प्रसंगाप्रमाणें काल कळणें आजच्या इतिहासाभ्यासकाला अत्यंत आवश्यक वाटतें.

दुसरी लक्ष्य गोष्ट कीं, बखरींतून काल दिलेला नसतो आणि ज्या चरित्रा-विषयीं, लढाईविषयीं ह्या बखरग्रंथांतून माहिती दिलेली असते त्या चरित्रादि संबंधानें आतां शकावली, पत्रें, करिने, कैफियती इत्यादि अन्य साधनसाहित्य उपलब्ध व प्रसिद्ध झाल्यानंतर बखर-ग्रंथांतून आढळणारा हा उणेपणा दूर केला पाहिजे. ही जोड ह्या ग्रंथांना अशाहि स्थितींत न दिली आणि ते ते ग्रंथ नुसतें प्रसिद्ध होत राहिले; इतकेंच नव्हे तर बखरींत काल दिलेला नसतो एवढेंच म्हणत ते ग्रंथ प्रसिद्ध केले अथवा अभ्यासांत घेतले तर त्या साधनांचाहि अपमान केल्यासारखें होईल आणि इ. स. १९२३ नंतर १९६० सालचें महाराष्ट्रेतिहासाचे अभ्यासक म्हणविणें हेंहि बरोबर नाहीं. यथाशक्ति पुढील कालपट जोडण्याचा यत्न केला आहे.

‘ भाऊसाहेब बखरीस ’ कालपट जोडणें आणि प्रस्तुत शिवचरित्रास कालपट जोडणें ह्यांत मात्र मला फरक वाटला. आणि त्याचें कारण मूळ ग्रंथाची मांडणी व इतर साधनांचें वेगळेपण हें आहे. ह्या संबंधानें एकदोन उदाहरणें देऊन हें वेगळेपण कालपटानंतर विवरणप्रसंगीं सांगणें इष्ट.

प्रस्तुत कालपटांत पहिल्या रकान्यांत बखर ग्रंथांतील परिच्छेद-क्रमांक दिला आहे आणि दुसऱ्या रकान्यांत त्या परिच्छेदांतील विषय व तोच विषय पत्रादि साधनांत कसा तें सांगून नंतर काल मिळाला तो दिला आणि शेवटीं कालाचे ग्रंथाधार दर्शित केले आहेत. ‘ शिवकालीन शकावलि ’ वगैरे साधन-ग्रंथांतून जे शिवप्रसंग आले आहेत ते ह्या कालपटांत घेतले नाहींत व घेण्याचें कारण नाहीं. केवळ बखर ग्रंथांतर्गतच जे प्रसंग व ज्या प्रसंगाचा काल जसा मला मिळाला तसा यथामति दिला आहे. सुहुरसनाचा रकाना अशासाठीं स्वतंत्र काल ह्या सदरांत दिला कीं तेथें पत्रांतुन वगैरे मुसलमानी सन आल्यास दर्शित करावा. पण तसें फारसें मिळालें नाहीं. कारण, तो काल देण्याजोगीं मूळ पत्रें घटना सांगणारीं कमीच आहेत. ‘जेधेशकावलींतीलच’ कालोल्लेख पुष्कळ. ह्यामुळें तिन्ही कालनिदर्शनांपैकीं मूळचा काल कोणता तें लक्षांत येण्यासाठीं जाड ठसा किंवा अधोरेखन हेंहि केलेलें नाहीं.

ह्या कालपटास अनुलक्षून कांहीं प्रसंगांची स्पष्टता व चर्चा करणें तीहि थोडक्यांत कालपट संपल्यानंतर केली आहे.

येथेंच हेंहि प्रसंगानें सांगावेसें वाटतें कीं, शिवाजीच्या चरित्रासंबंधानें व त्या कालासंबंधानें माहिती देणारीं निरनिराळीं अनेक साधनें उपलब्ध व प्रसिद्ध झालीं आहेत. ह्या साधनांतील उल्लेखांची सविवरण चर्चा करून कोणचा उल्लेख कितपत प्रमाण ह्याविषयीं स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. अशी चर्चा तच्चरित्रलेखक स्वतःशीं कांहीं बाबतींत करीतहि असतील आणि निष्कर्ष लक्षांत घेऊन चरित्रलेखन करीत असतील हें खरें आहे. पण अशा चर्चेचें स्वतंत्र पुस्तकच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. पत्रसारसंग्रहांत पत्रांचा संग्रह केला. पण त्याविषयीं असा चर्चा-ग्रंथ नसल्यामुळें किंवा पत्राखालीं टीपेंत किंवा स्वतंत्र पुढें कांहींहि लिहिलें नसल्यामुळें, तसेंच ह्या संग्रहावरून मूळ व पूर्ण पत्रच लक्षांत घ्यावयाचें आहे, केवळ सार लक्षांत आणण्यानें भागवाभागव

करूं नये हेंहि स्पष्टतया ध्यानीं न आल्यानें कांहींची फसगत झाली आहे. पत्र, शकावलि, बखर, काव्य, करिना इत्यादि इत्यादि निरनिराळीं साधनें एकाच मापानें प्रमाण वा अप्रमाण मानतां येणार नाहींत. त्यांतील कोणचा भाग कितपत प्रमाण हें सांगणें आतां आवश्यक झालें आहे.

अनुल्लेख हा तारतम्यानेंच लक्षांत घ्यावयाचा आहे. नाहींतर जो शि. भा. कार षाहिस्तेखानाबरोबर आलेल्या ५५ सरदारांचीं, अफजलप्रसंगीं शिवाजी व खान ह्यांकडील अनेक लोकांचीं नांवें देतो, तो दादाजी कोंडदेवाचा किंवा त्याबरोबर आलेल्या सरकारकुनांचा निर्देशहि करीत नाहीं हें काय? तसेंच सभासद व भारतकार कान्होजी जेध्यांचा नामनिर्देश करीत नाहींत; भूषणकाव्यांत जे सरदार उल्लिखित आहेत तेंहि सभासद सांगत नाहीं आणि अन्य पर्शियन ग्रंथ, प्रत्यक्ष मराठी पत्रें ह्यांतुन वरील व्यक्तींचे त्यांचे कार्यासह कितीतरी उल्लेख सांपडतात. म्हणून अनुल्लेख हें लक्षण सर्वांशीं प्रमाण नाहीं, खुद्द शिवाजीच्याच एका पत्रांत जें आहे तें अगदीं त्याच निमित्तानें लिहिलेल्या दुसऱ्या पत्रांत नाहीं. (पसासं १०४१ व १९०१) पहा. असो. इत्यर्थ कीं, प्रामाण्याप्रामाण्याच्या दृष्टीनें साधनांचीच चर्चा केलेलें व निष्कर्ष काढलेलें स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध होणें अत्यंत अत्यंत आवश्यक आहे. असो. कालपट असा.—

'भाऊसाहेब बखरीस' कालपट जोडणें आणि प्रस्तुत शिवचरित्रास कालपट जोडणें ह्यांत मात्र मला फरक वाटला. आणि त्याचें कारण मूळ ग्रंथाची मांडणी व इतर साधनांचें वेगळेपण हें आहे. ह्या संबंधानें एकदोन उदाहरणें देऊन हें वेगळेपण कालपटानंतर विवरणप्रसंगीं सांगणें इष्ट.

प्रस्तुत कालपटांत पहिल्या रकान्यांत बखर ग्रंथांतील परिच्छेद-क्रमांक दिला आहे आणि दुसऱ्या रकान्यांत त्या परिच्छेदांतील विषय व तोच विषय पत्रादि साधनांत कसा तें सांगून नंतर काल मिळाला तो दिला आणि शेवटीं कालाचे ग्रंथाधार दर्शित केले आहेत. 'शिवकालीन शकावलि' वगैरे साधन-ग्रंथांतून जे शिवप्रसंग आले आहेत ते ह्या कालपटांत घेतले नाहींत व घेण्याचें कारण नाहीं. केवळ बखर ग्रंथांतर्गतच जे प्रसंग व ज्या प्रसंगाचा काल जसा मला मिळाला तसा यथामति दिला आहे. सुहुरसनाचा रकाना अशासाठीं स्वतंत्र काल ह्या सदरांत दिला कीं तेथें पत्रांतुन वगैरे मुसलमानी सन आल्यास दर्शित करावा. पण तसें फारसें मिळालें नाहीं. कारण, तो काल देण्याजोगीं मूळ पत्रें घटना सांगणारीं कमीच आहेत. 'जेधेशकावलींतीलच' कालोल्लेख पुष्कळ. ह्यामुळें तिन्ही कालनिदर्शनांपैकीं मूळचा काल कोणता तें लक्षांत येण्यासाठीं जाड ठसा किंवा अधोरेखन हेंहि केलेलें नाहीं.

ह्या कालपटास अनुलक्षून कांहीं प्रसंगांची स्पष्टता व चर्चा करणें तीहि थोडक्यांत कालपट संपल्यानंतर केली आहे.

येथेंच हेंहि प्रसंगानें सांगावेसें वाटतें कीं, शिवाजीच्या चरित्रासंबंधानें व त्या कालासंबंधानें माहिती देणारीं निरनिराळीं अनेक साधनें उपलब्ध व प्रसिद्ध झालीं आहेत. ह्या साधनांतील उल्लेखांची सविवरण चर्चा करून कोणचा उल्लेख कितपत प्रमाण ह्याविषयीं स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. अशी चर्चा तच्चरित्रलेखक स्वतःशीं कांहीं बाबतींत करीतहि असतील आणि निष्कर्ष लक्षांत घेऊन चरित्रलेखन करीत असतील हें खरें आहे. पण अशा चर्चेचें स्वतंत्र पुस्तकच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. पत्रसारसंग्रहांत पत्रांचा संग्रह केला. पण त्याविषयीं असा चर्चा-ग्रंथ नसल्यामुळें किंवा पत्राखालीं टीपेंत किंवा स्वतंत्र पुढें कांहींहि लिहिलें नसल्यामुळें, तसेंच ह्या संग्रहावरून मूळ व पूर्ण पत्रच लक्षांत घ्यावयाचें आहे, केवळ सार लक्षांत आणण्यानें भागवाभागव

करूं नये हेंहि स्पष्टतया ध्यानीं न आल्यानें कांहींची फसगत झाली आहे. पत्र, शकावलि, बखर, काव्य, करिना इत्यादि इत्यादि निरनिराळीं साधनें एकाच मापानें प्रमाण वा अप्रमाण मानतां येणार नाहींत. त्यांतील कोणचा भाग कितपत प्रमाण हें सांगणें आतां आवश्यक झालें आहे.

अनुल्लेख हा तारतम्यानेंच लक्षांत घ्यावयाचा आहे. नाहींतर जो शि. भा. कार पाहिस्तेखानाबरोबर आलेल्या ५५ सरदारांचीं, अफजलप्रसंगीं शिवाजी व खान ह्यांकडील अनेक लोकांचीं नांवें देतो, तो दादाजी कोंडदेवाचा किंवा त्याबरोबर आलेल्या सरकारकुनांचा निर्देशहि करीत नाहीं हें काय? तसेंच सभासद व भारतकार कान्होजी जेध्यांचा नामनिर्देश करीत नाहींत; भूषणकाव्यांत जे सरदार उल्लिखित आहेत तेंहि सभासद सांगत नाहीं आणि अन्य पर्शियन ग्रंथ, प्रत्यक्ष मराठी पत्रें ह्यांतुन वरील व्यक्तींचे त्यांचे कार्यासह कितीतरी उल्लेख सांपडतात. म्हणून अनुल्लेख हें लक्षण सर्वांशीं प्रमाण नाहीं, खुद्द शिवाजीच्याच एका पत्रांत जें आहे तें अगदीं त्याच निमित्तानें लिहिलेल्या दुसऱ्या पत्रांत नाहीं. (पसासं १०४१ व १९०१) पहा. असो. इत्यर्थ कीं, प्रामाण्याप्रामाण्याच्या दृष्टीनें साधनांचीच चर्चा केलेलें व निष्कर्ष काढलेलें स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध होणें अत्यंत अत्यंत आवश्यक आहे. असो. कालपट असा.—

कालपट

प्रकरण १ – थोडें पूर्वजवृत्त व शिवाजी कार्यारंभ

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ स.	आधार
२	मालोजीराजे वजीर	सरगु-हो-लष्करी पदवी		१५२८	१६०६	खं. १५ ले. ३६८ मोकासदार
,,	विठोजीराजे ,,	,, सिखर शिंगणापूर	१०१२	१५३३	१६११	रा. खं. १५ ले. ३७५–३७७
३	शहाजी ' महाराज '			१५७१	१६४९	(जे.श. शिच.प्र. पृ. १७) शिच.प्र.१६
,,	शिवाजीराजे जन्म		शुक्र सं.	१५५१ फा. व. ३	१६३० फे. १९	शिभा. अ. ६·२६; २७
,,	शिवाजी पुण्यास	खेडेबारे व पुणा		१५६३	१६४२	,,
,,	दादाजी कोंडदेव मृत्यु		सु १०४९	१५६९	१६४७	शि. श. पृ. १३. खं. २० ले. २३७
४	सुपे देश साधिला	सुपे घेतलें सं. मो. धरलें	×	१५७८ आश्वि.	१६५६ अक्टो.	शिच. प्र. पृ ५०
५	जुन्नर शहर मारिलें	जुन्नर लुटलें.	×	१५७९ वै. व. १२	१६५७ ए ३०	शिच प्र. ५०, १८
,,	अमदानगर मारिलें	अ. नगरीं नौसिरखान युद्ध	×	१५७९ आषा.शु ३	१६५७ जून. ४	,, ,,

,,	कोंढाणा भेदें घेतला	दग्यानें दे (घे) ऊन	×	१५७०	१६४८ जुलै २६	पूर्वी ,, पृ. १७
,,	पुरंदर मुलांचें भांडण मिटवितांना घेतला		×	१५७१ श्रा. शु. १३	१६४९ ऑग. १७	शिचसा १ ले. ३२ (५६२). शिभा. अ. १३·५८; १२९; १४·३७; १५·१९
६	कल्याण भिवंडी मारिली	कल्याण भि. घेतली.	×	१५७९ श्वि. व. १२	१६५७ आक्टो. २४	शिच प्र. पृ. १८.
,,	‘ मुरुमदेव ’ डोंगर राजगड	राज. इमारतीचें काम	×	१५७१	१६४९	शिच प्र. पृ. ४१ जे.क.पसासं (५६२)
६	माहुली आदिल० किल्ला घेतला	←	×	१५७९ पौ. १५	१६५८ जाने. ९	शिच प्र. पृ. ५६
,,	चंद्रावाची जावळी	जमावाच्या बळें घेतली	×	१५७७ पौ. व. १४	१६५६ जाने. २६	शिच प्र. पृ. १७, करि. २.
७	शृंगारपूर राज्य हस्तगत			१५८३ वै. शु. ११	१६६१ ए. २९	शिच प्र. पृ. २२, ५८, पसासं (८८७)
,,	,,	,,	,,	,,	,,	शिभा. अ. ३१, ३२
,,	मोरोपंतास पेशवाई		×	१५८४ चै व १० गुरु.	१६६२ ए. ३	शिच प्र. पृ. २२
,,	निळो सोनदेव	सुरनिशी–मजमू.	×	,,	,,	,, ,,
,,	पुत्र संभाजी जन्म	← (पुरंदरीं)	×	१५७९ ज्ये. शु. गुरु. १२	१६५७ मे १४	,, पृ. १८, ५०, ६५

प्रकरण २—शिवाजी व अफजलखान

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. स.	आधार
८	शिवाजीस 'कैद्‌वार' ठेवण्याबद्दल आदिलशाही पत्र शहाजीस.	शिवाजीच्या बंडखोरीत तुम्ही नाहीं हें कळलें इ.	हि. १०६८ रम. ४	१५८० ज्येष्ठ शु. ५	१६५८ मे २७	हौस ऑफ शि. पृ. ?
९	अफजलखान रवाना	मावळ दे० ना फर्मानें रवाना	हि. १०६९ सवाल	१५८१ वैशाख	१६५९ एप्रील	शिचप्र पृ. १९; पसासं (७७४)
१०	खानाचा देवांना उपद्रव	पंढरपुरास खानाची तसवास.		१५८१ ज्येष्ठ	१६५९ मे, जून	राखं. २० ले. २१७
१०	खान व शिवाजी--	वकील भेट	×	१५८१ का.	१६५९ आक्टो.	शिच प्र. पृ. १८
२०	,,	भेट खान मृत्यु.		१५८१ मार्ग. शु. ७	१६५९ नोव्हें. १०	शि. भा. अ. २१·८३, ८४ शिच. प्र. पृ. २०

प्रकरण ३—प्रतापगडावर देवीची स्थापना व कारभार-व्यवस्था

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. स.	आधार
२६	तळ-कोंकण क़ाबीज	त. कों. अर्जानी	१०६२ जिल्हे १७	१५८३ श्राव. ३	१६६१ ऑग. ३	पसासं. (८५७), (८७१)

,,	बालेघाट इ. ७ शहरें	मोंगलाईंत स्वारी		१५८५ चैत्र शु. १	१६६३ मार्च १०	पसासं. (९२३)
,,	,,	नेताजी मोंगली मुलुखांत लुटालूट.	,,	,,	,,	,, ,,

प्रकरण ४—शिवाजीवर शास्ताखान व जयसिंग

३५	शास्ताखान पुण्यास		फ. १०७१	१५८३ श्वि. १५८३	१६६० सप्टें. १६६१	राखं. २० पृ. ७१; शिभा २८.४७; शिच प्र. पृ. २१
,,	खबर तहकीक आणविली	सोनोपंत खानाकडून आला	×	१५८२ कार्तिक	१६६३ ऑक्टो.	शिच प्र. पृ. २१
३६	शास्ताखानास शास्त			१५८५ चैत्र शु. ८	१६६३ ए. ५	शिच प्र. पृ. २२; शिभा २५.६०
३७	शास्ताखान ३ रे दिवशीं परतला		×	१५८५ चै. शु. ११	१६६३ ए. ११	सब. ३७
३९	जयसिंग निवडला	जयसिंग सुभा जाला	?	१५८६ श्वि. व. ५	१६६४ सप्टें. ३०	शिच प्र. पृ. १९६; औ० नामा भा. १ पृ. ६१
	,, येत आहे.	,, पुण्यास येतो	?	१५८६ फा. व. १२	१६६५ मार्च ३	हस अंजुमान
४४	(पुरंदर) गडास सामान चालों न द्यावें	दिलेरचा पुरंदरास वेढा	?	१५८७ चैत्र व. ९	१६६५ मार्च ३०	,, ,,

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. स.	आधार
४६	शिवाजी जयसिंग भेट	← पुरंदर येथें		१५८७ आषा.शु.९	१६६५ जून ११	हप्त अंजुमान, पसासं (१००)
,,	,, दिलेरखान भेट	— ,, दरवाजा		१५८७ आषा. शु. १२	१६६५ जून १४	शिच प्र. पृ. ५१
४७	शिवाजी जयसिंग	सला, संभाजी चाकर		१५८७ आषा. शु. ११	१६६५ जून १२	शिच प्र. पृ. २३
	२७ गड देणें (पंच हजारी निर्देश नाहीं)	पंच हजारी (गडांचा निर्देश नाहीं.)		,,	,,	,,
४८	जयसिंग-शिवाजी विजापूर स्वारी			१५८७ कार्ति.व.८	१६६५ नोवें. २०	शिच प्र. २३, हप्त अंजु.
,,	विजापुरास सला	अंतस्ते द्रव्य देऊन		१५८७ मार्ग.	१६६५ नोवें. डिसें.	शिच प्र. पृ. २३

प्रकरण ५— शिवाजी राजांचें आग्र्यास जाणें व येणें.

४९	राजे व पुत्र दिल्लीस	औरं०चे भेटीस गेले		१५८७ फा. शु. ९	१६६६ मार्च ५	शिच प्र. पृ. २३
,,	,, दिल्लीस	दोन महिन्यांनीं पावले	×	१५८८ वै. व. १	१६६६ मे ५	सब.
५०	,, सदर भेट	अगरियास औरंग० भेट	×	१५८८ वै. व. ४	१६६६ मे १२	औरंग० नामा भा. १ पृ. ६६
५५	शिवाजीभोंवतीं चौकी	बिघाड होऊन चौक्या	×	१५८८ ज्ये. शु. २	१६६६ मे २५	शिच प्र. पृ. २३, २४
५७	पेटाऱ्यांतून बसून चालिले	पेटारियांत बैसोन पळाले	×	१५८८ श्रा. व. १२	१६६६ ऑगष्ट १७	,, २४, औरंग० भा. १ पृ. ६७
६१	शिवाजी स्वस्तिक्षेम राजगडीं	संभाजीसह राजगडास	×	१५८८ मार्ग. शु. ५	१६६६ नोवें. २०	,, पृ. २४

प्रकरण ६—आदिलशाहीशीं युद्ध

६३	तानाजी कोंडाणा घेतो	कोंडाणा घेतला मालुसरा पडला.	×	१५९१ घ वद्य ९ शुक्रवारीं	१६७० फे. ४	शिच प्र. पृ. २४
६५	संभाजी राजगडास					रा. खं. ८ ले. २३

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ स.	आधार
६५	' विश्वासराव ' पदवी वगैरे		सु. १०७२	१५९३	१६७१ ७२	रा. खं. ८ ले. २३
६७	भेद करून पन्हाळा गड घेतला.	स्वामीनी रात्रीं पन्हाळा घेतला	?	१५८१ मार्ग. व. ९	=१६५९ नोवें. २८	शिच प्र. पृ. २०
,,	जोहारास दिला.	सलाबतखानासि दिल्हा सला केला	?	=१५८२ भाद्र.व.१३	१६६० सप्टें. २२	,, पृ. २१ हिं. बु. स. पृ. ६२६
६८	नेताजीची सरनौबती दूर	नेताजी शिवाजी भांडण ?	×	१५८८ चै. व. ३०	१६६६ एप्री. २४	इं. फॅक्टरी १२ पृ. २०४–०६
	कडतोजी गुजरास	'सेनापती' 'प्रतापराव'	×	,,	,,	,, ,,

प्रकरण ७ वें—शिवाजीराजांचा मोंगलाशीं तह व बिघाड

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ स.	आधार
७०	मोगलाशीं सला	मोगलाशीं सख्य	बोलणें व औरंगाबादेस प्रत्यक्ष जाणें	१५८९ चैत्र व. ५	१६६७ एप्री. ३	शिच प्र. पृ. २४, ५२ (१२००)

	संभाजी हप्त हजारी		×	१५९० श्रा. शु. ८	१६६८ ऑगष्ट ५	,, ,, ,, ,, स. पत्रें पृ. ९५ ले. ७१
७२	औरंग० फितव्याची शंका व कैदेचा हुकूम	सला तुटला	×	१५९१ पौष	१६६९ डिसें.	,, ,,
७४	रांगणा गडावरील भांडण	रांगण्यावरील वेढा मारून	×	१५८९ वै.	१६६७ ए. मे.	,, २४
७५	सुरत लुटली	सुरत शहर लुटलें.	×	१५९२ का. शु. १	१६७० आक्टो. ३–४	,, २५
,,	वणी दिंडोरी युद्ध	दिंडोरीस झगडा	×	,,	,,	,,
७६	रायबागीण धरली व सोडली	×	×	१५९२ का. शु. १४	१६७० ऑक्टो. १७	शि. च. प्र. २५
७९	बाप शहाजी मृत्यु	शहाजी परलोकास	×	१५८५ माघ. शु. ६	१६६४ जा. २३	पृ. २२
८०	राजपुरी शिद्दी जेर, एक हात सजला			१५९७ मार्ग.	१६७५ नोवें.	

प्रकरण ८—आदिल व मोगल-शाहीशीं युद्ध.

८१	बाजी घोरपडे व लखम सावंत यांवर स्वारी		?	१५८६ का.	१६६४ नोवें.	पसासं (१०८१) शिच प्र. २३, ६०, १७९, डॉ. बालकृष्ण शिवचरित्र भा. १ विभाग २ पृ. ५३३, डच पत्र पसासं (७६५)

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. सन	आधार
८२	फोंडा कोट उडविला		?	१५९७ वै. शु. २	१६७५ ए. १७	शिच प्र. पृ. २७, ६४
,,	कडवाड, शिवेश्वर इ.	निरंजन, अकोले, कद्रे इ.		१५९७ ज्येष्ठ	१६७५ मे-जून	,, ,, पसासं (१७५१) (१४७८ पहा)
८३	बसनूर मारिलें	बार्सिलोर—बसकर	?	१५८६ फा. शु. १३ (३?)	१६६५ फे. १७	शिच प्र. पृ. २३, ५१, ६०, २३, ५१, ६० पसासं (१०४४)
८४	कारंजें लूट	कारंजियास गेले		१५९२ मार्ग.	१६७० नोवें.	पप ग्र. अ. १.३१; पसासं (१३७०) (—७१), शिच प्र. पृ. २५, ६२
८५	रायगड बांधकाम			१५९३	१६७१ ७२	पसासं (१४५६)
८६	राजाराम जन्म	(स पत्रें पृ. ११५ चूक)	?	१५९१ फा. शु. १५	१६७० फे. २४	शिच प्र. पृ. २४, ५२, ६२
,,	जवार घेतलें			१५९४ ज्ये. व. ५	१६७२ जून ५	,, २५ पसासं (१४७४)
,,	रामनगर घेतलें			,,	,,	,, ,, ,,

८७	मोरोपंतांनीं सालेर इ.	किले घेतले	?	१५९२ पौष	१६७० डिसें.	पप ग्र २-५, ७; पसासं (१३७८) शिच प्र. पृ. २५, ५२, ६२ (स पत्रें पृ. १४७, ले. ३५)
८८	ह्या युद्धांत अनेक उपयुद्धें व बराच काल खर्चीं पडला आहे.			१५९२ माघ शु. १३ व. ५	१६७२ फे. ७	
८९	बहादुरखान सुभा होतो			१५९४ माघ	१६७३ जाने.	औरंग० व्हा. २ पृ. ४२

प्रकरण ९—आदिलशाहीशीं युद्ध.

९०	पन्हाळा किल्ला घेतला			१५९४ फा. व. १३	१६७३ मार्च ६	शिच प्र. पृ. २६
९१	अबदुल करीम बेलोलखान प्रतापरावांकडून पराभूत			१५९५ चैत्र	१६७३ ए.	,, ,,
९०	सातारा, परळी इ.			१५९५ चै. व. १०	१६७३ ए. १	शिच प्र. पृ. २६
	,, ,,			१५९५ श्रा. व. ९	१६७३ जुलै २७	,, ,,
९१	निवटियास प्रतापराव बहलोलखान युद्ध, प्रतापराव मृत्यु (ने-जे-सरी)			१५९५ माघ व. १४	१६७४ फे. २४	शिच प्र. पृ. २६, पसासं (१६२५) पृ. ३१

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. सन	आधार
९२	हंसाजीस सरनौबती			१५९६ चै. शु. १३	१६७४ ए. ८	शिच प्र. पृ. २७, पसासं (१३९२)
,,	संपगांवीं हंबीरराव	संपगाव पेठ लूट	(पेंपरे ?)	१५९५ फा व. ११	१६७४ मा. २३	,, पृ. २७ पसासं (१६२५)
,,	हंबीरराव व हुसेनखान मायणा युद्ध			१५९८ पौष	१६७७ जाने.	शिच प्र. पृ. २८
९३	किले कोपळ मोरोपंत घेतो			१६०१ चै.शु.१५	१६७९ मार्च ३	,, पृ. २९, ३०, ५३ शिचसा ले. ४४

प्रकरण १० — शिवाजीराजे यांस राज्याभिषेक

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. सन	आधार
९४	सिंहासनारूढ व अभिषेक	राज्याभिषेक	सु. १०७५ रवल ११	१५९६ ज्ये.शु. १३	१६७४ जून ६ शुक्रवार	शिच प्र. पृ. ५२, २७, ६४; पसासं (१६४३), (१६८४) (१६४०–४९)

प्रकरण ११ — ‘उभयता छत्रपतींची’ भेट

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. सन	आधार
९६	भीमातीरीं बहादुरखान छावणी		×	१५९६ भाद्र.	१६७४ ऑगष्ट	पसासं (१६६४,–७१,–९९)

९६	स्नेही तह (मागील गोष्ट)		×	१५९४ ज्ये. शु. ५	१६७२ मे २१	शिच प्र. पृ. २६
,,	बहादुरखानाशीं तह (?)			१५९७ चैत्र	१६७५ मार्च	पसासं (१७३९), (१७६५) (१८८५, १८९३)
,,	शिवाजी भागानगरकर बादशहा भेट			१५९८ फा.	१६७७ फे. मा.	शिच प्र. पृ. २८, पसासं (१९३६) (१९४५)
९७	कुतुबशहाचा शिवाजी-राजांना टेकार		×	१५९८	१६७७	पसासं (१९०५); स. पत्रें पृ. १४६ ले. ३४.
९८	शैल्य पर्वतगमन मलिकार्जुन-दर्शन		×	१५९९ वै.	१६७७ मे	स पत्रें पृ. १३२, १३३ ले. १८, २० (?)

प्रकरण १२—चंदी, व्यंकोजी व संभाजी

९९	चंदीस वेढा व स्थल-साध्य	चंजी घेतली, कुल-कर्नाटक कबज	×	१५९९ चैत्र, वै.	१६७७ मार्च, ए., मे.	शिच प्र. पृ. २८ पसासं (१९२०) (१९४५)
,,	त्रिमल महाल फत्ते शेरखान युद्ध	त्रिपती त्रिवादी तिरुमले		१५९९ आषाढ	१६७७ जून, जुलै	पसासं ३ पृ. १२५ ,, ,, (१९४८); (१९५३)
१००	शिवाजी-व्यंकोजी भेट	यंकोजी खासा भेट	×	१५९९ श्रावण	१६७७ जुलै, ऑ.	पसासं ३ पृ. १२६–१२७ ,, ,, (२३३२)
१०१	येलूर कोट घेतला	वेलूर (१४ महिने लढत.)		१५९९ भाद्र.	१६७७ ते ७८ ऑगष्ट	(१९३७) शिच प्र. पृ. २९

परिच्छेद	बखरींतील उल्लेख	पत्रांतील उल्लेख	सुहुरसन	काल शा. शक	इ. सन	आधार
१०१	चंदीकडील राज्याची मजमू	रघुनाथ नारायण		१५९९ आश्विन	१६७७ आक्टो.	शिच प्र. पृ. २९, पसासं ३ पृ. १२९
,,	बलवाड			१५९९ फा. व. २	१६७८ फे. २८	(२०१९)
,,	शिवाजी पन्हाळ्यास			१६०० चै.	१६७८ ए.	पसासं (२०३०)
१०२	व्यंकाजी व हंबीरराव युद्ध			१५९९ मार्ग. शु. १	१६७७ नोवें. १५	पसासं (१९९५) मार्टिन पृ. ३१७ (१९२०)
१०३	शिवाजी जालनापूर			१६०१ कार्तिक	१६७९ नोवें.	पसासं (२२३६) शिच प्र. पृ. ३०
१०४	संभाजी रुसोन	मोंगल दिलेर० कडे		१६०० पौ. शु. १०	१६७८ डिसें. १३	शिच प्र. पृ. २९
,,	,, परत	पन्हाळ्यास		१६०१ मार्ग.व.१४	१६७९ डिसें. २१	हिं. बु. स. पृ. ७१६
,,	शिवाजी पन्हाळ्यास	संभाजी भेट		१६०२ पौ. व. ७	१६८० जाने १३	पसासं (२२३६) शिच प्र. पृ. ३०

प्रकरण १३—शिवाजीच्या राज्याची मोजदाद

११०	पुत्र राजाराम लग्न			१६०१ फा. व. १०	१६८० मार्च १५	शिच प्र. पृ. ३०

प्रकरण १४—'राजियाचें देहावसान'

१११	शिवाजीस ज्वरव्यथा			१६०२ चै. शु. ४	१६८० मार्च २४	पसासं (२२५३)
११४	राजियाचें देहावसान			१६०२ चैत्र शु. १५	१६८० एप्रील ३	शिच प्र. पृ. ३०
११६	बखर संपूर्ण जाहाली			१६१९ चैत्र शु. १	१६९७ मार्च १३	

कालपटासंबंधीं कांहीं विवरण

कालदृष्ट्या सभासदांच्या लेखनाची पाहणी करतां असें आढळून येतें कीं, प्रकरण ८ पासून सभासदांचें लेखन दृष्टार्थ-कथनात्मक आहे; आणि त्याचें लक्षण सामान्यपणें हें आहे कीं, ह्यापूर्वीच्या लेखनांत जी कालविसंगति किंवा कालविपर्यय आढळतो तसा व तितका पुढें नाहीं. कालपट आणि परिच्छेद हेच पुढें दार्शित केल्यामुळें हें म्हणणें सहज पाहतां येईल. स्पष्टतेसाठीं सनाचे आंकडेच थोडेसे मांडून दाखवितों. मात्र परिच्छेदांक वा विषयनिर्देश स्थल-संकोचास्तव करीत नाहीं.

प्रकरण १ ते ७		प्रकरण ८ ते १४ अखेर	
१६०६	१६६२	१६६७	१६७९
१६११	१६५७	१६७५	१६७८–७९
१६४९	१६५८	१६६५	१६८०
१६३०	१६५९	१६७०	
१६४२	१६६१	१६७२–७२	
१६४७	१६६३	१६७०	
१६५६	१६६०	१६७०–७२	
१६५७	१६७१	१६७३–७६	
१६४८	१६६०	१६७३	
१६४९	१६६८	१६७५–७७	
१६५७	१६६७	१६७९	
१६४९	१६७०	१६७४	
१६५८	१६६७	१६७७	
१६५६	१६६४	१६७८	
१६६१	१६७५		

एकदां घेतलेला वर्षाचा आंकडा त्या वर्षांतीलच अन्य हालचाल असली तरी दुबार मांडलेला नाहीं. ह्या आंकड्यांवरून आपल्या ध्यानीं येईल कीं, पहिल्या सात प्रकरणांत इ. स. १६४२ पासून—पहिले चार सन मालोजी, विठोजी,

शहाजी व शिवजन्म ह्यांचेसंबंधीं आहेत. पुढें मात्र ५७ नंतर ४८, पुन्हां ५७ नंतर ४९; ५८ नंतर ५६, ६२ नंतर पुन्हां ५७; ६३ नंतर ६०; ७१ नंतर पुनः ६०; ७० नंतर ६७ व ६७ नंतर ६४ असे आले आहेत आणि प्रकरण ८ पासून ७५ नंतर ६५ आणि ७९ नंतर ७४ ह्या दोन विजोडांशिवाय एकहि वर्षाचा क्रम चुकलेला नाहीं. नेमक्या पुढल्या पुढल्याच घटना लेखकानें सांगितल्या आहेत. ह्यावरून उघडच होत आहे कीं, लेखकाचें हें लेखन श्रुतार्थ–कथनांतील नाहीं. संस्कृतांत 'दृष्टार्थ–कथन' आणि 'श्रुतार्थ–कथन' (पाहिलेलें सांगणें आणि ऐकलेलें सांगणें) ह्याला वेगळ्या संज्ञा असल्याचें सांगितलें आहे. आख्यान व उपाख्यान हीं तीं नांवें असावींत. ह्यांतहि थोडे पोटभेद आहेतच. असो. तर सभासदांचें लेखन ह्याप्रमाणें प्रकरण ८ पासून अधिक विश्वसनीय उतरलें आहे.

येथेंच हेंहि ध्यानीं येईल कीं, ह्यामुळें म्हणजे घटनांच्या कालसंगतीमुळें सभासदांची भाषा व मांडणी थोडी निराळी आणि अधिक वास्तव–निदर्शक झाली आहे व तें सहज आहे. प्रकरण ७ पर्यंत मुख्यतः अफजल (पृ. ६ ते २१), शास्ताखान (पृ. २८–३२) व जयसिंग प्रकरण म्हणजे आग्रा जाणें येणें (पृ. ३३ ते ५१); दिलेले किल्ले घेणें व शिवाजीची मांडलिकी, आणि शिद्दीवरील स्वारी (पृ. ५२–६५) एवढे प्रसंग सांगितले. म्हणजे बखरीचा निम्मा भाग एवढ्यांत आला. ह्यापुढें बाजी घोरपडे, लखम सावंत, फोंडा, आरमारी स्वारी, कारंजा लूट, रायगड बांधकाम, राजाराम-जन्म, कोळवणवर ताबा, सालेरी–पांगेरा युद्ध, पन्हाळा पुनः घेणें, बहलोलखान संपगांव लूट, दीक्षित हणमंते यांस तैनात, प्रतापरावाचे जागीं हंबीरराव, किले कोपळ; राज्याभिषेक, कुतुबशहास भेट, कर्नाटक स्वारी, व्यंकोजी भेट, जालना स्वारी, संभाजी दिलेरखानाकडे जाणें–येणें, राजाराम लग्न आणि महानिर्याण एवढे प्रसंग आले आहेत. ह्यांमध्यें मल्लिकार्जुनदर्शन–प्रसंगाशिवाय एकाहि प्रसंगीं भवानी देवीचा साक्षात्कार नाहीं. दृष्टार्थकथन व श्रुतार्थकथन ह्यांमधील हा भेद जसा लक्ष्यांत घेण्याजोगा त्याचप्रमाणें एखाद्या घटनेंतील अनेक व्यक्तींचीं नांवें दर्शित करणें हाहि भाग दृष्टार्थ–कथनाचा निदर्शक आहे. अनेक स्थलांचीं नांवें घेण्यापेक्षां व्यक्तींचीं नांवें सांगणें हें उघडच पहिल्याच परिच्छेदांतल्याप्रमाणें 'राज्यांतील माहीत लोक आहां' ह्या उल्लेखाला सार्थ करणारें आहे. व्यक्त्युल्लेखासंबंधांत एक-

---

स्वयं दृष्टार्थकथनं प्राहुराख्यानकं बुधाः ॥

दोन ठिकाणें अशीं आढळतात कीं, त्याहिवरून ते ते प्रसंगकथन ऐकीव आहे. उदाहरणार्थ, अफजलवधानंतर शिवाजीच्या सैन्याच्या हातीं जें जडजवाहीर, कापड, मोहरा इत्यादि द्रव्य लागलें; तसेंच घोडे, हत्ती, उंट मिळाले त्याची आंकडेवारी लेखकानें दिली. पण 'वजीर पाडाव जाहाले तो तपशील असा' असें म्हणून जें सांगितलें तें अगदींच सामान्य व बिनमाहितगारीचें आहे. 'बितपशील' असें म्हणून आव मात्र आणला मोठा आणि सांगितलें काय तर '१ सरदार व वजीर मातबर, अफजलखानाचे पुत्र, नाटकशाळेचे (म्ह. खानाच्या दासींचे) पुत्र.' एवढेंच. वजीर वा सरदार किंवा पुत्र ह्यांचीं नांवें तर नाहींतच पण किती ती संख्याहि नाहीं. कापड, ओझीं अथवा द्रव्य, घोडे ह्यांचें मोघम आंकडे आंगलट न येणारे दिल्यानें माहितगारीनें तपशील दिला असें होत नाहीं. वजीर दर्शित करावयाच्या दुसऱ्या रकान्यांत 'मंबाजी भोसले व झुंझारराव घाटगे याखेरीज लोक' एवढें लिहून पाडाव सांपडलेल्याची माहिती संपविली आहे. ह्याच प्रसंगांतील माहिती शि. भा. कार ह्यापेक्षां सूक्ष्म व विस्तृत देत आहे. इत्यर्थ कीं; सभासदांचें हें लिहिणें, वर म्हटल्याप्रमाणें सामान्यपणें ऐकलेलें आहे; पाहिलेलें किंवा वाचलेलें अथवा प्रत्यक्ष त्या प्रसंगांत असलेल्याकडून नेमकें व पुरतें कळलेलें असें नाहीं.

पुरंदर केव्हां घेतला—कालपटांत परि. ५ च्या पुढें ही घटना इ. स. १६४७–४८ मध्यें घडल्याचें दिलें आहे. शहाजी–शिवाजींचीं पत्रें, शिचसा. खं. १ मधील पत्र आणि बखरींतील मजकूर जर लक्षांत घेतला तर समन्वय व तोहि सयुक्तिकपणें होतो. तो असा कीं, दादाजी कोंडदेव मृत्यु पावल्यानंतर म्ह. १६४७ नंतर सिंहगडप्रमाणें पुरंदरहि शिवाजीनें घेतला. घेतला तरी गडावर राहणाऱ्या निळकंठराव सरनाईक ह्या पूर्व अधिकाऱ्यांना तेथून काढलें असें केलें नाहीं; कारण ते शहाजी-शिवाजीशीं 'इमानें वर्तत'. पण नीळकंठराव मेल्यानंतर त्यांच्या मुलांत भांडणें सुरू झालीं म्हणून शिवाजीनें त्यांची अन्यत्र व्यवस्था केली व गडावरचें त्यांचें राहणें हालविलें. बखरकारांना ह्या बारीक माहितीसह ती घटना कळली नाहीं आणि 'मुलांचीं भांडणें मिटवावयास गेले व आपणच गड घेतला' ही ऐकीव माहिती त्यांनीं लिहिली. मुलांचीं भांडणें आणि शिवाजीचा पुरंदरवर ताबा असा संबंध नाहीं.

जयसिंह ह्यास पुण्याचे सुभेदार केव्हां नेमलें? वरून इ. १६६४

सप्टें. ३० ला नेमणूक झाली. तेथें आणखी असेंहि सांगितलें कीं औरंगजेबाचा तो वाढदिवस होता. (म्हणजे मराठी काल श. १५८६ आश्विन वद्य ५ शुक्रवार.) औं० नामा व्हॉ. १ पृ. ६१.

मग जे. श. त श. १५८६ ज्येष्ठ शुद्ध १४ सोमवारीं 'जसवंतसिंगें कोंढाणियाचा वेढा काढला त्याचा सुबा तगीर होऊन जयसिंगास जाला' हें जें सांगितलें, त्यांत फार तफावत पडतें. व हीहि मिति सदोष आहे. १५८६ च्या ज्येष्ठ शु. १४ स शनिवार आहे सोमवार नाहीं. व ही चूक शिचप्र. पृ. २७० वर गु. आपटे यांनीं मान्य करून स्पष्टीकरण समजत नाहीं असेंहि लिहिलें. पण अधिक चर्चा केली नाहीं.

जयसिंहाच्या आधीं जसवंतसिंग दक्षिणचा सुभेदार होता व तो १५८६ च्या ज्येष्ठांत कोंडाण्यास वेढा घालून बसलाहि होता. पण औरंगजेबाच्या सुभेदारी बदलीमुळें म्हणा वेढाहि उठला आणि त्याची सुभेदारीहि संपली. श. १५८५ च्या ज्येष्ठांत सुभेदारी जसवंतसिंगाची संपली. व १५८६ च्या आश्विनांत जयसिंगाची सुभेदारी सुरू झाली. म्हणजे ज्येष्ठ ते आश्विन हे ४ महिने दक्षिण सुभ्यावर कोण अधिकारी ?

तसेंच १५८६ च्या आश्विनांत जयसिंग सुभा जाला व तो पुण्यास १५८६ फाल्गुन शु. १२ पर्यंत आला. म्हणजे १५८६ आश्विन ते फाल्गुन हे पांच महिने जसवंतसिंग पुण्यांतच असल्याचें सांगितलें आहे.

मुख्य कीं जे. श. त १५८६ ज्येष्ठांत म्हणजे आश्विन पूर्वीं ४ महिने जयसिंग नेमणूक हें जे. श. कसें आलें ? म्हणजे जें आलें त्याची कांहीं संगति बसते काय ?

जर जयसिंग पुण्यास येण्याआधीं म्हणजे फाल्गुना आधीं दोन महिने आपल्या शिक्क्याच्या सनदा देतो, तर ज्येष्ठांत जयसिंहाची योजना, आश्विनांत प्रत्यक्ष वाढदिवस प्रसंगानें नेमणूक व वस्त्रें आणि मार्ग. तील सनद व फाल्गुनांत पुण्यास येणें असेंहि कां समजूं नये. जे. श. तील ही मिती गणितशुद्ध नाहीं ही ह्यांत मोठी अडचण आहे. कोंडाण्याचा वेढा नेमका केव्हां व कां निघाला हें जर कळलें तर जसवंतसिंहाच्या जागीं जयसिंह केव्हां आला तें कळेल.

तूर्त वाटतें कीं, जसवंतसिंगाचा वेढा त्याच्या तगिरीमुळें आणि शिवाजी जी

लढंत देत होता त्यामुळें उठला. आणि शायिस्तेखानाच्या नाकर्तेपणामुळें जशी त्याची सुभेदारी रद्द तशीच जसवंतसिंगाची रद्द झाली व तेव्हांच इकडे कळलें कीं जयसिंगाची योजना झाली व प्रत्यक्ष नेमणूक पुढें पण योजनेपुरतें शकावलींतील लिहिणें असावें.

साधनसमन्वय व प्रामाण्याच्या दृष्टीनें हें लिहिलें. प्रत्यक्षतः सिद्ध होण्यासाठीं अधिक कागद मिळणें आवश्यक.

देवी भवानीचा स्वप्न-साक्षात्कार—ह्या चरित्रांत एकूण सहा प्रसंगानें देवीचा साक्षात्कार घडलेला आहे. ह्या सहाहि प्रसंगांत चारच प्रसंग असे आहेत कीं ज्यांचा प्रामुख्यानें विचार व्हावयास पाहिजे. हे चार विवक्षित प्रसंग आणि शिवाजीराजांच्या चरित्रांतील अन्य सर्व प्रसंग, लक्ष्यांत घेऊन ह्या देवीसंचाराच्या गोष्टीचा विचार केला तर असें सांगणें इष्ट होईल कीं, जे प्रसंग **शत्रुप्रेरित** आहेत, जे चरित्रप्रारंभाचे आहेत आणि जे अगतिकत्व उत्पन्न करणारे झाले आहेत, क्रमानें त्याच प्रसंगीं देवी भवानीनें शिवाजीराजांना अभय व संदेश दिलेला आहे. आणखी एक प्रसंग जवळ जवळ ह्याच गुणाचा व म्हणून ह्या चार प्रसंगांच्या जोडीला धरावयास पाहिजे असें वाटण्याजोगा आहे. पण चरित्रलेखकानें तो प्रसंग स्पष्टतया वेगळा व व्यवहारदृष्ट्या योग्य असा उलगडून मांडला असल्यामुळें ह्या गणनेंत धरण्याचें कारण नाहीं. हे सर्व प्रसंग असें–अफजल, षाहिस्तेखान, जयसिंग, आग्रा येथील चौकी आणि शिवाजीनें औरंगजेबाची मनसबदारी पतकरणें. हे पांचहि प्रसंग शत्रुप्रेरित आहेत, अगतिकत्व उत्पन्न करणारे आहेत आणि पांचवा वगळून बाकीच्या चारहि प्रसंगींच देवी अंगांत येणें घडलें आहे. शिवाजीराजांच्या अडतीस वर्षांमधील असामान्य कर्तृत्वप्रसंगांत इतकें वैविध्य, इतकें भव्यत्व व इतकें अलौकिकत्व आहे कीं त्यांपैकीं आणखी बऱ्याच प्रसंगीं असा देवीचा संचार व्हावयास पाहिजे. पण फक्त ह्याच चार प्रसंगांत तो आढळून येतो, इतरत्र नाहीं. म्हणून ह्या चार प्रसंगांची वेगळीक कोणची ती लक्ष्यांत घेतां वरीलप्रमाणें आगळे गुण ह्यांत दिसून येतात. सभासदांच्या शिवाजी चरित्रांत शिवाजीच्या स्वयंप्रेरित मुलुखगिरीचे, लुटालुटीचे अर्थात् शत्रूच्या ताब्यांत असलेल्या मुलखांत जाऊन केलेले युद्धादि प्रसंग पुष्कळच आहेत. पण त्यांत कोठें असा स्वप्नसाक्षात्काराचा भाग नाहीं; आणखीहि एक गोष्ट येथें ध्यानांत घ्यावयाची कीं, जे प्रसंग चरित्र

लेखकदृष्ट आहेत त्यांत असा देवीसंचार नाहीं. अन्य बखरग्रंथांवरून हा देवी-साक्षात्काराचा भाग पाहणें हें येथें एका दृष्टीनें आवश्यक; पण तो विस्तार फार होईल म्हणून तूर्त स्थगित.

वरील प्रसंगांतील पांचवा प्रसंग शत्रुप्रेरित असला तरी लेखकांनीं व्यवहार्य-दृष्ट्या तो कथन केला आहे. असें वर लिहिलें म्हणजे शिवाजी तेथें म्हणतो 'आपणास तीन पातशाहींशीं दावे सोसवत नाहींत; त्यांतहि दोन तीन चपेटे होऊन हलाखी झालेली. म्हणून मोंगलाशीं सला करावा, दोन वर्षें बळ धरून सांवरावें. मग पुढें जें कर्तव्य तें करूं' (पृ. ५७). असाच व मोगलाशींच सला करण्याचा प्रसंग जयसिंगाच्या वेळीं आला होता. पण तेव्हां देवीचें सांगणें घडलें आहे. त्यांतहि एक आणखी विशेष आहे तें म्हणजे मोंगलाशीं सलाहि करायचा आणि भेटीस स्वतः व तेंहि आग्रा येथें जावयाचें. येथें सला करून म्हणजे मनसबदारी पतकरून इतर अधिकाऱ्यांना पाठवावयाचें व तेंहि जवळच औरंगाबादेस. पण हा पांचवा प्रसंग सोडून इतर चार प्रसंगांतील चारहि लक्षणें देवीच्या स्वप्नसाक्षात्कारास निमंत्रण देतीं झालीं.

उरले दोन प्रसंग (पृ. २१ व ८७) हे अगदीं भिन्न आहेत हें प्रारंभीं सांगितलेंच. देवीची प्रतापगडीं स्थापना आणि मल्लिकार्जुन–दर्शन–प्रसंगीं झालेली संसार–उपरति. ह्या उपरतींत 'तुजे ये गोष्टीं मोक्ष नाहीं' हें वाक्य फार महत्त्वाचें आहे. इतकें कीं, त्यासाठीं देवीचा आविर्भाव अत्यवश्य चालेल. **देखें अनुक्रमाधारें । स्वधर्मु जो आचरे । तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥** अ. ३ **हा निजधर्मु जै सांडे…तेंचि बंधु पडे ८२** नियत कर्म–स्वधर्माप्रमाणें नेमलेलें कर्तव्य–करणें त्यानेंच मोक्ष, कर्तव्य सोडून केलेल्या कृत्यानें मोक्षप्राप्ति नाहीं. देवीच्या संचारप्रसंगानें हें येथें पुनः लिहिलें. हाच थोडा भाग परि. ९८ च्या टिपणींत आला आहे. पृ. १५१.

पन्हाळा घेण्याच्या बाबतींत शकावली, शि. भा. व सभासद ह्यांत भिन्नता आहे. पन्हाळा दोनदां घेतला हें सर्वांना–जयरामकविसुद्धां–मान्य. शि. भा. कार प्रथम पन्हाळा घेतला तो आणि जयरामकवि दुसऱ्यांदा घेतला तो कथाभाग सांगतात. शकावली व सभासद दोनहि प्रसंग सांगतात. पण शि. भा. अ. २३ मध्यें (६२–७१) तो लढून घेतला असें आलें आहे आणि

जयराम कवीच्या पर्णालपर्वतग्रहणाख्यानामध्यें (अ. ३ श्लोक १६–३२) मात्र भेद करून घेतला असें म्हणण्यास वाव मिळतो. भेद = रात्रीं गुप्तपणें तटावर चढणें इ. पुढें समरप्रसंग. शकावलींत दुसऱ्यांदा जो पन्हाळा घेतला तो ' भेद करून ' घेतला असें आहे. आणि सभासद प्रथम घेतला तो ' भेद करून घेतला ' असें सांगतो ' (परि. ६७). सभासदांना दोनदां पन्हाळा घेतला हें शकावली-प्रमाणेंच माहीत आहे व तसें सांगितलेंहि (परि. ६७ व ९०) पण दुसऱ्यांदा पन्हाळा घेतला हें ज्या प्रसंगानंतर सांगावयाचें तेथेंच पहिल्यांदा घेतला हें सांगितलें गेल्यामुळें ' भेद करून ' घेतला हें लिहिलें गेलें आणि दुसऱ्यांदा घेतला तें सांगतेवेळीं हें लिहिलें नाहीं. प्रथम घेतला त्या प्रसंगाच्या दोन्ही शकावली मिळून पुढील मिती क्रमानें अशा—

१५८१	मार्ग.	व. ९	=	१६५९	नोवें. २८	शिचप्र. पृ. २० शिवाजी पन्हाळा घेतो.
,,	,,	,, १३	=	,,	डिसें. २	,, पृ. ५० पनाल्यावर गेले.
,,	पौष	व. १०	=	,,	डिसें. २८	,, पृ. २० व पृ. ५० शिवाजीचे रुस्तुम. व फज० शीं कोल्हापुरजवळ युद्ध.
१५८२	चैत्र	शु. १	=	१६६०	मार्च २	,, पृ. २१ शिवाजी पुनः पन्हाळ्यास व शिद्दीचा वेढा.
,,	आषाढ	व. १	=	,,	जुलै १३	,, ,, ,, शिवाजी पन्हाळ्याहून खेळणा गडावर.
,,	भाद्र.	व. १३	=	,,	सप्टं. २२	,, व शि. भा. शिवाजीच्या सांगण्यानुसार त्रिंबक भास्करानें सलाबतखानाशीं सला करून गड दिला.

एकूण १० महिन्यांचा (अधिक ज्येष्ठ धरून) हा पन्हाळा–प्रसंग–काळ येतो. ह्यामध्यें शिवाजीराजे पन्हाळ्याहून कोणच्या महिन्यांत निघून गेले ह्याविषयीं भिन्नता उरतेच आहे. कारण **' पंचमोऽयं तु संप्राप्तो नभाः**

शामनभाः शुभः' (शिभा. २६–५७) असें शिवभारतकार सांगतात. येथें नभः म्हणजे श्रावण आणि पंचमः म्ह. पांचवा म्हणजेहि श्रावणच असा दोनदां उल्लेख आला असून '**यामिन्याः प्रथमे यामे**' रात्रीच्या पहिल्या प्रहरीं शिवराज निघाला असें सांगितलें आहे. (शिभा. २६.६६) आणि जे श. त हें निघणें 'आषाढ वद्य १' रोजीं घडलें असें स्पष्ट सांगतें. येथें श्रावण ही उत्तरीय कालगणना मानिल्यास चालण्याजोगें आहे. पौर्णिमान्त महिनागणनेप्रमाणें आषाढ वद्य म्हणजे श्रावणच महिना येतो. मात्र शि. भा. कारांनीं येथेंच तेवढी ही कालगणना कशी सांगितली हा प्रश्न येईल हें खरें. पण आषाढ–श्रावणाचा मेळ ह्या प्रकारें बसतो, हें खरें. सभासदांनीं पन्हाळा दुसऱ्यांदा घेतला. त्याचा काल (१६७३ मार्च ६) सामान्यतः बरोबर लक्ष्यांत घेऊन तो परि. ९० पृ. ७४ वर सांगितला. पन्हाळ्यावरील स्वारीचा तिसरा एक प्रसंग हफ्त अंजुमान ह्या फार्सी ग्रंथाधारें आहे. पण हा प्रसंग विजापूरवरील स्वारीप्रमाणें मोंगलाकरतां होता, हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. सभासदाच्या हातुन जो घोटाळा झाला, त्यांत हा तिसरा प्रसंग नाहीं; ते प्रारंभीं सांगितले ते दोन प्रसंग होत.

आग्र्याहून पेटाऱ्यांतून पलायन— पण पुढें 'देशास आपल्या राज्यांत' राजगड येथें शिवाजी कोणत्या मार्गानें आला, एकटा कीं संभाजीसह आणि किती दिवसांत, ह्या संबंधांत तूर्त भिन्नता आढळून येते. जे. श. त आहे, इ. स. १६६६ आगष्ट १७ ला अगरियाहून निघून संभाजीसह वर्तमान इ. १६६६ नोवें. २० ला राजगडास आले. म्हणजे ३ महिन्यांचा प्रवास; कसकसा तें श. त नाहीं. सभासदानें मुदत दिली नाहीं; मथुरा–वाराणशी–गोंडवण–भागानगर–विजापूर हा मार्ग सांगितला व बरोबर संभाजी नाहीं हें दर्शित केलें. खं. ८ मधील पत्रावरून राजे प्रथम एकटेच आले, एवढेंच कळतें. आणि आतां शिवाजी बादशाही परवाने दाखवीतच नरवरपर्यंत (११६ मैल) ता. २० आगष्ट म्हणजे ३ दिवसांत येऊन पुढें सोंग व वेगळा मार्ग असेल कदाचित्, पण सप्टें. १२ पर्यंत राजगडास आल्याचें आणि एकटेच, हें कळतें (जयपूर अखबार). म्हणजे आग्रा ते राजगड अवघा २५ दिवसांचा प्रवास येतो. म्ह. तीन महिन्यांच्या जागीं अवघे २५ दिवस असा बदल होतो. हीच गोष्ट संभाजीसह कीं संभाजी मागाहून ? ह्याहि बाबतींत आहे व तीच येथें दर्शित

होते. प्रकरण ५ व ६ संबद्ध ही टीप आहे. असें वाटतें कीं हें बक्षीस वगैरे पुढें उक्त वर्षी दिलें असावें. संभाजी आधींच आला असावा.

आग्र्याहून शिवाजी व संभाजी परत येणें ह्या संबंधानें टिपणीमध्यें पृ. १३७ वर लिहिलेंच आहे. शिवाजीराजांचा हा प्रसंग अतिशय अद्भुत, अतर्क्य आणि अत्यंत सावधानतेचा व दूरदर्शिपणाचा होता. ' माझ्याभोंवतीं चौक्या दिल्या व मला अटकेंत ठेवलें तर ठीक ' पण हें माझ्याबरोबर असलेलें सैन्य कशाला आतां येथें ? तें जाऊं द्या दक्षिणेंत;' असें सांगून शिवाजीनें सैन्यासाठीं औरंगजेबांचे परवाने घेतले व सैन्य रवाना केलें. वाटतें कीं सैन्यासाठीं घेतलेल्या परवान्याची एक प्रत स्वतःजवळ ठेवली. पुढें लवकरच पेटाऱ्यांतुन पलायन करून तोच जवळचा परवाना दाखवीत कांहीं चौक्या म्हणजे नरवरच्या घाटीपर्यंत शिवाजी घोड्यावरून जलदीनें आला. आणि पुढें मात्र शिवाजीनें रूप बदललें. कारण शोध सुरूं झाला. आणि नंतर शिवाजीनें कोणकोणतीं रूपें घेतलीं व कोणत्या मार्गानें कसा आला हें एक त्यालाच माहीत ! तात्पर्य, अलिकडे मिळालेल्या कागदपत्रावरून शिवाजी पंचवीस दिवसांतच राजगडला आला असें म्हणावें लागतें. म्हणजे ऑगष्ट १७ ते सप्टें. ११ पर्यंतच हा अलौकिक प्रवास आटोपला. मग जे. श. त नोवें. २० ला (मार्ग. शु. ५) पितापुत्र राजगडास आले हें लिहिलें तें कसें ? प्रस्तुत उपलब्ध साधनाधारें शिवाजी प्रथम एकटाच राजगडास आला व मागाहून जे. श. त आलेल्या मितीस संभाजी आला व तेव्हां आपण आल्याचें गडकोटावरून तोफांच्या आवाजांत प्रगट केलें. असें समजावें लागतें. आणि संभाजीस आणणाऱ्यांना ' विश्वासराव ' पद्वी व कांहीं हजार होन बक्षीस दिलें तेंहि पुढें दिलें (कालपट पहा. परि. ६५). एकंदरींत हे सर्वच प्रकरण इतकें आश्चर्यचकित करणारें व असामान्य आहे कीं ' तुज वर्णी ऐसा तुजवीण नाहीं ' हीच तुकाराम महाराजांची किंवा ' स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कधीं कवी निपजती । ' ही कविवर्य मयूर पंडितांची उक्ति आठवते. सारांश, ह्या प्रसंगाचें आणखी कापदपत्र मिळाले पाहिजेत म्ह. संशोधन व्हावयास पाहिजे.

नेताजीची सरनौबती— सभासदांच्या लिहिण्यांत घोटाळे फार. खोट मुळींच नाहीं. पण ह्या प्रसंगाचा संबंध त्या प्रसंगाशीं जोडला गेल्यामुळें घोटाळे व विसंगति निर्माण झाली. अफजलमृत्यूनंतर विजापूर दरबारांत जी सहजच

विचलित स्थिति झाली व धांदल उडाली त्याचा फायदा घेण्याचे दृष्टीनें शिवाजीनेंच नेताजीला गदगलक्ष्मेश्वरपर्यंत स्वारी करण्यास पाठविलें. इकडे स्वतः शिवाजीनें पन्हाळा घेतला व नंतर सिद्दीजोहाराचा वेढा पडल्यामुळें शिवाजी पन्हाळ्यावर अडकला गेला. ह्या वेळीं शिवाजीनें नेताजीस वेढा घालणाऱ्या सैन्याशीं बाहेरून झुंज द्यावें असें म्हटलें. पण नेताजी लांब गेल्यामुळें तें घडलें नाहीं व म्हणून एव्हां 'समयास कैसा पावला नाहींस' हें शिवाजीनें म्हणणें शक्य आहे. कारण, शिवाजीराजांच्या सर्व हालचालींत त्वरा हा स्थायीभाव आहे. सारांश, नेताजी ह्या वेळीं शिवाजीच्या अपेक्षेप्रमाणें येऊन पोंचला नाहीं हें खरें, पण ह्यामुळें व ह्या वेळीं त्याचीं सरनौबती दूर केली असावी असें वाटत नाहीं. एकतर सभासदानें हा पन्हाळा-प्रसंग आग्राप्रकरणानंतर सांगितला हें बरोबर नाहीं आणि दुसरें जेव्हां सांगितला तेव्हां सरनोबतपदावरून नेताजीस दूर केला पण त्याचें कारण हें नाहीं.

बाजी घोरपडे व लखम सावंत ह्यांवरील स्वारी— शिवाजीराजांच्या चरित्रांतील ही स्वारी एका दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. दोन अडीच शतकांइतक्या दीर्घ कालांमध्यें-व त्या वेळचा हा दीर्घकाल-परकीय मुसलमानी सत्तेचा केवढा पगडा जनमनावर होता व तो दूर करणें हें जें शिवाजीचें ध्येय तें किती कठीण होतें हें ह्या स्वारीप्रसंगावरून सभासदांनीं चांगलें ध्यानीं आणून दिलें आहे. म्हणजे लखम सावंत देसाई हा आपणहून आदिलशाही दरबारला कळवितो कीं, 'मी शिवाजीवर जातो आणि कोंकण सोडवितो.' दरबारला आनंद झाला व विजापुराहून प्रथम खवासखान आणि नंतर बाजी घोरपडे सावंताच्या मदतीस निघाले. हें पाहतांच शिवाजीस साहजिकच संताप आला आणि घोरपडे यांजवर सैन्य पाठवून त्यास ठार केलें. हें पाहतांच खवासखान परत फिरला व त्यानें विजापूर गांठलें आणि लखम सावंतानेंहि पराभव पावून फिरंगाणाचा आश्रय केला. गोवेकरांनीं आपला आश्रय देण्याचा परोपकार आपल्या अपकाराला निमंत्रण देणारा होत आहे— कारण शिवाजी गोवेकरांवर जाणार व हा धाक फिरंगाणांना वाटून—त्यांनीं लखम सावंताला ठेवून घेतलें नाहीं. मग सभासद लिहितो 'जागा कोठें नाहीं.' तेव्हां सावंतानें वकील पाठवून शिवाजीचा कौल मागवून आपण भेटीस गेला व सावंत शिवाजीस सांगतो 'आपण सावंत म्हणजे भोसले यांचा गोत्रज; आपले तुम्ही

चालविणें उचित आहे.' शिवाजीनेंहि त्याची कुडाळची देशमुखी त्याजकडेच ठेविली; पण वतन म्हणून नव्हे, वेतन म्हणून आणि करारांत स्वतंत्र जमाव करूं नये, पदरीं फौज ठेवावी पण राजियाच्या स्वारीप्रसंगीं त्या फौजेनें शिवाजीच्या सैन्याबरोबर असण्यासाठीं.

येथें मुद्दा हा कीं, जो लखम सावंत ' आपण भोसले यांचा गोत्रज; आपलें चालविणें तुम्हांस उचित ' हें तत्त्वज्ञान ह्या वेळीं शिवाजीस सांगतो; तोच, आपणहून आदिलशाही दरबारला ' मी शिवाजीवर जातों. शिवाजीनें घेतलेलें कोंकण सोडवितों ' हें कसें सांगतो. कां, त्या वेळीं त्यास भोसले गोत्रजाचें स्मरण नव्हतें ? सर्वच महाराष्ट्रीयांचें आणि दाक्षिणीयांचें आणि भारतीयांचें ह्या आपल्या मूळ रूपाचें स्मरण राहिलेलें नव्हतें. समर्थ सांगतात हा '**स्मरणाचा बंध गेला । तो प्राणी मनुष्यांतूनि उठिला । कांहीं एक बंध ढळला । म्हणजे खोटें ॥** हें स्मरण देणें हें शिवरायाचें मुख्य उद्दिष्ट होय. लखम सावंताला तें प्रारंभीं झालें नाहीं; इतकेंच नव्हे उलटच वाटलें व म्हणूनच तो आदिलशाही दरबारला ' आपणहून शिवाजीवर जातों ' इत्यादि सांगता झाला.

सावंत व घोरपडे ह्यांचेपैकीं सावंतावरील स्वारीची ही फलश्रुति आहे. व तीच सावंताशीं झालेल्या तहांत आपणांस दिसून येते. (पहा पसासं. ७६५) घोरपड्यावरील स्वारीच्या फलश्रुतीसाठीं पसासं. (१९०१ पाहा).

शिवाजीराजांच्या कामगिरीचें रहस्य—शिवाजीराजांनीं स्वतःस राज्यभिषेकसंस्कार करवून **छत्रपतिपद** निर्माण केलें ही एवढीहि गोष्ट त्यांच्या थोर कामगिरीची पूर्ण निदर्शक आहे. तथापि एवढ्यानें हें थोरवी वर्णन संपूर्ण होत नाहीं. शिवाजीराजांच्या चरित्राचे दोन प्रमुख विभाग पडतात ते लक्ष्यांत घेतले नाहींत तर शिवकार्य जाणणें वृथा होण्याचा संभव. राज्याभिषेक होण्यापूर्वींचा शिवाजी आणि राज्याभिषेकानंतरचा शिवाजी. हे ते दोन विभाग. राज्याभिषेकसंस्कारामुळें शिवाजीराजांचें ध्येय अधिक उच्च झालें, दृष्टि व्यापक झाली, धोरण विकसित झालें, आणि राज्यकारभारांत अधिक गांभीर्य व तपशिलांत उदारता उत्पन्न झाली. आपण ' छत्रपति ' झालों म्हणजे दक्षिणेंतील त्या काळच्या परिभाषेनें सांगावयाचें तर–तिसरे ' पातशहा ' झालों. सभासदानें तेंच सांगितलें

(पृ. ८२). अर्थातच शिवाजीराजांना वाटलें आतां पातशहा पातशहा म्हणूनच दुसऱ्या दोन पातशहांशीं भेटी झाल्या पाहिजेत आणि तिघांनीं मिळून आणखी कांहीं पुढलें ध्येय असलें तर तें ठरविलें पाहिजे व तशीं बोलणीं राहणीं घडलीं पाहिजेत.

राज्याभिषेक झाल्यानंतर सर्वच पातशहा म्हणविणाऱ्यांना धक्का बसला व ते विचार करूं लागले कीं, राज्यकर्ते, सलतनतवाले, म्हणजे मुसलमान असावयाचे; तेथें आतां ह्या शतकांत हिंदु राज्यकर्ते म्हणून पुनः आपली ओळख सांगूं लागले. तेव्हां ती आपली सद्दी संपली, मनु बदलला आणि काळजी उत्पन्न झाली. इकडे शिवाजीनें पाहिलें; मी छत्रपति झालों तर दुसरीं दोन शेजारचीं मुसलमान पातशाही राज्यें बुडविलीं तरी पाहिजेत; नाहींतर त्यांच्याशीं सारखा झगडा तरी चालू ठेवला पाहिजे आणि उत्तरेंतील बलाढ्य जो मोगल पातशहा त्याच्याशीं तर दावा राहणारच आहे. म्हणजे तिन्ही ठिकाणीं सारखीं भांडणें चालूं ठेवणें व तितकी तयारी सारखी राखणें हें केलें पाहिजे. ही एक विचाराची बाजू; किंवा इकडीलच शेजारच्या ज्या दोन पातशाह्या ह्यांतील कोण आपणाशीं समानतेनें सख्य ठेवूं इच्छितो तें पाहून इकडील झगड्यांतील तो तो भाग कमी होतो कां, हें पाहावें. ही विचाराची दुसरी बाजू.

त्याप्रमाणें शिवाजीनें वर म्हटल्या त्या तिन्ही बाजूंनीं प्रयत्न चालविले. विशेषतः आणखीहि एक चवथी गोष्ट शिवाजीनें उपक्रमित केली. ह्या चारहि गोष्टी थोडक्यांत अशा–भागानगरचा कुतुबशहा बादशहा ह्याची भेट घेऊन त्याच्याशीं सख्य केलें व त्याचें निदर्शक हें कीं त्याचें सैन्य बरोबर घेऊन पुढें कर्नाटकांत स्वारी केली. 'सर्वा प्रसंगीं आपणांस तुम्ही साहाय असावें.' असें कुतुबशहा म्हणतो आणि आपलें सैन्य शिवाजीबरोबर देतो ही केवढी गोष्ट! छत्रपति–पदाचा आणि–दृष्टीच्या विकासाचा हा प्रभाव होय. ही स्वारी करण्याचें जेव्हां शिवाजीनें मनांत आणिलें तेव्हांच दिल्लीच्या मोंगलाकडील बहादुरखान हा सरदार शिवाजीवर चालून आला होता; त्याजकडे नीराजीपंत न्यायाधीश पाठवून त्याचें आक्रमण थांबविलें. तिसरी गोष्ट म्हणजे कर्नाटकच्या स्वारींत अदिलशाही ठाणीं होतीं त्यांतील कांहीं ठाणीं ठाणेदारांना आपलेसें करून, कांहीं ठाणेदारांशीं लढून हस्तगत केलीं. पण एवढ्यानें अदिलशाही दरबार कुतुबशाही दरबाराप्रमाणें सख्यत्वांत आला नाहीं. तों दिलेरखान विजापूर

बुडविण्यास आला, ही संधि शिवाजीनें साधली व तोहि दरबार आपलासा केला. म्हणजे अदिलशाहीस निरनिराळे प्रकारें साह्य करून दिलेरखानास पराभूत केलें व आदिलशाही वांचविली. अर्थातच ह्या साहायामुळें अदिलशाहीहि स्नेहांत मिळाली, तह झाला. म्हणजे ह्याप्रमाणें तीन गोष्टी शिवाजीनें साध्य केल्या. कुतुबशाही दरबार व आदिलशाही दरबार ह्या उभयतांचा ' पातशाहा म्हणजे छत्रपती ' ह्या नात्यानें स्नेह होणें ही गोष्ट राज्याभिषेकसंस्कारामुळेंच सुचणें, घडून येणें शक्य व सुलभ झालें. तसेंच बहादुरखान ह्या मोगल सरदाराकडे शिवाजीनें निराजी रावजीस भेटीचें साहित्य देऊन पाठविलें असें सभासद सांगतो (पृ. ८३–८४) आणि निराजीपंत परत जेव्हां शिवाजीकडे आले तेव्हांहि खानानें शिवाजीसहि जडजवाहीर, वस्त्रें इत्यादि परतभेट पाठविली (पृ. ९१). पण हा केवळ औपचारिक भाग म्हटला पाहिजे. एवढ्यावरून मोंगलाशीं सख्य झालें असें मुळींच नाहीं. चवथी गोष्ट जी विशेष महत्त्वाची म्हणून लक्ष्यांत घ्यावयाची आहे ती म्हणजे ' आपण अदिलशाहीचे –मनसबदार,–जहागीरदार,–वतनदार म्हणून गौरवाचे व सुरक्षिततेचे घराणदार आहों ' असें जें दाक्षिणियांना, मराठ्यांना वाटत होतें त्या **परधार्जिणे-पणाच्या मनोवृत्तींतून त्या घरंदाजांना बाहेर काढणें ही होय.** शिवाजीच्या कामगिरीची खरी व चिरकालिक थोरवी ह्या शिकवणुकींत आहे. दक्षिणी मुसलमानपक्ष आणि परदेशी मुसलमानपक्ष हा तर शिवाजीराजांनीं राजकीय जीवनाचें अंग म्हणून दक्षिणेंतील हिंदु-मुसलमानांना कालसापेक्ष भाग म्हणून सांगितला. आणि त्याचें प्रत्यंतर–' हमारी पातशाही वा दखणमेकी पातशाही जुदी नै । उनोकु हुवा तो हमनोकु हुवा ।' (ह्याच पत्रांत हा कुतुबशहा ' महाराज छत्रपती संवाजीराजे पातशहा ' असा ' छत्रपती ' ' पातशहा ' ह्या दोन्ही अधिकारांचा उल्लेख करतों, हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. असो.) कुतुबशाहाचें जें पत्र संभाजी छत्रपतीस ' तुमची आणि ही पातशाही दोन नाहींत ' ह्या अर्थाचें आलें (शिचसा ले. ३९४) त्यावरून मिळत आहे. ह्याबरोबर लखम सावंत, राजे व्यंकोजी भोसले, मालोजी राजे घोरपडे ह्या देसाई व राजघराण्यांतील पुरुषांना ' तुम्ही अदिलशाहीचे म्हणून स्वतःस धन्य व मान्यतेचे मानूं नका, ही परधार्जिणीवृत्ति टाकून द्या, ह्यापेक्षां तुम्हांला स्वतःचें म्हणून स्वतंत्र गौरवाचें स्थान उपभोगतां येईल; तें आपण मिळवूं', ही शिवाजीची वर म्हटल्याप्रमाणें सार्व-

कालिक व पराक्रमी राजकीय शिकवण होय. विजयनगरच्या राज्यकर्तृत्वापेक्षां शिवाजीचें राज्य-कर्तृत्व ह्या दृष्टीनें पुढलें आहे असें आम्हांस वाटतें. अर्थात् संधि मिळणें ही एक गोष्ट अध्याहृत असते ह्यांत शंका नाहीं. औरंगजेबाचें सारखें आक्रमण ही ती संधि होय हें खरेंच आहे. पण शहाजहानच्या चढाईस जसें शहाजीनें उत्तर दिलें तसें औरंगजेबाच्या चढाईस शिवाजीनें उत्तर दिलें. दोनहि बापसे बेटे सवाई भेटले. **मुसलमानांच्या छायेंतून नव्हे छापेंतून दक्षिणीयांना काढणें आणि स्वायत्त होण्याचा धडा घालून देणें हें शिवकार्य होय.** मुसलमान आणि हिंदु ह्या दोघांनाहि शिवाजीनें दोन घडे दिले. मुसलमानांना बजावलें कीं धर्मवेडेपण सोडून द्या आणि–दक्षिण–देशाचे प्रेमी व्हा तरच येथें नांदतां येईल आणि हिंदूंना बजावलें कीं परधार्जिणेपणा टाकून द्या व फुटीर आणि भित्रे राहूं नका. व हें शिवविज्ञान होय.

शिवाजीच्या चरित्राचा हा भाग जितका पत्रांतून आढळतो व सांगतां येतो तितका बखरग्रंथांतून नाहीं. सभासदानें, आपल्या मुलुखांतील व पातशाही मुलुखांतील मराठे तेवढे एकत्र आणण्याचें कार्य प्रतापराव सेनापतीनें केलें, असें एक वाक्य पृ. ५५ वर दिलें आहे. पण प्रत्यक्ष त्या विचाराचा परिस्फोट शिवाजीच्या खाजगी पत्रांतून आला आहे. बखरीशीं पत्रांची जोड अशी अभ्यासानें देतां येते.

शिवाजीच्या ह्या दक्षिण स्वारीला दक्षिणदिग्विजय म्हणतात. पण ती पैशाकरतां होती, राज्याभिषेकमहोत्सवप्रसंगानें खर्च फार झाला, खजिना रिता पडला तो भरून काढण्याकरतां ही स्वारी होती असें कोणी म्हणतात. पण हें म्हणणें किंवा वाटा मागण्यासाठीं ही स्वारी होती हें म्हणणें वरोपचारी व बाह्यच दृष्टीचें होय. पत्रांतील मजकूर जर ध्यानांत घेतला आणि तो तसा लिहिण्यांतील भावगर्भ जर जाणला तर पैसे व बिरुदें मागण्यापलीकडे ह्या स्वारीचा वेगळा व उच्च हेतु असल्याचें पत्रांतून दिसून येतें.

सभासदांचें लेखन— शिवाजीराजांचें ‘ चरित्र आख्यान ’ सभासदानें अगदीं साध्यासुध्या भाषेंत लिहिलें आहे. आमचे मतें हेंच योग्य म्हणजे वास्तववादी लेखन होय. क्वचित् कोठें उपमादृष्टान्त पहिल्या सात प्रकरणांत अधिक आढळतात. पुढें कमी. एकदरींत सभासदाचें लिहिणें साधें आहे.

शिवाजीच्या चरित्रांतील एकेक अद्भुत प्रसंग पाहिले म्हणजे किती साहित्यपूर्ण, लालित्यदर्शक, शैलीबाज, काव्यगुणी लेखन करावयास पाहिजे असें सहजच वाटेल. तसेच ते प्रसंग आहेत ह्यांत संदेह नाहीं. साहित्यांतील नाना अलंकार ह्या अशा चरित्रलेखनांत योजिल्यानें 'परस्परं भूषणभूष्यभावः' ह्याचेंच तें उदाहरण होईल हें अगदीं खरें. पण साधेपणांत जी वास्तवतेची जोड आहे तीहि कांहीं कमी गुणाची नाहीं. **राज्याभिषेकासारख्या प्रसंगराजाची योजना** सभासद अगदीं सहासात ओळींत कशी सांगतात पहा. 'भट गोसावी यांचे मतें, मुसलमान पातशहा तक्तीं बसून छत्र धरून पातशाही करितात; आणि शिवाजीराजे यांनींहि चार पादशाही दबाविल्या; पाऊण लाख घोडा लष्कर, व अगणित गडकोट [मेळविले.] असें असतां त्यांस तख्त नाहीं. याकरतां मऱ्हाटा राजा छत्रपति व्हावा असें चित्तांत आणिलें. आणि [तें] राजियांसहि मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करतां सर्वांचे मनास आलें. तेव्हां भट गोसावी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें.' ह्या लिहिण्यांत गुणांनीं उणें असें कांहीं प्रतीत होत नाहीं. म्हणजे राज्याभिषेकाचा विचार ज्यांचे संमतीनें व्हावयाचा तो सर्व भाग ह्यांत आला. गागाभट्टांसारखे महामीमांसक पंडित, स्वतः राजे आणि इतर सर्व मातबर भले लोक ह्यांचे विचारें हा प्रसंग निश्चित झाला [परि. ९४].

स्थलवर्णनाचीं दोन उदाहरणें—येलूर कोट 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं. उदकांत दहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुती. पडकोट तरी चारचार फेरियावरि फेरे ये जातीचा कोट.' (पृ. ९०).

दुसरें रायगडचें वर्णन पहा (पृ. ६८) 'राजा खासा जाऊन पाहतां गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच. (गांव = १ कोस कानडी शब्द गावन्) पर्जन्यकाळीं कडियावरि गवत उगवत नाहीं. आणि धोंडा तासीव, एकच आहे. दौलताबादहि पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणी गड उंच. असे देखोन बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले, तक्तास जागा गड हाच करावा असें करारीं करून तेच गडीं घर, वाडे, माडिया, सदरा, चौसोपे आणि अठरा कारखाने यांस

व बाजार, पंच हजारियांस वेगळीं घरें, वेगळाले महाल, व राणियांस महाल, तैशींच सरकारकुनास वेगळीं घरें, व मातबर लोकांस घरें, व गजशाळा व अश्वशाळा, व उष्टरखाने, पालखीमहाल व वहिली (रथ) महाल, कोठी, थट्टी, महाल चुनेगच्ची चिरेबंदी बांधिले. '

असो. अशा प्रकारें बखरलेखक अगदीं साध्या शब्दांत स्थलवर्णनें करतो. आतां प्रसंगवर्णनांतील एक दोन प्रसंग पाहून नंतर सभासदांच्या भाषाविशेषाकडे वळूं. प्रसंगवर्णनांत युद्ध, लूट, भेट, देवदर्शन, इत्यादि प्रसंग येतात. युद्ध-वर्णनांत पृ. ७१ वरील सालेरी-युद्धांतील उपयुद्ध जें **कणेरागडयुद्ध** तें किती साधें पण सरस आहे तें पहा—'रामाजी पांगेरा म्हणून हशमांचा हजारी, यानें हजार लोकांनिशीं कणेरागड आहे त्याखालें दिलेलखानाशीं युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यांनीं आपले लोकांत निवड करून ' निदान करावयाचे सोबती असतील ते उभे राहणें ' म्हणून निवड करतां सातशें माणूस उभे राहिले. तितकियांनीं निदान करून भांडण दिधलें. चौफेरां मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी जैशी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेलखानाचे १२ शें पठाण रणास आणिले. मग ७ शें माणूस व रामाजी पांगेरा सर्वहि उघडे बोडके होऊन एकएकास वीसवीस तीसतीस जखमा तिराच्या बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोठें युद्ध जालें. मग दिलेलखान यांनीं तोंडांत आंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें." ह्या युद्धवर्णनांतील साधेपणा व वास्तवता कौतुकास्पद होय. ह्या शिमगाटिपरीच्या खेळाचें वर्णन टिपण पृ. १४६ मध्यें दिलें आहे. तें पहावें.

शिवाजी जयसिंग भेट—' रघुनाथ भट पंडित राऊ मिरजा राजिया-जवळ पाठविलें कीं, " आपण तुर्तच भेटीस येतों. दिलेलखानानें गड घेतला मग भेट घेतल्यानें हलाखी आहे ' असें सांगून पाठवून भेटीस जावेसें केलें... खासा राजा हजार माणूस निवड करून बरोबर घेतले. श्रीशंभूस व भवानीस नमस्कार केला. मातोश्रीस नमस्कार केला. आशीर्वाद घेऊन गडाखालीं उतरोन चालिले. एकाएकी मिरजा राजियाच्या गोटांत गेले. ' राजे आले ' ही खबर कळतांच जयसिंग देवडीबाहेर पायउतारा खासा आला. राजे पालखींतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनीं बैसले. राजे बोलूं लागले कीं, आपण

जैसा रामसिंग तैसेच तुम्हांस. त्याचें रक्षण कराल तैसें आपलें करणें.' मग जयसिंग बोलला जे 'हीच गोष्ट खरी. आपण रजपूत. तुम्ही आम्ही एकजाती आहों. अगोदर आपलें शिर जाईल मग तुम्हांस काय होणें तें होईल.' असा भरवसा बोलून शपथ वाहिली. मग राजे बोलले जे 'तुम्हांस जे गड पाहिजेत ते आपण देतो. दिलेलखानास बोलावून आणवणें. पुरंधर तुम्हांस देतों. निशाण तुमचें चढवितों. परंतु मुसलमानास यश देत नाहीं.' जयसिंग खुशाल जाहला' पृ. ३९.

सुरत लूट, कारंजा लूट इत्यादि वर्णनें तसेंच जालनास्वारी, व्यंकोजी भेट इत्यादिहि वर्णनें साधींच आहेत. तीं तीं सूची वरून पहावीं.

सभासदांचे कांहीं लेखनविशेष—एकमेक, परस्पर, अन्योन्य, हे शब्द योजून जेथें सांगण्याचा प्रसंग आला तेथें सभासदानें 'एकांत एक भांडूं लागले' (पृ. ४), 'वीरावीरांस झगडा जाहाला' (पृ. १९), 'एकास एक प्रतिमेळ ठेवावे' (पृ. २२), 'एकाचे एक आहों' (पृ. ३५), भेट बंधु-बंधूंची जाहाली (पृ. ८८), 'एकावर एक पडले' (पृ. ५२), एकास एकानी २५ जखमा करून ठार पडलें (पृ. ६२), यास त्यास युद्ध झालें. असे प्रयोग केले आहेत. तसेंच 'तूट विचार' (पृ. ३२), अशी 'ओळखण' करून (पृ. ६२), 'अश्रिणी' = अशरीरिणी, (पृ. ८) (आकाशवाणी हा शब्द तेथें आलाच आहे.) इत्यादि शब्दयोजना ही इतिहासकालीन भाषा व व्याकरण ह्यांचे साधनोपयोगी आहे. 'वर' हें जें शुद्धशब्दयोगी अव्यय ते 'वरी' ह्या रूपांत सभासद योजतो आणि हा इकार प्रस्तुत मुद्रणांत साने ह्यांच्या मताप्रमाणें सर्वत्र ऱ्हस्व दाखविला आहे. गेल्यावरि, बोलिल्यावरि, निजाम-शाहीवरि–बरियावरि–बऱ्यावर. इ. इ.. इतिहासकालांत समाहारद्वंद्वसमास म्हणजे उद्यांपरवां किंवा उद्यांबिद्या ह्याऐवजीं 'उद्यांसांद्या', 'आणाखुणा' टकापैका, अशा प्रकारें करीत.

भाषिकदृष्टीनें येथें पुनः लिहीत नाहीं. टिपणीमध्यें तो भाग पुष्कळ व दुबार-तिबारहि आला आहे.

बखर हा सारस्वताचा भाग—प्रास्ताविकांमध्यें बखर हा एक 'पत्रप्रकार' होता हें सांगितलें व तेथें त्याचे आधारहि दर्शित केले. आणि तेथेंच बखर हा

'वाङ्मयप्रकार' वेगळा असें सांगून त्या प्रकाराचें लक्षणहि सांगितलें. येथें त्याच वाङ्मयप्रकाराविषयीं, तो प्रकार केवळ वाङ्मयात्मक नसून **सारस्वतात्मकहि** आहे हें सांगावयाचें आहे. बखरग्रंथांतील भाषा ही बोली तर नाहींच नाहीं व हें सांगणेंहि नको. तसेंच ती कोण्या भाषेची पोटभाषा वा उपभाषाहि नाहीं हें लिहिणें नलगे. ही तत्कालीन ग्रांथिक आणि व्यवहाराची मराठी प्रतिष्ठित भाषा आहे. 'व्यवहाराची' म्हटलें ह्यावरून व्यावहारिक जीवन व धार्मिक जीवन वेगळें होतें आणि धार्मिक जीवनाची भाषा वेगळी हें सुचविल्यासारखें आहे व तें खरें आहे. म्हणजे इतिहासकालीन धार्मिक वाङ्मय वेगळें होतें आणि व्यावहारिक म्हणजे राजकीय जीवन व त्याचें वाङ्मय वेगळें. ही जीवनभिन्नता केव्हांपासून आणि त्यांतील धार्मिक जीवनांगाचें वाङ्मय तें कोणचें हें येथें विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. मराठींतील पद्य वाङ्मय–ओंवी, अभंग, आर्या इत्यादि वृत्तबद्ध वाङ्मय हें धार्मिक वाङ्मय होय. पोवाडे, लावण्या हा भाग स्वतंत्र आहे. आणि गद्य वाङ्मय हें व्यावहारिक वाङ्मय होय. कालदृष्ट्या ही भिन्नता सांगतांना ज्या कालापासून धार्मिक वाङ्मय सांपडतें त्या कालापासून वर म्हटल्याप्रमाणें लगेंच व्यावहारिक वाङ्मय सांपडतें असा प्रकार नाहीं. बाळसेदार गद्य म्हणजे व्यावहारिक वाङ्मयाचा प्रादुर्भाव फार पुढें झाला. म्हणजे दोहोंमध्यें अंतर तीन-चार शतकांचें पडतें. असो. मुख्य प्रतिपादन हें कीं, बखर हें धार्मिक वाङ्मय नसून व्यावहारिक, अर्थात् गद्यवाङ्मय आहे. प्रस्तुतापुरतें पाहतां असें सांगणें प्राप्त कीं, ह्यामध्यें अनेक व्यावहारिक घटना संकलित केलेल्या असतात. कैफियती, करिने, वाके, कुलकटे, बखरी इत्यादि इत्यादि हे त्यांतीलच प्रकार असून त्यामध्यें बखरवाङ्मय हा सर्वश्रेष्ठ प्रासाद आहेत. त्यांत विविध प्रसंगरूपी दालनें व मंडप आहेत. त्याचें लेखन अधिक प्रमाणांत कांहीं योजनापूर्वक, संदर्भदर्शित, आद्यंताचा तोल सांभाळून, विवेचनाचा रोख कायम ठेवून केलेलें असतें. ह्यांत संक्षेप जवळ जवळ नसतात. पत्रप्रकारांत राजश्री–रा॥, विनंति–वि॥, प्रमाणें–प्रा॥, परगणा–प॥, मोकासा–मो॥, इस्तकबिल–इ॥, मुकाम–मु॥, बितपशील–बि॥, रवाना–र॥ इत्यादि संक्षेप येतात; पण हेच शब्द बखरवाङ्मयांत पूर्णपणें येतात. कारण, पत्र हें विवक्षित व्यक्तीला उद्देशून असतें, पत्रांतील मजकुराचा भाग सामान्यतः ठरीव असून त्यांत केलेले संक्षेप उलगडणें पत्रव्यवहाराला धरून असतें, संक्षेपहि त्यामुळें ठरीव असतात. तसा प्रकार बखरलेखनाचा नाहीं. त्याचे

नकलाकार व वाचक अनेक असतात;बखरींतील विषयाहि पत्राप्रमाणें जमीनबाब, उत्पन्न, असा विविक्त नाहीं. बखर हें वर म्हटल्याप्रमाणें संकलनात्मक लेखन असून त्यांत राजचरित्र, युद्धवर्णनें, युद्धांतील गांठीभेटी, प्रवास, इत्यादि अनेक ऐतिहासिक घटना नामतः नव्हे पण उपयोगतः सामान्यतः सर्व जनतेनें त्या वाचाव्या अशा हेतूनें केलेलें असतें. चिटणिसी किंवा फडणिसी पत्रांची गोष्ट अशी नाहीं. एखादें पत्र असें असेल कीं ज्याला वाङ्मय, सारस्वत म्हणतात त्यालाहि तें पत्र सांगेल कीं 'लिहावयाचें तर असें लिहावें' इतकें तें पत्र चटकदार, सरस व विचारानें आणि मांडणीनें वाङ्मयगुणाचें असेल. पण सर्वसामान्यतः पत्र म्हणजे तें लहान असावयाचें; त्याचा संबंध पुरता लक्ष्यांत येण्यासाठीं त्यांतील आधींचा व्यवहार माहीत असावयास पाहिजे; त्यांत वर सांगितल्याप्रमाणें संक्षेप तर असतातच पण संकेताहि असतात; सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, ही पत्रलेखकाची भूमिका आणि बखरलेखकाची भूमिका अगदीं भिन्न असते. यामुळें वाङ्मयता हा धर्म जसा बखरलेखनाला जवळ तसा पत्रलेखनाला नाहीं. दोघांच्या मनोरचनेंतच अंतर आहे. म्हणून 'पत्रापेक्षां बखरग्रंथ हे जितके व्याकरणक्षम आहेत तितकें पत्र नाहीं.' पत्रांताहि तीच भाषा असते, विचार व विषयाहि पल्लवित केलेला असतो. भाषा जेथें लेखनिविष्ट झाली तेथें तिच्या मागोमाग व्याकरण आलेंच. म्हणून पत्रांचेंहि व्याकरण पाहिलेंच पाहिजे व तसें आहेहि. पण मुळांतच '**व्याकरणक्षमता**' पत्रापेक्षां बखरग्रंथाला अधिक जवळ. बखरलेखनांत आलेली वाक्यरचना, विभक्तिप्रत्यय, सामान्यरूप–प्रकार, समास, वाक्यांतील काल, कारकविचार, प्रयोग, अव्यय, इत्यादि व्याकरणाचीं बारा अंगें ह्या बखरवाङ्मयामध्यें कशी तें पाहणें इष्ट व तें ऐतिहासिक व्याकरण होय. बखरग्रंथांची विस्तृतता, विविधता, विवेचकता, लेखनहेतुविशिष्टता हींच कालिक भाषेचें व्याकरणदर्शन घडवील. म्हणून **तें नुसतें वाङ्मय नसून सारस्वत आहे**. ऐतिहासिक व्याकरणक्षमता त्याशीं निकट आहे.

ह्या दृष्टीनें प्रस्तुत बखरीकडे अगदीं थोडक्या प्रकारापुरतें पाहूं.

समासो वचनं लिंगं विभक्तिः प्रत्ययोऽव्ययम् ।
कालो नामोपसर्गश्च प्रयोगो धातुसंहिते ॥ (संहिता संधिः)
हीं व्याकरणाचीं बारा लक्षणें.

अपरामित–मूळ शब्द परिमित, दोन इ-कार शेजारींच आल्यामुळें एक इ-कार गळला. भाई-चारा. कुलाचार ह्यांतील आचार शब्दच येथें आहे. स्नेहाचार. स्नेही = भाई. भाई + आचार. पूर्वरूप संधि होऊन भाईचार. अफजल०च्या तोंडी हा शब्द आला आहे. लांचलुचपत = लांच – लालुच ह्याचें लाचलुचपत झालें असावें; पायउतारा. हा शब्द ज्ञानेश्वरींत आला आहे. 'एऱ्हवीं तऱ्ही अवधारा। जो दाविला तुम्ही अनुसारा। तो पव्हण्याहूनि पायउतारा। सोहपा जैसा।' १६५ अ. ५. पण ह्या अर्थाचा शब्द बखरींतील नाहीं. घोडें, हत्ती, उंट, पालखी इत्यादि वाहनांतून उतरून जे पायीं चालू लागले ते पायउतारा झाले. मग नुसते व मूळचे पदाती सैनिक, पायीचे लोक त्यांसहि पायउतारा शब्दानें उल्लेखिलें आहे. ज्ञानेश्वरींतील पायउतारा हा पाण्यांतील पायीं चालत जाण्याजोगा जो उतार तो आहे. पोहण्याविरुद्ध पायउतार. षष्ठीतत्पुरुष, किंवा मध्यमपदलोपी. बखरींतील अवधारणापूर्वपद कर्मधारय वाटतो. दबाविल्या, चार पातशाही इ०, फिरंगियास दबावून. दबणें–दबविणें. ब-चें बा हें मराठीच्या स्वभावानुसार-दीनानाथाप्रमाणें झालें. 'अगत्याअगत्य' येथेंहि तसेंच दिसतें. अगत्यअगत्य जेवढे, तेवढेच लोक बरोबर घेतले. पण 'अगत्याअगत्य' झालें आणि वाटतें कीं, उच्चारणहि असेंच होत असावें. असेंच नित्यानित्य. नित्य + अनित्य असें नाहीं.' 'इतका' हें संख्यार्थी विशेषण असतां त्याचा स्वरूपार्थी उपयोग केला आहे. 'सैदबंडा इतका बाजूस काढणें.' 'आला जमाखर्च चौधांचे विद्यमानें होईल.' 'वर्तमानसामीप्यात्०' ह्या सूत्रान्वयें, व्हावयाचा, होणारा, जमाखर्च तो 'आला' ह्या रूपानें सांगितला. ही रचना फार सुंदर व मराठीच्या घरची आहे.

आप्तविषयी 'आपण रजपूत आप्तविषयीं.' आप्तता हा विषय ज्यांमध्यें ते आप्तविषयी. इस्तकबिल हा शब्द फारसी. अर्थ पासून. पण मराठीमध्यें प्रारंभ ह्या अर्थानें वापरण्यांत येत गेला. इस्तकबिलपासून चरित्र लिहून देणें. इस्तकबिलपासून म्हणजे प्रारंभापासून. भा. ब. तहि प्रारंभ ह्या अर्थींच वापरला आहे. इस्तकबिलपासून धारण दीड शेर आहे इ. 'आविर्भवली'–नाम–धातु करून भूतकाळीं प्रयोग. अनुष्ठित–शब्द अनुष्ठान ह्याकरतां वापरला. अनुष्ठाते गागाभट्ट. आणि अनुष्ठित कर्म. पण अनुष्ठित हेंच व्यक्तिविशेषण केलें. भिडेचा, मेहेरबानीचा, बळाचा, बुद्धीचा येथील चा हा षष्ठ्यर्थक प्रत्यय स्वार्थी म्हणजे

वंत, किंवा वान् ह्या अर्थी आहे. बादशहास ज्याची भीड पडते तो भिडेचा, बादशहाची मेहेरबानी ज्यावर तो मेहेरबानीचा, तसेंच बळाचा किंवा बुद्धीचा म्हणजे बळवंत अथवा बलवान्, बुद्धिमान् तो. 'घोडीं आणिलीं तीं पागा केलीं' म्हणजे स्वतःच्या पागेंत घोडदळांत समाविष्ट केली. असो. असे आणखीहि प्रयोग देण्याजोगे आहेत. समासामध्यें पाचसहा प्रकार भाषेच्या दृष्टीचे आढळतात. संस्कृत २, मराठी २, संस्कृत–फारसी, मराठी–फारसी, फारसी २ ह्याचींहि उदाहरणें पाहण्याजोगीं आहेत. प्रयोगामध्यें 'त्यानें घेऊन आला' अशासारखे प्रयोग ह्या व भा. ब. फार आले आहेत. त्यास 'तृतीयारब्ध कर्तरी' हें नांव सुचतें. ह्या प्रयोगाचीं उदाहरणें द्यावयाचीं पण आतां थांबतों.

क्षमा व आभार

ह्या पुस्तकाचें काम हातानिराळें होत आहे हें पाहून आनंद होतो. हें काम प्रथम मीं स्वीकृत केलें तेव्हां पुणें विद्यापीठांतील व्याख्यानें लिहून देणें हें काम चालूंच होतें. तें अपेक्षेपेक्षां लांबलें व तें तर आधीं सुरूं केलेलें व आधीं संपवावयास हवें म्हणून तें पुरें केलें.[1] तें पुरें होतें तोंच 'भाऊसाहेब बखर' ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्याबद्दल प्रेष आला. पहिल्या–आवृत्तींत प्रस्तावनेंत पृ. ७ वर मीं म्हटलें होतें कीं, ह्या बखरग्रंथाप्रमाणें ह्याच प्रसंगाच्या आणखी ६–७ बखरग्रंथांतुन लेखन आलेलें आहे त्या आणि ह्या बखरग्रंथांत कोठें साम्य–विरोध आहे हें पाहिलें पाहिजे आणि प्रत्यक्ष पत्रें व प्रस्तुत बखर ह्यांतील मजकुराशींहि कोठें किती जमतें ह्यासंबंधींहि विवेचन यावयास हवें. अर्थात् तें लिहिण्यास प्रारंभ केला. पांच प्रकरणें छापूनहि झालीं पण मुद्रण-यंत्राच्या धांवेबरोबर मला मजकूर पुरवितां येईना. म्हणून ती आवृत्ती[2] तशीच काढली. आतां प्रकरण १२ पर्यंत तो मजकूर छापून झाला. असो. पण अशा ह्या कामामुळें सदर ग्रंथाचें काम मागेंच पडलें व मिळालेलें तें आश्वासन परत

---

१ 'अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालांतील राज्यकारभाराचा अभ्यास' इ. १६००–१६८० भाग १ पृ. ३४२ किं. रु. ३ इ. १९६० जाने. १३. विद्यापीठ प्रकाशन.

२. 'भाऊसाहेब बखर' आवृत्ती २ री इ. १९५९ पृ. २३०. किं. ६॥ अ. वि. गृ. प्रकाशन, पुणें २. आवृत्ति ३ री ?

देण्याचाच नामुष्कीचा प्रसंग आला. 'भाऊसाहेब' बखरीचें काम थांबलेंहि होतें व हें काम पुरें करणें वरील कारणास्तव अत्यंत आवश्यक. त्यांतुन ह्याच बखर-ग्रंथाबद्दल ह्याच विद्यापीठाकरवीं कांहीं भाषणें झालेलीं. तात्पर्य, हें काम पुरें करणें हेंच केवळ प्राप्त झालें. मध्यंतरीं '[3]आज्ञापत्रा' चेंहि काम लहानसें व घाईंतच संपविलें. असें हें काम शेवटीं दोन अडीच महिन्यांत सुरू होऊन आज अनंतचतुर्दशीच्या पुण्यपावन दिवशीं पुरें होत आहे व आनंद होत आहे. ह्या कामास विलंब लागला ह्याबद्दल आणि ह्यांत ज्या उणिवा राहिल्या त्याबद्दल 'क्षमस्व' म्हणणें प्राप्त आहे.

ह्या आवृत्तींत बऱ्याच गोष्टी मीं नव्यानें समाविष्ट केल्या आहेत. त्या कामीं अनेकांचें सहाय्य मला मिळालें. आचार्य वि. प्र. लिमये, श्री. य. ग. फफे, श्री. ब. मो. पुरंदरे, श्री. म. दा. साठे, श्री. दामले, श्री. धायगुडे, म. म. प्रा. द. वा. पोतदार, डॉ. अ. वि. नाईक, सचिव बहिः शि. मं. श्री. ना. सि. भट वकील. प्रो. म. द. वर्मा, श्रीमान् भाऊसाहेब ढवळे. कांहींचें नांव देणें त्यांना न आवडणारें म्हणून देतां येत नाहीं. श्री. गोखले, प्रा. न. र. फाटक, डॉ. भिंगारे, अ. अं. कुलकर्णी इत्यादि इत्यादि. शेवटीं निवेदनांत म्हटल्याप्रमाणें व येथेंहि ज्यांचा उल्लेख झाला त्यांचें आश्वासन व सहाय्य न मिळतें तर हा ग्रंथ असा प्रसिद्ध नच होता. तेव्हां सर्वांचा व आणखीहि कोणाचें नांव राहिलें असेल, तर त्यांनीं क्षमा करावी, त्यांचा फार फार आभारी आहे.

शेवटीं **आर्यभूषण** व **चित्रशाळा** ह्यांच्या मुद्रण–व प्रकाशन–कार्यामुळें हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देऊन मी हा ग्रंथ हातावेगळा करीत आहे. ह्यांत काय उणिवा राहिल्या हें सर्वांपेक्षां मला अधिकच माहित आहे. तथापि पुढील आवृत्तीसाठीं कोणास कांहीं सूचना, चुका कळविणें तर जरूर कळवाव्या.

---

३. 'हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य यांचें आज्ञापत्र व राजनीति'— कॉन्टिनेंटल प्रकाशन. इ. १९६० जून पृ. ११६ किं. रु. २

शब्द-सूची

ह्या सूचींत सभासद बखरींतील बरेचसे शब्द व त्यांचा अर्थ देण्याचा यत्न केला आहे. थोडी व्युत्पत्ति, क्वचित् राव्यको. तील प्रतिशब्द आढळला तो दिला आहे. **आंकडा** पृष्ठाचा नाहीं **परिच्छेदाचा** आहे. दोन्ही दिल्यानें जागा अधिक लागू लागल्यानें परिच्छेदांक तेवढा ठेवला. व त्याचेंहि कारण हें कीं, ह्याच शब्दासंबंधानें टिपणींतहि कांहीं स्पष्टता आहे तेंहि पाहण्याची सोय व्हावी. टिपणी परिच्छेदानुसारच आहे. क्वचित् बाराखडींतील क्रम चुकला आहे. अनुस्वाराची स्वतंत्र बाराखडी व त्यानंतर जोडाक्षरें आहेत. दुबार वाटतील पण कोश ह्या दृष्टीनें शब्दसंग्रह समजावा.

अ

अगणित—३५; ८८ (न मोजलेलें) गणन न करतां येणारें, पुष्कळ.

अगत्य—९३ व्होवेसें, जरूरीचें. विधिविशेषण. क्रियाविशेषण नाहीं;

अगत्याअगत्य—५०अगदीं अवश्य तेवढेच. द्विप्रयोगी शब्द. एकच, तोच तो शब्द दुबार जोडणें.

(अशा वेळीं सामान्यरूपाप्रमाणें पहिल्या शब्दाचा आकार होतो. अगत्याअगत्य येथें संस्कृताप्रमाणें संधी करूनहि पुनः अगत्य शब्द ठेवला असें नाहीं. तर मराठी स्वभावाप्रमाणेंच आकार झालेला आहे. दिनानाथाप्रमाणें)

अदमी—३९ (५०) सामान्य मनुष्य

अदृश्य—४१ दिसेनाशी

अध्वर्यू— ९४ यज्ञांतील चार मुख्य ऋत्विग्‌गणांतील (अध्वर्यु, होता, उद्गाता व ब्रह्मा पण त्यांतहि ब्रह्मा व) अध्वर्यु प्रमुख.

अनमान--अमान्य--अनमान्य--अनमान--न्य-चा न = संशय, शंका. १३.

अनर्थ = उच्छेद. १-१ उच्छाद; भलतेंच, विपरीत. (अन्-विरोधार्थक, अभावार्थक नव्हे.)

तत्सादृश्यमभावश्च तदन्यत्वं तदल्पता।
अप्राशस्त्यं विरोधश्च नञर्थाः
षट्प्रकीर्तिताः ॥९५

अफरा— ३१ (अ-तफरीक्-चेंच अफरातफरा. पैकीं अफरा) परागंदा, बे-बन्द

अबदागिरी—३२, (अ. आफताब-गीर) सूर्यपान, आतपत्र बहुमानाचें (व सावली देणारें) चिन्ह. अफताब्‌गिर्या त्वातपत्र १९ रा. व्य. को.

अबनाळ तैनाळ - ६६ म्यानाच्या वरील व खालच्या बाजूचें अडकावण.

अंबारखाना— १०५ धान्यकोशो (रा. व्य. को. १९९) धान्यकोठार.

अमानत—मना; ३३ रद्द, सरकार-जमा.

अमासवणी— ११५ पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून उदक अमत्स्य-वणी-अमास-वणी झालें; मासें न राहण्याजोगें घाण पाणी झालें.

अर्ज—१९ विनंती,-दस्त-विनंतीपत्र (आर्जिदास्तं विनतिपत्रकं ३०० रा. व्य. को.)

अर्थ—रहस्य १

अलबत्ता— १३ अलबत्-अवश्य. आवश्यकं त्वलबता रा. व्य. को. २४७

अल्पबुद्धी— १११ अप्रौढ, वक्र, मंद.

अवकाल—९१ अपघात, अकालः

अवतारी— २३, ११६ अवतरित झालेला ईश्वरी मनुष्य.

अवधी—१११ समाप्तिवेळा.

अश्रणी— १० अशरीरिणी वाणी आकाशवाणी.

अश्वशाळा—८५ घोडघर, तबेला, पागा,

असर्फ्या—७५; सोन्याचें नाणें

असामी— २२ मनुष्य (घातली.) यादींत नांव दाखल केलें (इसम-आसामी) ६५.

अहोरात्र—७५ दिवस रात्र.

अनाइक—अनायकी ११२ शेवटचा इकार गळाला.

अनुष्ठित—९४ अनुष्ठाते. अनुष्ठानी, अनुष्ठान करणारे. व्यक्तीकडे हें विशेषण लावावयाचें असल्यामुळें अनुष्ठाते असें पाहिजे. (अनुष्ठित कर्म)

अपार—२३, ९२ असंख्य, पुष्कळ.

अपरमित—मिति-परिमिति, अपरि-मिति = मर्यादित, अमर्यादित. अगणित, (शेवटचा इ-कार व दोन इ-कार जवळ आल्यामुळें त्यांतील पहिला इकार गळाला) २.

आऊ—३; ११, आई.

आकारून—चावर, बिघे इ. प्रकारें आकार करून मोजून. ३३ बेरीज, मिळवणीचा आंकडा ७७.

आटोप— ३ (आटोप न करणें) अडथळा, हरकत, व्यत्यय. (आवरूं नको, आवर न घालणें).

आडहत्यारी— २१, २७, ३५, ६२, ६६ त्यांत कांहीं बंदुखी,...वरकड आडहत्यारी...असे माणूस सजले. (अर्ध किंवा) जें कोणतें हत्यार असेल तें वापरणारा.

आणशपथ-- १५ शपथ कुर्दन्, ९६, ९७ (एका अर्थी द्वैभाषिक शब्द)

आणाखुणा—९५ आणा शपथा, खुणा भरंवशाच्या, धीराच्या गोष्टी.

आदब— प्रतिष्ठा ४१-४९

आमखास—दरबारचा दिवाणखाना ५०, ८९ दिवाण-इ-आम व दिवाण-इ-

खास ह्याचा संक्षेप. सर्व लोकांसाठीं असलेली आणि खासे लोकांसाठी असलेली राजसभा, सभामंडप.

आलाहिदा—८१ वेगवेगळे,स्वतंत्र.

आवाज—तोफेचा आवाज,ध्वनी १८

आविर्भवली—९८ संचारली,प्रकट झाली, संचार झाला. संस्कृत नामधातू करून मराठी प्रत्यय.

आशंका=शंका भीति, अविश्वासता, काळजी, ९५; शंका, संकट, जड १००.

आराबा—१६; ३५, ८८ तोफांचे गाडे, व त्यांची वेढापद्धतीनें मांडणी 'यन्त्रव्यूहस्त्वराबा स्यात्' १२९ रा. व्य. को. चतुरंग.

आरमार—७८, ८०(पाणियांतील जहाजें गुराबा ४०-५०) सागर सैन्य, नाविकदल, लढाऊ जहाजें.

आरबी—२१ आरब, १आरबस्तानी सैनिक.

आपाप—४४, ४६ (गड) आपाप येतील. आपोआप, प्रयत्नाशिवाय, आपसुखेंच, (आत्मनः) आप-चा द्विप्रयोग.

आप्तविषयी —४६आप्तांतील, आप्तसंबंधी. आप्तता हा विषय ज्यांचा ते आप्तविषयी.

आबदारखाना— १०५ आब्दारखाना जलस्थानं ८२ रा. व्य. को पाणी सांठविण्याची जागा.

आम-दरफ्ती—८२ ये-जा; वाहतूक; रहदारी.

आयुर्दाव—३३ आयुष्याचें प्रमाण पण त्याचा येथें संबंध नाहीं. जीवमानस्थिति, परिस्थिति व प्राप्ती.

इ

इजत— (प्रतिष्ठा इज्जतिः स्मृता २७३ रा. व्य.)अब्रु, इभ्रत, मान ११२.

इजाफा—अधिक. जाफा, इ-जाफा. ९, ३९.

इजारतीनें— ३३ मक्तेदारीनें. खण्डपद्धतीनें, चढत्या आकारणीनें.

इटेकरी— इटा नांवाचें शस्त्र. तें वापरणारे. (भालेकरी कौन्तिकः स्यात् प्रासिकः स्यात् इटेकरी १८३ रा. व्य. को.) २१, २७.

इतका—२० एवढा.

इतबार—विश्वास ३७,-री विश्वासाचे, ३३-३९ (इतबारस्तु विश्वासः २३० रा. व्य. को.)

इतर—परके १०.

इभ्राम्या—७५ इब्राहिम बादशहानें पाडलेलीं नाणीं.

इलाखा—५९ संबंध.

इशारत—खूण, १८, ६०, सूचना ७१.

इस्तकबिल= १-१ प्रारंभ (=पासून ह्या अरबी शब्दाचा अर्थच पासून हा आहे. पण मराठींत 'प्रारंभ' ह्या अर्थानें तो कांहीं ठिकाणीं योजिलेला आढळतो. 'इस्तक० पासून लष्करांत धारण

७, ८ शेर आहे.' भा. ब. परि. १६ मुसलमानींत अज, इस्तकबिल, अह्द हे शब्द 'पासून' ह्या अर्थाचेच आहेत. तरी त्यांची योजना भिन्न आहे. मराठी-मध्यें काल,-घरा-गोष्टी पासून म्हणतां येईल. पण पर्शियनमध्यें इस्तकबिल नर्मदा ते तागायत गोदावरी असें कधीं येणार नाहीं. अशा स्थलीं अह्द-तह्द हे शब्द येतील. कालस्थलभेदानें ही अव्ययोजना वेगवेगळी आहे.

उ

उजळून—९६ ओवाळून.

उंटें—८८, ९२, पृ. २० (३११) उंट शब्द नपुंसकलिंगी धरला. उंटादि जनावरें असें म्हणावयाचें आहे कीं काय?

उजदीन—२१ एक मुसलमानांतील जात.

उमराव--अमीरचें अ. व. सर्दार. ९, ३५, ७५.

उलफे--९४ शिधे. कोरडें धान्य.

उल्कापात—११५ (आकाशस्थ) तुटलेल्या ताऱ्याचें पतन. आकाशांतून धोंडा पडणें.

उष्टरखाने—८५, १०५ उष्टर=उंट त्यांना राहण्याची जागा. खाना =शाला.

ऊर्जित = उत्कर्ष १५ वढती, श्रेष्ठता ६१.

उभा केला—९१ (बहलोलखान) धरिला; कुंठित केला. कोणीकडे जाण्यास मार्ग नाहीं असा, रोखला.

उपाध्ये = ८ धार्मिक कृत्यप्रसंगीं वेदादि मंत्र व विधि सांगणारा.

उपरि—नंतर ७.

उपराळियास—५५, उपराळा-सहाय. मदत, उपराळियास = मदतीस ५५, ५९, ८७.

उपरांत—२०, ३१ नंतर, मागाहून, परि. २५, ३७ पहा.

उपद्रव मांडिला—त्रास देऊं लागले ७८.

उद्यांसाद्यां—उद्यांपरवां, उद्याबियां, पुढें केव्हांतरी ५०. (सां०)

उदमास—उदीम-व्यवसाय. उद्योग-व्यापारोद्योगास, उदीम—इकार गेला. उद्म. उद्यमपासून उदीम. धंदा.

उदंड—१९, पुष्कळ, फार. २५, ६१, ९५, १००, १०१.

उतावळा—अधीर, घाई करणारा, (उत् + त्वरा) उत्सुक ९३.

ए

एकांगी—१२ व १९ अशा दोन ठिकाणीं अफजलखान प्रकरणांत हा शब्द आला आहे. दोन्ही ठिकाणीं 'एकांगी करून' मारिला असा प्रयोग आहे. पहिल्या स्थलीं 'एकांतीं एकांगीं करून' असें आहे तर दुसऱ्या स्थलीं पुढें एकदोन ओळींनंतर 'एकले' भीमानें दुर्योधन

मारिला तसा, असें सांगितलें. प्रत्यक्ष भेटप्रसंगी हा शब्द नाहीं. नुसते सभासदापुरतें पाहतां 'एकांगीं करून' म्हणजे 'एकट्याच्या प्रयत्नें' एवढाच अर्थ दिसतो. 'आंगेंच' आंत शिरलें' 'आंगेजणीनें' इ. तत्कालीन व ह्याच लेखनांतील इतर प्रयोग पाहतां वरील अर्थच युक्त वाटतो.

एकाएकीं—३९, ४६, ७५, ८३. एकदम.

एकपंक्तीं—४७, सजातीयत्व आणि समतुल्य निदर्शक म्हणोन उभयतांनीं एका पंगतींत भोजन केलें.

एकजाती—४६, एका जातिर्ययोः एकजाती–एकाच जातीचे. एकजातवाले.

एकासनीं—४६, सारख्याच योग्यतेचे निदर्शक म्हणून शिवाजी व जयसिंग हे उभयतां एकाच गादीवर, आसनावर. ९६, उभयतां **एकासनीं** बसले. कुतुबशहा तानाशा बादशहा भागा-नगरकर आणि शिवाजीराजे छत्रपती एका योग्यतेनें एका गादीवर-आसनी बसले.

ओ

ओळखण—७७, ओळखण्याची खूण.

ओझ्यास—ओझें वाहण्यासाठीं, वाहण्यास २९

आंतस्त—९१, अंतस्थपणें. (धमधील महाप्राण ह जाऊन त)

आंगाचा—एकटाहि, स्वागें, शरिरानें. दृढ, चपल इ.

आंगीजणी—स्वतःचें शौर्य–८८

आंगें—३१–३२, एकट्याच्या हिंमतीवर ३६, ३७, ३९, ४५, ८०

अंकित—सेवकपणाचें चिन्ह-ची पदवी धारण करून राहणारा, ९६

अंगोळी—४१, अंगुली, बोट ४५, ४६, ८७

अंबर—कोठार २२–२७ कोठार, सांठवणीची जागा. आकाश, पोकळी, सांठविण्याची जागा.

आंगेंच—३१–३५ स्वतः एकटाच. स्वतःच (स्वांगें असाहि प्रयोग येतो. प्रथमार्थी तृतीया. आंगेजणीनें म्ह. स्वतःच. करून हें पद पुढें जोडून हा तृतीयांत शब्द देण्याची संस्कृतानुसारी प्रथा. शरीरें करून, मनें करून इ. पुढें करून शब्द गळला आणि स्वांगें अंगें एवढेंच लिहिण्यांत येऊं लागलें. राजा अंगेंजणीनें चालून गेला असें किंवा राजानें अंगें चाल केली असेंहि म्हटलें जातें. पण अंगें ही तृतीया कायम.

क

कटकांतील—पृ. ३० सैन्यांतील.

कट—६६ बंदूख, तमंचा, इत्यादि दारुयंत्रनलिका ज्या लाकडी साच्यांत बसवितात त्याला घेतलेले रुंद पटीचे वेढे. बंधन. दासबोध द. १ स. २ ओ १५, १६ हेमकट.

कज्या—७१ भांडण, तंटा, (वैमनस्य उत्पन्न करून तें वाढवावें.)

कचदिल—१६मनाचा-भितरा,-हलु-वार; दिलाचा कच्चा. कच्चें किंवा भ्यालेलें आहे मन ज्याचें.

कदीम—जुने-८६, १११ (पुरातनं कदीम स्यात् राव्य. को)

कबज—३३ स्वाधीनं काबिजं स्मृतम् राव्यको.

कमतर—२६ क्षीणशक्ति, दुर्बल.

कमाविशी—३२,३३जमीनमहसूल गोळा करणारा सरकारी अधिकारी. (ग्रामसंघकरग्रही । राव्यको.)

कर्दम—८८ रक्त, हाडें, मांस यांचा रेंदा.

कर्नाटकीचें—१०४ (तुजला **कर्नाटकीचें** राज्य दिधलें.) कर्नाटकी प्रांताकडील.

करार—३९ कायम (पूर्ववत्)

करारीं करून—८५ निश्चित.

करिणा—वृत्तान्त १५,५२ निरोप १६, व्यवहार, पद्धत ५१.

करून ठेविला—२८म्हणून ठेविला.

कलगी—३५ पागोट्यावर सुवर्ण-जडिताचें बहुमानाचें पदक (शिरपेच, कलगी, तुरा इ. पैकीं) दागिना [कल्गी पक्षावतंसकःराव्यको]

कलश—९४ गडवा, घट.

कलावंतीण—२९ दासी, नाटकशाला, खेळी.

कस्त—३९, ८० कष्ट [हा शब्द ३९ परि० राहिला आहे.]

कागदघडणी—३२ इतिहासकालीं घडणी म्ह० खातेदफ्तर वेगळें असे. त्या कडील सुटे कागद.

काठी—३३ पांच हात व पांच मुठींची **काठी**. शेत मोजणीची काठी.

कातर करून—पट्टयाचा हात करून २० (पट्टा व बिचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढिले.) टिपणी परि० ८७ पहा.

कापडजिन्नस—कापड आणि इतर जिन्नस असें नाहीं. कापडी जिन्नस.

काफर—१४-१४ नरकास जाण्यास योग्य. मूर्तिपूजक, दुष्ट.

काबीज—३,३२,९६,११६ कबज पहा.

कायदा घालणें—३२ शिस्त नियम करणें.

कारकून—३२,३३,३४,७० सरकार नियोजित दप्तर लेखनाचा अधिकारी; ठाणेदार.

कारखाननीस—२७,२८ गडावरील सर्व कारखान्याचा दप्तरदार. मुख्य लेखक.

कारण—२५ कार्य.

कारभारी—३, २८ कार्यकर्ते.

कालरात्री—टिपणी परि. ४८ पहा.

कालवशात्—३ कालवश-काल-स्वाधीनत्वात् पञ्चम्यन्त अव्यय (काल= मृत्युस्वाधीन.)

कालज्ञान—१११ मृत्युकाल आला हें ज्ञान.

कास कसली—१८पायांत चोळणा घालून कास कसली. (कच्छ) कांस-काचा घातला. कांस कसली. नुसती कंचर बांधणें ह्यास कमरबन्दी, कमरबस्ती (दूष्यामध्यं तु कांस स्यात् १०६ राव्यको.)

काळानुसार—८०सृष्टिक्रमानुसार, वयोमान सरल्यामुळें.

किताब—४२(खिताब. अ.) पद्वी. गौरवार्थक, ज्ञानदर्शक, उच्चतादर्शक, अधिकारदर्शक संज्ञा.

किल्ले कोंढाणा—किल्ला इ – इ=चा कोंढाणा. कोंढाण्याचा किल्ला. ५–५.

किल्लोकिल्लीं—१–१ (गावोगावीं, रस्तोरस्ती, घरोघर, पेठोपेठी—अकारान्त व आकारान्त शब्दाचाच ओ होतो. गल्लो-गल्ली येथील इकाराचा आकार झाला म्ह. इ–कार गळाला व मग ओकार झाला.)

कुडती—१८कुर्ता फा.–सदरा, सद्रा (कुड्ती कूर्परकंचुकः ६० राव्यको.)

कुबल—१४–१४ बळकट, कठीण, अडचणीची, दृढ.

कुल—सर्व. हा शब्द ह्या बखरींत १६ ठिकाणीं आला आहे. कुल देश,–कारभार,–जमाव,–सुभा,–बारा ह. लष्कर,–जरीसामान, कारभारी पंत, महाराजांचे होते इ. इ. ते सर्व म्ह० कुल. परिच्छेदांक येथें दिले नाहींत.

कुलगुरु—९४ कुलोपाध्याय.

कुलस्वामी—९४ श्रीमहादेव व श्रीभवानी **कुलस्वामी**, ... (कुलदेव, कुलदेवी व) कुल पुरुष.

कूच—चालणें, मुकाम सोडून १०,२९ मुकाम स्यात् अवस्थानं प्रस्थानं कुच-नामकं १८६ राव्यको.

केवळ—३२ नुसतें, विशिष्ट, शुद्ध.

कैद—३१ नियम, कैद–कानु, पद्धत (कैदं च निग्रहः २५० राव्यको.) ३१; –वार नियमांत म्ह० अदिल० पातशाहीशीं निष्ठेनें वागणारा ८;–०त ३३.

कैफ (खाईल)—११२ मादक (पदार्थ. मादक गांजा, भांग इ.पदार्थ खाण्यानें धुन्दी येते ती. कैफ शब्दच कैफ आणणाऱ्या पदार्थांकरतां वापरला. (मदद्रव्यं तु कैफं स्यात्) राव्यको. ८८.

कोट—७,३३,४७,७५ प्राकारः कोट इत्युक्तो १९० राव्यको. शहरवस्ती वेगळी. आणि त्याच शहराची गोट वस्ती वेगळी गढी वेगळी. तटबुरुज असलेलें दिवाणघर.

कोटचंडी—टिपणी ४० परि. पहा.

कोठडींत—५८,६० दिवाणखाना–खोली.

कोडींचा—८४ कोटिः, कोटी, कोट, क्रोड. संस्कृत कोटचें क्रोड हें गांवठी संस्कृत आहे. संपुटचें संपुष्ट.

कोणास—कोणाकडून, कोणाच्यानें ६–७ तृतीयार्थी चतुर्थी किंवा द्वितीया

कोश—८८ (कोस नाहीं–श) २–२. कोस. २,३ मैलांचा कोस. कोस अंतर.

कौल—७,८,४५,७६,७७,८१,८२, ९९ पत्र. आश्वासन, अभयपत्र.

कंगाल—६०भिकारी, गरीब, दरिद्री.

कंठमाला—२२ (हस्तकडीं, कंठमाला, तुरे, पदकें...कित्येकांस बक्षीस. फार दिलें.) कंठाभरण; माला, गळ्यांतच घालावयाची पण ही फार मोठी नसते, सामान्यतः गळ्याजवळ व गळ्याभोवतीच असणारी माळा. ही कमरेपर्यंत लांब म्ह० मोठी नसावयाची. ती नुसती माला. अलिकडील लाकेट)

कंबरवस्ती—५०,६०,६३,८७,९६ कटिबंध, कंबर बांधून सज्ज.

क्रियाशपथ मागणें—१२–१३ (खानास = अफ० स क्रि. मागणें) १४,

क्रिया जतन केली—९६ वचन पाळिलें, आण शपथ घेतली ती खरी केली.

क्रोधें करून—४६ रागानें.

क्रोड—७७ कोटि, कोट संख्या (कोटिःचें कोट त्यानंतर क्रोड झालें कीं काय ? गी. को. ।। दोन्ही शब्द आहेत. पण क्रोडः त्याला हा अर्थ नाहीं. डुकार०

ख

खजीना—३५,९२,१०५ (खिजाना, ख० अ.)—द्रव्य, कोश, तिजोरी, कोशागारं खजिना स्यात् ३४ राज्य को. शस्त्रालन्वः खजिना स्यात् २२५.

खबर—वार्ता, समाचार ८, ११ घेतली, केली ९३, (वार्ता खबरनामिका २९५.)

खबरदारीनें — बातमी आणवून सावधतेनें, हुषारीनें (खबर्दारस्त्वहितः २९६ रा. व्य. को.)

खबर बातमी - ८९ एकार्थी दोन शब्द.

खलबत—१३, खिल्वत अ. न. एकान्तीचें बोलणें गुप्त, आपसांतल्या पुरतीच गोष्ट.

खस्त होतो—मरून जातों — ४६ नष्ट २१.

खानाजाद— ३९, खाना – झाद् = दासीपुत्र, लेकावळे.

खावंद— खाविंद् = मालक, धनी, स्वामी, मुख्य, ५, ७८.

खासा—७, १८, ६३, ७५, ८५, ९०, ९६, ८३; १९, ४०, ४६, ५०, ९९. स्वतः, खुद्द, खाशा डेऱ्यापर्यंत ३७, खासाखाशी ७८, खासेखासे १७.

खुदानें—२४, ४५, ९५ परमेश्वरानें.

खुद्द—८५–१०८ स्वतः

खुमास—पृ. ९७ कलापूर्ण, सौंदर्ययुक्त.

खुशाली केली—९, २३, ४६, ६१, ९३ सुखी जाहाले; कुशल ५०, ल०—राहिले ७०, १०३.

खुष-खरेदी—९६ खुषीनें केलेली खरेदी.

खेरीज—(खा-खेरीज,) शिवाय, वांचून, इतर, आणखी ५.

खैरात—८६, ९६ (धर्मादायस्तु खैरातिः ३०३ रा. व्य. को.) दानधर्म, देकार.

खोंचून—५३ टोंचून घेऊन, दंश धरून.

खोजे—३७ फा. खोजा-खोजा-पंढ, हिजडा, ना पुरुष ना स्त्री. मुसलमानी जातींत फार.

खोरें—कुहर ७. मावळ भागांत दोन डोंगरांमधील लहान भाग. अशी प्रसिद्ध ७ आहेत.

खंडण्या—२६. गांवोंगांवीं जबरदस्तीनें घेतलेला पैका.

खंडमक्ता—२३ ख्ता-खंड व मक्ता एकार्थक दोन शब्द=उत्पन्नाचा ठराविक अंश.

ख्यात—३, ६४, ६९, ८६ प्रसिद्धी, कीर्ति.

ग

गइब—गुप्त गैब अ. घाइब अदृश्य ६०.

गज—५३, २४ तसु लांबीचें परिमाण.

गजशाळा — ८५, १०५, हत्ती बांधण्याची जागा, हत्तीखाना.

गड—८०. ह्या ठिकाणीं-पाणदुर्ग. जंजिरे-समुद्रकांठचे किल्ले.

गड कोट किल्ले—२७, ९०.

गड भांडवणें—४३, किल्लोकिल्ली सिद्ध राहून बंदोबस्त राखून लढणें, प्र. गडावरील सैन्यानें लढाई द्यावी. ४३ वसवणें; केलें—६, ..., ८०, ८६, पृ. १०२, १०५.

गणतीस लागले—८८ घोडदळांत जमा झाले. मोजणींत धरले गेले.

गणना केली—६५, समाविष्ट केले

गणना न करणें—४५, मनानें न खचतां, लक्षांत न घेतां, न मोजतां.

गनिमाची=मोगल शत्रूची—३६.

गनिमाचे—मराठे-६३.

गनीम—७५, ९६, वैरी १८७ रा. व्य. को.

गयावर्जन—गयाव्रजन ६१, बिहार-प्रांतांतील गया ह्या पुण्यक्षेत्रीं केलेलें त्यागपूर्वक केलेलें पूजन श्राद्धादिक कृत्य.

गरोदर—८६ [गुरु+उदर] गर्भवती.

गर्दीस मेळविणें—८, ११, ७७, ८४, ८८ मारून गर्दीस मेळविणें. फा.

गर्मी—५०, उष्णता-उन्हामुळें बेचैन, अस्वस्थता.

गलबा—३६ [घलबा अ.] गडबड, धामधूम, आरडाओरड.

गल्ला — २७, ३३ [घल्ला अ.] धान्य, उत्पन्न, पीक. (गल्ला धान्यस्य संहतिः १९९ रा. व्य. को.)

गवतानें शाकारून—२९ [छाया + करणें] गवत पसरून वर कवलें लावणी करून.

गांठ न पडे—३६, उद्दिष्ट साध्य न होणें.

गांव—उंची–१॥ गांव उंच ८५
—लांबी–२ गांवें लांब व १॥ गांव रुंद ३५, ४०
—वस्ती–८४, ९३, ९६
—एकवस्ती, ३३

गाहा—एकीकरण-९२.

गिल्ला—५४फा. पु. तक्रार, गाऱ्हाणें, प्रतिकूल मत होईल असें बोलणें.

गुमान—पर्वा; हिशेब ४६ फा.

गुलाम — ११२ [घुलाम अ.] विकत घेतलेले सेवक. कनिष्ठ सेवक, क्षुद्र, होयबा. (गुलाम बंदा द्वावेतौ दासनाम्ना प्रकीर्तितौ ॥ गुलाम बंदा फर्जंदा दासचण्डप्रचण्डकाः २४ रा. व्य. को.)

गैरहुशार—४१, ७५. अ–सावध, दुश्चित्त, गाफील.

गोट—१७, १९, २१. कापडी तंबु, सैन्यशिबिर राहण्याची जागा. ३६ (शिबिरं गोट उच्यते १८४रा. व्य. को)

गोत्रज—८१. एक गोत्री.

गोरखपंथी— ६०–गोरखनाथ यांचा नाथ-पंथ तोच गोरख पंथ [गो = इंद्रिये तीं स्वाधीन ठेवलेला गोरक्ष-गोरख]

गोरगरीब—२२.

गोसावी—९४ गोस्वामी, विद्वान्.

गंगातीर—गोदातीर २६–२७.

गुंजाईस—३३ फा. उत्पन्न, मिळकत, नफा.

गोंडवण—६१, गोंड लोक राहतात तो वन–प्रदेश. (कोळवण, फिरंगाण, तेलंगण प्रों).

घ

घटाई— ९६ अ – संघट्टण – स्नेह, मैत्रीची बोलणी, वाटाघाट.

घडोघडीं—९१–वारंवार, पुनः पुन्हां.

घाट, घाटमाथा—१२, १७–परि. १२ टिपणी पहा.

घुगी—मुखत्राण [फा. कूकी स्त्री] शिरस्त्राण ७५ (घुगी नाम शिरस्त्राणं १२८ रा. व्य. को.)

घुशलखाना—खलबतखाना [फा. घुस्लखाना पु.] ३९, ५२, ९६, १०५, टीप, (मंत्रस्थानं गुसुलखाना २०६ (स्नानस्थान '–पाठभेद) रा. व्य. को.

घेऊन—९४ (अलंकार) धारण करून, लेऊन.

घेरा—२७ डोंगरी किल्ल्याच्या पायथ्यालगतचा सपाट भाग, परीघ.

घोडा-राऊत-- ८१ घोडा व घोडेस्वार.

घोरांदर--२१,४५, ७५. घनघोर, घोरतर, निकराचें, तुंबळ.

च

चखोट—३६, ६६, ८५[चोक्ष सं.] नेटका, उत्तम, शुद्ध, प्रशस्त.

चढे घोडियांनिशीं--(हें ज्याला कैद करून धरून आणावयाचें त्याच्याकडे लावावयाचें कीं जो पकडण्यास जाणार त्याच्याकडे लावावयाचें ? ज्याला पकडावयाचें त्याकडेहि लागेल. तो जरी (चढे) घोड्यांवर, चढलेला असला तरी त्याला तसाच धरून आणतो. (२) मी घोड्यावर चढून न उतरतां तसाच धरतो व आणतो. मी० ह्या अर्थापेक्षां, पार्यी असलेल्यास तर धरीनच. पण चढलेल्या घोड्यासह म्ह. घोड्यावर चढून असला तरी आणतो.) ९, एका धावणींत, एकाच घोडदौडींत, हाच अर्थ योग्य ७५.

चपेटे—ठोकरा, धक्के, आपत्प्रसंग. ७०

चाल करून, आला—१८, २६, ४५, ६३, ८१, ८७, ९१. चढाईच्या ईर्षेनें,-घेतले-तयारीनें धावून येणें. चालून-आला, असेहि प्रयोग येतात.

चावर—ऐ. पत्रांतुन क्वचित् चावराणा हा शब्द येतो. चाहूर=१२० बिघे.

चिरगुटें — २१ चिंध्या, फाटकीं फडकीं. [चीरं सं.-वस्त्रं, कुट = गुट अल्पार्थक प्रत्यय, फळी-फळकुट, शेणी-शेणकुट=तुकडा]

चुकला—५० (व्हावयाचा पण) टळला, राहिला. (स्कु० धा. चुकणें).

चुकूर—११४ गोंधळलेले व दुःखी वि.

चोळणा—५८ ना. गुढग्यापर्यंतची तंग विजार.

चौकटीचा--चौकट=ना चौकोन-नी

चौकडें—२२ ना. चार मोत्यांचा किंवा सोन्याच्या चार कड्यांचा पुरुषांचा कानांतील दागिना.

चौकशी—७,३३ ना. व्यवस्था (शेतजमिनीची), व्यवस्था, हिशेब.

चौकस—(चोकस) (वजन, तापविणें, सुलाख, घर्षण) सावध, हुशार, दूर दृष्टीचा.

चौका— ना. जरब; धाक, ८०.

चौगर्दा—१६ चोंहों बाजूंस फा. गिर्द परीघ गिर्द-गर्द गर्दी क्रिवि.

चौतर्फा—४५, ६०, ६६, ८५, ९० (ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती.) चारी बाजूनें क्रिवि.

चौफेरां—८७, ९६ अ, चारहि बाजूंनीं क्रिवि. (चौफेरी बिदीस)

छडीवाले—२१ ना. हत्यारबंद सैनिकांतील एक, छडीनें लढणारे.

छत्र—९४ना. सिंहासनावरील वर्तुळाकार राज्यचिन्ह. राजमस्तकावर हें छत्री

घरल्याप्रमाणें असतें. (छादयतीति छत्रम् पृथ्वीचें, राज्याचें रक्षण करणारें छत्र) सुवर्णरत्नजडित.

छत्रपती—९४ वि. छत्राचा स्वामी.

छापा-छापे—८७ ना. शत्रूवर अचानक घातलेला केलेला हल्ला.

छावणी—२९ ना. घरीं शेतवाडींत राहणें २९, युद्धावर असतां सैन्य राहण्याची जागा, तळ, ९५.

छावे—१०६ ना. लहान हत्ती.

जड-जवाहीर = ५ (जड-जोखीम, जडावचें काम, जडण, हिरेजडित. हिरे जोडलेले, जव्हेर, जवाहीर-हिरा, हिरे-माणीक इ. रत्नें जडविलेले ह्याचा संक्षेप जडजवाहीर, सोनें, रत्न; इ. साठीं व्यापक संज्ञा (फारशी = सोनें, + अर जवाहिर रत्न) ५, २१, २९, ६९

जडभारी -- ४६ ना. संकट, आपत्ति,

जडाव केली—९४ (सिंहासनास कोंदण करून रत्नें) जोडलीं; जडणी केली.

जडित केले—९४ वि. (सोन्याचें कोंदणांत रत्नें जडविलेले खांब सिद्ध केलें.) रत्नजडित, रत्नखचित.

सिंहासन-९४ **जडित सिंहासन**-सिद्ध केलें.

जप्त--२६, ९३, ९६ खंडण्या घेतल्या. मुलूख **जप्त** केला तात्पुरता-सब...१४

हाता घेतलेला, जिंकलेला. जप्तीखाली-३३,

जबरदस्त—(राज्य करून प्रधान नांवाचे अधिकारी ठेवून जे ते जबरदस्त; ७ जबर जोर दस्त दंडनायक) वि. वि. बलिष्ठ [फा. झबर्दस्त] ७, ८२

जमदाड—मोठ्या पात्याची तलवार २०. यमाची दाढच जणु अशी तलवार (यमदंष्ट्र)

जम निदान करून—२१, यमाशीं मृत्यूशींच झुंज समजून, निकरानें.

जमनीस — २८ ना. जमाबंदी खात्याकडील लेखक जमा निविस्तन्-जमनिवीस—

जमातींशीं—बरोबरच्या जमावासह ७. जमातीनिशीं जमातींसह [जमात = निशी, - नि गळाली जमातीसह-जमातीशीं]

जमाव स्वार--७४ स्वारांचा जमाव ७४

जमीदार—३१, ३३ जमीनदार, = देशमुख देसाई खोत.

जरी--१८, १९, २०, ५०, ९६ अ (झर = सोनें) जरीचीं ६३

जरीची कुडती—२० चांदीचा वा सोन्याचा मुलामा केलेलें = लोखंडाच्या कड्यांचें असलेलें व कमरेपर्यंत येणारें डगलें.

जव्हाहीरखाना—१०५ रत्नशाला.

जातीचा, जातिवंत— १९, २७, ११६ योग्यतेचा, थोर, रीतीनें.

—प्रकारें, प्रकारचें ३३, ६०, ७३, ६३, ६६, ९०.

—अंतःकरणानें, स्वभावानें २३

जाफा—अधिक, ज्यास्त ८९

जाब—५२ उत्तर.

जाबता— १ धाक, दरारा, ९६अ., २ यादी, टिपण, नोंद २९.

जामदार— ११ कापड, कपडा-कोठीवरील अधिकारी,-खाना–कापड-कोठी, वस्त्रागार, वसनागार, १०५.

जामीन— २७ मध्यस्थ विश्वासु, हमीदार.

जायां—४४ खराब, नष्ट, (कामाचा) बिघाड [आ. झाइ. नष्ट]

जासूद—२४,२८, ४१, ४२, ६१, ६९ ना. बातमी आणणारे, निरोपे.

जाहाजें गुराबा— ७८ जलवाहन तारूं.

जाहीर केली— २४, ४०, ५३ सांगितली, श्रुत केली.

जिन्नसवार—१०५पदार्थानुक्रमानें, तपशीलवार. (वस्तु स्याज् जिन्नसाभिधम् २४६ रा. व्य. को.)

जिरातखाना—१०५ शस्त्रागार.

जुमला—२३, २८, ३०, ६६,९२, टिपणी २८ व ३० परि. पहा.

जुम्लेदारः शताधिपः राव्यको १७७ परिस्तोमी तु जुमलैदार १८२ (हत्तीवरील झूल चित्रविचित्र, अनेकरंगी).

जे—३५, ३६, ४५, ४६ कीं.

जेजाला—३९, ना. उंटावरील तोफ, लांब नळीची तोफ फिरवितां येणारी.

जेर—८०, ८९, ९१ बेचैन, घाबरें, निर्बल, पराभूत, हैराण, जेरजप्त- पराभूत व स्वाधीन ११६.

जोगी—योगी, बैरागी, गोसावी, योगीपासून शब्द जोगी झाला. पण सध्यां जोगी वेगळा. व सामान्यतः कनिष्ठ. ६०.

जोड-इंद्रधनुष्यें—११५, रात्रीं व तींहि जोड इंद्रधनुष्यें निघणें हें अशुभ व मोठें दुश्चिन्ह होय.

जोड जाहली—५१ लाभ जाहाला. परि. टिपणी पहा.

जोडीचे—४६, बरोबरीचे, योग्यतेचे.

जोरावर—३९, ४३, ४६, समर्थ, शक्तिवान्. जोरदार—जोरावारीनें जुलूम-जबरदस्ती करून, युद्धादि प्रसंगानें ६९.

जोहार—सलाम ४८.

जंजिरे—पाणकिल्ला, जलदुर्ग ८०.

जंबूरियाचा—(जंबूरा तु शतघ्निका १३१ राव्यको.) तोफविशेष ८८.

झ

झगडा—द्वंद्वयुद्ध, लढाई २३, (दिधला) ७५.

झाडा--३३ जमीन मोजणींतील एकीकरणाचें एक प्रमाण ३३.

झाडा घेणें--२९ तपासणी करावी. (झाडा झडती-निर्याति र्झडती भवेत् १२२ राव्यको.) निर्यातिः = परत देणें.

टक्का--पैका ३३,६९,७०,७१ (यांणीं कमाविसी करावी आणि मोघम) **टक्का** द्यावा.

टाकोटाक—तत्काल, लगेच ७१

टिपरी--दणाणणें. शिमगा खेळ ८७ टिपणी पहा.

ठाणीं—गांवें ३३ कचेरीची जागा गडावर. मुख्य कचेरी ६३.

डबीर--(युक्तभिज्ञो डबीरः स्यात्) परराष्ट्र वकील ३

डेरा--=१७,४७,५५ तंबू, कापडी घर (डेरा दूष्या प्रकीर्तिता १०५ राव्यको. दूष्य = तंबू)

डौल देऊन--११२ वरकरणी मनासारखें वागून.

ढाल—(खेटकं नाम ढाल: स्यात् १२६)-ढाला चढवून-शस्त्रास्त्रें-उगारीत, सरसावून ६३.

त

तख्त-तक्त—राज्यासन, सिंहासन, २४, ५०, ८५, ९३, ९४ (तख्त सिंहासनं स्मृतम् २४ रा. व्य. को.)

तजविजींत पडला— विचारांत, चिंतेंत-पडला, युक्ती ११; १४, १९, ३६, ४२, ४८, ५२, ५४, ६०, ६५, ७५, ८०.

तट—प्राकार २७, **सनौंबत**-ज्ञेयः प्राकारपालस्तु तट-सनौंबत नामकः २०१ रा. व्य. को.

तनका—तन्खा-वेतन, पगार ३१; ८१.

तबेल्यास लावणें—७१ (घोडीं) स्वाधीन करून घेऊन आपल्या पागेंत दाखल करणें.

तमाम—४३ चोहोंकडून, सर्वत्र

तर्कशकमान—३९ तुणीरः तर्कशः १२१ तूणधरः. धनुष्य; बाणांचा भाता,

तर्फ— ३६ तालुक्यापेक्षां लहान ग्रामसंघ; रांग, बाजू.

तरतूद—(उपायस्तर्तुदः स्मृतः २९७ रा. व्य. को.)

तरि—३६ राजियाच्या मतें सला करावा **तरि** कोणी मातबर रजपूत नाहीं. तर-तरी-हें अव्यय कारणबोधक व विरोधार्थक अशा दोन प्रकारांनीं येतें. १, ३६.

तरांडें— ८० तरांडें-जलवाहन, गलबत प्रकार. (दर्यांत **तरांडें** फिरेना).

तलफ--८० नाश, उध्वस्त ८०.

तश्रीफा—लढाईचा-लढाऊ पोषाख; सर्कारी वस्त्रें ३९.

तसनस—९६ अ. नुकसान अफरातफर.

तसलीम—सलाम; मुजरा ५९.

तहकीक—पक्की; निश्चित,खरी ३६.

तहरह = सलोख्याचें बोलणें व तशी वागणूक.

तक्षिमा—वांटे; विभाग ३३.

तासीव—तासल्याप्रमाणें साफ ८५.

ताकीदपत्रें—आज्ञापत्रें ४९.

ताम्र—यवन. ३६, म्लेंच्छ.शायिस्तेखानाकडील मुसलमान.

ताबीज– ताब्यांत ९२.

तालीमखाना--व्यायामशाळा१०५ (बलशिक्षा तु तालिमम्, मल्लशाला १३२ राज्यको)

तिरंदाज—धनुष्यबाणानें लढणारा २१, २७, ३५, ६३, ९२ (तिरंदाजस्तु धानुष्को १८० राज्यको.)

तुरे--२२, मोत्याचा लहान पदर लावलेला शिरोलंकार, २२. (तुरीवतंसः पदकं ज्ञेयं वै क–रुतका–भिधं ४४ राज्यको.)

तूट विचार--धीर सुटलेला, युद्धक्षेत्रपलायनाचा विचार. ३७.

तूर्तच—आतांच ४६.

तैनात—(वार्षिक) नेमणूक पगार. २८, ३२, ६५, ६६, ९०.

तोडा—परि. १८ पहा–बार–बंदुकीस अग्नि लावण्याचा काकडा व बंदुक उडविणें–बार काढणें. ६३.

तोफखाना—हत्ती, उंट, घोडे, बैल, इ. जनावरांनीं ओढावयाचे तोफगाडे घर ३५.

तोफाची—तोफा उडविणारे लोक २१, ४४, ८८, ६३.

तोलदार—प्रतिष्ठित, ४५, ४८, ९२ प्रशस्त, मान्यता, मोठी २६, २७, २८, ३२. समर्थ २८, ४३, ९३.

त्याजवर—त्याजकरतां २०, ६०, ८२ ह्याचे निरनिराळे अर्थ, मुळें–साधनबोधक, साध्यदर्शक, नंतर, वर इत्यादि, आहेत.

त्यास—अव्ययार्थी सविभक्तिक नाम. –तेव्हां ५०, ४८, म्हणून ४७, मुळें, करतां आणि ३३, आणि ७, पण २, इत्यादि अर्थ.

थ

थट्टी—गोवाटिका नाम, गोवाहिका १०५

थोटा—हात–तुटका ३८

थोर धर्म—धर्म–भार,-ला. पुष्कळ, उच्च, वडील ६१, ६५, १

द

दगा--अकस्मात् पकडणें–१५, ५३, १०४ पकडणारा खोर–पकडणारा ३७, ४०, ५३

दफ्तरखाना--लेख्यशाला १०५, दार–लेखक, लेखाधिकारी ३२,

दबाविल्या—धाक दाखविला,धाकांत ठेविल्या ८२, ९४

दर्या—समुद्र ७८,–जेर = (सागरी सैन्यामुळें, शिद्दी) पराभूत आहे. ८०,

ध

धर्म--९४ देकार. अपार द्रव्य **धर्म** केला.

धारकरी-- १८, ७, २०, २८, ३६, ६३, ८२, ८८, ९२. शस्त्र धारण करणारा. आघाडीचा वीर, युद्धांतील आघाडी संभाळणारा योद्धा, शस्त्रधारी.

धाशत खाईल—१९, २१, ८१, ९३ इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. भिईल.

धुंद-ध — ३५, ७३ गोंधळ, लूट, मारामारी, २६ मोंगलाईंत **धुंद** उठविली (हीं खबर औरंगजेबास कळोन, बहुत चिंतातुर जाहला.)

धुरंग--३३ जमिनीचें माप ?

धूमकेत--११५(धूमकेतु = अग्नि) धूर एवढेंच ज्याचें चिन्ह असें अशुभ नक्षत्र-शेंडें नक्षत्र.

धोंक-ग-टिया--७५ दोन पुडांच्या पिशव्या; पडशा.

न

नखत--३३ रोख द्रव्य (द्रव्यं तु नखत संज्ञं स्यात् ३८ रा. व्य. को.

नगारे-करणे केले--२३ (आनकस्तु नगारा स्यात् १७४ रा. को.) वाजविले.

नजरगुजर--समक्ष पाहून २७, ९० (नजर्गुजरमित्येतद् विज्ञेयं दृष्टिगोचरम्)

नजरेंत धरिला नाहीं-- ९३ खिजगणतींत धरला नाहीं, स्वतःपेक्षां सामान्य मानिला.

नवरत्नें--७५ हिरा, माणीक, पाच, गोमेद, मोतीं, इंद्रनील, पुष्कराज, पोवळें व वैडूर्य हीं नऊ रत्नें.

नष्टाई--१४ = कपटी, खोटी, नष्ट करण्याची बुद्धि मनांत, पण बाहेर तसें न दाखवतां.

नागवीन-- ३३ (नाग्विणें नाम विज्ञेयं सर्वस्वहरणं बुद्धेः २७८ रा. व्य. को.) अंगावरील वस्त्रासह लुटणें.

नाटकशाळा—१००, २१ रखेली, दासी,-शाळेचे पुत्र.

नानकपंथी—शीख ६०.

नामजाद—स्वतंत्र नियोजित केलेला अधिकारी, विख्यात-११, ४५, ८०, ८१, ४७. (नामजादिः स्यात् अभिक्रमः १८८).

नामर्दी — कुचराई, दुर्लक्ष्य. २९.

नामोश—लौकिक. ४४, ७५ (कीर्तिर्नामोश नाम्नीस्यात् २९० रा. व्य. को.)

नामोहरम—धैर्यरहित, पराभूत ३९, ८४, ८७.

नालबंद—घोड्यांस नाल मारणारा २८ (खुरत्रबन्धकश्चापि नालबंद इतीरितः १४०)

पुरोहित--कुलाचार्य, ११.

पूर्णाहुती-- ४० अनुष्ठान पूर्ण होतांना शेवटची दिलेली आहुती.

पैकाटक्का--द्रव्य ६९.

पैदा--प्राप्त, मिळविणें ७८, १११.

पोक्त--प्रशस्त, पुष्कळ, पक्का ६८.

पोतें--खजिना, द्रव्यसांठा १०५.

पोस्त मागणें-- ३ (सणास खेळ वगैरेसाठीं आप्तमित्रांकडे गांवांत संबंधी लोकांकडे कांहीं खाऊ, चिदागी, बक्षीस म्हणून पैसे वगैरे मागणें. सणाचा आनंदाचा देकार.

पुंड--३, ७, ८, ७७, ८१कसलीच सत्ता न मानणारा, बलिष्ठ.

प्यादे--पायदळांतील सैनिक, पायशिपाई ३३.

प्रतिइच्छा-- स्वतःच्या इच्छेप्रमाणें, इच्छामरणी ११६.

प्रतिमेचा--तुलनेचा ८८

प्रतिमेळ--एका प्रतीचे व मिळणींतील २७.

फ

फटकळ—क्षुद्र, दुर्बुद्ध १११.

फतू—६६ प्रवाशाचा डगला. (कार्पास कंचुको नाम डगला पान्थकंचुकः ज्ञेयः फतू नाम बुधैः ६० रा. को.)

फत्ते—जय १८, २२–२३, ३५, ३९, ४७, ६३, ७५, ८८, ९१, ९२, ९९.

फन्ना केलें--उध्वस्त, नष्ट ८३.

फरजंद-- दासीपुत्र (पुत्रासमान) ५८, ७५.

फरासखाना-- राहुट्या, तंबू, जाजमें, खुर्चा इ. सामान व त्याची जागा ३५, १०५. (स्यात् अथास्तरणागारं फरासखानाभिधानकम् १०२ रा. को.)

फस्त करणें--फन्ना पहा ८७.

फाजील--आधींच अधिक दिलेला पैका २९, १०३.

फामिंदा--जाणता, मानी ४६.

फितवा-- फितुर, भेद २७, ३७, १०४ फितवा भेद इतीरितः रा.व्य.को.

फिरंग-तरवार--१८, २०, ६३, ६६, ८१ त्यांत कांहीं बंदुखी, कांहीं विटेकरी, **फिरंग** (वाले) असे माणूस सजले.)

फुरसत--सवड, वेळ ७१.

फौज-- ८-८ पागा व शिलेदार मिळून फौज २६, ६०, ७२, ८१, ९३; –दार ४९.

ब

बख्तर-- पोलादी कड्यांचें किंवा कातडी चिलखत ७५ (बख्तरं चर्म कीर्तितम् रा. व्य. को.)

बगळामुखी--बगळा हें मुख जिचें अशी देवी परि. ४० पहा. पृ. १३३

बटकी--दासी २९.

बडे-साहेबा-- हे बडा साहेब-चें स्त्रीलिंगी रूप ८, ९.

बदअमल--बदकर्म; जुलूम, दुष्कृत्य, दुराचार २९.

बरखंदाज--बंदूकवाले ३५(नालींक बरखंदाज रा. व्य. को.)

बरचीवाले--३५, ६३.

बराबरि-- ४६ (एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्ती **बराबरि** खाणें.)

बरा-रो-बर-रि-सह, योग्य व तुल्य त्याच्यासह, तुझें म्हणणें, हत्ती बराबरी इतकें खाणें ३, ७, ९, १९, ३९, ४१, ४६.

बल धरून राहणें-- ७ ससैन्य अर्थात् बलकटीनें बंदोबस्तानें, प्रतिकाराच्या सिद्धतेनें राहणें.

बहिले--मुसलमानी जातीचे पादचारी शिपाई २१, ४४, ९२.

बळकट--युद्ध, (खान), ४६, ९२.

बळकटी-- दृढता, निश्चितता, ९६, ९७.

बळ धरून सांवरावें--संपत्ति, माणूस, युद्धसाहित्य जमवून ७०.

बळावणें--बलिष्ठ होणें ३३, ३५, ८०. ८०.

बाडांत--तंबूंत (शिरला) ५३.

बांके-- आडवळणी पण महत्त्वाची जागा ७७.

बाजारबुणगे-- सैन्याबरोबरचे गैरलढाऊ लोक ३५ (बाजारः पण्यविथिका रा. व्य. को.)

बाजे--इतर २१, ८८, ९१, ९२.

बाड-- तंबूचें आवरण, कनाथ; पडदा ३६, ५३.

बाणाईत-- दारूचे बाण सोडणारे १९, २१.

बारगीर--सरकारी घोडेस्वार २८ (बारगीर स्त्वश्ववहो १७९ रा. व्य. को.)

बाह्यात्कार-- वरवरची, बाह्य, औपचारिक ७, ५०.

बिघा-- जमिनीचें माप ३३.

बिछाईत-- जाजम, गाद्या इ. ८८, ९२.

बिदी--रस्ता, सडक ९६ अ.

बिरदें--(१०० परि. पृ. १५२ पहा.)

बिशात--लुटींतील सामान (सर्वस्वं तु बिसादिः स्यात्) २९, ७६, ७२.

बुद्धिवाद--विचार, मंत्र ६९.

बुद्धीनें असणें-- बिचारानें राहाणें ११४.

बेइमान-- बेपान, असत्य, खोटा ४१, ४८.

बेकैद--बेशिस्त, नियमबाह्य, २९

बेगी--लवकर २०.

बेदील--दिलगीर, दुःखी ३९.

बेमुहिन-- बेमुबलक - अगणित, पुष्कळ ३५, ९२.

बेहुशार--असावध ८३.

बंकाईत-- बांका-बांग-एक शस्त्र चेंकाशस्त्रधारी २१.

बंद--व्यवस्था ३३, ९२.

बंदा--बंदीवान, नौकर ५९.

बंदुखी-- बंदुखधारी सैनिक ९९, २१, २७, १६, ३३, ६६.

भ

भट गोसावी--विद्वान्, पंडित ९४.

भतीजा—भाचा, पुतण्या २०.

भाईचार— भाई-आचार कुलाचार, शिष्टाचाराप्रमाणें हा आचार शब्द स्नेहाचार. पूर्वरूप संधि होऊन आ-गे ला (बंध्वाचार) १०.

भांडते-- लढाऊ लोक, हत्ती २१, ३५.

भांडीं मारणें--तोफा उडविल्या परि. २१, २३, ३८.

भिडेचा—४८ ज्याची भीड ऐकली जाते, पडते, असा; (स्वरूपदर्शक षष्ठी)

भेद--५, १५ युक्ति, फितवा

भोयी--पालखी वाहणारे २०.

म

मजकूर करून - विचार ३५.

मजल दरमजल—४९, ६१, ६९, ७२, ८९, ९६ अ.

मजलस—(सभा) वागण्याची रीति, धोरण.

मजलीवर—मुकामापर्यंत ८८

मजलीस — मुकामाचे उतरण्याचे गांवीं ४९, ९६ अ

मजुमदार — मजमू - अमात्यस्यान्मुजुमदारो, वसुलीकडील कारभारी ३२८ मुजुमदार पहा.

मत्ता—मालमत्ता ५, २१, ८३ मालमत्ता पहा.

मध्यान्हरात्र—मध्यरात्र (अह्न शब्द गळंत मानावयाचा) ३६

मनसबा--जहागिरी ३९

मना बंद--३९, ५८ (निषेधस्तु मना स्मृतः २७४ रा. व्य. को.)

मबलग— पुष्कळ, विपुल २१

मर्दाने--२७ मर्द, शूर, वीर.

मर्दाना--धीराचा व पराक्रमी १८, २७, २९, ३९, ४०, ६३

मर्दानी--पराक्रमी, शूरत्वाची वृत्ति ६६

मशागत--यत्न, मेहनत ३९

मसलत--मोहीम ३९.

महाल--१. देशविभाग, २ स्त्रियांची राहण्याची जागा, ३ सभागृह, ४ खोली, २४, ९६ अ, ३, ८, १३, १०५, ९९ ५खातें. २६०,१०५. प्रासादो महलाभिदः

महालदार - रक्षक, ८, १८- महालावरील अंमलदार ७.

महालमोकाशे—गांवें व तेथील उत्पन्न २५. ४९.

मोकासबा—हिशेब ? ३२.

मोतीलग—१९मोत्यांचे पदर असलेलें वस्त्र, कापड.

मोहनास्त्र—५५ मोह, असावध, झोपेंत. (१, २) शब्द येथें वाचणें.

य

यथायोग्य-- जितक्यास तितकें अवश्य तेढवेंच ३४.

यश घेणें--देणें ४६, ६९.

यास्तव--परंतु १४.

येलगार--हल्ला ए-(तु.) चढाई ४४.

येलंगेवार--(?) २१.

र

रण--(अपार पडलें, रणास येणें इ.) २१, ४६, ८७, ८८, ९१ रण म्हणजे लक्षणेनें मृत्यु.

रणकंदन खंदळ-- निकराचें युद्ध, कापाकापी, २१, ८२.

रजपूत--जातिवाचक नाहीं, विशिष्ट शस्त्रधारी योद्धा ३५, जाति ३६, ३९, ४६ तिरंदाज, बरखंदाज, **रजपूत** व सतीलीवाले... पाइच्यांची गणतीच नाहीं. ह्या ठिकाणचा रजपूत शब्द जातिवाचक नाहीं, खड्गधारी अशासारखा विशिष्ट शस्त्र धारक म्हणून आहे.

रतीब--नियमित रोज अन्न देणें तें २९.

रयतेची रयत— (साकल्यार्थक षष्ठी) प्रत्येक व सर्व ३३ गावनूगांव गांवाप्रमाणें, पिकाचे पिकावर निश्चयार्थक षष्ठी.

रयात—कींव, माफी, कसूर ७१.

रसद—गांवचा वसूलझाडा ९०.

रसरंग—बैठकीपुरेसें, देखलें ५१.

रहस्तां— रस्त्यावर; मार्गी ६६ (रस्ता रथ्या प्रकीर्तिता रा. व्य. को.)

रहस्य— आत्मगत खाजगी बोलणें १०४.

राज्यकारण—राजकारण ७, १४, ९९.

राजबिंडा—राजपिंड ८२.

राज्य--मोरे ७, सुर्वे ८, ९, १५, ३८, ४१, ६१, ७०, ९६, १०४, ११६, १२०.

राज्यभार--९६, १०९.

राबता—ये-जा, परिपाठ ५६; ६०.

रुजू-रुजवातीनें असणें— ३८, ६९. अनुकूल ऐक्य.

रोखा—पत्र ४९, ५३.

रोचेवार— (?) २१ कर्नाटकी प्यादे, बंदुखी, आडहत्यारी रोचेवार व लोकवार...एसे एकंदर जमनिदान करून भांडण दिधलें.

रोहिले—२१.

रंगमाळा—रांगोळी ९६ अ.

ल

लगट—४४.

श

शपथ देणें—घालणें, वाहणें, करणें १४,१५,४६ (आण–क्रिया.)

शब्द लावून—६८ दोष लावून.

शरतीनें—४५,७५अटीतटीनें,हिमतीनें.

शरबतखाना—१०५.

शहतखाना—१०५.

शहर मारणें—४, ६, ७,२४, ७५, ७९, ८३, ८७.

शास्त—शिक्षा ३८,३९. पृ. ९५

शाहाजादा ७३,४९. पृ. ९५ राजपुत्र

शिबाडें—जलवाहन ८०.

शिलेदार—स्वतुरगी–स्वतःचें घोडें घेऊन सैनिकीपेशाचा नोकर २,२८, ६८,७५,७९,१०६.

शिसोदे रजपूत—४२.

शैल—सल्ला–चें भाववाचक नाम सैल्य ८०; सल, कांटा ७.

शोध पडला—१४,६१,९४.

स

सला—तह, १२, १५, मामला, ६९, ८०.

सलाम—जोहार ४८, ५०.

सवेंच—लगेच, कालनिकटत्व. च मुळें निश्चितत्व.

साज—पोषाख ५७, ६६.

साधक कार्यसाधक ९६ अ.

साधणें—देश हस्तगत करणें. ४, ९६, १००, १०४.

सार्थक—जन्माचें (उत्तर) १०४.

सालझाडा—वार्षिक हिशेब ३१.

साहेब—१–१ बी–धनीपण ३१, ३३, ४६.

साहेबीण--साहेबा-साहेब-चें स्त्रीलिंगी रूप.

सिताब—जलद १९, २०,८८.

सुतरनाला—उंटावरील अग्नियंत्रें १६

सुभे—शिलेदारावरील २८, प्रांताचे हिशेबी लिहिणें करणारा व लाख उत्पन्नाच्या मुलखावरील अंमलदार ३२, लाख सैन्य ज्याच्याबरोबर तो, ३५, ५२, ७५, दोनशें जहाजावरील अधिकारी ८०.

सुभेदार—आरमारी अंमलदार ८० व मोंगलाईतील वसूली कारकून ९०.

सुमार—मोजून पण निश्चित, नेमकें. २१.

सुरनीस—सचीव ८, ९०.

सुऱ्या—सुरा वापरणारा ६३.

सुलतानढवा—साहसाधिरोह ४४.

सुवर्ण-चौकी—सिंहासन ९४.

सेरी—खाजगी विहारबाग १०५.

सैतान—३९, ५०.

सौदागीर—धनिक व्यापारी १०५.

संचणी—७, ८ जमाव.

संतर्पण—समाप्ति ४०.

स्वार—घोडेस्वार ५, ९, २९, ३२, ६०, ८४. नुसतें निघणें.

सर्वंत्र—सर्व ह्या अर्थी २-२ त्र-शिष्टत्वनिदर्शक वर्ण वृथा ३२.

सर्वस्वें—सर्वप्रकारें ११.

सचंतर—स्वतंत्र २५,७०,१०४.

सजविले—साज दिला,घोडे खरेदी, ७३ आरमार ८०.

सडे—शिडकाव ९६ अ.

सडे एकटे—८८.

सतराम्या—होनपुतळ्या ७५.

सतीलीवाले—सैती शस्त्रविशेष ३५. ५९.

सदर—सभा, कचेरीची जागा,सभा-स्थान, १३,१८,१९,५०.

सबनीस—सबनीस्तथा सेनालेखकः परिकीर्तितः। शंबा = रात्र. रात्री निवि-स्तन रात्रींचें लिहिणें करणारा. ३,७, ११,२७,३०,६५,७०.

सबुरी करणें—थांबणें ५२.

सबुरीचा—सावध, सहनशील ९२.

सभा—सदर १३-१३.

सभ्य—१११.

समेत—युक्त, सह, ७,२०

सर करणें—७-७जिंकणें, हस्तगत करणें, घेणें.

सरंजाम—साधनसाहित्य,१०,२९, ४८.

सरकारकून—१२-१३, ३६,६५, ७५,८५,९०,१११. वरिष्ठ अधिकारी.

सरखवास—हुजऱ्यांतील प्रमुख १११.

सदर—सरहद्द; शींव २९, ३२, ८०, ८२.

सरदार—सरकारकून ११,१३, २१.

सरनोबत—५ सरनोबतस्तु सेनानी. लष्करचे सरनोबत. ५,११,१२,२६,२७, ३०,३६,६५,६८,९२.

सरबरा—वहिवाटदार;अंमल करणारा ३२.

सर्फराजी—पोषाख; सन्मान, बढती

ह

हक्क—तैनात नेमणूक २९, ३१, ३३ (धर्मो हक्क (किंवा) सत्ता हक्क इति प्रोक्तो ना हक्कोऽधर्म नामकः २९८ रा. व्य. को.)

हजरतीस—धन्यास, स्वामीस ५२

हजीर—७३ (प्रत्यासन्नस्तु हाजीरः ३२७ रा. को.) उपस्थित.

हजारी—३०, ६३, ६६, ८२, ८८, ९० परि. २८, ३० व ६६ पहा.

हतुलवे (?)—२१

हमेण्या—लांब पिशव्या ७५

हमेशा—६६, ८० (हमेशा स्यात् निरंतरम् २४७ रा. व्य. को.)

हयवान—घाबरा ५० (हैवानः पामरः स्मृतः २४७ रा. को.)

हर-ल-कोर—१९, २४, २८, ६९ राजियास सिताब आणवणें म्हणून जासूद हरकारे रवाना केले. (गुप्तकारी तथा चोर-हरकारः प्रकीर्तितः १८)

व्यक्तिस्थल सूची

[ही सूची पाहतांना इतिहासकालीन लेखनपद्धति थोडीशी ध्यानांत घ्यावी. ए–ये–व्यंकोजी, वे–ए–लूर, श–स–रफजी, दिलेल–र–खान, बह–बे–लोलखान, इत्यादि. परिच्छेदांक ११६ आहेत. अर्थात् ११६ पुढील सर्व आंकडे पृष्ठांक समजावे. पृ. असें कांहीं ठिकाणीं म्हटलें आहे. शिवाजी हाच विषय ह्या ग्रंथाचा असल्यामुळें ह्या सूचींत शिवाजी ह्या नांवापुढें कांहीं प्रसंग व त्यांचे परिच्छेद व पृष्ठें दर्शित केलीं. अशीच गोष्ट मोरोपंत, नेताजी, रघुनाथपंत, शहाजी, व्यंकोजी, अफजल०, औरंग० जयसिंग, दत्ताजीपंत, निळो सोनदेव, पन्हाळा, प्रतापराव, इत्यादींच्या बाबतींतहि आहे. त्यांच्या नांवापुढें हालचाल दर्शित करून परि० वा पृ. द्यावयास हवें. पण ग्रंथ पृष्ठमर्यादाहि लक्ष्यांत घेणें प्राप्त झालें. म्हणून सर्व पृष्ठांक वं परिच्छेदांक पाहा ही विनंती.]

अ

हत्यारें वगैरे लढाईसंबंधीं

कपडे वगैरे

– सभासद बखर –

शिवाजी चरित्र

साधनग्रंथ (कांहीं)

सभासद बखर
चित्रगुप्ताची बखर
चिटणीशी बखर
एक्याण्णव कलमी बखर
शिवदिग्विजय
शिवाजी प्रताप
शेडगांवकराची बखर
बुंदेल्यांची बखर
मोऱ्यांची बखर
महाराष्ट्रसा. बखर
तंजावरचा शिलालेख
अफझलखानाचा पोवाडा
सिंहगडचा पोवाडा
जेधे यांची शकावली शिचप्र.
होनप शकावली
राज्याभिषेक शकावली
गदाधर प्रल्हाद शकावली
शिवचरित्र साहित्य खंड १ ते ११
राजवाडे खंड ३, ४, ६, ८, ९, १५, १६, १७, १८, २०, २१.
शिवकालीन पत्रसारसंग्रह १, २; ३
शिवाजी सिवेनूर
सावंतवाडी सं. इतिहास, पिंगुलकरकृत
मराठी दप्तर रुमाल ३
पुरंदरे दफ्तर भाग ३
पे. द. भाग ३१
सनदापत्रें व भा. इ. सं. मं. ग्रंथ.
वतनपत्रें निवाडपत्रें
इ. सं. तंजावर राजघराणें
का. प्र. इ. साधनें.
अर्वाचीन महाराष्ट्रेतिहास कालांतील राज्यकारभाराचा अभ्यास भा. १ १६००–८०.
मराठेकालीन समाजदर्शन
ऐ--फार्सी साहित्य खंड १ तें ४
शिवचरित्र वृत्तसंग्रह खं.
„ संशोधन वृत्त
भूषण (हिंदी)
श्रीसंप्रदायपत्रें
आसामी बखर (बुरुंजी)
तुकारामाचे संतसांगाती
पोतदारगौरव ग्रंथ
शिवशाहीचा लेखनालंकार
सरदेसाई घ० इतिहास

संस्कृत

१ शिवभारत
२ पर्नालपर्वत--ग्रहणाख्यान
३ राधामाधवविलासचंपू
४ शिवकाव्यम्
५ बुधभूषण
६ गागाभट्टप्रशास्ति च. सं. वृत्त
७ श्येनवी--निर्णय इतिवृत्त श. १८३५
८ करणकौस्तुभ

फारशी

पादशाहनामा—अबदुल हमीद लाहोरी

अमल-इ-साली—कंबु
अलमगीरनामा-मिर्झा महमद काझी
मासीर इ अलमगिरी-साकी मुस्तैदखान
मुंतखब उललुबाब-खाफी खान
नख्स इ दिलकाश-भीमसेन बऱ्हाणपुरी
फुतूहत-इ-आलमगिरी-ईश्वरदासनागर
अखबरत-इ-दरबार-इ मुआला
महमदनामा-महमद जहूर
तरीख-इ-अली अदिलशहा-सयद नुरुल्ला
बसातिने सलातीन-महमद इब्राहीम अल झुबैरी
तरीख इ-शिवाजी
आदब-इ-आलमगिरी
हफ्त अंजुमन-उदिराज तलयार
फयझ--उल्-कवानीन
खतूत इ-शिवाजी
अहकाम-इ-आलमगिरी-हमीदुद्दीनखान
(रुकत--इ--आलमगिरी
पारसनीस संग्रहांतील फारशी पत्रें
मुधोळ येथील फारशी पत्रें
निंबाळकरांकडील फारशी पत्रें
(पोतदार यांजकडील फारशीं पत्रें)

इंग्रजी

Original Correspondence
Factory Records
Surat consultations
Records of Fort St. George
Orm manuscripts
D'ary of W. Hedjes (Hakluyat Vol. II)
Dutch Factory Records
Storia do mogor-manucci
Bernier's Travels
Tavernier's Travels
J. Fryer's New Account of East India
OrmeHistorical Fragments
Grant Duff's History of the Mahra.

Portuguese

Vide e accoens do famose e felicissimo sevajy (1695)
पोर्तुगीज-ए-मराठा

Dutch

Dagh Diwries.

श्रीशिवाजीराजांची जन्मतिथि

वस्तुतः हें प्रकरण ह्या पुस्तकांत असणें अवश्यच होय असें नाहीं. कारण, ह्या जन्ममितीची चर्चा **'शिवचरित्र-प्रदीप'** ह्या स्वतंत्र ग्रंथांत पृ. १ ते १३; ४९; ७१ ते ७९; १९७–२१९; २२१ ते २२२; २५० ते २८९ अशीं ८८वर पृष्ठें सविस्तर सर्व ग्रंथांतील प्रत्यक्ष व पूर्ण उताऱ्यांसह आली आहे. तेव्हां ज्या कोणा जिज्ञासू वाचकांना ह्या तिथीसंबंधानें एकत्रित व दोन्ही बाजूंची म्हणजे मिति कोणती चूक व कां आणि कोणती बरोबर व ती कशी ही माहिती पाहिजे असेल त्यांनीं सदर ग्रंथ अवश्यमेव वाचावा. ज्यांना इंग्रजींतून ह्या तिथी-संबंधानें तपशील पाहिजे असेल त्यांनींहि कै. एम्. आर. परांजपे एम्. ए. ह्यांनीं आपल्या एज्युकेशनलच्या एका अंकांत ही माहिती तपशीलासह दिली आहे, ती पाहावी. पुढें ह्यासंबंधाचें स्वतंत्र छोटें पुस्तकहि त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. खेरीज हिंदीमध्यें ज्यांना ह्यासंबंधानें माहिती पाहिजे असेल त्यांनीं महामहोपाध्याय गौरीशंकर हिराचंद ओझा ह्या महापंडितांनीं शिवाजीनिबंधावलीमध्यें आणि बॅरिस्टर रविशंकर देराश्री उदेपूरकर ह्यांनीं त्रै. व. २० अं. ३ पृ. १२५ वर ह्या संबंधानें थोडक्यांत व नवीन माहितीसह लेख लिहिले आहेत, ते पाहावे. सारांश अभ्यासू वाचकांसाठीं असें हें ह्या प्रश्नापुरती संपूर्ण माहिती देणारें साहित्य उपलब्ध व प्रसिद्ध आहे. तसेंच ह्यांतील माहितींच्या आधारें ज्ञानकोश, चरित्रकोश, अशासारख्या ग्रंथांतूनहि सपादकांनीं विशेषतः डॉ. श्री. व्यं. केतकर व डॉ. बाळकृष्ण, एम्. ए. पीएच. डी., प्रिन्सिपाल राजाराम कॉलेज–कोल्हापूर ह्यांनीं ऊहापोह करून आपलें मत मांडून इ. स. १६३० मधील शिवजन्म तिथीच खरी हें स्पष्ट केलें आहे. असें आहे तथापि आणि जवळजवळ सर्व मराठी इतिहासग्रंथांतून श्रीशिवाजी जन्म सन १६३० हा दिला असतां त्याचप्रमाणें भा. इ. सं. मडळाकडे विचारणा व माहिती मागविण्यांत आल्यावरून भारत बाह्य ग्रंथांतून हाच जन्मसन (१६३०) प्रकाशित झाला असतां महाराष्ट्रांत मराठींतील कांहीं पंचांगें, थोडीं कॅलेंडरें, क्वचित् कांहीं ग्रंथ अद्यापि चुकीच्या ठरलेल्या शिवजन्म-मितीचाच दुराग्रह धरून आहेत हें मोठें विचित्र आहे !

विशेषतः नवलाची गोष्ट कीं, वैशाखांतील मितीचे आधार कोणते म्हणून जेव्हां सरकारांत विचारले तेव्हां ती मिति चूक हेंच ज्या ग्रंथांत सांगितलेलें तेच त्या मितीचे आधारग्रंथ म्हणून पुढें मांडण्यांत आले ! ह्या प्रकाराला काय

म्हणावें !! सत्तेपुढें शहाणपण नाहीं तें हें असें. 'राजशेखरानीं' आपल्या 'काव्य-मीमांसेंत 'राजा कविः स्यात्' असें म्हणून एक स्वतंत्रच प्रकरण लिहिलें आहे; त्याचें स्मरण झालें. असो.

आम्हाला अद्याप भरपूर आशा आहे. कां, तर त्यांचें आमचें गणित म्हणून म्हणतात तें एक आहे. इतिहास-संशोधनाच्या प्रांतांत नव्या हातीं आलेल्या साधनांधारें जुन्या चुकीच्या गोष्टी जर आपण दुरुस्त करण्यास तयार नसलों तर संशोधन कशाला आणि इतिहास तरी कशाला ? इतिहासाप्रमाणें इतर कार्यक्षेत्रांतहि हाच न्याय आहे. चूक ही चूक आहे, हेंहि डोळसपणें आणि सावधपणानें, सावकाशीनें पूर्ण विचारान्तीं ठरवावयाचें आणि त्याची दुरुस्ती म्हणजे अमूक हेंहि तितक्याच किंवा त्याहीपेक्षां अधिक सावधानपणें ठरवावयाचें आणि ठरल्यानंतर तिच्या दुरुस्तीचीहि पद्धति आहे त्या पद्धतीनें चालून पण **चूक दुरुस्त झाली पाहिजे.** सध्यां ह्या प्रश्नापुरतें पाहतां केविलवाणी स्थिति आहे. नुकताच हाच बखरग्रंथ मित्रवर्यांकरवीं संपादित व प्रसिद्ध झाला त्यांत परिशिष्ट ९ म्हणून ही मितिचर्चा निराळ्याच रूपानें व पूर्ण विकृतपणें दिली आहे. त्यांतील सर्व उतारे घेऊन विकृतता कशी हें सांगण्याचें मुळींच कारण नाहीं. एकच उदाहरण देतों. श्री. वा. सि. बेंद्रे ह्यांनीं आपल्या ' संभाजी ' चरित्रांत शिवाजीराजांचा जन्मसन इ. १६३० हा पृ. १५ वर स्पष्टपणें (म्ह. १५५१ फा. व. ३) प्रसिद्ध केला. त्या बेंद्रे यांना त्याच शकाविरुद्ध ते आहेत हें सांगण्यासाठीं साक्षीदार केलें आहे. दुसरें उदाहरण श्रीमान् तात्यासो केळकर ह्यांचें. हे तर सर्वस्वीं इ. स. १६३० ह्या सनाशीं संमत. आणि तेच त्या वादांत न्यायाधीश करून त्यांजकडून ' जुनी (म्ह. १६२७ मधील) मिति चूक पण नवी मिति...आदा करतां येत नाहीं ' असें वदवून थोडीशी गंभीर चेष्टाच केली आहे. महाराष्ट्रांतील जाणत्या वाचकांसमोर प्रारंभीं दिलेल्या ग्रंथांतील ८८ पृष्ठें हा मूळ मजकूर त्यांत इतिहासाचार्य राजवाडे, लोकमान्य, कै. खरेशास्त्री, इतिहासाभ्यासी दत्तोपंत आपटे इत्यादींचें सर्व लेखन आलें आहे. त्याचा विचार करावा.

साठ वर्षें झालीं; राजवाडे यांनीं सदर मितीची चर्चा करून पंचमी त्यांतल्या त्यांत बरी असें सुचविलें. लोकांना व लोकांच्या पुढाऱ्यांना श्रीशिवाजीराजांच्या चरित्राकडे वळावयाचें होतें व त्यासाठीं जयन्त्युत्सवदिन पाहिजे होता. त्याच

संधीस राजवाडे यांनीं पंचमी (रोहिणी नक्षत्र) ही मिति सांगितली व ती सरदेसायांनींहि छापली. ही मिति लोकमान्यांच्या दृष्टीस पडतांच ज्योतिर्गणित दृष्ट्या त्यांतहि थोडा दोष आढळला. म्हणून त्यांनीं ते सर्व आधार मुळांतून स्वतः पाहिले व 'प्रतिपदा गुरुवार उत्तररात्र आश्विनी नक्षत्र' हा काल त्याहिपेक्षां कमी चुकीचा म्हणून 'केसरीद्वारां' सांगितलें. अर्थातच सर्वत्र द्वितीयेला शिवजन्मोत्सव सुरू झाले. सारांश, उत्सवांत द्वितीया आणि ग्रंथांत प्रथम पंचमी रूढ झाली ती ह्याप्रमाणें. ह्या दोघां विद्वानांनीं तेथेंच असेंहि लिहिलें कीं 'यद्यपि त्यानें (= शिवदिग्विजयकारानें) व मल्हाररामरावानें बनावट मिति देण्यास कमी केलें नाहीं. ... बनावट पुरावा तयार करणाऱ्यांना आपलें काम बेमालूम करण्याइतकें शास्त्रज्ञान प्रायः नसतें हें ती मनुष्यमात्राचें सुदैवच समजलें पाहिजे' ऐ. राजवाडेप्रस्तता. असा एक टोमणा मारला आहे. लोकमान्यांनीं राजवाडे ह्यांच्या आधारविवेचनांत थोड्या सूक्ष्मतेनें भर घातली. म्हणजे 'शिवदिग्विजयांतील एकाच अर्थाचे तीन श्लोक एका वेळचे नसावे असें सांगून, पहिल्या श्लोकांतील विधु=शब्दाची सप्तमी विधौ हीं गृहीत धरून (विधिशब्दाचीहि विधौ हीच सप्तमी होते) व त्याचा 'एक' ह्या संख्येसाठीं संस्कृतवाङ्मयांत सर्हा उपयोग होतो हें जाणून 'वैशाख शुद्ध प्रतिपदा' गुरुवार उत्तररात्र इ. वरीलप्रमाणें शिवजन्मकाल प्रकट केला (केसरी वर्ष २० अंक १७; २४-४-१९००) आणि त्याच अंकांतील अग्रलेखांत हें सुचविलें कीं 'आजच्या अंकांत उपस्थित केलेल्या वादाचा निकाल लागण्यास (संशोधन करून खऱ्या व पुऱ्या व गणितशुद्ध मिति साठीं) प्रयत्न केला पाहिजे व आणखी थोडा काळ गेला पाहिजे' हें लिहिलें. म्हणजे पंचमी तर नाहींच पण द्वितीयाहि तूर्त म्हणून स्वीकारली.

तात्पर्य, राजवाड्यांची पंचमी किंवा लोकमान्यांची रूढ द्वितीया ही, नापासांतला वरचा नंबर, ह्या नात्यानें स्वीकृत केली गेली होती. आणिं त्याचें मुख्य कारण हें कीं (पंचमी किंवा द्वितीया आतां पंचमी नको) द्वितीया ह्या मितीस शिवजन्म सांगणारा पूर्ण कालासह एकहि ग्रंथ नाहीं. शकाचा संवत्सराशीं मेळ नाहीं तर तिथीचा वाराशीं पत्ता नाहीं. वर्ष, संवत्सर, महिना, पक्ष, तिथि, वार ह्या सहा लक्षणांनीं युक्त तो शिवजन्मकाल. हा गणितशुद्ध पाहिजे. पण १७ हि आधारग्रंथांत एकाहि ग्रंथ असा नाहीं कीं जो एखादी मिति ह्या सहा लक्षणांनी व

अचुक सांगतो. **हे सर्व आधार स्वतःशीं कसे विसंगत आहेत; इतरांशींहि कसे विरोधी आहेत** ह्याची चर्चा प्रारंभीं दिलेल्या ' शिवचरित्र प्रदीप ' ह्या ग्रंथांत सर्व निर्दिष्ट आहे. सर्वहि आधारांचे तक्तेच तेथें दिले आहेत आणि त्यावरून आरशासारखा हा प्रश्न ग. द. वि. आपटे यांनीं अत्यंत विस्तृतपणें व सर्वांगांनीं विचार करून मांडला आहे. वाचकांना फिरून फिरून विनंती कीं ह्या ग्रंथांतील वरील पृष्ठांक वाचावे.

मध्यंतरीं मित्रश्रेष्ठ कै. प्रा. श्री. म. माटे ह्यांनीं ' वादकोश ' प्रसिद्ध करण्याचें योजून तशी माहिती जमविण्यास प्रारंभहि केला होता. त्यांत त्यांचा हेतु हा कीं, कोणचा वाद कोठपर्यंत आला आहे, त्यांतील मुद्दे कोणते व आधार काय तें दर्शित करावयाचें. म्हणजे पुनः पुनः त्याच त्याच गोष्टीची चर्चा, आपण नवीनच करतों आहों ह्या समजुतीनें करतों व काल वृथा जातो, तें नको. आग्रहानें कोणी पुनः तेंच तें मांडील हा भाग वेगळा. पण त्यामुळें नव्या वाचकांना हें कळावें कीं हें अमक्या ग्रंथांत आलेलें आहे व वाद एथपर्यंत आला आहे किंवा समाप्त झाला आहे. पण तें ग्रंथकार्य तसेंच राहिलें. तथापि तें अवश्य व्हावयास हवें. असो.

दुर्दैवानें श्रीशिवाजी राजांच्या चरित्राबाबत आणि राजवटीबाबत अद्याप हेंच चालू आहे. ' योद्धा ' ह्या नात्याची शिवाजीची कारकीर्द अपुरीची पुरी करण्यासाठीं संशोधन पाहिजे तें फार मंद दिसतें आणि ' शास्ता ' ह्या नात्याच्या त्यांच्या कालाला अद्याप फारसा हातच लागला नाहीं. जकाती कशा, जमीनमहसूल व द्विदलराज्यपद्धतींत वतन-चें वेतन ठरविलें त्याचें प्रमाण काय, कर व पट्या कोणत्या, देशक–सत्तेचें राजसत्तेशीं भांडण देशमुखांपुरतेंच कीं पाटीलाशींहि, इत्यादि इत्यादि; शिवकालीन पत्रांचे नेमके काल अद्याप द्यावयाचे आहेत. हें सर्व अभ्यासांत यावयाचें आहे. बखरग्रंथ पुनर्मुद्रित करीत असतांना ज्या हालचालींचा काल दर्शित नाहीं त्यांतील कितींचा आपणांस देतां येतो एवढेंच व त्या त्या ग्रंथांना अनुलक्षून पाहणें रूढ करावयाचें आहे. त्याशिवाय 'बखरग्रंथ' हे 'व्याकरणक्षम' आहेत; पण किती प्रकारांपुरतें व तें कसें मांडतां येतें हें पाहावयाचेंच आहे. (इच्छा आहे कीं

टीप : 'दत्तोपंत आपटे लेखसंग्रहांतहि' हा लेख दिला आहे. पृ. ६९–१०४ द. आ. स्मा. मं. भा. इ. सं. मं. पुणें.

अभ्यासक विद्वानांच्या शेजारीं बसून हो सेवा व्हावी. स्थळकाल व निवांतता लाभेल तसें करीत आहे. मजकडून मी स्वाध्यायांतच आहे. पहावें काय घडेल तें.)

प्रस्तुत कीं, शिवजन्माचाच वाद आम्ही लिहीत आहों व प्रकाशक भेटत आहेत. एकतरी साधन नवीन आहे काय अथवा जुन्यांत न निघालेला नवा मुद्दा तरी आहे काय ? तसेंच प्रस्तुत बखर ग्रंथाशीं त्याचा दृढसंबंध आहे काय ? इतकेंहि करून मूळ मुद्याला उत्तर नाहीं तें नाहींच. मुद्दा हा कीं 'वैशाख शुद्ध द्वितीया' हीं मिति सांगणाऱ्या ग्रंथांत वर्ष, संवत्सर वार इत्यादि सहा हीं लक्षणें ज्यांत बिनचुक गणित शुद्ध आहेत असा एक तरी साधनग्रंथ आहे काय ?' नाहीं. जर असतां तर राजवाडे व सरदेसाई यांनीं प्रथम पंचमी दिलीच नसती. असो, तेंच तें पुनः सांगण्यांत स्वारस्य नाहीं. आणि आक्षेपकांच्या मतपरिवर्तनासाठीं हें मीं लिहीतहि नाहीं. झालें तर उत्तमच. पण तो वाद-प्रतिवाद होऊन गेला आहे. अशा स्थितींत ज्या वाचकांना हा प्रश्न मुळांत कसा व तो कसा संपला, नव्या मितीचे आधार कोणते व किती; व ते बिनचूक कसे व म्हणून नापासांतला वरचा नंबर पाहणें इत्यादि नको; पूर्ण शिवजन्ममिति–वाक्य व तें कसें निर्दोष व पास मिति कोणती हें कळावें त्यासाठीं हे दोन शब्द लिहिले. *प्रतापगडच्या प्रसिद्ध व भव्य श्रीशिवरायाच्या पुतळ्यावर हीच मिती आहे.

तात्पर्य, असे कितीतरी कार्य महाराष्ट्रेतिहासाचें शिल्लक असतांना नवें साधन कांहीं हातीं नसतां तोच तो वाद पुनः पुनः पुढें यावा हें साक्षेपी जनतेचें लक्षण मुळींच नाहीं. प्रेसॲक्टमध्यें लेखकाबरोबर प्रकाशकांसहि जबाबदार कां धरलें हें अशा प्रसंगीं ध्यानांत येतें.

---

* ही मिति शक १५५१ फाल्गुन वद्य ३ = १६३० फेब्रु. १९ ही खरी आहे. बिकानेर-कुंडलीसंग्रहांतहि हीच मिति आहे.

* शिवनेरी गडावर शिवराजाचा जन्म झाला. तेथेंहि हाच जन्म सन दिला आहे.